नागपूर महानगरपालिकेची स्थगित सर्वसाधारण सभा **गुरुवार दिनांक २५/०३/२०२१ रोजी दुपारी १२.४५ वाजता** मुख्यालयातील स्व. डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृह, मनपा येथून दिनांक **१९/०३/२०२१ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयावर विचार करण्याकरिता महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचे पत्र क्र. कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/ नवि (१४) दि. ०३-०७-२०२० तसेच सचिवालय विभाग, मनपा कार्यालयाचे दि. ०३-०७-२०२० सूचना/परिपत्रक अन्वये Video Conferencing व्दारे आयोजित सभेचे कार्यवृत्त.**

## उपस्थित सदस्य

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| १. | **१९** | **ड** | **दयाशंकर चंद्रशेखर तिवारी** | **महापौर** |
| २. | **२३** | **ब** | **मनिषा आशिष धावडे** | **उपमहापौर** |
| ३. | १ | क | प्रमिला प्रितम मथरानी | सदस्या |
| ४. | १ | ड | विरेन्द्र उर्फ विक्की धनश्यामदास कुकरेजा | सदस्य |
| ५. | २ | ब | दिनेश बसंतलाल यादव | सदस्य |
| ६. | २ | ड | मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |
| ७. | ३ | अ | परसराम काशीनाथ मानवटकर | सदस्य |
| ८. | ४ | ब | शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य |
| ९. | ४ | क | मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या |
| १०. | ४ | ड | राजकुमार पुनाराम साहु | सदस्य |
| ११. | ५ | क | अभिरुची अनिल राजगिरे | सदस्या |
| १२. | ५ | ड | संजय अरुणराव चावरे | सदस्य |
| १३. | ६ | अ | जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| १४. | ६ | क | वैशाली अविनाश नारनवरे | सदस्या |
| १५. | ६ | ड | मो. इब्राहिम तॉफीक अहमद | सदस्य |
| १६. | ७ | अ | विरंका मुरलीधर भिवगडे | सदस्या |
| १७. | ७ | ब | शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| १८. | ७ | क | मंगला योगीराज लांजेवार | सदस्या |
| १९. | ८ | अ | आशा नेहरु उईके (आयेशा) | सदस्या |
| २०. | ११ | अ | संदीप चंद्रभान जाधव | सदस्य |
| २१. | ११ | ब | संगिता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| २२. | ११ | क | अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| २३. | १२ | क | हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| २४. | १३ | ड | वर्षा जयंत ठाकरे | सदस्या |
| २५. | १४ | क | कमलेश दिलीप चौधरी | सदस्य |
| २६. | १५ | अ | सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य |
| २७. | १६ | अ | लखन सुमेरा येरवार | सदस्य |
| २८. | १६ | क | तारा (लक्ष्मी) ओमप्रकाश यादव | सदस्या |
| २९. | १६ | ड | संदीप दिवाकर जोशी | सदस्य |
| ३०. | १८ | अ | प्रवीण प्रभाकर दटके | सदस्य |
| ३१. | २० | ब | यशश्री देवराम नंदनवार | सदस्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३२. | २० | क | रमेश गणपती पुणेकर | सदस्य |
| ३३. | २० | ड | दिपराज भैय्याजी पार्डीकर | सदस्य |
| ३४. | २१ | क | आभा विजयकुमार पांडे | सदस्या |
| ३५. | २२ | क | श्रध्दा विजय पाठक | सदस्या |
| ३६. | २४ | क | चेतना राजू टांक | सदस्या |
| ३७. | २५ | अ | जयश्री योगेश्वर रारोकर | सदस्य |
| ३८. | २५ | ड | दिपक मोतीरामजी वाडीभस्मे | सदस्य |
| ३९. | २६ | अ | धर्मपाल नत्थुजी मेश्राम | सदस्य |
| ४०. | २६ | क | मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| ४१. | २६ | ड | जितेंद्र धनराज कुकडे | सदस्या |
| ४२. | २७ | अ | तानाजी सुकलाजी वनवे | सदस्य |
| ४३. | २७ | ड | हरीश  सिताराम दिकोंडवार | सदस्य |
| ४४. | २८ | ब | मंगलाबाई प्रशांत गवरे | सदस्या |
| ४५. | २९ | अ | लिला अजय हाथीबेड | सदस्य |
| ४६. | २९ | क | भगवान भाऊराव मेंढे | सदस्य |
| ४७. | ३१ | ब | सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| ४८. | ३१ | क | शीतल प्रशांत कामडे | सदस्या |
| ४९. | ३३ | अ | वंदना भानुदास भगत | सदस्या |
| ५०. | ३४ | ब | राजेन्द्र विठ्ठलराव सोनकुसरे | सदस्य |
| ५१. | ३४ | क | माधुरी प्रवीण ठाकरे | सदस्या |
| ५२. | ३४ | ड | मंगला शशांक खेकरे | सदस्या |
| ५३. | ३५ | अ | संदीप रमेश गवई | सदस्य |
| ५४. | ३५ | ब | जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| ५५. | ३५ | क | विशाखा प्रकाश मोहोड | सदस्या |
| ५६. | ३५ | ड | अविनाश निलकंठ ठाकरे | सदस्य |
| ५७. | ३६ | अ | मिनाक्षी नितीन तेलगोटे | सदस्या |
| ५८. | ३६ | ब | पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या |
| ५९. | ३६ | ड | प्रकाश सिताराम भोयर | सदस्य |
| ६०. | ३७ | अ | प्रमोद हरिभाऊ तभाने | सदस्य |
| ६१. | ३७ | ब | सोनाली शालीक कडू | सदस्या |
| ६२. | ३७ | क | नंदा शरद जिचकार | सदस्या |
| ६३. | ३८ | ब | प्रफुल्ल विनोंदराव गुडधे | सदस्य |
| ६४. | ना.स. | | गांधी निशांत गिरीश | सदस्य |

## अनुपस्थित सदस्य

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| १. | १ | अ | महेन्द्रप्रसाद रमेश धनविजय | सदस्य |
| २. | १ | ब | सुषमा संजय चौधरी | सदस्या |
| ३. | २ | अ | भावना संतोष लोणारे | सदस्या |
| ४. | २ | क | नेहा राकेश निकोसे | सदस्या |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| ५. | ३ | ब | गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| ६. | ३ | क | भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| ७. | ३ | ड | खान नसीम बानो मो. इब्राहिम | सदस्या |
| ८. | ४ | अ | निरंजना महेश पाटील | सदस्या |
| ९. | ५ | अ | रिक्त | |
| १०. | ५ | ब | प्रवीण विलासराव भिसीकर | सदस्य |
| ११. | ६ | ब | वंदना राजू चांदेकर | सदस्या |
| १२. | ७ | ड | संदीप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| १३. | ८ | ब | रिक्त | |
| १४. | ८ | क | जिशानमुमताज मो. इरफान अंसारी | सदस्या |
| १५. | ८ | ड | भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य |
| १६. | ९ | अ | स्नेहा विवेक निकोसे | सदस्या |
| १७. | ९ | ब | संजय श्यामराव बुर्रेवार | सदस्य |
| १८. | ९ | क | ममता महेश सहारे | सदस्या |
| १९. | ९ | ड | नरेंद्र नत्थुजी वालदे | सदस्् |
| २०. | १० | अ | साक्षी विपीन राऊत | सदस्या |
| २१. | १० | ब | रश्मि निलमनी धुर्वे | सदस्या |
| २२. | १० | क | नितिश गंगाप्रसादर ग्वालबंशी | सदस्य |
| २३. | १० | ड | गार्गी प्रशांत चोपरा | सदस्या |
| २४. | ११ | ड | भूषण कृष्णराव शिंगणे | सदस्य |
| २५. | १२ | अ | दर्शनी स्वानंद धवड | सदस्या |
| २६. | १२ | ब | माया चिंतामन इवनाते | सदस्या |
| २७. | १२ | ड | विक्रम जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| २८. | १३ | अ | अमर हरीश बागडे | सदस्य |
| २९. | १३ | ब | रुतिका योगेश मसराम | सदस्या |
| ३०. | १३ | क | परिणिता परिणय फुके | सदस्या |
| ३१. | १४ | अ | शिल्पा इशांत धोटे | सदस्या |
| ३२. | १४ | ब | प्रमोद ताराचंद कौरती | सदस्य |
| ३३. | १४ | ड | प्रगती अजय पाटील | सदस्या |
| ३४. | १५ | ब | उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या |
| ३५. | १५ | क | रुपा शेखर राय | सदस्या |
| ३६. | १५ | ड | संजय अनंत बंगाले | सदस्य |
| ३७. | १६ | ब | वनिता सुनिल दांडेकर | सदस्या |
| ३८. | १७ | अ | विजय गोपालराव चुटेले | सदस्य |
| ३९. | १७ | ब | लता सुनिल काडगाये | सदस्या |
| ४०. | १७ | क | हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या |
| ४१. | १७ | ड | प्रमोद छत्रपाल चिखले | सदस्य |
| ४२. | १८ | ब | सुमेधा श्रीकांत देशपांडे | सदस्या |
| ४३. | १८ | क | नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| ४४. | १८ | ड | ऋषिकेश (बंटी) नारायण शेळके | सदस्य |
| ४५. | १९ | अ | संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| ४६. | १९ | ब | विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| ४७. | १९ | क | सरला कमलेश नायक | सदस्या |
| ४८. | २० | अ | शंकुतला वामन पारवे | सदस्या |
| ४९. | २१ | अ | ज्योती श्रीधर भिसीकर | सदस्या |
| ५०. | २१ | ब | नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य |
| ५१. | २१ | ड | महेश केशवराव महाजन | सदस्य |
| ५२. | २२ | अ | राजेश श्रावणजी घोडपागे | सदस्य |
| ५३. | २२ | ब | वंदना वसंतराव यंगटवार | सदस्या |
| ५४. | २२ | ड | मनोज केशवराव चापले | सदस्य |
| ५५. | २३ | अ | कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| ५६. | २३ | क | नरेंद्र (बाल्या) गोविंद बोरकर | सदस्य |
| ५७. | २३ | ड | दुनेश्वर सूर्यभान पेठे | सदस्य |
| ५८. | २४ | अ | अनिल शौकीलाल गेंडरे | सदस्य |
| ५९. | २४ | ब | सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| ६०. | २४ | ड | प्रदीप वसंतराव पोहाणे | सदस्य |
| ६१. | २५ | ब | पुरुषोत्तम नागोराव हजारे | सदस्य |
| ६२. | २५ | क | वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या |
| ६३. | २६ | ब | समिता राजेन्द्र चकोले | सदस्या |
| ६४. | २७ | ब | दिव्या दिपक धुरडे | सदस्या |
| ६५. | २७ | क | वंदना राजेश भुरे | सदस्या |
| ६६. | २८ | अ | किशोर रतनलाल कुमेरिया | सदस्य |
| ६७. | २८ | क | रेखा राजू साकोरे | सदस्या |
| ६८. | २८ | ड | विजय शंकरराव झलके | सदस्य |
| ६९. | २९ | ब | विद्या योगेश मडावी | सदस्या |
| ७०. | २९ | ड | स्वाती चंद्रकांत आखतकर | सदस्या |
| ७१. | ३० | अ | नागेश गोविंदराव सहारे | सदस्या |
| ७२. | ३० | ब | रिता अशोक मुळे | सदस्या |
| ७३. | ३० | क | स्नेहल सतीश बिहारे | सदस्या |
| ७४. | ३० | ड | संजय मधुकर महाकाळकर | सदस्य |
| ७५. | ३१ | अ | उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| ७६. | ३१ | ड | रविंद्र प्रभाकर भोयर | सदस्य |
| ७७. | ३२ | अ | अभय प्रल्हाद गोटेकर | सदस्य |
| ७८. | ३२ | ब | कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| ७९. | ३२ | क | रुपाली प्रशांतसिंह ठाकूर | सदस्या |
| ८०. | ३२ | ड | दिपक मारोतराव चौधरी | सदस्य |
| ८१. | ३३ | ब | भारती विकास बुंडे | सदस्या |
| ८२. | ३३ | क | विशाखा शरद बान्ते | सदस्या |
| ८३. | ३३ | ड | मनोजकुमार धोंडुजी गावंडे | सदस्य |
| ८४. | ३४ | अ | नागेश महादेव मानकर | सदस्य |
| ८५. | ३६ | क | लहुकुमार दत्तुजी बेहते | सदस्य |
| ८६. | ३७ | ड | दिलीप वामनराव दिवे | सदस्य |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| ८७. | ३८ | अ | उज्ज्वला वसंतराव बनकर | सदस्या |
| ८८. | ३८ | क | प्रणिता चंद्रप्रकाश शहाणे | सदस्या |
| ८९. | ना.स. | | अग्रवाल सुनिल जिवराज | सदस्य |
| ९०. | ना.स. | | पोकुलवार गणेश उर्फ (मुन्ना) रामन्ना | सदस्य |
| ९१. | ना.स. | | वानखेडे किशोर रामकृष्ण | सदस्य |
| ९२. | ना.स. | | जिचकार किशोर दामोदर | सदस्य |

**उपस्थित अधिकारी**

**श्री.राधाकृष्णन बी. निगम आयुक्त**

**डॉ.रंजना लाडे निगम सचिव**

सभेच्या कार्यवाहीस सुरुवात करण्यात आली.

महापौर :- मा.सदस्य, श्री प्रविणजी दटके आपण शेवटी जे बोलले ते कोणाला ऐकु न आल्यामुळे आपण पुन्हा उच्चारीत करावे.

श्री प्रविण दटके :- मा.महापौरजी, मा.आयुक्तांच्या निवेदनानंतर मला हे पत्र काल रात्री प्राप्त झाले, माझ्याकडे दोन तक्रारी आहे, ज्याच्या आयटी विभागाकडुन मी रितसर डेटा मिळवला आहे. माझी आपणांस विनंती आहे कि, या संबंधित विभागाचे जे विभाग प्रमुख असतील त्यांची तात्काळ आपण बदली करावी, किंवा त्यांना रजेवर पाठवावे आणि सभागृहाच्या काही ज्येष्ठ सदस्य आणि काही अधिकारी यांच्या माध्यमातुन पुढच्या सभागृहाच्याआधी या संपुर्ण रेव्हेन्युचे जे विभाग आहे एलबीटी, बाजार, स्थावर, टॅक्स या सगळया विभागाची त्या समितीकडुन निट चौकशी करावी, याचा आपल्या विकास कामाशी संबंध आहे, आपण महानगरपालिकेच्या कर्मचा-यांना सेवन पे दिला आहे, आपण त्यांची खबरदारी घेतो, त्यांची काळजी करतो, आणि हे सारे केल्यानंतर कर्मचा-यांकडुन अश्याप्रकारची या शहराच्या नागरिकांना वागणुक मिळत असेल तर महानगरपालिकेच्या रेव्हेन्युमध्ये घट निर्माण होत असेल तर या टॅक्समधुन आपण या कर्मचा-यांचा पगार करतो याची जाणीव सर्व कर्मचा-यांना राहणार नाही, ही बाब खेदजनक आहे. कारण कि काही कर्मचा-यांमुळे संपुर्ण महानगरपालिकेचे कर्मचारी बदनाम होत आहे. जे प्रामाणिकपणे काम करतात, त्यांना शिक्षा मिळत आहे, व जे असे घोटाळेबाजी करतात, त्यांना ॲवार्ड मिळत आहे. म्हणुन माझी आपणांस विनंती आहे कि, सभागृहाच्या ज्येष्ठ सदस्याची अधिकारी व सदस्यांची एक चौकशी समिती निर्माण करुन आपण पुढच्या सर्वसाधारण सभेच्याआधी याचा अहवाल आपल्या पटलावर बोलवावा, तोपर्यंत या विभागाचे संबंधित अधिकारी यांची एकतर बदली करावी किंवा त्यांना सक्तीच्या रजेवर पाठवावे ते जर दोषी असतील तर त्यांच्यावर कार्यवाही करावी, नसेल तर त्यांना परत कामावर बोलवावे हे जर आपण केले नाही तर नागपूर शहराच्या विकास कामावर परिणाम होईल. आणि महानगरपालिकेला याच्यातुन मोठया अडचणीत जावे लागेल, त्यामुळे माझी आपल्याला विनंती आहे कि, सभागृहाच्या माध्यमातुन आपण चौकशी समिती स्थापण करुन त्या अधिका-याला बाजुला करुन या विषयाची निष्पक्षपणे चौकशी या समितीच्या माध्यमातुन करुन घ्यावी, अशी माझी आपणांस विनंती आहे. त्या समितीसमोर आम्हा सगळयांना बोलवावे आमच्या जवळ जे काही पुरावे असतील, आम्ही आपली बाजु मांडु आणि त्या अधिका-यांची बाजु समितीने ऐकुण घ्यावी, याकरिता निष्पक्ष एक समिती करावी, अशी माझी

आपणांस विनंती आहे.

महापौर :- मा.सदस्यांनी आपले निवेदन केले, प्रशासनानी सुध्दा आपले निवेदन केले, या विषयाच्या संदर्भात मा.आयुक्त महोदय निवेदन करु इच्छितात, त्यांनी निवेदन करावे.

निगम आयुक्त :- मा.महापौरजी, मी मघाशी या विषयाच्या संदर्भात सांगीतले आहे, परत सांगु इच्छितो कि, हा कंप्लीट प्रशासकीय विषय आहे प्रशासनाने या विषयाची दखल घेतलेली आहे, या अनुषंगाने एक दोन लोकांची चौकशी झालेली आहे. आम्ही याच्यामध्ये डिटेल चौकशी करणार आहे, प्रशासनाव्दारे या प्रकरणाची चौकशी करुन सभागृहासमोर डिटेल सादर करण्याची परवानगी देण्यांत यावी.

श्री प्रविण दटके :- मा.महापौरजी, एकटया प्रशासनाच्या चौकशी समितीवर आमचा विश्वास नाही, या प्रकरणाच्या संदर्भात अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांची एकत्रित समिती असावी. मी आपणांस सांगु इच्छितो कि प्रशासन याबाबतीत योग्य ती कार्यवाही करीत नाही, असा आमचा समज आहे. मी पत्र दिल्यानंतर दीड महिना यावर कोणतीही कारवाई झाली नाही येवढे दिवस प्रशासन झोपला होते काय ? मा.महापौरजी, ज्या कर्मचा-यांनी सुमुटो सायबर सेलला तक्रार केली त्या कर्मचा-यांला यांनी सस्पेंड केले. कोणते कर्मचारी कोणकोणत्या दिवशी कोणत्या वार्डामध्ये फिरत होते त्याचा तक्ता दिला, मा.महापौरी, जे रिटायर्ड झाले, ज्यांची बदली झाली, त्यांचा युजर आयडी आणि पासवर्ड वापरुन हया कर्मचा-यांनी टॅक्समध्ये घोटाळा केला आहे. त्यामुळे आपण सभागृहाच्या मा.सदस्यांची व अधिका-यांची एकत्रित समिती तयार करुन पुढच्या सभागृहाच्या आंत या सर्व रेव्हेन्यु विभगाची चौकशी लावावी, यात अधिका-यांना घ्यावे, अतिरिक्त आयुक्तांना सुध्दा या समितीचे सदस्य करावे, पण लोकप्रतिनिधी व अधिकारी यांची एकत्रित समिती केल्याशिवाय या प्रकरणाची निट चौकशी होणार नाही, असा माझा मत आहे. मी आपणांस विनंती करतो कि संबंधित अधिका-यांची बदली करुन किंवा त्यांना सक्तीच्या रजेवर पाठवुन जोपर्यंत चौकशी होत नाही, आणि चौकशी अंती तो अधिकारी दोषी असेल तर त्याच्यावर कार्यवाही करण्यांत यावी आणि जर तो अधिकारी दोषी नसेल तर त्यांना परत कामावर घ्यावे, या संदर्भात आापण योग्य तो निर्णय घ्यावा अशी माझी आपणांस विनंती आहे.

महापौर :- मा.सदस्य, श्री प्रविणजी दटके यांनी जो विषय मांडला आहे, तो विषय अत्यंत गंभीर आहे, या विषयाची दोन बाजु आहे, प्रथम बाजु अशी आहे कि, एका माणसांनी आपला पासवर्ड दुस-या माणसाला सांगावयास नको, ही त्या माणसाची चुक आहे.जो माणुस आपला पासवर्ड दुस-या माणसाला सांगतो आणि त्याचा गैरवापर होते, आणि ज्यांनी गैरवापर केला त्याची तर चुक आहेतच, ही चुक कोणी केली, कोणामुळे हे प्रकरण घडले या सर्वांचा निष्कर्श समितीच्या अहवालातुन येईलच, परंतु खरे म्हटले तर महानगरपालिकेच्या रेव्हेन्युचा मोठया प्रमाणात नुकसान दिसत आहे. मा.सदस्यांचे म्हणणे आहे की सभागृहाची चौकशी समिती बनवुन याची जांच करणे आवश्यक आहे आणि याच्यात आयुक्तांचे वेगळे म्हणणे आहे, मी आयुक्तांना असे निर्देश देतो कि, ही सर्व चौकशी करीत असतांना जो संबंधित अधिकारी त्या पदावर बसला आहे, त्याचा हस्तक्षेप या चौकशीत कुठे ही होता कामा नये, यादृष्टीने आयुक्तांनी समोरचे पाऊल उचलावे. या विषयाची चौकशी करण्याकरिता सभागृहाची तीन सदस्यांची समिती घोषित करण्यांत येत आहे, कर आकारणी व कर संकलन समितीचे सभापती, उपसभापती आणि मालमत्ता कराशी संबंधित अतिरिक्त आयुक्त या तीन सदस्यीय समितीने याची संपुर्ण चौकशी करुन जी तक्रार आपण सायबर सेलला केलेली आहे, त्यांच्याकडुन ही मदत घेवुन संपुर्ण चौकशीचा अहवाल पुढच्या सभागृहाच्या पूर्वी सभागृहाच्या पटलावर मांडावा, असे मी या सभागृहाच्या माध्यमातुन प्रशासनाला निर्देश देतो.

महापौर:- प्रश्नोत्तराला सुरुवात करु या.

**प्रश्न क्र २२५** :- त्रिशरण नगर ते जीवन छाया ले-आऊट (प्रभाग क्र. ३७ ड) संदर्भातील प्रश्न

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

श्री.हरीश ग्वालबंशी :- मा.महापौरजी, केंद्र शासन के अधिकारी वर्ग की अगर कोई गलती हुयी तो हम केंद्र सरकार को दोषी मानते है, राज्य शासन के अधिकारी वर्ग की अगर कोई गलती हुयी तो राज्य सरकार को दोषी मानते है और जो महानगरपालिका मे जो भ्रष्टाचार हुवा तो क्यौ न सत्ताधारी भाजप पार्टी को दोषी माना जायें।

महापौर :- मा.सदस्यगण प्रश्न के उपर चर्चा किजीयें।

श्री.हरीश ग्वालबंशी :- मा.महापौरजी, मेरा प्रश्न यह था की अधिकारी व कर्मचा-यांकडुन लेखणी बंद आंदोलन होते ते लेखणी बंद आंदोलन कोणत्या कारणामुळे करण्यात आले होते त्या संदर्भात माहिती देण्यात यावी.

महापौर :- प्रशासनाने उत्तर दयावे.

उपायुक्त (श्री.निर्भय जैन) :- मा.महापौरजी, सन्माननिय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्या अनुषंगाने महानगरपालिकेत दिनांक १३/०७/२०२० रोजी मनपा अधिकारी सहा.संचालक, नगररचना यांची एका सन्माननिय सदस्यांसोबत टेलीफोनवर बोलचालीच्या अनुषंगाने लेखणीबंद आंदोलन करण्यात आले हाते आणि सदर आंदोलनाच्या अनुषंगाने सर्व अधिकारी कर्मचारी यांनी आपआपल्या हजर होते मनपा च्या कामकाजावर त्याचा परिणाम झालेला नाही.

श्री.हरीश ग्वालबंशी :- मा.महापौरजी, यह जो लेखणीबंद आंदोलन किया गया था तो उसमे मा.सदस्य की गलती थी क्या ? ऐंसा कोणता कृत्य मा.सदस्य ने किया था जिसकी वजह से नागपूर महानगरपालिका के अधिकारी / कर्मचारीयोंको लेखणी बंद आंदोलन करना पडा, ऐंसा क्या किया था मा.सदस्य ने, और वह सदस्य का नाम क्या है ?

महापौर :- प्रशासनाने उत्तर दयावे.

उपायुक्त (श्री.निर्भय जैन) :- मा.महापौरजी, मा.सदस्यांची अधिका-यांसोबत दुरध्वणीवर बोलचाल झाली होती त्या अनुषंगाने सहा.संचालक, नगररचना यांनी मा.आयुक्तांकडे निवेदन दिले होते की सन्माननिय सदस्यांनी माझ्यासोबत दुरध्वनीवर बाचाबाची झालेली आहे त्या अनुषंगाने संबंधित कर्मचारी वर्गकडुन व अधिकारी वर्गाकडुन हे आंदोलन करण्यात आले होते.

श्री.हरीश ग्वालबंशी :- मा.महापौरजी, जो सदस्य के साथ मे वार्तालाप हुयी थी वह सदस्य का क्या नाम था और वह अधिकारी का क्या नाम था।

उपायुक्त (श्री.निर्भय जैन) :- मा.महापौरजी, मा.प्रविणजी दटके व तत्कालीन सहा.संचालक श्री.गावंडे यांच्यासोबत दुरध्वनीवर झालेल्या बोलचाली संदर्भात आंदोलन करण्यात आले होते त्या संदर्भात ही पार्श्वभुमी आहे.

श्री.हरीश ग्वालबंशी :- मा.महापौरजी, दुरध्वनीपर जो संवाद हुवा था वह संवाद मे सदस्य की गलती थी क्या ?

उपायुक्त (श्री.निर्भय जैन) :- मा.महापौरजी, संवादाचा सविस्तर तपशील आमच्याकडे उपलब्ध नाही. परंतु सन्माननिय सदस्यांसोबत जी काही बाचाबाची झाली होती त्या अनुषंगाने संबंधित अधिका-यांनी मा.आयुक्तांकडे व वेगवेगळया अधिका-यांकडे ती बाब नमुद केली होती त्या अनुषंगाने हे आंदोलन झाले होते. दोघांमध्ये जे संवाद झाला होता त्याबाबत आमच्याकडे कुठलाही डेटा आमच्याकडे उपलब्ध नाही.

श्री.हरीश ग्वालबंशी :- मा.महापौरजी, जो विषय था वह मा.सदस्य का निजी था की जनहित का था

महापौर :- प्रशासन के पास डेटा उपलब्ध नही है इसलिये नही बता पायेंगे

उपायुक्त (श्री.निर्भय जैन) :- मा.महापौरजी, त्याबाबत आमच्याकडे तपशील उपलब्ध नाही.

श्री.हरीश ग्वालबंशी :- मा.महापौरजी, आपसे विनंती है की आनेवाली मिटींग मे वह पुरा तपशील रखीये

उपायुक्त (श्री.निर्भय जैन) :- मा.महापौरजी, संबंधित अधिका-यांची त्या कार्यालयातुन बदली झालेली आहे. सध्या ते अधिकारी कार्यरत नाही.

श्री.हरीश ग्वालबंशी :- मा.महापौरजी, अधिकारी नही है तो क्या हुवा आनेवाली मिटींग मे वह पुरा तपशील रखना चाहियें

श्री.धर्मपाल मेश्राम :- पॉइंट ऑफ ऑर्डर मा.महापौरजी, सन्माननिय सदस्य जो काही प्रश्न करीत आहे त्याचा कुठलाही संदर्भाने आजतारखेमध्ये महानगरपालिकेच्या विकास कामांच्या संदर्भाने बोलायचे नाही आणि अशा प्रकारचे प्रश्न विचारुन महानगरपालिकेच्या कामकाजामध्ये खोळंबा होत आहे. माझी आपणांस विनंती आहे की या प्रश्नाला याच ठिकाणी संपविण्यात यावे.

श्री.हरीश ग्वालबंशी :- मा.महापौरजी, यह अगर कृत्य विपक्ष का नगरसेवक ने किया होता तो उसके उपर एफ.आय.आर. दर्ज होता है यह सही है क्या।

महापौर :- मा.सदस्य आप रेफरन्स दिजीये, आपके पास नाम होंगा तो बतायें, नही तो प्रशासन के पास बहोत सारे ऐंसे नाम है जिनमे सत्तापक्ष के नगरसेवक भी है। आप प्रशासन को नाम पुछ रहे तो Es आपको पुछ रहा हु की किसपर गुन्हा दाखल हो रहा आप नाम बताये, मोघम मे मत बोलिये।

**<u>प्रश्न क्र २२६</u>** :- प्रभाग क्र ३१ अंतर्गत रेशीमबाग जलकुंभ व बुधवार बाजार जलकुंभ यामध्ये किती एम.एल.डी. पाणी संदर्भात प्रश्न

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

**<u>प्रश्न क्र २२७</u>** :- सन २०२०-२१ च्या मनपा अर्थसंकल्पामध्ये मलजल वाहिणीसाठी व गडर चेंबरसाठी किती निधी उपलब्ध होता व किती निधी खर्च झाला ? संदर्भात प्रश्न

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

**<u>प्रश्न क्र २२८</u>** :- भोलागणेश चौक ते गजानन चौक, रेशीमबाग ते मेडीकल चौक मंजूर असलेले सिमेंट रोडच्या कामाची स्थिती काय ? संदर्भात प्रश्न

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

**<u>प्रश्न क्र २२९</u>** :- गोरेवाडा जंगल मनपा कडुन फॉरेस्ट / वनविभागाला हस्तांतरण बाबत अटी व शर्ती संदर्भात माहिती प्रश्न

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

श्री.हरीश ग्वालबंशी :- मा.महापौरजी, अपना जो गोरेवाडा जंगल है वह महानगरपालिका के हद्दी मे था लेकीन १९८९ के बाद मे महानगरपालिका ने वह फॉरेस्ट डिपार्टमेंट को हस्तांतरीत किया, तो जब महानगरपालिका के हद मे वह गोरेवाडा जंगल था तो वहापर कितने सार्वजनिक स्थल थे उसकी जानकारी प्रशासन से होना।

महापौर :- प्रशासनाने उत्तर दयावे.

उपायुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :- मा.महापौरजी, सन्माननिय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नामध्ये मौजा गोरेवाडा १८३१.६६ हेक्टर जमिन ही ६/१०/१९९० ला ही उपविभागीय अधिकारी, वन विभाग, नागपूर यांना ताबा दिला आहे. आणि ही जी जागा होती ती गोरेवाडा पानलोट क्षेत्र होते हे कलेक्टर ऑफीसचे जे उपविभागीय अधिकारी आहे त्यांनी हॅन्डओव्हर केलेली आहे. आणि २०१८ ला महाराष्ट्र शासन २५.७० हेक्टर आर जागा उप

वननिरीक्षक यांना हस्तांतरीत केलेली आहे. म्हणजे ही जरी जागा नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील होती व आपल्या व्यवस्थापनात आली होती त्या जागेची मालकियत कलेक्टर विभागाची होती म्हणजेच महाराष्ट्र शासनाची होती. शासनानी वन विभागाला हस्तांतरीत केलेली आहे.

श्री.हरीश ग्वालबंशी :- मा.महापौरजी, इसमे मेरे प्रश्न का उत्तर नही है। मेरा प्रश्न यह था गोरेवाडा जंगल मे कितने हनुमान मंदीर थे, कितले भगवान राम के मंदीर थे, कितने सार्वजनिक मंदीर थे इसकी जानकारी प्रशासन से होना था।

उपायुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :- मा.महापौरजी, मालकीयत महाराष्ट्र शासनाची असल्यामुळे सदरहु जागेत किती मालमत्ता होत्या किंवा तेथे किती धार्मिक स्थळे होती हया बाबतची माहिती स्थावर विभागाकडे उपलब्ध नाही.

श्री.हरीश ग्वालबंशी :- मा.महापौरजी, तो जानकारी कहा से मिलेंगी।

महापौर :- प्रशासन ने उत्तर दिया है की उस जगह की मलकीयत महाराष्ट्र शासन की है इसलिये इस विषय की जानकारी हमारे पास नही है।

श्री.हरीश ग्वालबंशी :- मा.महापौरजी, वहापर महानगरपालिका कर्मचारीयों की वसाहत है, वहापर कर्मचारी रहते है वहापर प्राचीन मंदीर थे उसकी जानकारी प्रशासन के माध्यम से दिया जायें।

उपायुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :- मा.महापौरजी,संबंधित सन्माननिय सदस्यांचा विषय असा होता की, गोरेवाडा जंगल मनपा कडुन फॉरेस्ट विभागाला अटी व शर्तीच्या अधीन राहुन हस्तांतरीत करण्यात आले परंतु हस्तांतरण आपण केलेच नाही. तदनंतर दुसरा प्रश्न सन्माननिय सदस्यांचा असा होता की, गोरेवाडा जंगलामध्ये धार्मिक स्थळाची माहिती उपलब्ध करुण देणे या अनुषंगाने विभागातर्फे असे उत्तर देण्यात आले आहे की, गोरेवाडा संबंधित क्षेत्र हे जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन वन विभागाला हस्तांतरीत झालेले असल्यामुळे सध्यस्थितीत धार्मिक स्थळाची माहिती स्थावर विभागाकडे उपलब्ध नाही.

महापौर :- संबंधित अधिकारीयों के पास उस संदर्भ मे कोईभी जानकारी नही है ऐंसा उन्होने बताया है।

श्री.हरीश ग्वालबंशी :- मा.महापौरजी, वहापर महानगरपालिका कर्मचारीयोंकी वसाहत है क्या ? और वहापर कितीने क्वॉटर्स है।

उपायुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :- मा.महापौरजी, वहापर कर्मचारी वसाहत है लेकीन वहापर कितने वसाहत है उसकी जानकारी मै लिखीत स्वरुप मे आपको मंगळवार तक दुंगा। मा.सदस्य की अनुमती से मै पुरा प्रश्न पढ रहा हु, मा.सदस्य ने प्रश्न पुछा था १३/१०/२०२० को उपरोक्त विषयाकींत पत्रान्वये आपणांस कळविण्यात येते गोरेवाडा जंगलामध्ये मनपा कडुन फॉरेस्ट विभागाला कोणत्या अटी व शर्तीच्या अधीन राहुन हस्तांतरीत करण्यात आले. गोरेवाडा जंगलामध्ये धार्मिक स्थळाची व संपुर्ण अटी व शर्तीची संपुर्ण माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. हा मुळ प्रश्न मा.सदस्यांचा होता.

**<u>प्रश्न क्र २३०</u>** :- त्रिशरण नगर ते जीवन छाया ले –आऊट (प्रभाग क्र ३७ ड) पर्यत ट्रंक सिव्हर लाईनचे काम मागील ३ ते ४ वर्षापासून सुरु आहे. संदर्भात प्रश्न

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

श्री.दिलीप दिवे :- मा.महापौरजी, मी माझ्या प्रभागातील त्रीशरण नगर पासून ते जिवन छाया लेआउट पर्यत २०१६ मध्ये सुरु झालेल्या कामाच्या संदर्भात प्रश्न टाकला होता या प्रश्नामध्ये मला श्वेता बॅनर्जी मॅडमने उत्तर दिलेले आहे. ते संपुर्णत: चुकीचे दिलेले आहे. बॅनर्जी मॅडमने जे उत्तर मला दिलेले आहे त्यांना मी प्रश्न विचारु इच्छितो की त्यांनी या कामाची पहाणी केली की नाही या संदर्भात माहिती देण्यात यावी.

महापौर :- प्रशासनाने उत्तर दयावे.

कार्यकारी अभियंता (श्रीमती श्वेता बॅनर्जी ) :- मा.महापौरजी, यह सही है की यह ऐरिया की पहाणी मैने नही की है l

श्री.दिलीप दिवे :- मा.महापौरजी, संबंधीत अधिका-यांनी पहाणी केली नाही तर यांनी उत्तर कसे दिले.

कार्यकारी अभियंता (श्रीमती श्वेता बॅनर्जी ) :- मा.महापौरजी, यह सिव्हर लाईन के काम के बारे मे है और यह जो मैने माहिती दि है वह लक्ष्मीनगर झोन से मंगवाई है क्यौकी मुझे ही साईन करना था l यह विषय सिव्हर लाईन का है पहले यह विषय ट्रान्सपोर्ट डिपार्टमेंट के नियाजी साहब काम देखते थे, यह काम पी.एच.ई डिपार्टमेंट को हस्तांतरी हुवा २०१९ मे लेकीन यह काम के फाईल हमे नही मिले, यह फाईल डिसेंबर मे लक्ष्मीनगर झोन के गुरुबक्षानी साहब को मिले थे, सन्माननिय सदस्य ने जो मुद्या उपस्थित किया है वह बिलकुल सही है की २०१६ से लेकर वह काम पुरा क्यौ नही हुवा है इसपर जो मुझे जानकारी मिली है पेमेंट जो है उसमे ११ कोटी मे से १० कोटी का पेमेंट हो चुका है मतलब ९२ परसेंट पेमेंट हो चुका है l रिमेनिंग मे एन्क्रोचमेंट का ऐरिया है वहापर पाईप लाईन डालना है मैने उनको ब्लॅकलिस्ट करने के पहले जो नोटीस देनी पडती है वह नोटीस ऑलरेडी एजन्सी को दे दिया है l

श्री.दिलीप दिवे :- मा.महापौरजी, ब्लॅकलिस्ट करने के बारे मे जो बोला है उसके पहले साईड व्हीजीट करना जरुरी है की नही है l ९२ परसेंट पेमेंट हो चुका है उतना काम अपना हुवा की नही, उतना काम ही नही हुवा और ठेकेदार को पेमेंट इशु कर दिया, पेमेंट हुवा की नही देखना यह किसका काम है l

कार्यकारी अभियंता (श्रीमती श्वेता बॅनर्जी ) :- मा.महापौरजी, जबसे यह विषय पी.एच.ई डिपार्टमेंट के पास आया है तबसे पेमेंट नही हुवा, यह जो काम था वह नियाजी साहब देखते थे, उनके पास जो डाक्युमेंट थे तो वहीपर ही पेमेंट हो चुका है l

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, विषय अतिशय गंभीर आहे. ९२ टक्के काम झाले आहे असे प्रशासनाचे म्हणणे आहे आणि मा.सदस्यांचे म्हणणे आहे की तेवढे काम झालेले नाही. हा चौकशीचा मुद्या आहे. सार्वजनिक अभियांत्रिकी यांत्रिकी विभाग हा विभाग बॅनर्जी मॅडमकडे आहे त्यांचे काम होते त्या साईडवर जाऊन चेकींग करणे, आणि दुसरा विषय म्हणजे कंत्राटदाराला ब्लॅकलिस्ट करण्याचा तर काम पुर्ण करण्याची जबाबदारी कोणाची आहे. तेथील नागरिकांना त्या सुविधा दयायच्या आहे तर त्या आपण देऊ शकु काय ? त्याचे उत्तर प्रशासनाने दयावे.

कार्यकारी अभियंता (श्रीमती श्वेता बॅनर्जी ) :- मा.महापौरजी, जबसे यह विषय पी.एच.ई डिपार्टमेंट को आया है तबसे हम उस विषय का फॉलोअप कर रहे है और उसके बाद कोव्हीड के वजह से लोग नही थे और हमारे यहापर जे.ई. और डेप्टी इंजिनिअर कोव्हीड मे बिमार पड गये थे इसके लिये वहापर जाना पॉसिबल नही हुवा l

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, २०१९ पुर्वी हे डिपार्टमेंट कुणाकडे होते.

कार्यकारी अभियंता (श्रीमती श्वेता बॅनर्जी) :- मा.महापौरजी, २०२० के पहले यह का जो था वह एस.ई. पी.डब्लु.डी. के पास मे था और पर्टीकुलर यह जो काम था वह ट्रान्सपोर्ट डिपार्टमेंट के नियाजी साहब देखते थे l

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, करोडो रुपयांचे काम आहे आणि सन्माननिय अधिकारी गेल्या वर्षभरापासुन एकही व्हीजीट मारत नाही. हा विषय अतिशय गंभीर आहे. गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्राने जो पैसे दिलेला आहे ते काम आहे त्या बिलांना यांना सर्टीफाय करायचे आहे आणि त्या अधिका-यांची अजुनपर्यत त्या कामाला व्हीजीट झालेली नाही आणि झोनकडुन जे आले ते मी मान्य केले आणि त्यावर सही केली. इतरत्र कामांच्या फाईलवर तर खुप लिहले जाते मग हेच काम कसे मान्य केले व्हीजीट न करता.

कार्यकारी अभियंता (श्रीमती श्वेता बॅनर्जी) :- मा.महापौरजी, बिल मैने नही निकाला, मेरे तरफ से कोई भी

पेमेंट नही हुवा है।

महापौर :- सन्माननिय सदस्यांनी प्रश्न विचारल्यानंतर जेव्हा आपण उत्तर दिले त्या पुर्वी त्या कामाची संपुर्ण शहानिशा करुन घेणे आपली जबाबदारी आहे किंवा नाही.

कार्यकारी अभियंता (श्रीमती श्वेता बॅनर्जी) :- मा.महापौरजी, है

महापौर :- मग आपण आपली जबाबदारीचे पालन केले नाही हे येथे एस्टॅब्लीश होत आहे.

कार्यकारी अभियंता (श्रीमती श्वेता बॅनर्जी) :- मा.महापौरजी, मुझे यहापर एक बात कहना है की मेरे पास पाच छे डिपार्टमेंट है तो मै हर तरफ कैसे जाऊंगी।

महापौर :- आप इस्तीफा दे दे

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी हा पॉइंट येथे नोट केला पाहिजे की एकटया बॅनर्जी मॅडमच येथे सक्षम आहे काय ? बाकी अधिकारी सक्षम नाही काय, त्यांनी स्वत: कबुल केले की त्यांना जाता येत नाही तरी सुध्दा त्यांना सर्वच्या सर्व डिपार्टमेंट दयायचे.

कार्यकारी अभियंता (श्रीमती श्वेता बॅनर्जी) :- मा.महापौरजी, डिपार्टमेंट मेरे तरफ क्यौ है इसका उत्तर मै नही दे सकती.

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी आपने बोला की प्रशासन ने उत्तर दे तो इसका उत्तर आयुक्त महोदय ने देना चाहिये।

निगम आयुक्त :- सन्माननिय महापौर महोदय, या विभागाचे अधिकारी जे होते तालेवार ते सध्या कोव्हीड पॉझिटीव्ह आहे. हे काम सर्व जुने आहे या कामामध्ये ब-यापैकी पेमेंट झाले आहे. ते काम समाधानकारक पणे झाले नाही असे सन्माननिय सदस्यांचे म्हणणे आहे. या प्रकरणाची प्रॉपर शहानिशा करुन श्री तालेवार रुजु झाल्यानंतर अधिका-यांनी त्याची चौकशी करावी तदनंतर टेक्नीकली काम कसे पुर्ण करता येईल त्याप्रमाणे ते तपासावे जर ते होत नसेल तर कंन्सर्न एजन्सीवर कारवाई करुन केलेली कार्यवाही सन्माननिय सदस्यांना व सभागृहाला अवगत करावी.

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी आयुक्त महोदयांनी या कामांच्या संदर्भात सांगितले त्या बद्ल काही बोलायचे नाही परंतु संबंधित अधिका-यांकडे अधिक विभाग असल्यामुळे ते कमी करुन काही विभाग सक्षम अधिका-यांकडे दयावे अशी मी विनंती करतो.

निगम आयुक्त :- मा.महापौरजी, त्यांच्याकडे सध्या एस.ई. चार्ज नाही आहे ते फक्त कार्यकारी अभियंताचा चार्ज पाहत आहे. आणि एस.ई वर आणखी सी.ई. मॅडम सुध्दा आहे.

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, मला प्रशासनाला प्रश्न विचारायचा आहे की श्वेता बॅनर्जी मॅडमला गव्हर्नमेंटनी कुठल्या कामासाठी पाठविले आहे.

उपायुक्त (श्री.निर्भय जैन) :- मा.महापौरजी, श्रीमती बॅनर्जी यांची नियुक्ती कार्यकारी अभियंता, जलप्रदाय या पदावर शासनाकडुन करण्यात आलेली आहे.

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, मला कोणाच्या क्वॉलिफीकेशनवर प्रश्न विचारणे योग्य वाटत नाही पण ज्या अधिका-यांना जलप्रदाय विभागाकरीता शासनाने पाठविले त्या अधिका-यांना आय.टी. ची सुध्दा जबाबदारी त्याच अधिका-यांना सामाजिक यांत्रिकी विभागाची सुध्दा जबाबदारी, त्याच अधिका-यांना मधल्या काळामध्ये अकाऊंट सेक्शनमध्ये काम करण्याची सुध्दा जबाबदारी, असे कुठले प्रेम आहे प्रशासनाचे की त्यांना सगळेच्या सगळे विभाग दयायचे आणि नागपूर महानगरपालिकेचे जे सक्षम अधिकारी आहे. गेल्या अनेक वर्षापासून या विभागामध्ये काम करीत आहे व नागपूर शहरातील जनतेला लाभ देण्याचा प्रयत्न करीत आहे त्यांना डावलुन फक्त मॅडमला जबाबदा-या दयायच्या याच्यामध्ये प्रशासनाची काय भुमिका आहे ते प्रशासनाने

समजाऊन सांगावी.

उपायुक्त (श्री.निर्भय जैन) :- मा.महापौरजी, अकाऊंट विभागाची जबाबदारी मॅडमकडे देण्यात आलेली नाही. सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकीचा चार्ज देण्यात आलेला आहे.

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, अकाऊंट विभागाचा चार्ज या अगोदर देण्यात आलेला आहे अशी माझ्याकडे माहिती आहे.

उपायुक्त (श्री.निर्भय जैन) :- मा.महापौरजी, अकाऊंट विभागाची कोणतीही जबाबदारी बॅनर्जी मॅडम यांच्याकडे देण्यात आलेली नाही. या पुर्वी सुध्दा देण्यात आलेली नव्हती. त्यांच्याकडे फक्त आय.टी. विभागाचा अतिरिक्त प्रभार देण्यात आलेला आहे.

महापौर :- आय.टी. चे काही क्वॉलिफीकेशन आहे काय मॅडमकडे.

कार्यकारी अभियंता (श्रीमती श्वेता बॅनर्जी) :- मा.महापौरजी, माझ्याकडे आय.टी. चे कोणतेही क्वॉलिफीकेशन नाही.

महापौर :- कारण की एक वर्ष झाले तरी सुध्दा आपण मुलांना टॅब देऊ शकलो नाही.

कार्यकारी अभियंता (श्रीमती श्वेता बॅनर्जी) :- मा.महापौरजी, टॅब मेरे तरफ नही है, वह विषय शिक्षण विभाग से संबंधित है I

महापौर :- प्रशासनाने सांगावे की मॅडमला आय.टी. विभाग देण्यामागची भुमिका काय आहे.

उपायुक्त (श्री.निर्भय जैन) :- मा.महापौरजी, हा विभाग तत्कालीन आयुक्तांनी मॅडमकडे हा प्रभार सोपविण्यात आलेला आहे त्यांचे इंजिनिअरींग बेस असल्यामुळे त्यांच्याकडे या विभागाचा प्रभार सोपविण्यात आला होता आणि अधिका-यांची कमतरता असल्यामुळे सुध्दा हा निर्णय घेण्यात आला होता.

महापौर :- आपली आवाज आपल्यापर्यत पोहचत नव्हती ते आय.टी. विभागाची चुक आहे तर आपण असे समजायचे काय की त्यांचे क्वॉलिफीकेशन आहे म्हणुन आपली आवाज आमच्या पर्यत नाही पोहचली.

उपायुक्त (श्री.निर्भय जैन) :- मा.महापौरजी, आवाजा संदर्भात काही तांत्रिक अडचण असु शकते

महापौर :- तांत्रिक अडचणीसाठी तांत्रिक अडचणीसाठी तांत्रिक क्वॉलिफीकेशन असणे आवश्यक असते ते त्यांच्याकडे नाही.

उपायुक्त (श्री.निर्भय जैन) :- मा.महापौरजी, आय.टी. संदर्भात त्यांच्याकडे कोणतेही एज्युकेशनल क्वॉलिफीकेशन नाही आहे.

महापौर :- म्हणजे याचा अर्थ की जुन्या काळात यांना जे जबाबदारी देण्यात आलेली होती ती चुकीच्या पध्दतीने देण्यात आली हे आपण कबुल करता काय ?

उपायुक्त (श्री.निर्भय जैन) :- मा.महापौरजी, असे नाही त्यावेळी उपलब्ध अधिका-यांपैकी कोण हे काम करु शकेल त्या अनुषंगाने मॅडमला ही जबाबदारी देण्यात आली होती.

महापौर :- महानगरपालिकेच्या कर्मचा-यांवर बाहेरुन आलेल्या अधिका-यांचा भरोसा नव्हता म्हणुन देण्यात आली होती असे यामधुन एस्टॅब्लीश होत आहे काय यामधुन.

उपायुक्त (श्री.निर्भय जैन) :- मा.महापौरजी, असे नाही.

महापौर :- मग काय आहे. महानगरपालिकेच्या अधिका-यांचे जे क्वॉलिफीकेशन आहे त्या प्रमाणे त्यांना काम न देणे आणि जे क्वॉलिफीकेशन आहे त्या प्रमाणे त्यांनी काम न करणे आणि सभागृहात हे सांगणे की मी साईडवर गेली नाही आणि मी आपले निवदेन सभागृहाच्या पटलावर ठेवले म्हणजे जे क्वॉलिफीकेशन आहे ते काम नाही करायचे, जे नाही आहे ते पण काम नाही करायचे हे सुरु काय आहे. प्रश्न अत्यंत गंभीर आहे मी २०१२-२०१३ ला नागपूर महानगरपालिकेला स्थायी समितीचा अध्यक्ष होतो त्या प्रभागात गेल्यानंतर त्या

प्रभागातील नागरिकांची तक्रार मला प्राप्त झाली त्या तक्रारीमध्ये त्यांनी नमुद केले की आम्ही आमच्या घरी कुलर लावत नाही. आम्हाला ए.सी. लावावा लागतो याचे कारण असे आहे जर कुलर लावला तर सर्व सीवरेजची घाणेरडी वास आमच्या घरी कुलरच्या माध्यमातून येते त्याचे मुळ कारण फक्त ऐवढेच होते की ज्याला आपण पोहरा नदी म्हणतो त्या नदीमध्ये पुर्ण ओपन सिव्हरेज एन.आय.टी. ने टाकुन दिले होते पोहरा नदीच्या काठावर पुर्ण नविन सिव्हर लाईन टाकली पाहिजे याकरीता बजेटमध्ये प्रोव्हीजन मी तेव्हा केले होते. नंतर त्या फाईलची व्याप्ती वाढली प्रोव्हीजन पेक्षा जास्त निधी लागत असल्यामुळे माजी मुख्यमंत्री श्री देवेंद्रजीने या कामासाठी पैसे दिले की त्या परिसरातील सिव्हरेज डिस्पोजल चांगला झाला पाहिजे आता सिव्हरेज हे महानगरपालिकेची प्रायरिटी असते मॅनडेटरी डयुटीमध्ये असते आणि ते काम ही व्यवस्थित होत नसेल तर अशा स्थितीत ज्या कोणाची चुक या कामामध्ये आहे त्याच्यावर कारवाई होणे नितांत आवश्यक आहे. आणि एकीकडे ज्या कामाचे १०० टक्के काम झाले आहे त्यांना आपण पेमंट देत नाही आणि दुसरीकडे ज्यांचे काम झाले नाही त्यांना ९२ टक्के काम झाले आहे असे दाखवून पेमेंट देतो ९२ टक्के पेमेंट देतो ही भुमिका चुकीची आहे याच्याकडेही लक्ष देणे प्रशासनाचे काम आहे. मी प्रशासनाला निर्देश देतो की मुख्य अभियंता, अति.आयुक्त, आणि स्थापत्य विशेष व प्रकल्प समितीचे सभापती या तिघांची एक समिती करुन या संपुर्ण प्रकरणाचा अहवाल सभागृहाच्या समोर पुढच्या सभागृहाच्या पुर्वी प्रस्तुत करण्यात यावा सोबतच संबंधित कंत्राटदाराला ब्लॅक लिस्टेड करणे हे काही उपाययोजना नाही त्याच्याकडुन पुर्ण काम करुन घेण्याची जबाबदारी संबंधित अधिका-यांवर टाकण्यात यावी आणि पुढच्या सभागृहात संपुर्ण सखोल चौकशीसह अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावा.

महापौर :- मा.महापौरजी यांनी प्रशासनाला निर्देशित केले की, सन्माननिय सदस्य श्री.सतिश होले इन्होने जो विषय रखा इस विषय का गांभीर्य ध्यान मे रखते हुऐ प्रशासन को निर्देश दिये जाते है की प्रशासन ने भलेही इस विषय पर लिगल ओपिनियन लिया हो अगर किसी एक वारसदार ने इस विषय पर ऑब्जेक्शन लिया है तो उसका नाम उसमे समाविष्ट करने की प्रक्रीया करने की दृष्टीसे प्रशासन पुनश्च उसमे लिगल ओपिनियन ले और उस वारसदार का नाम उसमे समाविष्ट किया जा सकता है की नाही इस बारे मे कारवाई अग्रेषित करे, ऐसे निर्देश प्रशासन को दिये जाते है।

**प्रश्न क्र २३२** :- मनपा च्या समाजकल्याण विभागामार्फत अपंगांना व्यवसायासाठी स्टॉल मिळण्यासंदर्भात प्रश्न

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

श्री.मोहम्मद जमाल :- मा.महापौरजी, मैने प्रश्न डाला था और वह प्रश्न समाजकल्याण विभाग से संबंधित था, अपंगो के लिये जो पॉलिसी ठहरा गयी थी नागपूर महानगरपालिका व्दारा और २०१२ मे जगह देने के लिये कुछ अप्लीकेशन बुलायी गयी थी उस संबंध मे मेरा प्रश्न था, पिछले कुछ दिनों मे अपंगो को जो जगह दि थी उसपर अतिक्रमण कारवाई हुयी थी, उसका एक डेप्युटेशन महापौर महोदय को आया था और उस डेप्युटेशन का हिस्सा मै भी बन गया था, तो मैने प्रश्न किया था की नागपूर महानगरपालिका ने अभी तक विकलांग लोगों को कितनी जगह उपलब्ध दी है और उसमे दुसरा प्रश्न है जो लोगों ने अप्लीकेशन के संदर्भ मे तो उसमे मुझे प्रशासन की तरफ से जवाब मिला की दिनांक १७/०६/२०१९ ला विधी समिती व्दारे रोजी अर्ज मागविण्यात आले होते. मा.महापौरजी, सबसे पहले तो मै यह कहना चाहता हु की राज्य शासनव्दारा कोई अधिसुचना जाहीर हुयी है क्या की महाराष्ट्र के अंदर विकलांग लागों को व्यवसाय करणे के लिये जगह दी जा रही है। मुझे संबंधित अधिकारी से इसका जवाब चाहियें।

महापौर :- प्रशासनाने उत्तर दयावे

उपायुक्त (श्री.राजेश भगत) :- मा.महापौरजी, दिव्यांग व्यक्तींना व्यवसाय करण्यासाठी जागा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने शासनाकडुन असे कुठलेही निर्देश नव्हते. दि.१७/०६/२०१९ च्या विधी समितीच्या सभेमध्ये असे निर्देश देण्यात आले होते की, विभागाने असे अर्ज मागवावे आणि असे प्राप्त झालेले अर्ज स्थावर विभागाला दयावे व दिव्यांग व्यक्तींना व्यवसाय करण्यासाठी जागा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने ते कारवाई करतील असा निर्णय झालेला होता. मात्र शासनाकडुन असे कुठलेही निर्देश नाही.

श्री.मोहम्मद जमाल :- मा.महापौरजी, मेरे पास एक अधिसुचना है राज्य सरकार की दिनांक ०७/०१/२०१८ की महसुल व विन विभाग, मंत्रालय मुंबई. इसमे स्पष्ट रुप मे लिखा है की, (वाचले)

महापोर :-ज्या अधिसुचनेचे वाचन मा.सदस्य करीत आहे ते कोणाचे सर्कुलर आहे व ते कोणाला पाठविले आहे.

श्री.मोहम्मद जमाल :- मा.महापौरजी, हे राज्य शासनाचे सर्कुलर आहे व महसुल व वन विभागाव्दारे काढण्यात आलेले आहे.

श्री.कमलेश चौधरी :- मा.महापौरजी इस सर्कुलर मे महानगरपालिका का उल्लेख है और नगरपरिषद का भी उल्लेख है, विकलांग लोगों को जगह देने के लिये राज्य सरकार का एक जी.आर आया है उसमे विकलांग लोगों को जगह देने का उल्लेख किया गया है l

श्री.राजेश भगत :- मा.महापौरजी, विकलांग लोकांना अशा पध्दतीने जागा देण्यासंदर्भात कठल्याही प्रकारचा शासन निर्णय नाही.

श्री.कमलेश चौधरी :- मा.महापौरजी, जर ही माहिती प्रशासनाजवळ उपलब्ध नसेल तर या जी.आर. ची प्रत प्रशासनाला देऊ इच्छितो कारण की हा जी.आर. मी सुध्दा वाचला आहे.

अति.आयुक्त (श्री.निपाणे) :- मा.महापौरजी, या संदर्भात महाराष्ट्र शासनाचा २८ ऑक्टोबर २०१५ चा सुधारीत जी.आर. आहे. तो नगरविकास विभागाचा आहे व तो महानगरपालिकेला लागु आहे. त्यामध्ये वेगवेगळया १७ योजना दिलेल्या होत्या, त्या १७ योजनेच्या अनुषंगाने त्यामध्ये असा एक मुद्या आहे की, मुद्या क्र ६ शॉपिंग मॉल मध्ये विकलांग लोकांना स्टॉल उभारणी करता अर्थसहाय्य देणे, या अनुषंगाने आपल्याकडे एक समिती गठीत करण्यात आली आहे. दरम्यानच्या काळात कोव्हीडमुळे त्या समितीची सभा झाली नव्हती. या अनुषंगाने दिनांक २६/०२/२०२१ रोजी मा.महापौरजी यांच्या अध्यक्षतेखाली सभा घेण्यात आली होती त्यामध्ये विधी समितीच्या ठरावानुसार अर्ज बोलाविण्यात आले होते ते अर्ज प्रलंबित आहे. त्यामध्ये तांत्रिक अडचणी असल्यामुळे तसेच कोरोना काळ असल्यामुळे ते अर्ज प्रलंबित राहीले मा.महापौरजी यांच्या अध्यक्षतेखाली जी सभा झाली होती त्या सभेमध्ये मा.महापौरांनी निर्देश दिले होते त्याप्रमाणे काय करता येईल त्याकरीता धोरण तयार करण्याच्या सुचना होत्या आम्ही त्यावर अभ्यास करतो आहे आणि शक्यतोवर पुढच्या महासभेमध्ये आणायचा आमचा विचार आहे. पहिले आम्ही मा.महापौरजी यांच्या समितीपुढे आणु नंतर ते महासभेसमोर आणण्यात येईल.

श्री.कमलेश चौधरी :- मा.महापौरजी, यामध्ये आमचे म्हणणे एकच आहे की, जेवढे राज्य सरकारचे यामध्ये जी.आर. आलेले आहे. साहेबांचे म्हणणे आहे की त्यामध्ये एक सुधारीत जी.आर. केलेला आहे. मग जे जी.आर. आमच्याकडे आहे ते निरस्त झाले आहे काय ? त्यामध्ये कुठल्याप्रकारे सुधारीत आदेश राज्य सरकारचा देण्यात आलेला आहे.

महापौर :- महानगरपालिकेला राज्य शासनाकडुन जे परिपत्रक भेटले आहे त्याच परिपत्रकाचे वाचन अति.आयुक्त महोदयांनी केले आहे.

अति.आयुक्त (श्री.निपाणे) :- मा.महापौरजी, ज्या परिपत्रकाचा उल्लेख मा.सदस्यगण करीत आहे ते

वाचल्यानंतर कळेल परंतु तसे त्याबद्यल सांगता येणार नाही.

महापौर :- सन्माननिय सदस्य श्री.मो.जमाल यह परिपत्रक की कॉपी प्रशासनको दे, प्रशासन को परिपत्रक मिलने के बाद इसपर सखोल चर्चा करके इसपर प्रशासन निर्णय ले, इसलिये अगले सभागृह तक इस विषय को स्थगित रखते है।

**प्रश्न क्र २३३** :- मोमिनपुरा क्षेत्रातील बकरामंडीची इमारत संदर्भातील प्रश्न

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

सौ.आयेशा उईके :- मा.महापौरजी, विराधी पक्ष नेता, मोमिनपुरा की जो बकरामंडीकी जो इमारत है उसके बारे मे मैने प्रश्न पुछा था, वह बिल्डींग पुरी जरजर हो चुकी है और वहापर कभी भी हादसा हो सकता है। वह बिल्डींग तोडकर नये तरीके से बनाई गयी और उसको सभी को कमरे मिले जायेंगे। वहापर बडे पैमान मे अतिक्रमण है रास्तेपर अतिक्रमण हुवा है, दो-दो मंजील के घरे बनाये है कई जगह पर रास्तेमे सब्जी के दुकान है, कई लोग दारु और गांजा भी पिते है। इसलिये बकरामंडी की जो बिल्डींग जरजर हो गयी है उसको अच्छा बनाया जायें।

महापौर :- महानगरपालिका के स्थावर विभाग के माध्यम से इस जगह का निरीक्षण किया जाये, निरीक्षण करने के बाद जो सन्माननिय सदस्य ने कहा है की वहा पर बहोत बडे प्रमाण मे अनधिकृत रुप से अतिक्रमण किया गया है, लोगों ने दो-दो तीन-तीन मंजील बिल्डींग बांध के वहा पर होटले खोली है, जो अनधिकृत बांधकाम वहा पर हुवा है उसपर तुरंत कारवाई करने के निर्देश यह सभागृह देती है और वहा बकरामंडी के लिये बहोत बडी जगह आरक्षित थी जो महानगरपालिका के स्थावर विभाग के दस्तऐवज मे दर्ज है, स्थावर विभाग वह संपुर्ण जमिन की जानकारी प्रकल्प विभाग को दे और प्रकल्प विभाग पुर्व मे महानगरपालिका के बकरामंडी परिसर मे कॉम्पलेक्स बनाने का जो निर्णय हुआ था उसके अनुरुप आगे की कारवाई करके वहा अच्छा प्रकल्प हो सके जिसमे बकरामंडी भी हो साथ मे अन्य बाजार भी वहा पर उपलब्ध हो सके इस तरह का प्रकल्प तयार करे ऐंसा निर्देश मैं प्रशासन को देता हु।

**प्रश्न क्र २३४** :- मौजा तरोडी, बिडगांव, वाठोडा व भांडेवाडी येथे नागपूर महानगरपालिकेची जागा संदर्भात प्रश्न

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

श्री. जितेन्द्र (बंटी) कुकडे :- मा.महापौरजी, माझा प्रश्न असा आहे की माझ्या ऐरियामध्ये प्रभाग क्र २६ मौज तरोडी, बिडगांव, वाठोडा व भांडेवाडी येथे आपण सिम्बॉसिस व साईला जागा दिल्यानंतर महानगरपालिकेची आपली किती जागा शिल्लक आहे.

महापौर :- प्रशासनाने उत्तर दयावे.

उपायुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :- मा.महापौर महोदय, सन्माननिय सदस्यांनी प्रश्न विचारला आहे मौजा तरोडी, बिडगांव, वाठोडा व भांडेवाडी येथे नागपूर महानगरपालिकेची जागा किती आहे याची सविस्तर माहिती देण्यात यावी या अनुषंगाने मौज तरोडी, बिडगांव, वाठोडा व भांडेवाडी येथे नागपूर महानगरपालिकेच्या मालकीची ४५५.८६ ऐकर जागा आहे. त्यानंतर स्पोर्ट अथॉरिटी ऑफ इंडियाला सभागृहाचा ठराव क्र २५७ मध्ये एकुण १४०.६७ एकर जागा देण्यात आलेली होती त्यानंतर मौजा वाठोडा मौजा तरोडी येथील एकुण १४०.६७ एकर जागा देण्यात आली. त्यानंतर असे निर्देशनास आले की १४०.६७ एकर जागेमध्ये काही ठिकाणी बरेचशी दाट लोकवस्ती आढळलेली आहे आणि त्या अनुषंगाने बैठका झाल्या त्यामध्ये निर्देश देण्यात आले की जेथे तुरळक घरे आहे अशा प्रकारे ८७.२५ एकर जागा साईला देण्याचा निर्णय तत्कालीन मा.आयुक्तांनी घेतला आहे. ८७.२५ एकर जागेची अगाऊ ताबा भारतीय क्रीडा प्राधीकरणाला देण्यात आलेला आहे.

श्री. जितेन्द्र (बंटी) कुकडे :- मा.महापौरजी, जी ८७.२५ एकर जागेवर काही लोकांनी अतिक्रमण केलेले आहे.महानगरपालिकेने अजुनही तेथील अतिक्रमण काढलेले नाही. हा प्रकल्प प्रभाग २६ मध्ये येत आहे. आणि स्पोर्ट अथॉरिटीचे म्हणणे आहे की अतिक्रमण काढुन दयावे आणि महानगरपालिका अतिक्रमण काढत नाही. ती महानगरपालिकेची जागा आहे तेथे प्लॉटची विक्री होत आहे व तेथे लोक घरे बांधत आहे. तर अतिक्रमण काढण्याची जबाबदारी ही कोणाची आहे.

उपायुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :- मा.महापौर महोदय, मा.निगम आयुक्तांनी एक बैठक घेतली होती त्यामध्ये एन.एम.आर.डी.ए. चे सभापती, भारतीय क्रीडा प्राधीकरणचे अधिकारी यांच्यासोबत बैठक घेण्यात आली होती व त्या बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आलेला आहे. ज्या क्षेत्राकरीता नियोजन प्राधीकरण हे एन.एम.आर.डी.ए. आहे ते तेथील अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यात यावी आणि वाठोडा हे जे क्षेत्र आहे ते नागपूर महानगरपालिका क्षेत्रामध्ये येत आहे. तेथील अतिक्रमण काढण्याची कारवाई तात्काळ सुरु करण्याची निर्देश देण्यात आले होते. तसेच तिसरे निर्देश असे दिले होते की जेव्हा आपण अगाऊ ताबा दिलेला आहे आणि ताबा पावती दिलेली आहे त्या ताबा पावतीमध्ये आपण अशी अट टाकली होती की ताबा दिलेल्या दिनांकापासून भारतीय क्रीडा प्राधीकरण यांनी त्या जागेचे संरक्षण करणे अपेक्षित आहे. या अनुषंगाने तसे पण निर्देश मा.आयुक्तांनी दिले की लगेच तेथे संरक्षण भिंत बांधण्यात यावी. तेव्हा संचालक, भारतीय क्रीडा प्राधीकरण यांनी बैठकीमध्ये कबुल केले आणि पोलीस संरक्षण घेऊन तेथे संरक्षण भिंत बांधण्याचे काम करतो आहे.

श्री. जितेन्द्र (बंटी) कुकडे :- मा.महापौरजी, यामध्ये ज्यांनी अतिक्रमण केलेले आहे ज्यांनी महानगरपालिकेच्या जागेचे लेआऊट पाडुन प्लॉट विकले आहे. गरीब लोकांची तेथे फसवणुक केली आहे ती जागा महानगरपालिकेची आहे आपण महानगरपालिकेतर्फे त्यांच्यावर पोलीस कारवाई करणार आहेत काय ?

उपायुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :- मा.महापौर महोदय, तेथे ओनरशिप ऑफ लॅन्डचा प्रॉब्लेम निर्देशनास आलेला आहे. त्या अनुषंगाने मा.आयुक्त महोदयांनी एक कमेटी गठीत केलेली आहे. मालकीयत नागपूर महानगरपालिकेची असतांना कोणीजर तेथे अतिक्रमण करुन अवैधरित्या विक्री केली असेल त्या समिती समोर तो उलगडा करुन त्यावर उचित कारवाई करीत आहे. त्या समितीकडुन ३० एप्रिल २०२१ पर्यत कारवाई करण्याचे मा.आयुक्त महोदयांचे निर्देश आहे.

श्री. जितेन्द्र (बंटी) कुकडे :- मा.महापौरजी, एक चांगला प्रोजेक्ट आपल्या नागपूर शहरामध्ये स्पोर्ट अथॉरिटी ऑफ इंडिया व साईच्या माध्यमातून आलेला आहे. फक्त तेथे अतिक्रमण असल्याकारणाने त्यांनी प्रोजेक्टचे काम थांबविले आहे. महानगरपालिकेच्या काही अधिका-यांच्या ढसाळ प्रवृत्तीमुळे नागपूर शहराची जी शाण बनली आहे चांगला प्रोजेक्ट तयार झालेला आहे. त्यामुळे नागपूर महानगरपालिकेचे व नागपूर शहराचे नाव मोठे झाले आहे. ते काम तेथे अतिक्रमण असल्यामुळे व अधिका-यांच्या ढसाळ प्रवृत्तीमुळे थांबले आहे. आपण जर लवकरात लवकर अतिक्रमण हटविले तर तेथे साईचे काम सुरु होईल व एक चांगला प्रोजेक्ट तयार होईल अशी मी आपणांस विनंती करतो.

महापौर :- सन्माननिय सदस्यांनी चांगल्या विषयाकडे लक्ष वेधले आहे. मी प्रशासनाला निर्देश देतो कि, साईला जागा देण्यासाठी आपण सभागृहात ठराव पारीत केला होता तो १४०.६७ एकर जागेचा प्रस्ताव पारीत केला होता नंतर बहुतांश भागात अतिक्रमण झाल्यामुळे आपण ते कमी करुन ८७.२५ एकर ऐवढी जागेचा ताबा साईला देण्यासाठी निर्धार घेतलेला आहे. प्रशासनाने साईला या संपुर्ण जागेची रजिस्ट्री त्यांच्या नावाने करुन देण्याची प्रोसेस करण्यासाठी सभागृहात लवकरात लवकर हा विषय त्या दृष्टीने सभागृहाच्या पटलावर आणावा जेणेकरुन साईच्या नावावर रजिस्ट्री झाल्यानंतर साई रितसर नियमानुकुल तेथे बांधकाम करु शकेल त्या दृष्टीने कारवाई लवकरात लवकर प्रशासनाने पुर्ण करावी असे निर्देश देण्यात येते सोबतच ज्या अतिक्रमणधारकांकडे

राहणा-या जागेची अधिकृत रजिस्ट्री असेल किंवा सेलडीड असेल अशाच लोकांना पर्यायी जागेवर निवासाची व्यवस्था उपलब्ध करुन देण्याचे निर्देश या सभागृहाच्या माध्यमातून देण्यात येत आहे.

**प्रश्न क्र २३५** :- भुखंड क्र. १७९/ब वर तयार झालेल्या अभिन्यासातील मंजुर नकाशा संदर्भातील प्रश्न

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

श्री.नरेंद्र (बाल्या) बोरकर :- मा.महापौरजी, हा जो विषय आहे त्याचे परत एकदा वाचन करावे.

महापौर :- प्रशासनाने विषयाचे वाचन करावे.

निगम सचिव (श्रीमती लाडे) :- मा.महापौरजी, मा.सदन प्रश्न असा आहे की मौजा नागपूर येथील खसरा क्र १७९ मधील १० एकर जागा म्युनसिपल कमेटीचा ठराव क्र दिनांक १६/१२/१९१८ नुसार दिनांक ३०/११/१९१४ ला संपादीत करण्यात आली आहे काय ? ही जागा अभिन्यासातील ३१८९.२२ चौरस मिटर क्षेत्रफळाचा भुखंड भाडेपट्टयावर देण्यात आला आहे काय ? भुखंड क्र १७९ ब वर तयार झालेल्या अभिन्यासातील मंजुर नकाशा नुसार ३१८९.२२ चौरस मिटर जागा अंडर यु.एल.सी. असे नमुद आहे काय तसेच सदर जागा ही शासनास हस्तांतरीत झाल्याची नोंद मनपाच्या अभिलेख विभागात आढळुन येत आहे काय ?

श्री.नरेंद्र (बाल्या) बोरकर :- मा.महापौरजी, यह जो महानगरपालिका ने जगह आवंटीत किया है यहापर एक यु.एल.सी. की जगा है वहापर जो कनकोलिया करके जो है उनको अलग से जगा दी है, यहापर कंपाउन्ड डालने के संदर्भ मे मैने महानगरपालिका को पुछा था, तो मुझे प्रशासन के तरफ से यह उत्तर दिया की इस जगह पर हायकोर्ट मे केस चालु है और वह जगह पर अतिक्रमण नही है I लेकीन जो जगह यु.एल.सी. के नाम पर है वहापर अतिक्रमण हुवा है और वहाका जो नक्शा है वह मेरे पास है मै मा.आयुक्त महोदय को वह दिखाऊंगा यहापर अतिक्रमण करके इस जगह पर कब्जा किया है और यह जगह वह बाजुके लागों ने अपने कब्जे मे लेकर चार लाख रुपये मंथ से किराया पर दि है इस संदर्भ मे मैने महानगरपालिका को पत्र दिया है लेकीन महानगरपालिका के तरफ से वहापर कोईभी कारवाई नही की गयी I

उपायुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :- मा.महापौर महोदय, सन्माननिय सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे ती नागपूर महानगरपालिकेची १० एकर जागा आहे ती १९१४ ला तेव्हा म्युनसिपल कमेटी होती त्यांनी ठराव क्र ६ अंतर्गत कारवाई केली. त्यानंतर त्यावर लेआऊट सॅग्शन झाले आहे. लेआऊट सॅग्शन करतेवेळी त्यात ३१८९.२२ चौरस मिटर जी जागा आहे ती यु.एल.सी. च्या अंडरमध्ये राखीव ठेवण्यात आली. त्या जागेकरीता जे सन्माननिय सदस्य नाव घेत आहे त्यांनी आम्हाला वारंवार पत्र दिले की त्या जागेचा आम्हाला लिजपट्टा करुन दयावा आपण तो पत्राव्दारे पुर्णपणे फेटाळला की हा लिजपट्टा करुन देण्यात येत नाही. आपल्या कारवाईच्या अगेस्टमध्ये ते कोर्टात गेले आहे आणि प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. स्थावर विभागाच्या प्राप्त रिपोर्टनुसार उक्त जागा ती अजुनही खाली आहे. त्यावर अतिक्रमण झालेले नाही असा मला रिपोर्ट प्राप्त झालेला आहे. तिथे जर कुठले अवैधरित्या अतिक्रमण झाले असेल तर प्रत्यक्षरित्या तेथे जाऊन कारवाई करण्यात येईल.

श्री.नरेंद्र(बाल्या)बोरकर :- मा.महापौरजी, या जागेचा अगेंस्ट मध्ये महानगरपालिकेच्या एका अधिका-याला ससपेंड करण्यात आले होते त्या अधिका-यांचे नाव सांगण्यात यावे.

उपायुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :- मा.महापौर महोदय, जी माहिती मला मिळालेली आहे आणि मी जी धारिका वाचली आहे त्या अनुषंगाने जामगडे नावाचे अधिकारी होते त्या प्रकरणात सभागृहाने निर्णय घेवुन त्यांना बडतर्फ करण्यात आलेले होते.

श्री.नरेंद्र (बाल्या) बोरकर :- मा.महापौरजी, इस जगा के लिये मैने वारंवार पत्रव्यवहार किया है की वहापर महानगरपालिकाने कंपाऊंन्ड वाल डालना चाहिये, वहापर महानगरपालिका की बहोत बडी जगा है, वहापर महानगरपालिका का एक बहोत बडा संकुल बन सकता है I वहापर आज भी अतिक्रमण है, लकडे के लिये वह

जगा किराये से दि है, यह जगा अपने कब्जे मे करने के लिये आप निर्देश दिजीये.

महापौर :- या जागेचे वयक्तीक निरीक्षण करण्यात यावे, प्रशासनाने दिलेल्या सुचनेप्रमाणे या जागेवर कोणतेही बांधकाम नाही असे सांगण्यात आले परंतु सदस्यांच्या म्हणण्याप्रमाणे जी मोकळी आणि खुली जागा आहे त्या जागेवर लाकडे ठेऊन त्याचे भाडे शुल्क घेण्याचा व्यवहार संबंधितांकडुन करण्यात येत आहे सोबतच तेथे बांधकाम सुध्दा झालेले आहे असे त्यांचे म्हणणे आहे त्यामुळे त्याचे निरीक्षण करावे आणि जर तेथे अशाप्रकारचे अनधिकृत बांधकाम असेल तर त्यावर ताबडतोब कारवाई प्रशासनाने करावी, असे निर्देश देण्यात येत आहे.

**प्रश्न क्र २३६** :- ख.क्र. ९० ते ९९ पर्यत खसरे कोणत्या प्रयोजनाकरीता आरक्षीत आहे या संदर्भात प्रश्न

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

श्री.मनोज सांगोळे :- मा.महापौरजी, नारी खसरा क्र ९० ते ९९ का जो आरक्षण है, वहापर बोर्ड लगाये गये है लेकीन आज भी वहा की खेती मालक के नाम पर है आगे जाके वहाका पुरा लोड महानगरपालिका के उपर पडने वाला है। मेरी सभागृह से विनंती है की वहापर जो काम चालु है तो वहापर तुरंत नोटीस देकर डेव्हलपमेंट चार्ज भरने के लिये लगाया जाये, वहापर जो बिल्डर काम कर रहे है उनसे राजस्व वसुल किया जाये।

स्थावर अधिकारी (श्री.अंबारे) :- मा.महापौर महोदय, मा.नगरसेवक श्री.मनोज सांगोळे यांनी विचारलेला जो प्रश्न आहे मौजा नारी येथील ख.क्र ९० ते ९९ ते कोणत्या प्रयोजनाकरीता आरक्षीत आहे. या संदर्भात मी आपणांस सांगु इच्छितो की येथील खसरे विविध आरक्षणा करीता बाधीत आहे. जसे की प्ले ग्राउंड, पार्क, प्रायमरी स्कुल, तेथील सद्यस्थिती अशी आहे की खसरा क्र ९३/३, ९४/२,९४/३,९४/६ खसरा क्र ९०,९१,९२,९३, यामध्ये जे गुंठेवारी अंतर्गत जे अर्ज प्राप्त झाले होते ते अभिन्यास मंजूरीचे अर्ज नागपूर सुधार प्रन्यासने प्राप्त केले त्या अंतर्गत ने मंजूर करण्यात आलेले आहे. तेथील काही जागेवर जर अनधिकृत बांधकाम होत असेल तर त्यावर प्रशासनातर्फे कारवाई करण्यात येईल.

श्री.मनोज सांगोळे :- मा.महापौरजी, तेथे मोठया प्रमाणात बांधकाम होत आहे. तेथे दवाखान्यासाठी जागा आरक्षित आहे त्या करीता पैसे देखील मंजूर आहे. तेथे जागा उपलब्ध नाही असे म्हणुन प्रशासन वेळ काढुपणा करत आहे. त्यामुळे माझी आ पणांस विनंती आहे की तेथे जे अनिधकृत बांधकाम होत आहे ते थांबवुन त्यावर त्वरीत कारवाई करण्यात यावी.

महापौर :- या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करुन जे अनधिकृत बांधकाम सुरु आहे त्यावर कारवाई करण्यात यावी, महानगरपालिकेला केंद्र शासनाच्या माध्यमातून हॉस्पीटल बांधण्याचे निर्देश देण्यात आले आहे त्यासाठी N.U.H.M. ला ५ कोटी रुपयांची राशी सुध्दा देण्यात आली आहे त्यामुळे हॉस्पीटल बांधकामाच्या दृष्टीने ताबडतोब तेथे बांधकाम करण्यासाठी निर्देश देण्यात येते सोबतच तेथे जे अनधिकृत बांधकाम सुरु आहे त्यावर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात येते.

**प्रश्न क्र २३७** :- विविध विषयाच्या अनुषंगाने मा.आयुक्तांनी प्रशासनातील अधिका-यांच्या समित्या गठीत केल्या आहे हे खरे आहे काय ?

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

महापौर :- या विषयावर आपली चर्चा झालेली आहे.

**प्रश्न क्र २३८** :- श्री.शिनॉय एच.अंतोनी रा.जिजस हाऊस MB-२२८NRCDC कॉलन, मौजा भानखेडा यांचे घर कोणत्या कायद्यांअंतर्गत तोडण्यात आले ?

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

**प्रश्न क्र २३९** :- नागपूर मनपा कडून किती लिज करण्यात आलेल्या आहे.

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

महापौर :- विरोधी पक्ष नेता का पत्र आया है की वह पॉझिटीव्ह होने कारन इस प्रश्न को अगले मिटींग मे लिया जायें। इसलिये यह प्रश्न को यहापर स्थगित रखते है।

**प्रश्न क्र २४०** :- हनुमाननगर झोन येथील वार्ड नं. ९ मधील घर नं. २४ यामध्ये गैरकायदेशीर व नियमाविरुध्द करनिर्धारण तथा नामांतरण कार्यवाही केलेली आहे ?

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

महापौर :- इस विषय को शुरुवात मे ही लक्षवेधीपर चर्चा हो चुकी है

**प्रश्न क्र २४१** :- नागपूर महानगरपालिकेच्या नगर रचना विभागाच्या नवीन डीसीआर प्रमाणे फायर एनओसी किती माळयाप्रमाणे आवश्यक आहे ?

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

महापौर :- यह भी प्रश्न विरोधी पक्ष नेता का है आरै वह पॉझिटीव्ह होने के कारण यह प्रश्न अगले मिटींग तक स्थगित रखा जाता है।

**प्रश्न क्र २४२** :- म न पा प्रभाग क्र ६ क अंतर्गत राणी दुर्गावती चौक येथील नेहमी होत असलेल्या वाहतुकीच्या वर्दळीमुळे या संदर्भात प्रश्न

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

श्रीमती वैशाली नारनवरे :- मा.महापौरजी, माझा प्रश्न असा आहे की राणी दुर्गावती चौक येथे ट्राफीक सिंग्नल लावण्यात यावे. वाहन चालक वाताहात नियमानुसार वाहन चालवत नाही आपल्या मर्जीनुसार ते वाहन चालवितात त्यामुळे अनेक अपघात तेथे होतात त्या अनुषंगाने तेथे ट्राफीक सिग्नल असणे आवश्यक आहे. मा.महापौरजी या आधी २०२० ला वाहतुक विभागाला व विद्युत विभागाला पत्र पाठविले आहे. त्या पत्रावर मला काहीच उत्तर प्रशासनाकडुन प्राप्त झालेले नाही. येथे निष्काळजीपणाचे काम प्रशासन करीत आहे तसेच मला जे उत्तर देण्यात आले आहे त्यावर कोणाचेही हस्ताक्षर नाही.

महापौर :- प्रशासनाकडुन जे उत्तर देण्यात आलेले आहे की वाहतुक नियंत्रकाचे काम चालु आहे.

श्रीमती.वैशाली नारनवरे :- मा.महापौरजी, वाहतुक नियंत्रकाचे काम सुरु आहे ते अगदी चुकीचे उत्तर आहे.

कार्यकारी अभियंता (श्री.मानकर) :- मा.महापौरजी, मा.सभागृह, सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने उत्तर देतो की, तेथे बी.एस.एन.एल व एम.एस.ई.बी. च्या विद्युत वाहिन्या होत्या त्या शिफ्ट करण्यात आालेल्या आहेत तेथे सिग्नलचे अर्धे काम झालेले आहे.

महापौर :- वाहतुकीची कोंडी होवु नये, याकडे आपण लक्ष दयावे, लवकरात लवकर ते काम पुर्ण करण्यासाठी पुरेसे प्रयत्न करावे असे निर्देश प्रशासनाला देण्यात येत आहे.

**प्रश्न क्र २३१** :- विदर्भ हाऊसिंग बोर्ड म्हाडा, रघुजीनगर, सोमवारी क्वार्टर येथील मोकळया जागा व लिज संदर्भातील प्रश्नावर

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

श्री.सतिश होले :- मा.महापौरजी, विदर्भ हाऊसिंग बोर्ड म्हाडा, रघुजीनगर, सोमवारी क्वार्टर येथील मोकळया जागा व लिजच्या संदर्भात प्रशासनाने उत्तर दिलेले आहे की या वेळेसच्या आयुक्तांनी दिनांक २४.१२१.२०२० ला त्या जागेची लिज दिलेली आहे. लिज देतांना तात्कालीन आयुक्तांनी आदेश दिले होते. वारसा हक्क प्रमाणपत्र असल्याशिवाय लिज देऊ नये आणि आपल्या प्रशासनानी अर्जामध्ये त्यांनी स्वत: त्याला संमत्ती दिलेली नाही. तरी सुध्दा नियम क्रमांक ८.१०.१ नुसार आयुक्तांना अधिकार आहे असे दाखवून सन्माननिय अधिका-यांना मला हे विचारायचे आहे की ८.१०.१ मध्ये काय आहे. आणि वारसा हक्क प्रमाणपत्र

महानगरपालिकेच्या कुठल्या अधिका-यांना देता येते काय ?

उपायुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :- मा.महापौरजी, सन्माननिय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्यामध्ये म्हटले आहे की महानगरपालिकेच्या अधिका-यांना नियमानुसार कायदेशीर वारसाहक्क प्रमाणपत्र नसतांना वारस ठरविण्याचा अधिकार दिलेला आहे. हा त्यांचा प्रश्न होता संबंधित प्रकरणात जे मृत्यपत्र आहे व इच्छापत्र जे आहे त्या इच्छापत्राच्या आधारे त्याचा वारसा हक्काव्दारे लिज करुन देण्यात आलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम परिशिष्ट ड प्रकरण ८ जे आपण मालमत्ता कर आकारणीमध्ये नामांतरण करणे म्हणजे एखादया व्यक्तीच्या प्रॉपटी ए.बी.सी. नावाच्या व्यक्तीच्या नावानी नोंदणी केली आहे आणि ती जर वारसा हक्काने दुस-या व्यक्तीच्या नावानी जर नोंदायची असेल तर आपण सेलडिड....

श्री.सतिश होले :- मा.महापौरजी, मी थोड इंटरअप करतो. मला हे सांगण्यात यावे की १९७८ पर्यत ती जागा त्याच्या आजोबाला लिजवर होती आणि त्यानंतर ती जागा कोणालाही लिजवर नव्हती. आणि जर ती जागा लिजवर नाही तर त्याच्या आजोबाचे मृत्युपत्र आपल्याला लागु होते की नाही. जर त्याचे संपुर्ण वारसदार त्याला संमत्ती देतील तरच आपण वारसदार ठरवतो की नाही. की वंशावळी करुन आपण कोणालाही वारसदार ठरवितो.

उपायुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :- मा.महापौरजी, सन्माननिय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर असे आहे ही म्हाडाची जागा होती तेथील जे प्लॉट आहे ते आपल्याला हस्तांतरीत केलेले आहे. हा जो भुखंड आहे तो किसन गणुजी चिंचमलातपुरे यांच्या नावानी होता. गणुजी चिंचमलातपुरे यांची डेथ झाली त्यानंतर त्यांचा वारस रामचंद्र किसन चिंचमलातपूरे यांच्या नावाने हा भुखंड देण्यात यावा असे शासनाने २७ नोव्हेंबर २००६ ला मंजूरी प्रदान केली त्या मंजूरी नुसार रामचंद्र किसन चिंचमलातूरे यांचे नावाने होते ते वारल्यानंतर त्यांचे जे वारस होते त्यांच्या इतर वारसांनी हक्क सोडल्यामुळे

श्री.सतिश होले :- मा.महापौरजी, जे रामचंद्र चिंचमलातपूरे जे आहेत त्यांच्या फुटपाथ गॅरेजवर त्यांच्या बहिण श्रीमती पुष्पा ज्ञानेश्वर बहाळ रा. नंदनवन झोपडपटटी गल्ली नं १२ यांनी कुठलिही संम्मती दर्शविण्यास तयार नाही अशाप्रकारचे असे त्यांच्या अर्जात आहे काय ? माझ्याजवळ त्याचा अर्ज आहे त्यामध्ये त्याची बहिण त्याला अर्जामध्ये लिहुन दयायला तयार नाही. जर त्याचा वारसदार त्याला वारस दयायला तयार नसेल तर त्याचा वारस आपण कुठल्या आधारावर ठरवितो. वारस अशाच ठरला जातो की त्याचे संपुर्ण वारसदार संमती देतात एकाने जर संमत्ती दिली नाही तर तो वारसदार कसा होऊ शकेल.

उपायुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :- मा.महापौरजी, येथे जे दस्तऐवज सादर करण्यात आले आहे त्यामध्ये रामचंद्र चिंचमलातपूरे यांचे पाच वारस दर्शविण्यात आलेले आहे. त्यापैकी एक अरुण रामचंद्र चिंचमलातपुरे मुलगा, अशोक रामचंद्र चिंचमलातपूरे मुलगा, केशव रामचंद्र चिंचमलातपूरे मुलगा, पुष्पा ज्ञानेश्वर बहाळ मुलगी, सुनिता विलासराव अनसाने ही मुलगी,

श्री.सतिश होले :- मा.महापौरजी, त्यापैकी पुष्पा ज्ञानेश्वर बहाळ ही त्याची मुलगी नव्हती काय ? व तिने संमत्ती दिली आहे काय ? अर्जामध्ये नंबर २ वर लिहले आहे. श्रीमती पुष्पा ज्ञानेश्वर बहाळ,रा.नंदनवन झोपडपट्टी गल्ली नं. १२ यांनी कुठलिही संम्मती दिलेली नाही. यांच्या मिनीटस् मध्ये आहे की मा.आयुक्तांच्या आदेशानूसार सध्याचे जे आयुक्त आहे यांनी दिनांक २४.११.२०२० ला लिज दिली आहे. हे काही जुणे प्रकरण नाही.

उपायुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :- मा.महापौरजी, मी ओरीजनल धारिका मागविलेली आहे. मी डॉक्युमेंट बघुन उत्तर देतो.

श्री.सतिश होले :- मा.महापौरजी, मला हे विचारायचे आहे की २०१७ तत्कालीन आयुक्तांनी जे आदेश

काढले आहे (वाचले) जो पर्यत लिगल हेअर त्याचे डॉक्युमेंट देत नाही तो पर्यत ही जागा कोणालाही लिजवर देण्यात येऊ नये. परंतु २०१७ नंतर आपण २०२० ला ती जागा लिजवर देतो. सध्याचे आयुक्त देखील याला जबाबदार आहे की त्यांनी कुठल्याही प्रकारे वारसदार न शोधता महानगरपालिकेचे नुकसाण केले आहे. या संदर्भात चौकशी करण्यात यावी.

उपायुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :- मा.महापौरजी, सन्माननिय सदस्यांनी जो प्रश्न विचारला होता की तत्कालीन आयुक्तांनी जो आदेश पारीत केलेला होता (आदेशाचे वाचन केले)

श्री.सतिश होले :- मा.महापौरजी, आदेशाच्या अगोदर तत्कालीन आयुक्त महोदयांनी काय म्हटले आहे (वाचले) ही अथॉरिटी महानगरपालिकेने डिसाईड करायची नाही.

उपायुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :- मा.महापौरजी, तत्कालीन आयुक्तांनी जो ऑर्डर पारीत केला होता त्यामध्ये प्रशासनाला जे निर्देश दिलेले आहे (वाचले)

श्री.सतिश होले :- मा.महापौरजी, या ऑर्डरच्या पहिल्या पॅरिग्राफ मध्ये काय म्हटले आहे की त्यांनी हा ऑर्डर मी तेव्हाच देतो आहे की जो पर्यत लिगल डॉक्युमेंट पुट अप करता सक्शेशन सर्टीफिकेट लागते अपिलंट मध्ये लिहले आहे व त्यामध्ये त्याच्या बहीणीने नकार दिलेला आहे त्यामुळे त्याला तुम्ही वारसदार करुच शकत नाही.

उपायुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :- मा.महापौरजी, या प्रकरणात आम्ही लिगल ओपिनिअन घेतले आहे. (वाचले) जर त्या प्रकरणात बिल नसेल तर त्या प्रकरणात सक्शेशन सर्टीफिकेट मागु शकतात

महापौर :- वारंवार असा विषय येत आहे की, लिगल हेअर पैकी जर एका व्यक्तीचे जर ऑब्जेशन आहे तर एका बहिणीचे ऑब्जेक्शन असल्यानंतर तर ते करता येते काय ?

उपायुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :- मा.महापौरजी, माझे यात सबमिशन आहे की डिपार्टमेंटला कुठलेही ऑब्जेक्शन प्राप्त झाले नाही.

श्री.सतिश होले :- मा.महापौरजी, ओरिजनल अर्जामध्ये नंबर दोनवर लिहले आहे त्यामध्ये ज्याच्या नावानी लिज केली आहे त्यामध्ये पुष्पा ज्ञानेश्वर चिंचमलातपूरे नंदनवन झोपडपट्टी गल्ली नंबर १२ नागपूर मी शपथपत्र करुन देण्यास तयार नाही असा अर्जदार म्हणत आहे. मा.महापौरजी, या संदर्भात आपण काय आदेश देता आणि आदेश महानगरपालिकेच्या हिताचाच राहील ज्यामुळे महानगरपालिकेचे नुकसाण होणार नाही. अशा अजुन आठ जागा आहे माझ्याकडे यांच्याकडे जागेचे ऑडीट नाही. अशा एक एक जागा खड्यात टाकल्या तर काय होईल.

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, या विषयावर जी चर्चा सुरु आहे आणि ज्यावर रुलिंग मागितला आहे तर हा एक व्यक्तीगत विषय आहे.

श्री.सतिश होले :- मा.महापौरजी, हा व्यक्तीगत विषय नसुन हा महानगरपालिकेच्या फायदयाचा विषय आहे. अशा महानगरपालिकेच्या प्रॉपर्टी शहरात भरपुर आहे. तर अशा एक-एक प्रॉपर्टीची जर आपण अशाप्रकारे विल्हेवाट लावली तर त्याचे आपण समर्थन करणार काय ?

महापौर :- सन्माननिय सदस्य श्री.सतिश होले इन्होने जो विषय रखा इस विषय का गांभीर्य ध्यान मे रखते हुऐ प्रशासन को निर्देश दिये जाते है की प्रशासन ने भलेही इस विषय पर लिगल ओपिनियन लिया हो अगर किसी एक वारसदार ने इस विषय पर ऑब्जेक्शन लिया है तो उसका नाम उसमे समाविष्ट करने की प्रक्रीया करने की दृष्टीसे प्रशासन पुनश्च उसमे लिगल ओपिनियन ले और उस वारसदार का नाम उसमे समाविष्ट किया जा सकता है की नाही इस बारे मे कारवाई अग्रेषित करे, ऐसे निर्देश प्रशासन को दिये जाते है।

**प्रश्न क्र २४३** :- लकडगंज कडबी बाजार मैदान व मोमिनपुरा येथील मुस्लिम कॅन्टीन मनपाच्या संबंधित

विभागाने काय कार्यवाही केली ?

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

श्री.धर्मपाल मेश्राम :- मा.महापौरजी, लकडगंज कडबी बाजार व मोमिनपुरा येथील मुस्लिम कॅन्टीन या महानगपालिकेच्या जागा आहे. लकडगंज कडबी बाजार मनपाच्या जागेवर सिव्हीक सेंटर प्रस्तावित आहे आणि मोमीनपूरा येथील मुस्लीम लायब्ररीला ती जागा दिली आहे एक वर्षापुर्वी तेथे विद्यार्थ्यांना शिक्षण देणे अपेक्षित होते त्या जागेचा दुरुपयोग करुन त्या ठिकाणी व्यवसायीक आस्थापना मोठया प्रमाणात उभ्या करण्यात आलेल्या आहेत. मी मागील अनेक वेळा या जागा तत्काळ प्रभावाने महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यात याव्यात व त्याचा आपल्या पध्दतीने विचार करण्यात यावा अशा प्रकारचे प्रयत्न करीत आहे. मी आपणांस या प्रश्नाच्या माध्यमातून विनंती करतो की, ही जागा तात्काळ प्रभावाने खाली करण्याचे निर्देश मा.महापौरजी आपण प्रशासनाला दयावे.

उपायुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :- मा.महापौरजी, सन्माननिय सदस्यगण, सन्माननिय सदस्यांनी जो प्रश्न विचारला होता त्यातील पहिला प्रश्न असा होता की, लकडगंज कडबी बाजार येथील लिजच्या संदर्भात होता आणि या ज्या लिज आहे त्या बाजार विभागाकडुन देण्यात आलेल्या आहेत. आणि या ११-११ महिन्याच्या अस्थायी स्वरुपातील आहे. त्यानंतर दुसरा प्रश्न सन्माननिय सदस्यांचा असा होता की या जागेवर मनपा सिव्हीक सेंटर उभारणार होते त्याचा आराखडा तथा आवेदन बोलाविण्यात आलेले आहे काय ? दुसरा विषय हा बाजार विभागाशी संबंधित नव्हता त्यावर प्रकल्प विभागाकडुन उत्तर आलेले आहे. न्युनतम दराने आवेदन बोलाविण्यात आलेले होते ते आवेदन प्राप्त झाले त्यानंतर सुध्दा मुख्य अभियंता यांनी आवेदन बोलाविण्यासंदर्भात सांगितले होते. तिसरा प्रश्न मोमिनपूरा मुस्लीम लायब्ररी संदर्भात होता. मोमिनपुरा मुस्लीम लायब्ररी जी आहे ती लिजवर देण्यात आली होती त्यावर दोन्हीकडुन कंन्स्ट्रक्शन झालेले आहे. तेथे इल्लीगल ॲक्टीव्हीटी आढळली आहे. पहिल्या प्रकरणात ती लिज संपुष्टात आली त्यामुळे आणि लिज डिडचे व्हायलेशन झाले त्यानुसार एम.आर.टी.पी. ॲक्ट मधील ८१ (डी) अंतर्गत नोटीस इशु करण्यात आलेले आहे. आणि दुसरे अनधिकृत बांधकामाकरीता त्यांच्यावर एम.आर.टी.पी. ॲक्ट अंतर्गत कारवाईची नोटीस देण्यात आलेली आहे. एम.आर.टी.पी. कारवाईच्या अगेंस्टमध्ये मा.जिल्हा न्यायालयात ते प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. दुसरा प्रश्न लकडगंज कडबी बाजाराच्या संदर्भात होता. त्या जागा काढुन टाकण्याबाबत आदेश पारीत करतांना तत्कालीन उपायुक्तांनी ८१ बी अंतर्गत आदेश पारीत करतांना त्या झोनचे संबंधित कार्यकारी अभियंता यांच्याकडे ते प्रकरण वर्गीकृत केलेले होते आणि संबंधित कार्यकारी अभियंता यांना असे निर्देश दिलेले आहे मा.तत्कालीन उपायुक्त यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे त्यांच्यावर कारवाई एका आठवडयात करुन तो अहवाल सादर करावा. असे त्याचे स्टेटस आहे.

महापौर :- उपायुक्तांनी केव्हा संबंधित कार्यकारी अभियंता यांना आदेश दिले होते.

उपायुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :- मा.महापौरजी, दिनांक १६-०३-२०२० रोजी आदेश दिलेले आहे.

महापौर :- एक वर्षाचा कालावधी लोटल्यानंतर सुध्दा कार्यकारी अभियंता यांनी कुठल्याही प्रकारची कारवाई केलेली नाही.

उपायुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :- मा.महापौरजी, मागे सन्माननिय सदस्य विधी समितीचे सभापती असतांना त्यांच्या कक्षात एक मिटींग लावण्यात आली त्यावेळी कार्यकारी अभियंता यांना जाब विचारण्यात आला. कार्यकारी अभियंता यांनी असे उत्तर दिले की मला पी.टी.एस. सर्व्हे करणे गरजेचे आहे. कोणते स्ट्रक्चर किती आहे व कोण्याच्या कब्ज्यात किती आहे तर या अनुषंगाने त्यांनी वेळ मागितला होता. तो संबंधित अहवाल अजुनपर्यंत अप्राप्त आहे. पी.टी.एस. सर्व्हे अजुनपर्यंत व्हायचा आहे.

श्री.धर्मपाल मेश्राम :- मा.महापौरजी, एक वर्ष झालेला आहे परंतु अजुनपर्यंत अहवाल दिलेला नाही.

महापौर :- संबंधित कार्यकारी अभियंता यांनी उत्तर दयावे.

कार्यकारी अभियंता (श्री.मेंडुलकर) :- मा.महापौरजी, त्या जागेचा प्लेन टेबल सर्व्हे केलेला आहे. त्यामध्ये इस्टेट डिपार्टमेंट व बाजार विभागाच्या कुठल्या प्रॉपर्टी आहे त्या मार्क करायच्या आहेत ते काम सुरु आहे.

महापौर :- दिनांक २० -०३-२०२० चे काम होते. या कामाला एक वर्ष लोटले आहे. हे प्रकरण कुठे अडकले आहे. उपायुक्तांनी जेव्हा आदेश दिला ताबा घेण्यासंदर्भात तर आपण ताबा का घेत नाही.

कार्यकारी अभियंता (श्री.मेंडुलकर) :- मा.महापौरजी, मी या झोनला दिनांक ११-०८-२०२० ला रुजु झालेलो आहे. ही पुर्वीची तारीख आहे. पी.टी.एस. सर्व्हे पुर्ण झाल्यानंतर ज्यांचे अतिक्रमण आहे त्यांच्यावर कारवाई करीत आहे.

श्री.धर्मपाल मेश्राम :- मा.महापौरजी, या सर्व जागांची लिज संपलेल्या आहेत. आणि तेथे आता व्यापारांचा अवैध वापर सुरु आहे. काही व्यापारांनी आपल्या मर्जीनुसार त्या जागेचा वापर बदललेला आहे. काही व्यापारांनी मर्जीप्रमाणे अतिक्रमण केलेले आहे. काबरा पेट्रोल पंपाचा लिजचा कार्यकाळ संपलेला आहे. असे असतांना हा जो पुर्ण भाग आहे लकडगंज कडबी बाजाराचा त्यावर मागच्या अनेक वर्षापासून आपल्या प्रॉपर्टीचा फायदा लिज होल्डर आणि व्यापारी मंडळी घेत आहे ऐवढेच मला आपल्या निर्देशनास आणुन दयायचे आहे.

महापौर :- १५ दिवसाच्या आत आपली कारवाई पुर्ण करावी, संबंधित सर्व विभागाने यांना सहकार्य करावे, आणि आयुक्तांनी दिलेल्या निर्देशाचे पालन तत्वत: करण्याच्या दृष्टीने १५ दिवसाच्या आत आपण कार्यवाही संपवावी असे निर्देश सभागृहाच्या माध्यमातून प्रशासनाला देण्यात येत आहे.

**प्रश्न क्र २४४** :- मनपा बजेट निधी मधून वर्ष २०१९-२० मधील विणकर कॉलनी येथील नाल्याची भिंतीचे कामासंदर्भातील प्रश्नावर

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

श्री.राजेंद्र सोनकुसरे :- मा.महापौरजी, माझा प्रश्न होता प्रभाग क्र ३७ मानेवाडा येथील संरक्षण भिंतीसंदर्भात. बजेटमध्ये प्रावधान असुन या कामाचे वर्कऑर्डर सुध्दा झाले आहे. त्यानुसार हे काम करण्यास तयार आहे अशी विनंती केली असतांना सुध्दा झोनच्या अधिका-यांनी लापरवाही करुन जाणुनबुजुन हे काम करण्यास विलंब लावलेला आहे. व झोनच्या अधिका-यांनी सांगितले की कोणतेही काम प्रस्तावित करण्यात आले नाही. दिनांक २०/०१.२०२१ च्या सर्वसाधारण सभेत दिलेल्या निर्देशानुसार अति.आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली होती. मला आपणांस हेच म्हणावयाचे आहे की, माझ्या प्रभागातील सार्वजनिक अभियांत्रिकी विभागा अंतर्गत येत असलेले जे कामे थांबलेले आहे ते कामे त्वरीत पुर्ण करावे ही माझी आपणांस नम्र विनंती आहे.

कार्यकारी अभियंता (श्रीमती श्वेता बॅनर्जी) :- मा.महापौरजी, नाल्याच्या संरक्षण भिंतीच्या संदर्भात जे प्रपोजल होते ते बजेटमध्ये घेत आहे. अध्यक्ष स्थायी समिती ने जो बजट के लिये माहिती मंगवायी है उस काम मे यह काम समाविष्ट किया जा रहा है।

महापौर :- मा.सदस्य श्री.राजेंद्र सोनकुसरेजी आप के प्रश्न के उत्तर ऐंसा है की आनेवाले बजेट मे उसका प्रोव्हीजन किया जा रहा है।

श्री. राजेंद्र सोनकुसरे :- मा.महापौरजी, जे कामे झालेले नाही त्या सुध्दा कामांचा समावेश यामध्ये करण्यात यावा.

महापौर :- मा.सदस्यांचे जे कामे थांबलेले आहे त्या कामाची यादी माझ्याकडे दयावी, त्यानंतर त्या कामाच्या संदर्भात चर्चा करुन त्यावर काय निष्कर्ष काढता येईल तो काढण्याचा प्रयत्न करण्यांत येईल. याच प्रश्नामध्ये २४५ व २४६ या प्रश्नांचे उत्तर अंतर्भुत आहे.

**प्रश्न क्र २४५** :- प्रभाग क्र. ३४-ब विकास कामाचा निधी वर्ष २०१७ ते २०२० यादी उपलब्ध संदर्भात प्रश्न

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

**प्रश्न क्र २४६** :- वर्ष २०१७ ते २०२० मधिल मनपा तर्फे झालेले सिव्हील कामातुन न झालेले काम कोणते आहेत? या संदर्भात प्रश्न

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

**प्रश्न क्र २४७** :- नागपूर शहरामधील इतर प्रभागामध्ये असलेल्या खाजगी खुल्या प्लॉटवर घनकचरा झाडेझुडपे मोठया प्रमाणात असल्याचे निदर्शनास आले आहे का ? या संदर्भात प्रश्न

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

**प्रश्न क्र २४८** :- रेशीमबाग येथील व्हॉलीबॉल मैदानावर आरक्षण कोणते आहे ? या संदर्भात प्रश्न

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

महापौर :- निगम सचिवांनी स्थगण प्रस्तावाचे वाचन करावे. प्रविण दटके यांचा स्थगण प्रस्ताव स्विकारण्यात आला आहे.

निगम सचिव :- मा.सदस्य, श्री प्रविण दटके यांनी नागपूर शहरातील कोविडची परिस्थिती पाहता व नागपूर शहरात लागलेले प्रतिबंध (लॉकडाऊन) तसेच नागपूर शहरात चालू असलेले लसीकरण व कोविड-१९ फ्रंन्ट लाईनवर काम करणारे कर्मचारी यांचे लसीकरण यावर चर्चा घडवुन आणण्यासाठी स्थगण प्रस्ताव दिलेला आहे.

महापौर :- मा.सदस्य श्री.प्रविणजी दटके यांनी स्थगण प्रस्तावावर चर्चा सुरु करावी

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, माझ्या स्थगण प्रस्तावावर प्रशासनाने निवेदन करावे की, शहरातील फ्रंटलाईन वर्करचे किती व्हॅक्सीनेशन झाले. डिपार्टमेंट निहाय किती व्हॅक्सीनेशन झाले, कोव्हीडची परिस्थिती लक्षात घेता महानगरपालिकेच्या माध्यमातून किती व्हॅक्सीनेशन होत आहे. बेडची उपलब्धता किती आहे. किती दवाखाने सुरु झाले आहे. महानगरपालिके अंतर्गत किती ठिकाणी सर्व्हे सुरु आहे. जे नागरिक आयसोलेट आहे त्यांच्याकडे कोणाचे लक्ष आहे या सर्व बाबींवर संबंधित अधिकारी किंवा जे काही जबाबदार अधिकारी आहे त्यांनी या विषयावर निवेदन करावे अशी माझी विनंती आहे.

महापौर :- प्रशासनाने उत्तर दयावे.

अति.आयुक्त (श्री.राम जोशी) :- मा.महापौरजी, आदरणिय सदन, शहरामध्ये कोव्हीडच्या परिस्थितीला आपण खुप दिवसांपासून तोंड देत आहोत, सध्या कोव्हीडची टेस्ट करण्याकरीता महानगरपालिकेतर्फे ५२ फ्री टेस्ट सेंटर सुरु आहे तेथे आर.टी.पी.सी.आर. व ॲन्टीजन टेस्ट होतात. याशिवाय आपल्याकडे प्रायव्हेट लेबॉटरीमध्ये सुध्दा जो काही शासनाने दर निश्चित करुन दिले आहे तेथे सुध्दा टेस्टींग सुरु आहे. नुकत्याच आपल्याकडे व्हॅक्सीनेशन सुरु झालेले आहे या व्हॅक्सीनेशनमध्ये चार प्रकारच्या कॅटीगीरीमध्ये शासनानी सुरुवात केलेली आहे. सर्वप्रथम आपल्याकडे हेल्थ केअर वर्करचे व्हॅक्सीनेशन सुरु झाले तसेच फ्रंटलेव्हल वर्करचे व्हॅक्सीनेशन सुरु झाले. या फ्रंटलेव्हल वर्करचे जे रजिस्ट्रेशन करायचे होते ते फक्त महानगरपालिकेच्या

कर्मचा-यांचे रजिस्ट्रेशन महानगरपालिकेने करायचे होते आणि हेल्थ केअर वर्करचे आपल्याकडे ज्या ज्या हेल्थ केअर वर्करने आपल्याकडे डाटा पाठविला होता त्या अनुषंगाने आपल्याला त्यांचे रजिस्ट्रेशन करायचे होते हे दोन्ही टप्पे सुरु झाल्यानंतर आपल्याकडे १ मार्चपासून सिनिअर सिटीझनचे व्हॅक्सीनेशन शासनाने सुरु केले, या सिनिअर सिटीझन म्हणजे ६० वयापेक्षा जास्त असलेल्या सिनिअर सिटीझनच्या व्यतिरिक्त ४५ ते ६० वर्षाच्या दरम्यान असलेले ज्यांचे वय आहे त्यांना कोम ऑरबेडीटी आहे त्या लोकांचे सुध्दा व्हॅक्सीनेशन सुरु झालेले आहे. आजपर्यत आपल्याकडे १,१६,६९३ व्हॅक्सीनेशन फक्त सिनिअर सिटीझन आणि ४५ प्लस कोम ऑरबेडीटी यांचे झालेले आहे. उर्वरीत जे फ्रंट लाईन वर्कर आणि हेल्थ केअर वर्कर आहे यांचे मिळुन आपल्याकडे १,९२,००० ऐवढे व्हॅक्सीनेशन झालेले आहे. १,९२,००० हजारामध्ये जसे महानगरपालिकेचे फ्रंट लेव्हल वर्कर आहे त्याचप्रमाणे पोलीस विभागाचे फ्रंट लाईन वर्कर आहे , रेव्हेन्यु विभागाचे आहे आता रेल्वेचे सुध्दा त्यामध्ये समाविष्ट करण्यात आलेले आहे. असे टप्याटप्याने आपल्याकडे व्हॅक्सीनेशन सुरु आहे. आपल्याकडे आता ७४ व्हॅक्सीनेशन सेंटर सुरु आहे त्यामध्ये ४५ प्रायव्हेट आहे २९ गर्व्हनमेंटचे आहे. यापैकी आपण बहुतांश ठिकाणी कोव्हीडशिल्ड ही लस उपलब्ध करुन दिलेली आहे आणि चार ते पाच केंद्रावर म्हणजे जी.एम.सी. चे दोन्ही केंद्र, महाल दवाखाना, आंबेडकर दवाखाना, इंदोरा चौकातील आणि विवेका या ठिकाणी कोव्हॅक्सीन ही लस देण्यात आलेली आहे. कोव्हीडशिल्ड आणि कोव्हॅक्सीन यांची जशी जशी आपल्याला उपलब्धता शासनाकडुन होत आहे ती उपसंचालक कार्यालयाला पुर्वी प्राप्त होते आणि उपसंचालकाच्या माध्यमातून आपल्याला मिळते. मध्यंतरीच्या काळामध्ये आपल्याला थोडा शॉर्ट गेला होता तेव्हा विभागीय आयुक्तांना विनंती करुन इतर जिल्हयातील व्हॅक्सीन सुध्दा आपल्याकडे उपलब्ध करुन घेतले होते आज आपल्याकडे २५ ते ३० हजार व्हॅक्सीन आहे साधारणत: या व्हॅक्सीन आपल्याला दोन ते तीन दिवस पुरतील, पुढची सुध्दा मागणी आम्ही उपसंचालक कार्यालयाच्या माध्यमातून शासनाकडे वारंवार करीत आहे. यामध्ये आपल्या सर्व नगरसेवकांचा देखील सहभाग फार छान मिळत आहे. नागपूर शहरामध्ये जे ४५ ते ५९ वर्ष वयोगाटातील जे कोम ऑरबेडीटी आहे त्यासह सिनिअर सिटीझनला आपल्यासह बहुतांश नगरसेवकांनी व पदाधिका-यांनी त्यांना मार्ग दाखविला आहे की त्यांना कुठे जायचे, कसे करायचे, रजिस्ट्रेशन सुध्दा झोन कार्यालयामध्ये चालु आहे. एन.जी.ओ. आणि नगरसेवक स्वत:हुन पुढे येऊन रजिस्ट्रेशन करुन दयायला मदत करीत आहे. याप्रकारे अंदाजे आपल्या शहराची लोकसंख्या २७ ते २८ लाखांचा जर आपण विचार केला तर साधारणत: ९ टक्के लोकसंख्या ही ६० पेक्षा जास्त वयाची असते त्यामध्ये कोम ऑरबेडीटी धरले तर ३.८ लक्ष ऐवढया नागरिकांपर्यत व्हॅक्सीनेशन पोहचवायचे आहे. त्यामुळे मोठे काम आपण सुरु केले आहे. आपल्या सर्वांच्या सहकार्य व सहभाग आवश्यक आहे यामध्ये व्हॅक्सीनेशन हा सर्वाज जालीम उपाय आहे असे म्हणता येईल, नागपूर शहरामध्ये जी कोव्हीडची परिस्थिती आहे ती लक्षात घेता आपल्याकडे दोन ते अडीच हजार पेक्षाही जास्त रुग्ण मोठया संख्येने आपल्याकडे येते त्यामुळे आपल्याकडे जे पुर्वी खाजगी दवाखाने होते त्या दवाखान्याच्या संख्येमध्ये थोडयाप्रमाणात वाढ झालेली आहे आणखी आपल्याकडे ती संख्या वाढवायची गरज आहे.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, ही माहिती मोघम आहे. प्रत्यक्षात किती खाजगी दवाखाने सुरु झाले

आहे. खाजगी दवाखान्यामध्ये आय.सी.यु. किती आहे, व्हॅन्टीलेटर किती आहे, ऑक्सीजनयुक्त बेड किती आहे. मेयो, मेडीकल, लता मंगेशकर, शालिनीताई मेघे असे किती हॉस्पीटल आहे. महानगरपालिकेच्या हॉस्पीटलमध्ये काय सुरु आहे अशी सर्व डिटेल माहिती सर्व नगरसेवकांपर्यत तसेच या जे मा.पत्रकार बंधु आहे त्यांच्यापर्यत निट गेली पाहिजे. डिटेल माहिती देण्याची आज गरज आहे. अधिकारी येथे मोघम माहिती देत आहे. अनेक सफाई कर्मचा-यांचे अजुन व्हॅक्सीनेशन आणि रजिस्ट्रेशन निट न केल्यामुळे झालेले आहे. यांच्याकडे जर सफाई कर्मचा-यांची माहितीच नसेल तर त्यांना व्हॅक्सीनेशन काय देतील, ज्यांनी मागच्या पुर्ण वर्षभरात आपला जीव धोक्यात टाकुन या शहराची स्वच्छता केली. ज्या स्वच्छता कर्मचा-यांनी पी.पी. किट घालुन कोरोना असलेल्या रुग्णांचे अंतिम संस्कार केले त्यांना व्हॅक्सीनेशन होऊ शकले नाही हे दुर्देव आहे. त्यामुळे अधिका-यांना सांगण्यात यावे की सेस्पीसीफीक उत्तर दयावे. महानगरपालिकेमध्ये झोननिहाय किती सफाई कर्मचा-यांचे व्हॅक्सीनेशन झाले, महानगरपालिकेत ज्या विभागामध्ये फ्रंट लाईन वर्कर नव्हते त्यांचेसुध्दा व्हॅक्सीनेशन झाले, ज्या खाजगी डॉक्टरांनी आपल्याकडे रजिस्ट्रेशन केले होते त्यांनी आपल्या आव्हानावर ओपीडी सुरु केली आहे परंतु त्यांना सुध्दा अजुनपर्यत व्हॅक्सीनेशन मिळाले नाही. त्यामुळे अधिका-यांनी डिटेल माहिती की किती साधे बेड आहे, किती ऑक्सीजन युक्त बेड आहे, किती आय.सी.यु. आहे, किती व्हेंटीलेटर आहे, किती खाजगी दवाखान्यामध्ये एकुण बेड आहे. किती गर्व्हनमेंटच्या दवाखान्यामध्ये किती बेड आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, सन्माननिय जेष्ठ सदस्य श्री.प्रविण दटके यांनी स्थगण प्रस्ताव दिला आहे. मा.महापौरजी याच्या आधी सुध्दा एक ते दोन विषयासंदर्भात माझा हात वर केला होता परंतु बोलण्याची परवानगी मिळाली नाही. स्थगण प्रस्तावावर चर्चा करण्याची काही नियमावली आहे. स्थगण प्रस्तावावर मा.सदस्यांनी आपले विस्तृत म्हणणे मांडुन घ्यावे, त्यांना कुठल्या कुठल्या विषयावर चर्चा उपस्थित करावयाची आहे. तसेच या अनुषंगाने अन्य सदस्यांना जर स्थगण प्रस्तावावर सहभागी व्हायचे असेल तर सर्व सदस्य त्यावर आपले मत व्यक्त करतील, त्यानंतर आपण निर्देशित केल्याप्रमाणे प्रशासन त्यावर उत्तर देईल ही पध्दत आहे. स्थगण प्रस्तावावर चर्चा करीत असतांना प्रश्नोत्तरासारखी चर्चा होऊ शकत नाही त्यामुळे एक-एक प्रश्नाचे उत्तर आपण या सभागृहामध्ये स्थगण प्रस्तावाच्या अनुषंगाने अपेक्षित नाही.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर, मी सुरुवातीलाच दोन ओळीचे माझे निवेदन केले, माझे म्हणणे होते की जे व्हॅक्सीनेशन असेल, कोव्हीडची परिस्थिती असेल, मला प्रशासनावर दोषारोप करण्यासाठी मी विषय ठेवला नाही. कोव्हीडच्या संदर्भात शहरात काय परिस्थती आहे. महानगरपालिका काय करीत आहे. मला सुध्दा प्रश्नोत्तर करायचे नाही परंतु जर माहिती प्रॉपर येत नव्हती म्हणुन मी इंअरअप केले.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, दटके साहेबांच्या ज्ञानावर माझा अजिबात आक्षेप नाही. माझे मित्र आहे, माझे बंधु आहे त्यांचा अनुभव आहे मला ते म्हणायचे नाही. मी फक्त माझे निवेदन केले स्थगण प्रस्तावावर साधारणत: अशाप्रकारे चर्चा व्हायला पाहिजे. मा.महापौरजी आपण सभागृहाचे प्रमुख आहे. सभागृहाचे सर्वस्वी निर्णय आपण घ्यावे, या आधी सुध्दा ज्यावेळी लक्षवेधीचा प्रस्ताव आला होता परंतु लक्षवेधीवर चर्चा अभिप्रेत नसते. मात्र लक्षवेधीवर चर्चा झाली. लक्षवेधीवर चर्चा करता येत नाही. त्यावर मा.आयुक्त निवेदन देतील, आणि निवेदनासाठी त्यांच्याकडे माहिती जर पर्याप्त नसेल तर पुढच्या सभागृहामध्ये त्यांनी निवेदन करावे असा नियम

आहे. मात्र मा.महापौरजी लक्षवेधीवर चर्चा झालेली आहे. आता स्थगण प्रस्तावावर चर्चा करीत असतांना प्रश्नोत्तर अपेक्षित नाही तर स्थगण प्रस्तावावर विस्तृत भाषण म्हणजे त्यांना जे जे गोष्ट मांडायची आहे ती सर्व मांडावे त्याबद्यल आक्षेप नाही.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, मला प्रश्नोत्तर करायचे नाही. या महानगरपालिकेत जे भट सभागृह मध्ये सभा झाली होती त्यावेळच्या आयुक्तांनी त्यांच्या निवेदनात प्रचंड खोटी माहिती ठेवली होती. त्यामुळे खोटी माहिती ऐकुण घेण्यास आम्ही सभागृहात बसलो नाही.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, प्रशासन जर खोटी माहिती देत असेल तर निश्चितपणाने हे सभागृह त्यावर निर्णय घेण्यासाठी सक्षम आहे. आणि आमचा मा.महापौरांवर विश्वास आहे.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, त्याही सभागृहात महापौरांवर आमचा विश्वास होता, त्यांनी सक्षम निर्णय घेतले आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- म्हणजे यावेळच्या महापौरांवर आपला विश्वास नाही काय ?

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, मा.सदस्य श्री.प्रफुल्लजी मला शब्दच्छेल करायचा नाही आणि मला राजकारण करायचे नाही. मा.महापौरजी मला आपल्या माध्यमातुन सांगायचे आहे त्याही महापौरांवर आमचा विश्वास होता आणि याही महापौरांवर आमचा विश्वास आहे परंतु प्रशासनाने मागच्या वेळेस खोटे उत्तर देऊन निर्देश सभागृहाने दिले होते ते ठराव अजुनही विखंडीत झालेले नाही. जर या निवेदनात जर प्रशासन खोटे बोलणार असेल आणि खोटेच ऐकुण घ्यायचे असेल तर आम्ही याच्यानंतर सभागृहात स्थगण प्रस्ताव टाकणार नाही. त्यामुळे आम्हाला खरी माहिती सभागृहात पाहिजे आहे.

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर, मा.दटके साहेब माहिती घेतांना जी माहिती प्रशासनाच्या निवेदनातुन सुटत होती याबद्यल दटके साहेबांनी म्हटले की तुम्ही जी माहिती आम्हाला देत आहेत त्यामध्ये हे ॲड करा, जर काही गोष्टीची माहिती मिळत असेल तर त्यांचा तो अधिकार आहे आणि दटके साहेबांनी ती माहिती मागितली, त्यामुळे आपण संबंधित अधिका-यांना सांगावे की जी माहीती दटके साहेब मागत आहे ती माहिती आपण सभागृहाच्या पटलावर ठेवावी.

महापौर :- सन्माननिय सदस्यांनी जी माहिती मागितली आहे ती प्रशासनाने सभागृहाच्या पटलावर उपलब्ध करुन दयावी.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, ३६०० बेडपैकी किती बेड फंक्शनल आहे किती बेड रिकामे आहे त्या संदर्भात सुध्दा माहिती देण्यात यावी.

महापौर :- मा.सदस्य श्री.प्रविणजी दटके आपल्याला जी माहिती हवी आहे त्या संदर्भात आपण एकत्रित सर्व बोलुन घ्यावे. त्यानंतर मी प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देण्यास प्रशासनाला निर्देश देतो.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, डिटेल माहिती मध्ये एकुण किती बेड आहे, किती रिकामे आहे, किती भरलेले आहे किती बेड रिकामे आहे ते मा.सदस्यांना किंवा नागरिकांना कुठल्या पोर्टलवर बघता येईल, हे सर्व डिटेल माहिती पाहिजे आहे. जी माहिती अधिकारी देत आहे ही मोघम स्वरुपाची देत आहे. मला प्रशासनाला इंटरअप करण्यात काही इंटरेस्ट नाही. फक्त यांनी या पुर्ण सभागृहाला, सभागृहातील १५६ सदस्यांना या

सभागृहाच्या माध्यमातून सर्व जनतेला खरी माहिती दयावी, ऐवढीच माझी सभागृहाच्या माध्यमातून अपेक्षा आहे.

महापौर :- प्रशासनाचे निवेदन एकदा पुर्ण होऊ दया, त्यामध्ये प्रशासनाचे काही चुकले तर आपण पुन्हा प्रश्न विचारावे त्यानंतर प्रशासन पुन्हा माहिती देईल. प्रशासनाने डिटेलमध्ये माहती दयावी, ज्याप्रमाणे सन्माननिय सदस्यांना अपेक्षित आहे.

अति.आयुक्त (श्री.राम जोशी) :- मा.महापौरजी,सन्माननिय सदस्यांनी मागणी केल्याप्रमाणे डिटेल माहिती सादर करण्यात येत आहे. आजपर्यत ज्या प्रायव्हेट हॉस्पीटलमध्ये कोव्हिडचे सेंटर दिले आहे असे एकुण ७९ हॉस्पीटल आहे. ७९ हॉस्पीटल मिळुन २९३६ बेड उपलब्ध आहे. या २९३६ बेडपैकी १८३९ बेड ऑक्सीजनचे ९९४ बेड आय.सी.यु. चे २६१ बेड व्हेंटीलेटरचे आहे. त्यापैकी सर्व ऑक्युपेशन झाल्यानंतर जे रिक्त आहे ते १९४ ऑक्सीजनचे, ४६ बेड आय.सी.यु चे आणि ३५ बेड व्हेंटीलेटरचे हे प्रायव्हेट बेड दवाखान्यामध्ये आज रोजी उपलब्ध आहे. या व्यतिरिक्त ८ हॉस्पीटल गर्व्हनमेंटचे आहे यांची बेडची एकुण संख्या आहे १५१५ त्यापैकी ऑक्सीजनचे ८५२ बेड आय.सी.यु. चे ३१९ बेड आणि व्हेंटीलेटरचे २७१ बेड यापैकी तेथे ऑक्युपेशन झाल्यानंतर तेथे जी व्हॅकंन्सी आहे ती ४२७ ऑक्सीजनचे बेड अव्हेलेबल आहे. आय.सी.यु. ७० आहे आणि व्हेंटीलेटरचे बेड ७४ आपल्याकडे उपलब्ध आहे. सन्माननिय सदस्यांनी व्हॅक्सीनसाठीचा जो डेटा विचारला आहे तो असा आहे की आजरोजी आपल्याकडे ७४ व्हॅक्सीनेशन सेंटर सुरु आहे. त्यामध्ये ४५ प्रायव्हेट हॉस्पीटल आहे आणि २९ हे गर्व्हनमेंट हॉस्पीटलमध्ये आहे. सन्माननिय सदस्यांनी आणखी एक विचारणा केली की सफाई कामगारापैकी किती सफाई कामगारांना व्हॅक्सीनेशन दिलेली आहे किती लोकांना दिलेली नाही. विभागाकडुन मिळालेल्या माहिती प्रमाणे एकुण ७४७७ एकुण सफाई कामगार कार्यरत आहे त्यापैकी ३८५८ सफाई कामगारांनी आजपर्यंत आपल्याकडुन लस घेतलेली आहे. त्याचा पाठपुरावा करुन सफाई कामगारांना कनव्हेंस करण्याचा प्रयत्न सुरु आहे त्यांना सर्वांना आपण लस देण्यास इच्छुक आहे. पुर्वी जे हेल्थ केअर वर्कर अनरिजस्टर किंवा सुटलेले आहे त्यांना लस देता येत नव्हती त्यामुळे आता कोवीन २ या ॲपमध्ये अशी तरतुद करण्यात आली आहे की या हेल्थ केअर वर्करनी सेंटरवर जाऊन आपले ओळखपत्र दाखविले तर त्यांना तिथल्या तिथे रजिस्ट्रेशन करुन घेता येते आणि फ्रंट लेव्हल वर्करने सुध्दा ज्यांचे रजिस्ट्रेशन झालेले नसेल त्यांनी सुध्दा आपले ओळखपत्र दाखविले तर त्यामध्ये रजिस्ट्रेशन करुन त्यांना व्हॅक्सीनेशन दिल्या जाईल, महाल येथील दवाखान्यात अशाप्रकारचे जे हेल्थ केअर वर्कर आहे आयुक्त साहेबांनी आाणि मी भेट दिली असतांना सुध्दा तेथे आलेले होते आणि त्यांचे रजिस्ट्रेशन करणे सुरु होते. ज्यांनी १०० टक्के प्रत्यक्ष काम केलेले आहे अशा सर्व लोकांना या व्हॅक्सीनेशन मध्ये सहभागी करुण घेणे परंतु या ऐच्छिक गोष्टी आहे याकरीता जबरदस्ती आम्हाला करता येत नाही परंतु आग्रहपुर्वक करण्याचा प्रयत्न प्रशासनाकडुन सुरु आहे. आपलया मार्गदर्शनाखाली आम्ही व्हॅक्सीनेशन पुर्णत: करु अशी आपणांस ग्वाही देतो.

महापौर :- आता जी माहिती आपण बेडची दिलेली आहे ती माहिती किती वाजताची आहे ते सुध्दा नमुद करावे,

अति.आयुक्त (श्री.राम जोशी) :- मा.महापौरजी, बेड संदर्भात जी आता माहिती दिली आहे ती आज सकाळी १०.०० वाजताची स्थिती आहे.

महापौर :- सन्माननिय सदस्य श्री.प्रविणजी दटके प्रशासनाच्या निवेदनामध्ये काही सांगायचे राहिले असेल तर ते पुन्हा सुचित करतील त्यामुळे आपण आपले भाष्य करावे.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, मला सांगावायस खेद वाटतो की जेव्हा मा.पालकमंत्री महोदयांनी बैठक घेतली त्या बैठकीला आपण सुध्दा उपस्थित होता तेव्हा व्हॅक्सीनेशन सेंटरची संख्या ८८ होती ती आता ७४ वर आलेली आहे. त्यामुळे असे काय झाले की ती संख्या कमी झालेली आहे हा माझा एक मुद्या आहे. आपण व्हॅक्सीनेशन सेंटर वार्ड निहाय किंवा प्रभाग निहाय करणार आहेत की नाही ते करण्याकरीता आपल्याला कोणत्या गोष्टी लागणार आहे. महानगरपालिकेने किती शिफ्टमध्ये व्हॅक्सीनेशन सुरु केले आहे. त्यामध्ये एक शिफ्ट आहे की दोन शिफ्ट आहे की तीन शिफ्ट आहे त्या संदर्भात महानगरपालिकेने काय उपाययोजना केलेल्या आहेत काय ? ७९ खाजगी हॉस्पीटलमध्ये २९३६ पैकी १८४९ ऑक्सीजनयुक्त बेड आहे त्यातील १९१ रिकामे आहे तर याची काही ॲप आहे काय की सामान्य नागरिकांना कळेल की कुठल्या हॉस्पीटलमध्ये किती बेड रिकामे आहे. या संदर्भात महानगरपालिकेने काही नियोजन केले आहे काय ? जे आठ सरकारी दवाखाने आहे ते कोणते दवाखाने आहे. गर्व्हनमेंट हॉस्पीटलमध्ये १५१५ बेड उपलब्ध आहे ४२७ ऑक्सीजनचे बेड रिकामे आहे ७० ऑक्सीजनचे बेड रिकामे आहे ७४ व्हेंटीलेटचे बेड रिकामे आहे ते सर्व सामान्य नागरिकांना कसे कळेल, याबाबतीत प्रशसनाने काही नियोजन केले आहे काय किंवा काही टोल फ्री नंबर प्रकाशीत केला आहे काय ? पुर्वी मे किंवा जुन २०२० मध्ये प्रत्येक खाजगी हॉस्पीटलने बिल योग्य आहे की नाही त्यांनी दर बरोबर लावले की नाही लावले या संदर्भात महानगरपालिकेच्या प्रशासनाने काही नियोजन केले आहे काय याची माहिती आवश्यक आहे. आणि ही माहिती रोजच्या रोज महानगरपालिकेकडुन महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर माझी आपणांस विनंती आहे की वृत्तपत्रकाच्या माध्यमातून, टी.व्ही. चॅनलच्या माध्यमातून तसेच कोव्हीडच्या बाबतीत डेली ब्रिफींग व्हेंटीलेटर असतील किंवा ऑक्सीजनचे बेड असतील याबाबतीत डेली ब्रिफींग महानगरपालिकेच्या एका अधिका-यांकडे डे टु डे ब्रिफींग करण्याची आपण व्यवस्था केलेली आहे काय, मी आपले आणि या सभागृहातील सर्व सदस्यांचे अभिनंदन करतो सर्व पक्षीय नेत्यांचे मा.पालकमंत्र्यांचे, मा.केंद्रीय मंत्री श्री.नितीनजी गडकरी यांचे तसेच सर्वपक्षीय खासदारांचे मा.आमदारांचे की त्यांनी व्हॅक्सीनेशन करीता मोठया प्रमाणात प्रशासनाला मदत केली आहे. परंतु प्रशासानाने दोन शिफ्टमध्ये हे चालु केले तर शहरात मोठया प्रमाणात व्हॅक्सीनेशन होईल, १ एप्रिल पासुन महानगरपालिकेच्या सर्व झोन कार्यालयामधुन सर्व सफाई कामगारांचे रजिस्ट्रेशन करणार आहेत काय त्यावर प्रशासनाचे काय म्हणणे आहे. लोकप्रतिनिधी प्रशासनाला संपुर्ण मदत करण्यास तयार आहे. परंतु प्रशासन या संदर्भात काही पॉलिसी तयार करणार आहेत काय ? ऑटो आणि रिक्षाच्या माध्यमातून आपली काही प्रसिध्दी करण्याची योजना आहे काय ? या संदर्भात प्रशासनाची काही पॉलिसी आहेत काय किंवा काही उपाययोजना केलेल्या आहेत काय ? होम आयसोलेशन करीता किती टिम आहे. आपण रोज किती आर.टी.पी.सी.आर. टेस्ट करीत आहे ते वाढविण्याची गरज आहे काय ? तेवढा स्टाफ आपल्याकडे उपलब्ध आहे काय ? खाजगी दवाखान्यामध्ये किंवा सरकारी दवाखान्यामध्ये मागच्या वेळी जसा आपण स्टाफ पुरविला होता आता तशी काही व्यवस्था आहे काय ? यांच्यावर एकंदरीत प्रशासन पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधी, मा.आमदार असतील मा.खासदार असतील, मंत्री असतील नगरसेवक असतील

आरटीपीसीआर ची जबाबदारी कोणत्या मानसाकडे आहे. व्हॅक्सीनेशनची जबाबदारी कोणत्या मानसाकडे आहे सर्वच्या सर्व अति.आयुक्त श्री.राम जोशी आणि आरोग्य अधिकारी श्री.चिलकर यांच्याकडेच आहे काय, समजा व्हॅक्सीनेशनच्या संदर्भात बोलायचे असेल तर संबंधित अधिकारीशी बोलता येईल, आर.टी.पी.सी.आर. च्या संदर्भात बोलायचे असल्यास संबंधित अधिकारीशी बोलता येईल, ज्या अधिकारी कडे खाजगीची व्यवस्था असेल त्याच्याशी त्या बाबतीत बोलता येईल, ज्या अधिका-याकडे सरकारी व्यवस्था असेल तर त्याच्याशी बोलता येईल, आम्हाला काहीपणा माहिती पाहिजे असल्यास आम्ही जोशी साहेबांना फोन लावतो नाहीतर डॉ.चिलकरला फोन लावतो, त्यामुळे त्या त्या झोनचे मेडीकल आफीसर असेल, जर आपण हातात हात घालुन जर आपण निट कारवाई करु शकलो तर पुढच्या १० ते १५ दिवसात आपण निट व्यवस्था उभारु शकु, याची संपुर्ण माहिती आपण प्रशासनाकडुन घ्यावी, अशी स्थगण प्रस्तावाच्या संदर्भात माझी मागणी आहे.

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, स्थगण प्रस्तावाच्या विषयाला जोडुन यामध्ये दोन ते तीन मुद्ये आहे. होम आयसोलेशनच्या संदर्भात विचारले आहे की किती लोकांची टिम आहे ही माहिती सभागृहाला मिळाली पाहिजे अशी माझी अपेक्षा आहे. होम आयसोलेटमधील किती पेशंट महानगरपालिकेच्या कर्मचा-यांनी संपर्क साधला आहे त्यांची माहिती घेतली आहे. किती पेशंटपर्यत महानगरपालिकेच्या माध्यमातून औषधांचा पुरवठा झाला आहे. एकुण किती टिम यामध्ये कार्य करीत आहे याचा डे टु डे रिपोर्टची माहिती याला जोडुन प्रशासनाने दयावी अशी माझी मागणी आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, अत्यंत महत्वाचा विषय सन्माननिय दटके साहेबांनी या ठिकाणी स्थगण प्रस्तावाच्या माध्यमातून उपस्थित केला आहे. सध्या नागपूर शहर हे देशातून दुस-या नंबरचे शहर झाले आहे. की या शहरामध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव मोठया प्रमाणात वाढलेला आहे. कोव्हीडच्या स्थितीमध्ये मागचा अनुभव आपला राहिला आहे तेव्हाच्या स्थितीमध्ये आणि आजच्या स्थितीमध्ये थोडेसे अंतर आहे. मागच्या वेळी जेव्हा कोरोना आला त्यावेळी सर्व लोक जागरुक होते आणि जे भितीयुक्त वातावरण जगामध्ये होते तशी खबरदारी लोकांनी सुध्दा घेतली होती. मात्र वर्षभरामध्ये ज्यावेळी त्यांचे जिवनमान विस्कळीत झाले आणि त्या विस्कळीत झालेल्या जिवनमाना नंतर त्यांना घराच्या बाहेर पडणे गरजेचे होते आणि घराच्या बाहेर पडल्यानंतर गर्दी होऊन राहिली आणि मोठया प्रमाणामध्ये दरोरोज मोठे पेशंट यायला लागले आहे. आधीच्या कोरोनाच्या स्थिती आणि आताच्या कोरानाच्या स्थितीमध्ये थोडेसे अंतर आहे. एखादा रुग्ण ज्यावेळी पॉझिटीव्ह येतो आणि तो आल्यानंतर एखादया फिजीशीयन कडे कंन्सलटेशन करीता जातो तेव्हा त्याचा सिटीस्कोर ० किंवा १० च्या आतमध्ये असेल, तर तो फिजीशीयन त्याला सल्ला देतो की घरीच आपला औषोधोपचार केला पाहिजे. घरी औषधोपचार केल्यानंतर साधारणत: तीन ते चार दिवसानंतर त्याचा सिटीस्कोर १० पेक्षा अधिक होतो आणि त्याची सिस्टीम थोडी विक व्हायला लागते, आणि त्याला हॉस्पीटलाईज करण्याची गरज भासते. मा.महापौरजी, एखादया नागरिकाला जर हॉस्पीटलाईज व्हायचे असेल तर हॉस्पीटलाईज होण्याची जी सध्याची सिस्टीम आहे महानगरपालिकेच्या दृष्टीकोणातून ती पुर्णत: कमकुवत आहे. कुठलिही व्यवस्था नाही. जे आकडे दिलेले आहे राम जोशी साहेबांनी की अजुनही आय.सी.यु. चे बेड खाली आहे. व्हेंटीलेटरचे बेड खाली आहे परंतु ती स्थिती प्रत्यशामध्ये नाही. ज्या ८ गर्व्हनमेंट हॉस्पीटलमधील १५१५ बेडची संख्या दिलेली आहे. मेडीकल मध्ये

साधरणत: ६०० बेड आहे. मात्र त्यामध्ये फंक्शनिंग बेड किती आहे तर ते अत्यंत कमी आहे. २०० ते २५० च्या वर बेडची संख्या कार्यरत नाही. प्रायव्हेट हॉस्पीटलमध्ये जर जायचे असेल तो त्या नागरिकांचा तो स्वत:चा निर्णय असतो. मात्र आपण सरकारी हॉस्पीटलची जर स्थिती पाहिली तर ते महानगरपालिकेचे हॉस्पीटल असो किंवा शासनाचे हॉस्पीटल असो, ज्या पध्दतीने तेथे सुविधा मिळायला पाहिजे पेशंट बेडच्या उपलब्धतेकरीता दोन दिवस फोनाफानी करुन राहिला किंवा ईकडेतिकडे फिरुन राहिला तोपर्यत त्याची जी इन्फेक्शन लेव्हलजी आहे ती वाढुन राहिली आहे. त्यामुळे त्याच्यावर जी परिस्थिती येऊन राहिली ती अत्यंत बिकट आहे. आणि यामध्ये महानगरीपालिकेचा हात नागरिकांपर्यत पोहचणे गरजेचे आहे मला असे वाटते की तो कुठल्याही पध्दतीने जात नाही. आपलं कंट्रोल रुम आहे त्या कंट्रोल रुमची जी आकडेवारी आहे ती आकडेवारी वारंवार चुकत आहे असे का होत आहे. त्या कंट्रोल रुमचा नोडल ऑफीसर कोण आहे. अति.आयुक्त राम जोशी साहेब आहे. दटके साहेबांनी सांगितले की एकच मानुस किती काम पाहणार त्याला जर आपण डिसेंट्रलाईज करुन झोन स्तरावर त्याची व्यवस्था निर्माण केली त्याचा रिव्हुव काय आहे. मा.महापौरजी आपण साक्षी आहेत काल मी आपणास विनंती केली होती आणि आपण माझ्या विनंतीवरुन इंदिरा गांधी रुग्णालयामध्ये आले होते. पर्वाची स्थिती आपल्याला माहिती आहे. ऑक्सीजनचा पुरवठा संपणार आहे हे माहिती असतांना देखील प्रशासन काहीच काम करायला तयार नाही अशी स्थिती आहे. आपल्याला माहित आहे की उद्या सकाळी ०६.०० वाजता ऑक्सीजन संपुण राहिलं आहे. किंवा ज्या प्रमाणात ऑक्सीजनची मागणी आहे त्या प्रमाणामध्ये तेथे ऑक्सीजन नसेल तर प्रशासनाने गंभीर राहुन तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे. ही बाब माझ्या लक्षात आली आणि ही बाब मी आपल्या लक्षात आणुन दिली आणि आपण यामध्ये प्रत्यक्ष हस्तक्षेप करुन ती उपलब्धता करुन घेतली मात्र ही स्थिती का आली त्यामध्ये प्रशासनाने सुमोटो निर्णय का घेण्यात आलेला नाही. औषधांची जर स्थिती पाहिली दवाखान्यामध्ये कागदोपत्री उपलब्धता पुर्ण मिळते परंतु प्रत्यक्षात त्या दवाखान्यामध्ये स्टिकर नाही आहे. तेथे प्रायव्हेट फार्मसीचे नावे दिले, नंबर दिला आहे. इंजेक्शन संपले असेल तर तेथे जे नंबर दिले आहे त्या नंबरवर फोन करा आणि खाजगी फार्मसीमध्ये आपल्याला उपलब्ध होऊन जाईल, महानगरपालिकेच्या दवाखान्यामध्ये औषधी खाजगी दवाखान्यामधुन घेण्याची आवश्यकता का भासते, महानगरपालिकेकडे याचा तुटवडा आहे काय ? औषधांची संख्या कमी आहे काय, मा.महापौरजी, महानगरपालिकेच्या दवाखान्यामध्ये औषध संपल ती स्थिती आपल्यासाठी भुषणावह नाही. माझा प्रश्न आहे या निमित्ताने महानगरपालिकेच्या अधिकारी किंवा पदाधिका-यांच्या गाडीतले पेट्रोल कधी संपत नाही ते संपण्याच्या आधीच आपण भरतो मात्र ऑक्सीजन संपते, औषधोपचार संपते त्याचा पुरवठा संपतो मा.महापौरजी ही आपल्यासाठी योग्य स्थिती नाही. त्याचप्रमाणे होम आयसोलेशनच्या मॉनिटरींगची सिस्टीम सुध्दा पुर्णत: कोलॅप्स झालेली आहे. सुरुवातीला महानगरपालिकेचा कर्मचारी तेथे जात होता तेव्हा त्याला विचारपुस केल्या जात होती आज अशी कुठलिही व्यवस्था आपल्याकडुन सुरु नाही. मला असे वाटते की १५ दिवसा आधी पर्यत ती स्थिती कायम होती. मात्र या १५ दिवसामध्ये फोनची व्यवस्था महानगरपालिकेच्या माध्यमातून सुरु नाही. त्याचा फिडबॅक घेतला जात नाही. कागदावरुन बेडची उपलब्धता दिसते परंतु अजुनही लोक भटकतांना दिसतात बेड मिळत नाही. मग ते प्रायव्हेट हॉस्पीटल असो की गव्हर्नमेंट हॉस्पीटल असो तेथे बेडची उपलब्धता त्यांना मिळत नाही. मा.महापौरजी हा विषय आपण अत्यंत

गांभीर्याने घेतला पाहिजे. महानगरपालिका प्रशासन हा विषय ऐवढया गांभीर्याने घेत नाही म्हणुन माझी आपणांस विनंती आहे की या संदर्भामध्ये कुठेतरी ठोस निर्णय आपल्या माध्यमातून घेणे आवश्यक आहे. आणि हा जो दरोरोजचा वाढता ग्राफ आहे रोज जर ३००० पेशंट येत असतील तर त्यांना हॅन्डल करण्यासाठी आपली प्रभावी यंत्रणा आपण निर्माण करावी हीच अपेक्षा या ठिकाणी व्यक्त करतो. धन्यवाद.

श्रीमती आभाताई पांडे :- मा.महापौरजी, आज नागपूर शहर मे कोरोना का विक्राल स्थिती निर्माण हो गयी है, मा.महापौरजी, मैं आपका अभिनंदन करना चाहुंगी कि, आपकी धर्मपत्नी ॲडमिट रहते हुऐ फिरभी आप प्रतिकुल परिस्थिती मे भी नागपूर महानगरपालिका के माध्यम से कितने अच्छे तरीके से नागपूर शहर के लोगो को सेवा दे रहे है, उसके लिये आप प्रयास कर रहे है I इस बात के लिये मैं आपका अभिनंदन करती हुॅं, मा.महापौरजी, लेकीन जितना गंभीरतापूर्वक आप सारी बातो को ले रहे है, उतने गंभीरतापूर्वक प्रशासन यह सारी बातो को नही ले रहा है, यह उतनीही सच्चाई है I मा.महापौरजी, जो स्थिती अभी अभी यहां पर बताई गयी है, वह सरासर गलत है, मा.महापौरजी, दो दिन पूर्व की रात मे मैं ढाई बजे तक अपने प्रभाग के पेशंट को ॲडमिट कराने के लिये मेयो, मेडिकल और अन्य प्रायव्हेट हॉस्पिटल मे फोन लगा रही थी, मेडिकल मे ४१ की वेटींग थी, मेयो मे भी वेटिंग थी, और प्रायव्हेट हॉस्पिटल मे भी वेटींग थी, मुझे बडे दुख के साथ कहना पड रहा है कि, हम दो तीन पेशंट को भी ॲडमिट नही करवा सकते है I मा.महापौरजी, आज जो विक्राल परिथिती है, इसके लिये प्रशासन भी कही न कही जिम्मेदार है, और वह जिम्मेदारी हमे लेनी पडेगी, मा.महापौरजी, जिस तरह से अभी आय.सी.यु. ऑक्सिजन और बेड की जानकारी दी गयी है, वह सरासर गलत है I मा.महापौरजी, आठ दिन पहले मेरे प्रभाग का एक व्यक्ति पॉझीटीव्ह आया, और आठ दिन बाद प्रशासन उसके घर पहुंचा और कहां गया कि हमको आपके यहां स्टीकर लगाना है, स्टीकर लगाने के लिये मा.महापौरजी उस व्यक्तिने विरोध किया कि, आप आठ दिन बाद कैसे आये, जब मैं पहले दिन पॉझीटीव्ह आया, मेरे घर के लोग पॉझीटीव्ह आये, तब क्यों नही आये, उस व्यक्तिने विरोध किया, नागपूर महानगरपालिका के अधिकारीयों मानसिकता देखिये कि, उन्होने तुरंत पोलिस को फोन किया, पोलिस को इंफार्म करने के बाद वह कोरोना पेशंट जिसकी मानसिक स्थिती अच्छी नही है, जिसके घर मे पांच कोरोना पॉझीटीव्ह पेशंट है, वहां पर आप पोलिस को बुलाकर उस पेशंट को धमकाते है, मैं इस बात का निषेध करती हुॅं I मा.महापौरजी, ऐसे व्क्त क्यों जनप्रतिनिधीयों की मदद प्रशासन नही लेता, जिसके मन मे जो आरहा है वह कर रहा है, मैं इस विषय मे कहना चाहती हुॅं कि, अगर प्रभाग का कोई व्यक्ती पॉझीटीव्ह आता है, उस बात की जानकारी सभी मा.सदस्यो को मिलनी चाहिये, उस तरीके से हम उस समस्या का समाधान कर सकते है, उसपर हम हल निकाल सकते है, जिसका फायदा प्रशासन को होंगा, और पेशंट को भी होंगा, लैकिन इस दिशा मे प्रशासन व्दारा किसी भी प्रकार के प्रयत्न नही किये जाते है I मा.महापौरजी, दो दिन पूर्व मैं बहोत जद्योजहद कर रही थी, अपने प्रभाग के कुछ लोगो को ॲडमिट करवाने के लिये उस वक्त मुझे एक बात का अनुभव आया कि, जिस व्यक्ती को कोरोना हो रहा है, उसकी मानसिक स्थिती खराब हो जाती है कि, मैं पॉझीटीव्ह आगया हुॅं, उस वक्त वह व्यक्ती घबरा जाता है, उस वक्त उसे ऐसा लगता है कि, मैंने तुरंत ॲडमिट हो जाना चाहिये, ऐसे वक्त वह जाकर ॲडमिट हो जाता है और बेड ऑक्युपॉय कर लेता है, लैकिन जिसको सचमे ऑक्सिजन की जरुरत है, उसको ऑक्सिजन नही मिल पाता और बिना ऑक्सिजन के उसकी मौत हो

जाती है, इसलिये मेरा यह कहना है कि, पहले जब कोरोना की स्ट्रेन आयी थी तब हमने जो कोरोना पेशंट के लिये कोरंटाईन सेंटर बनाये थे, उन सारे कोरंटाईन सेंटर को तात्काल खोलना चाहिये, ताकि जितने पेशंट को बुखार है, या जिनको कोई तकलीफ है, वह तुरंत वहां कोरंटाईन होसके, आज अनेक हॉस्पिटल मे बेड की व्यवस्था नही है, इसलिये यह मेरा आपसे निवेदन है। मा.महापौरजी, और दुसरा निवेदन मेरा ऐसा है कि, हमने लसीकरण की शुरु की और लसीकरण मे जो हमको आउटपुट मिलना चाहिये था वह नही मिला है, हमारे कर्मचारी और अन्य कर्मचारी मिलाकर आज करीब १.९३ लाख लोगों का लसीकरण हो गया है, ऐसा प्रशासन ने अभी अभी बताया है, मा.महापौरजी, मेरा इस संदर्भ मे एक निवेदन है आपसे क्योंकि आप एक बहोतही सुलझे हुऐ और बहोत ही कर्तव्यदक्ष महापौर है, जिन्होने केवल घोषणा ही नही की बल्कि उसपर अंमल किया इसलिये नागपूर शहर की जनता आप पर विश्वास करती है और आप अगर आवाहन करेगें तो जितने समाज भवन शहर मे है, उन समाज भवन के जनप्रतिनिधीयो को बुलाकर आपने मिर्टीग ली, वहां पर लसीकरण की सुविधा उपलब्ध करवा सकते है, अगर आपने जनप्रतिनिधीयो को आवाहन किया वर्तमान पत्र के माध्यम से तो हम उन समाज भवनो मे उन समाज भवनों के प्रतिनिधीयो के माध्यम से हम वहां यह लसीकरण की सुविधाऐ उपलब्ध करवा सकते है, मा.महापौरजी, मैं एक और बात कहना चाहती हॅु कि, जिन्होने महानगरपालिका मे सेवा दी, अगर उनको कोरोना होता है तो उनपर न झोनल अधिकारी ध्यान देते है, और न सहा.आयुक्त ध्यान देते है, ऐसे अनेक मामले है, मैंने मेयो और मेडिकल मे डॉक्टर्स से लडकर उन लोगो का इलाज करवाया है, मा.महापौरजी, यह बहोत दुख की बात है, जब हमारे कर्मचारी काम करते है, कोरोना पेशंट के लिये घर घर जाकर दस्तक देते है, लैकिन जब उसको कोरोना हो जाता है तो अपने आपको कही न कही असुरक्षित पाता है, यह प्रशासन की जिम्मेदारी है कि, उनको ॲडमिट करे, उनकी मदद करे, लैकिन प्रशासन ऐसा नही करता है, इस ओर प्रशासन ने ध्यान देना चाहिये, मैं यह निवेदन आपसे करती हॅु । मा.महापौरजी, इसके साथ साथ करीब चार से पांच महिने होगये, कोविड के संदर्भ मे मैंने अनेक पत्र महानगरपालिका को लिखे, मेरे पत्रो के जवाब महानगरपालिका ने दिये, लेकिन पुरे गोल-गोल करके दिये, मुझे ऐसा लगता है कि, अगर प्रशासन बराबर काम करे तो उन्हे गोलगोल जानकारी देने की आवश्यकता नही पडेगी । मा.महापौरजी, एस.डी.आर.एफ. और एन.यु.एच.एम.का फंड कोरोना की स्थिती को कंट्रोल करने के लिये केंद्र सरकार और राज्य सरकार से फंड महानगरपालिका को मिला, नागपूर महानगरपालिका को भी स्वयं का कुछ फंड खर्चा करना पडा, मा.महापौरजी, जनप्रतिनिधी होने के नाते यह मेरा अधिकार नही है क्या की एन.यु.एच.एम. के अंतर्गत क्या क्या खर्च किया गया है, और वह किन किन पदो मे खर्च किया गया, उस फंड से क्या क्या सुविधाऐ उपलब्ध करवाई गयी, मैंने दो दिन पूर्व वैद्यकीय अधिकारी को फोन किया कि, की मुझे एनयुएचएम के अंतर्गत जो खर्च हुआ है, तो मैने बँक स्टेटमेंट दिया जाये, ते मला म्हणाले मॅडम मी नक्की देतो आपणांस स्टेटमेंट देतो संध्याकाळी फोन केला तो म्हणाले कि, तुमची ई-मेल आयडी पाठवुन द्या परंतु माझ्याकडे आतापर्यत माहिती आलेली नाही, दुस-या दिवशी मी त्यांना फोन केला, ते म्हणाले कि अतिरिक्त आयुक्त श्री राम जोशी साहेबांनी असे सांगीतले आहे कि, अश्याप्रकारची माहिती आभा पांडे मॅडम मागत आहे तर त्यांनी आम्हाला तर त्यांनी म्हटले की अशाप्रकारची माहिती त्यांना देवु नये, जोपर्यंत आपण आयुक्तांशी बोलत नाही, तोपर्यंत कुठलीही माहिती आभा पांडे मॅडमला द्यावयाची नाही. मा.महापौरजी,

नागपूर महानगरपालिका का प्रशासन अगर इतना ज्यादा मग्रुर हो गया है तो मा.महापौरजी, हमे भी मग्रुरी करना आता है, हम एक जिम्मेदार जनप्रतिनिधी है, और हम इस जिम्मेदारी के अंतर्गत प्रशासन से यह माहिती मांग रहे है, हमे यह अधिकार इन्होने नही दिया है, हमे यह जिम्मेदारी का अधिकार संविधान ने दिया है, ओर इसलिये मेरा आपसे निवेदन है कि, मैंने जो बँक स्टेटमेंट मांगा है, उसकी जानकारी मुझे तत्काल प्रशासन ने देना चाहिये, ऐसा मैं आपसे निवेदन करती हुॅ, बस यही कहते हुऐ मैं अपने वाणी को विराम देती हुॅ ।

श्री.कमलेश चौधरी :- मा.महापौरजी, बहोत ही गंभीर विषय पर यहां चर्चा होरही है, आप इस विषय पर बहोत गंभीर है, क्योंकि आपके घर के सदस्य भी पॉझीटीव्ह आये है और हॉस्पीटल मे है । यह बात आपने गंभीरता से ली, लैकिन देखने को मिल रहा है कि, प्रशासन इस विषय को लेकर गंभीर नही है, यह सच्चाई है, इसके पहले भी कोविड की परिस्थिती आयी तो देखने मे मिला कि, प्रायव्हेट हॉस्पिटलवालो ने एक लुट का धंदा मचाया था, तकरीबन ७२ लाख रुपये महानगरपालिका की मदद से पेशंट के परिजनो को वापस किये गये । मा.महापौरजी, मैं प्रशासन के माध्यम से यह जानना चाहता हुॅ कि, यह जो प्रायव्हेट हॉस्पिटलवालोने पेशंट के परिजनो को ७२ लाख रुपये वापस किये इससे यह पता चलता है कि, हॉस्पिटलवालो ने पेशंट से ज्यादा पैसा लिया था, उस संदर्भ मे कोई दंडात्मक कारवाई हास्पिटलवालो पर की गयी है क्या ? जो हॉस्पीटल कोव्हीड के लिये स्टार्ट किये थे ऐसे हॉस्पिटल को बंद करने का कोई सर्कुलर प्रशासन की तरफ से निकाला गया है क्या ? ऐसे बहोत सारे हॉस्पिटल है जिनको कोविड केअर के नाम से परवानगी दी गयी, मगर वह कभी शुरु नही हुऐ, उनपर क्या कारवाई की गयी, अभी हमारे दीदी श्रीमती आभा पांडेजी ने बेड की स्थिती के संदर्भ मे यहां पर जानकारी दी है कल मेरे प्रभाग के दो लोगो की जिनको बेड नही मिलने के कारण व्हेंटीलेटर उपलब्ध नही होने के कारण मृत्यु हो गयी, ऐसी भयानक परिस्थिती आज निर्माण हो गयी है । ऐसी परिस्थिती मे प्रशासन पुरी तरह से गंभीर नही है और गलत जानकारी सदन के पटल पर रखने का प्रयास कर रहा है, जो लोग पॉझीटीव्ह निकल रहे है उनके घर के लोगों को कोरंटाईन कराने का काम तो नही हो रहा है, ऐसे लोग रोड पर घुम रहे है, जिसकी तरफ प्रशासन का कोई ध्यान नही है, झोन की ओर से ऐसी स्थिती पर कोई कंट्रोल नही किया जारहा है । यह जो विषय है फंड को लेकर इसपर पुरी तरह से ध्यान देने की आवश्यकता है, क्योंकि लोगो ने प्रायव्हेट हॉस्पिटल मे अपनी जेब से पैसे भरे है, और जिन हॉस्पिटलवालो ने ज्यादा का बिल पेशंट से लिया है, उनपर तुरंत दंडात्मक कारवाई की जाये, आपने मुझे बोलने का मौका दिया, धन्यवाद ।

श्रीमती नंदाताई जिचकार :- मा.महापौरजी, आज स्थगन प्रस्तावाव्दारे जो विषय प्रविणजींनी मांडलेला आहे, तो गंभीर विषय आहे आणि यावर प्रफुलजी, आभाताई, यांनी आपले मत मांडले आहे, मा.महापौरजी, कोरोनाची ही दुसरी लाट आहे, ही पहिल्या लाटेपेक्षा भयावह आहे, अशी भिती मनामध्ये आहे, मा.महापौरजी, मला असे सांगावयाचे आहे कि, हे जे पेशंट वाढत आहे यासाठी जनजागृतीचे कार्यक्रम करणे खूप आवश्यक आहे. जनजागृती करण्याच्या दृष्टीने चौका चौकात, कोविड योध्दाव्दारे लोकामध्ये मार्केट प्लेसला जनजागृती करणे आवश्यक आहे, यासाठी जे कलाकार नागपूर शहरामध्ये आहे त्यांना सुध्दा यामध्ये आम्ही काही काम देवु शकतो, ते कुठल्या तरी पथनाटयाव्दारे किंवा कलाव्दारे लोकामध्ये जावून हे सांगु शकतात कि, कोरोनापासून दुर कसे राहता येईल. टेस्टींग किती आवश्यक आहे, मास्क वापरणे किती आवश्यक आहे. सॅनिटायझर किती

आवश्यक आहे, याकरिता लोकप्रतिनिधीची सुध्दा मदत घेवून जनजागृती करणे खूप आवश्यक आहे. ही दुसरी लाट आहे, मला असे वाटते कि प्रशासन व जनता या दोघामध्ये या रोगाला घेवून सिरीअसनेस नाही आहे. कालच आपण बघितले कि ४० च्यावर लोक मृत्युमुखी पडले आहे, आपण एकीकडे कोरोनाच्या गोष्टी करतो, परंतु जेव्हा आपल्या घरातला जिव कोरोनाने जातो तेव्हाच आपल्याला माहित होते. प्रत्येक व्यक्तिचे नातेवाईक या कोरोनाने आज बळी पडलेले आहे. ही एक शोकांतिका आहे कि यावर आम्ही आज मात करु शकलो नाही ही साखळी तोडावयाची झाल्यास अत्यंत मोठयाप्रमाणात जनजागृती करण्याची गरज आहे. या अनुषंगाने एक कॅम्पेनींग महानगरपालिकेनी घ्यावयास पाहिजे. चौका चौकामध्ये, मार्केट प्लेसमध्ये जे कोणी मदतीला येतील, त्यांची मदत घ्यावी, पुन्हा अशी वेळ येवु नये, याकडे लक्ष देणे आवश्यक आहे, कारण कि आपल्याला कोरोनाच्या पहिल्या लाटेमध्ये खूप अनुभव आलेला आहे. लोकांना खाण्यास अन्न नव्हते व हॉस्पिटलमध्ये पेशंटला बेड उपलब्ध होत नव्हते. ही वेळ येवु नये म्हणुन आताच आपण सतर्कता बाळगावी, कारण जेव्हा पेशंट खूप वाढुन जाईल तेव्हा आपल्या हातात काहीच राहणार नाही, प्रशासन असामान्य परिस्थितीमध्ये आहे. आताच येथे प्रफुलजी ने सांगीतले आहे कि, प्रशासन सांगते कि इतके बेड उपलबध आहे, इतके व्हॅनटीलेटर उपलब्ध आहे, परंतु जेव्हा आपल्या पेशंटला ॲडमिट करण्याची वेळ येते तेव्हा आपण हवालदिल झालेलो असतो, तेव्हा आपल्याल बेड मिळत नाही, त्यांना आयसीयुमध्ये जागा नाही मिळत, व्हेंटीलेटर मिळत नाही, ही अत्यंत दुर्देवी परिस्थिती या नागपूर शहरावर आलेली आहे, नागपूर शहर कोरोनामध्ये सगळयात वरच्या क्रमांकावर आहे हे आपण रोज न्युजमध्ये बघतो आहे. मी आयुक्तांना विनंती करीन की आपण यामध्ये स्वत: लक्ष घालुन कठोर पावले उचलावी अशी मी विनंती महापौरजी यांना करेल, मा.महापौरजी, आपण मला बोलण्याची संधी दिली याबद्दल आपले धन्यवाद.

श्री.सुनिल हिरणवार :- मा.महापौरजी, मैं सर्वप्रथम आपका अभिनंदन करना चाहता हुँ, उसी प्रकार से मैं मा.निगम आयुक्त महोदय का भी अभिनंदन करना चाहता हुँ, लसीकरण के विषय को लेकर नागपूर महानगरपालिका ने रजिस्ट्रेशन मोहिम शुरु की है, यह बहोत अच्छी बात है, लैकिन हमारे झोन के अंतर्गत आनेवाले आयजीआर हॉस्पिटल मे स्टॉफ बढाने की आवश्यकता है, वहां पर तुरंत स्टॉफ बढाया जाये, के.टी.नगर मे लसीकरण केंद्र बहोत अच्छे से चल रहा है, उसमे महानगरपालिका का सहयोग बडे प्रमाण मे है, उसी तरह का सहयोग आयजीआर हॉस्पिटल मे रहना चाहिये, वहां तुरंत स्टॉफ बढाया जाये, मा.महापौरजी, मैं यह आपसे निवेदन करता हुँ ।

श्री.जितेंद्र घोडेस्वार :- मा.महापौरजी, श्री प्रविणजी ने जो स्थगण प्रस्ताव रखा है वह सराहनीय है, निश्चितरुपसे पुरे देश के अंदर कोरोना की दुसरी लाट शुरु हो चुकी है, और यह लाट नागपूर शहर मे भी उत्पन्न हो रही है, ऐसी परिथिती मे देखने को मिल रहा है कि निवडणुक आयोग ने चार राज्यो मे निवडणुक की प्रक्रिया शुरु की है, ओर दुसरी तरफ अगर नागपूर शहर के बारे मे सोंचा जाये तो नागपूर शहर मे टेस्टींग के बाद बडे प्रमाण मे हमारे झोन मे प्रभाग मे पॉझीटीव्ह पेशंट निकल रहे है, नागपूर शहर मे जो परिस्थिती एक वर्ष पूर्व थी उससे काफी भयानक परिस्थिती इस वक्त दिखाई दे रही है, मेरे घर मे मैं जहां पर रहता है वहां के घर मालक

कोरोना के कारण पिछले दो महिने पहले गुजर चुके है, निश्चित रुपसे मैं बताना चाहता हुॅ कि, जो कोरोना के पॉझीटीव्ह पेशंट मिल रहे है, मैं बताना चाहता हुॅ कि मेरे प्रभाग मे एक जैन समाज के परिवार के अंदर पुरे घर के लोग पॉझीटीव्ह निकले, उन्हे डबा पहोंचाने के लिये कोई नही था,वह हॉस्पिटल का खाना नही खा सकते थे क्यों कि वह बिना प्याज के खाना खाते है, तो उनका लडका डबा पहोंचाने के लिये गया तो एनडीएस के टिम के माध्यम से प्रशासन की ओर से उनको दंडित करने का काम किया गया है, इतना ही नही कोरोना पॉझीटीव्ह आने के बाद अगर कोई पेशंट की मृतयु हो जाती है तो उसको लेजाने के लिये प्रशासन की गाडी उपलब्ध नही होती, पोलिस प्रशासन को जब तक लेटर नही दिया जाता, तब तक पोलिस प्रशासन कुछ नही करता, उस कोरोना पेशंट की बॉडी हॉस्पिटल मे वैसे ही पडी रहती है, प्रभाग मे जिन लोगो की कोरोना के कारण डेट हुई, उस वक्त लापरवाही का प्रकार प्रशासन की माध्यम से हुआ, इतना ही नही, हमारे आसीनगर झोन मे डेट बॉडी को उठाने का काम जो गाडी करती है, उस गाडी के ड्रायव्हर का पांच महिने से पगार नही दिया गया है, वह ड्रायव्हर पिछले एक साल से कोरोना के पेशंट की बॉडी उठाने का काम कर रहा है, लैकिन उसको पगार नही दिया जारहा है, तो फिर वह कैसे गाडी चलायेगा, कैसे बॉडी उठायेंगा, उस वक्ती का मनोबल कैसे बढाया जायेगा, ऐसी परिस्थिती प्रशासन की ओर से उत्पनन की जारही है, आज जिसकी वजह से एक भय का वातावरण समाज मे पैदा हो गया है। प्रशासन का जनप्रतिनिधीयो को सहयोग नही मिलने के बाद जनप्रतिनिधी पुरी निष्ठा से कोरोना पेशंट के लिये काम कर रहे है, वह दवाईयॉ उपलबध करने का काम कर रहे है, लसीकरण के लिये लोगो को आवाहन कर रहे है, निश्चित रुपसे प्रशासन ने जनप्रतिनिधीयो को साथ मे लेकर चलना चाहिये, इससे जनता को सुविधा मिलने मे आसानी होंगी, इस संदर्भ मे जो बाते आभाताई पांडेजी ने कही है वह सही है, प्रभागो के अंदर मे जो समाज भवन है, उन समाज भवन का उपयोग हम लसीकरण केंद्र के रुप मे कर सकते है, इस संदर्भ मे समाज भवन के प्रतिनिधीयो का सहयोग लेकर के हम लसीकरण की मोहिम को तिव्र कर सकते है, इस दिशा मे प्रशासन तुरंत कदम उठाये, आप प्रशासन को निर्देश दे, आपने मुझे बोलने का मौका दिया, इसके लिये आपका धन्यवाद ।

श्री.नितीन साठवणे :- मा.महापौरजी, आपने जो मुझे यहां बोलने का मौका दिया इसके लिये मैं आपका आभारी हुॅ, देखने मे आरहा है कि प्रायव्हेट हॉस्पिटल मे इस महामारी के दौरान एक लुट का व्यापार चालु है, महापौरजी, इस विषय मे मैं एक बात कहना चाहता हुॅ कि, कोविड के दौरान इन प्रायव्हेट हॉस्पिटलो मे उनकी खुद की मेडिसीन दी जारही है, उनकी खुद की मेडिसीन की फार्मसी है, जो रेट गर्व्हमेंट की तरफ से निर्धारीत किये गये है उससे ज्यादा पेशंट से आयसीयु, बेड और व्हेंटीलेटर के चार्ज आज प्रायव्हेट हॉस्पिटल व्दारा पेशंट से लिये जारहे है, आज पेशंट की लुट की जारही है, पेशंट को अनसंट मेडीसीन लिखकर दी जाती है, और मनमानी तरीके से उसके पैसे वसुल किये जारहे है, जितना हॉस्पिटल का बील नही बन रहा है, उससे ज्यादा मेडीसीन का बील बन रहा है, इस विषय मे आप एफडीआय कमिशनर से बात किजीये, आयसीएमआर की जो गाईड लाईन्स है, उनका उस गाईड लाईन्स पर ध्यान आकर्षित करे, ताकि पेशंट की लुट बंद हो सके। पेशंट को जो इंजेक्शन और मेडीसीन लगती है, उसके बारे मे उनसे चर्चा करे। यही कहते हुऐ मैं अपने दो शब्द समाप्त करता हुॅ, धन्यवाद ।

सौ.दिव्या धुरडे :- मा.महापौरजी, प्रशासनानी जी माहिती आपल्याला दिलेली आहे, ती चुकिची आहे.

आपण फिल्डवर काम करतो, आपण पाहत आहे कि, इतकी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे, आताच माझ्या प्रभागातील एक ४० वर्षाच्या व्यक्तिला एका प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये अॅडमिट करण्यांत आले आहे, त्या पेशंटला व्हेंटीलेटरची गरज पडली तर त्या हॉस्पिटलमध्ये व्हेंटीलेटर नाही, मी मेडिकल हॉस्पिटलच्या डॉ.गुप्ताला फोन केला, इतर डॉक्टरशी बोलली, अनेक पेशंटला व्हेंटीलेटर व बेड उपलब्ध होवुन राहिले नाही, व आपले प्रशासन माहिती देत आहे कि, बेड उपलब्ध आहे. ही चुकिची माहिती आहे. मा.महापौरजी, कोविडच्या या काळात आपल्या झोन अंतर्गत कोविड पेशंट पर्यंत चार ते पांच दिवस औषध पोहोचत नाही, माझे असे म्हणणे आहे कि, आपले कर्मचारी पेशंट पर्यंत पहोचत नाही, परंतु त्यांचे नातेवाईकांनी जर फोन केला तर त्यांना सुध्दा औषधे दिल्या जात नाही, आपली टिम तिथपर्यंत पहोचत नाही, जर त्यांचे नातेवाईक आले तर त्यांना तरी औषध दिली पाहिजे. आणि नगरसेवकांना फोन येतो कि, पेशंटला औषध मिळत नाही, मी फोन केला तर नगरसेवकांना चुकिची माहिती दिल्या जात आहे, हे बरोबर नाही. आणि या गंभीर स्थितीमध्ये प्रायव्हेट दवाखान्यामध्ये आपण महानगरपालिकेच्या वतीने बेड उपलब्ध करुन दिलेले होते, त्याची देखील माहिती मा.सदस्यांना सांगीतल्या जात नाही, त्या ठिकाणी किती बेड उपलब्ध आहे, किती व्हेंटीलेटरचे बेड उपलब्ध आहे. आपण मेयो मेडिकलमध्ये पेशंटला पाठवतो, परंतु त्या लोकांची स्थिती अशी राहते कि मी प्रायव्हेटमध्ये जाईल, होते असे कि, महानगरपालिकेच्या वतीने ज्या प्रायव्हेट हॉस्पिटल्मध्ये बेड उपलब्ध करुन दिले आहे त्याची माहिती प्रत्येक मा.सदस्यांना जवळ राहत नाही, मा.सदस्यांना ही माहिती द्यावयास पाहिजे, यामुळे त्यांना आपल्या प्रभागातील पेशंटला त्या प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये अॅडमिट करण्यास मदत होईल. आणि काही भागामध्ये हॉस्पिटल आहे, तेथे आपण अतिरिक्त बेड लावु शकतो, याकडे सुध्दा लक्ष देणे आवश्यक आहे. आणि स्थिती इतकी गंभीर आहे कि नगरसेवकांकडे कोरोना पेशंटचे नातेवाईक आले तर आपण त्यांना नियंत्रण कक्षाचे नंबर देतो, परंतु नियंत्रण कक्षांकडुन ही अचुक माहिती मिळत नाही, आपण महानगरपालिकेच्या वतीने जो नंबर माहितीसाठी उपलब्ध केले आहे, त्या नंबरवर प्रतिसाद मिळत नाही. ही देखील गंभीर बाब आहे, याकडे सुध्दा जातीने लक्ष देणे आवश्यक आहे, मला बोलण्याची संधी दिली त्याबद्यल धन्यवाद.

श्री.महेंद्र धनविजय :- मा.महापौरजी, मी पहिल्यांदा श्री प्रविणजी दटके साहेबांचा अभिनंदन करीन कि त्यांना अत्यंत गंभीर विषय या ठिकाणी ठेवला आहे, माझ्या दोन ते तीन सुचना आहे. मागच्या कोविडच्या काळात आपण महानगरपालिकेतर्फे ज्याप्रमाणे सुविधा उपलब्ध करुन दिली होती, त्याप्रमाणे या काळात सुविधा उपलब्ध होत नसल्याचे आढळुन आले आहे, पेशंटला वेळेवर औषद्य पुरिवली जात नाही, सॅनेटाईझेशन केले जात नाही, सॅनिटायझेशन करणे गरजेचे आहे. आज नागपूर शहरात तीन हजाराच्यावर पेशंट निघत आहे, यामुळे महानगरपालिकेच्या वतीने बेड तातडीने वाढविणे आवश्यक झाले आहे. लसीकरणाबद्यल पाहिजे त्याप्रमाणात जाहिरात दिल्या जात नाही. कोविड पेशंटला वेळेवर बेड उपलब्ध व्हावयास पाहिजे, त्या दृष्टीने बेड तातडीने वाढविण्याची व्यवस्था प्रशासनाने करणे गरजेचे आहे, याकडे लक्ष देण्यांत यावे.

श्री. मो.इब्राहिम :- मा.महापौरजी, मैं यह बताना चाहता हुं कि, प्रशासन जो यहां माहिती दे रहा है, कोरोना पेशंट के लिये बेड उपलब्ध होने के संदर्भ मे वह गलत है, मैं दो दिन पहले एक पेशंट को अॅडमिट करने के लिये मेयो हॉस्पिटल गया था, लेकिन वहां पर बेड उपलब्ध नही हो सका,और उनको वापस जाना पडा, वहां पर १५-

२० लोग आये थे, लैकिन वहां पर किसी भी प्रकार की कोई सुविधा पेशंट को उपलब्ध नही हो रही है, जिसकी वजह से मृत्यु के प्रमाण बड रहे है, अभी जो कोरोना का दौर है, यह बिमारी बहोत ज्यादा बढ रही है, इसके संदर्भ मे हमे ज्यादा खयाल रखने की जरुरत है, हम किस तरह से पेशंट को सारी सुविधा उपलब्ध करा सकते है, इस ओर ध्यान देना चाहिये, आपने मुझे बोलने का मौका दिया इसके लिये मैं आपका आभारी हुँ । धन्यवाद ।

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, या विषयाच्या संदर्भात मला सुचना करायच्या आहेत. या विषयाच्या संदर्भात मा.प्रविणजी यांनी स्थगण प्रस्ताव मांडला त्यांचे खरोखर अभिनंदन आहे आणि या विषयावर मा.सदस्यांनी चर्चा देखील केली. प्रशासनाशी चर्चा करण्याकरीता नगरसेवकांनी जी आापली भुमिका मांडली. नगरसेवक हे ग्राउंड लेव्हलवर काम करणारे वर्कर आहे आणि त्यांनी प्रशासनाने जी माहिती सांगितली ही माहिती आणि त्यातील तफावत ही आपल्या सभागृहासमोर सांगु इच्छितो, मी असे म्हणणार नाही की प्रशासन सर्वच काम चुकीचे करीत आहे. काही ठिकाणी मा.महापौरजी आणि मा.आयुक्तांनी जे निर्णय घेतले ते खरोखरच अभिनंदनास पात्र आहेज. ज्याप्रमाणे जेष्ठ नागरिकांकरीता जे निशुल्क बसची व्यवस्था उभी करुन दिली त्यामुळे आज नगरसेवकांच्या माध्यमातून आज मोठया प्रमाणात व्हॅक्सीनेशन सेंटरपर्यत घेऊन जात आहे. हे सर्व होत असतांना आपण सर्व ठिकाणी दौरे करीत आहेत. आयुक्त सुध्दा सर्व ठिकाणी दौरे करीत आहेत. ज्या ज्या चुका प्रशासनाच्या आहे त्या काढण्याचे सातत्याने सभागृहाच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न होत आहे. ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. पण त्याचबरोबर ज्या गोष्टी वरच्या लेव्हल घडत आहे ती भिती खालच्या स्तराच्या अधिका-यापर्यत कुठेही दिसत नाही. जे नगरसेवक भुमिका मांडत आहे त्यामध्ये आपल्या लक्षात येईल की निर्णय वरच्या लेव्हलवर चांगले होत आहे खाली त्याचे इम्प्लीमेंटेशन व्यवस्थितपणे होत नाही. डि-सेंट्रलायझेशन पाहिजे त्या प्रमाणात होतांना दिसत नाही. प्रविणजी दटके यांनी सांगितल्याप्रमाणे एकटे राम जोशीच माहिती देतील काय ? किंवा एकटे डॉ.चिलकरच माहिती देतील काय ? सहा.आयुक्तांचा यांच्यामध्ये इन्हॉलमेंट किती आहे, झोनमध्ये असलेल्या हेल्थ ऑफीसर किंवा डॉक्टरांचा इनव्हॉलमेंट किती आहे हा मुळ प्रश्न येथे उभा राहतो. हे सर्व होत असतांना काही गोष्टी प्रशासनातर्फे होणे आवश्यक आहे. व्हॅक्सीनेशनच्या संदर्भात आपण चर्चा करीतो आहे अजुनही ५० टक्के व्हॅक्सीनेशन राहिले आहे याचे कारण आहे. आपल्या सेंटरवर आपण मोठया प्रमाणात लोक तर घेऊन चाललो आहे परंतु व्हॅक्सीनेशन सेंटरवर गर्दी होत आहे अशा चर्चा नागरिकांमध्ये होतांना दिसत आहे त्याला स्पीडअप करण्याची प्रक्रीया करण्याची गरज आहे. काही ठिकाणी स्टाफची कमतरता आहे. आपल्या येथे इंदिरा गांधी रुग्णालयामध्ये मोठया प्रमाणात लोक जातात त्या ठिकाणी बसण्याची व्यवस्था नाही किंवा रजिस्ट्रेशनची व्यवस्था नाही आहे. मा.आमदार श्री.प्रविणजी दटके यांनी महाल येथे ओपीडी आहे त्या ठिकाणी त्यांनी स्व:ताच्या खर्चातून तीन ऑपरेटर लावले, त्यामुळे अशाप्रकारची व्यवस्था आपल्याला सेंटरवर करता येईल काय हा महत्वचा मुद्या आहे. व्हॅक्सीनेशन सेंटर वाढविण्याकरीता प्रशासनाने भुमिका घ्यावी, अशी माझी सूचना आहे. कारण १ एप्रिल, पासून ४५ वर्षाच्या वरचे जेवढे लोक आहे तेवढया सर्वांना व्हॅक्सीनेशन दयायचे आहे मग आताच जर व्हॅक्सीनेशन सेंटर कमी पडत आहे तर त्यावेळी व्हॅक्सीनेशन सेंटरवर किती जास्त गर्दी राहील, याची आपण कल्पना निश्चितपणे करु शकतो त्या दृष्टीने प्रशासनाने आतापासून योग्य ते पाऊले उचलायला पाहिजे अशी माझी या ठिकाणी सूचना आहे. नविन सेंटर आपण कुठे

कुठे उघडु शकतो याची प्रक्रीया आतापासून प्रशासनाने पुर्ण केली पाहिजे. होम क्वॉरंटाईन पेशंटच्या संदर्भात अजुनही फार मोठी अडचण आहे. आपल्या येथे व्हीजीलन्स स्कॉड आहे त्या माध्यमातून आपण होम क्वॉरंटाईन पेशंटच्या संपर्कात राहु शकतो.अजुनही बरेचसे नगरसेवक असे आहे की त्यांना आपल्या झोनमध्ये जे काही नंबर डिक्लीअर केले आहे ते नंबर माहिती नाही. एका झोनच्या सहा.आयुक्तांसंदर्भात सांगतो कारण त्यांचे नाव घेणे येथे उचित नाही आहे. बसच्या संदर्भात निर्णय घेऊन आठ दिवस झाले परंतु त्यांना काहीच माहिती नाही आणि तीन दिवसाअगोदर प्रशासनाने निर्णय घेतला की आता झोनश: नागरिकांना व्हॅक्सीनेशन सेंटरवर जायला बसची व्यवस्था करावी याची सहा.आयुक्तांना कल्पना नव्हती म्हणजे कुठेतरी प्रशासनाचा इंटरनल लॅक्युना जो आहे त्या लॅक्युनामुळे आपण वरच्या लेव्हलवर चांगल्या व्यवस्था उभ्या करीत आहे आणि त्या सर्वच्या सर्व व्यवस्था आपल्याला कोलॅप्स होतांना दिसत आहे त्यामुळे जो खालचा ग्रांउंड स्टाफ आहे त्यांचा अॅक्टीव्हनेस वाढविणे या संपुर्ण प्रोसेसमध्ये अतिशय महत्वाचा भाग आहे. आपण मोठे होर्डीग शहरामध्ये लावले आहे. माझ्या माहितीप्रमाणे २५ ते ३० मोठया ठिकाणी आपण होर्डीग लावले आहे. परंतु आपल्या कंट्रोल रुमचे जे नंबर आहे ते वस्त्यांमध्ये कश्या पोहचतील याचे नियोजन करणे आवश्यक आहे. याच्या अगोदर आपण टॅक्सेशन वसुली करीता किंवा इतर वसुली करीता धार्मिक स्थळांना आपण तीन बाय दोन चे बॅनर लावायचो त्या माध्यमातून ही सर्व माहिती आपण नागरिकांपर्यत पोहचायचो ती व्यवस्था सुध्दा या प्रोसेसमध्ये होणे आवश्यक आहे असे मला या ठिकाणी वाटते.मा.सदस्या सौ.दिव्याताईंनी या ठिकाणी जो विषय मांडला त्या विषयावर मा.महापौरजी आपली सुध्दा दोन ते तीन वेळा चर्चा झालेली आहे. राम जोशी साहेबांनी व्हेंटीलेटर असलेल्या हॉस्पीटलची संख्या सांगितली परंतु एकुण हॉस्पीटलपैकी कोणत्या हॉस्पीटलमध्ये व्हॅटीलेशन उपलब्ध नाही किंवा कुठल्या हॉस्पीटलमध्ये व्हेंटीलेशन उपलब्ध आहे याची माहिती पब्लीक डोमेनमध्ये गेली तर ज्या पेशंटला व्हेंटीलेटरची आवश्यकता आहे ते व्हेंटीलेटर जेथे उपलब्ध आहे ते त्या हॉस्पीटलमध्ये अॅडमीट होतील व ज्या पेशंटला व्हेटीलेटरची आवश्यकता नाही आहे ते ज्या हॉस्पीटलमध्ये व्हेंटीलेटर उपलब्ध नाही आहे ते त्या हॉस्पीटलमध्ये अॅडमिट होण्यासाठी प्रक्रीया सुरु करतील, सिटी व्हॅल्युव नुसार आपण त्यांना रेमीडीसीव्हरचे इंजेक्शन देतो अनेक असे पेशंट आहे त्यांना फक्त इंजेक्शनसाठीच हॉस्पीटलाईज व्हावे लागते किंवा कोर्स कंम्पलीट झाल्यानंतर त्यांना ऑक्सीजनची सुध्दा गरज पडत नाही. यांचे सेपरेशन आपल्याला कुठे करता येते काय तो मेडीकल हेल्थचा विषय आहे ते जर होत असेल तर निश्चित याच्याबद्यल सुध्दा प्रशासनानी विचार करावा अशी माझी सुचना आहे. आणि सर्व नगरसेवकांच्या माध्यमातून या ठिकाणी विनंती करण्यात आली आहे की १ एप्रिल पासून ४५ च्या वरच्या सर्व नागरिकांचे लसीकरण होणार आहे परंतु असे ही काही नगरसेवक आहे की ते ४५ वर्षापेक्षा कमी आहे परंतु ते फ्रंटलाईन वर्कर आहे. नगरसेवक हा पेशंटच्या घरी जात आहे. त्याची घरी जाऊन विचारपुस करीत आहे चर्चा करीत आहे. जरी ते दुरुनच करीत असेल पण तो स्वत:च्या जीवावर खेळुन तो कधी कधी पेशंटच्या संपर्कात सुध्दा येत आहे. त्यामुळे या फ्रंटलाईन नगरसेवकांना सुध्दा कोरोना लस देता येईल काय या बद्यल सुध्दा सकारात्मक विचार करावा, अशी माझी विनंती आहे. त्यासोबतच पत्रकार बंधु सुध्दा जे पब्लीकमध्ये फिरत असतात त्यांना सुध्दा फ्रंट लाईन वर्कर समजुन त्यांना सुध्दा आपल्याला व्हॅक्सीनेशन करता येईल काय अशा माझ्या सूचना आहे. मी निश्चितपणे या स्थगण प्रस्तावाच्या माध्यमातून ज्या ज्या

चांगल्या गोष्टी नागपूर महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे त्याबद्यल मी आपले आणि मा.आयुक्तांचे अभिनंदन करतो. जे आपण करु शकतो ते आपण निश्चितपणे करावे, त्याची माहिती आपल्याला सुध्दा आहे व सर्व नगरसेवकांनी सुध्दा विषय मांडले आहे त्या प्रमाणे आदेश आपण प्रशासनाला दयावे.

महापौर :- सर्व नगरसेवकांनी सखोल चर्चा या विषयावरव केलेली आहे. प्रशासनाने संपुर्ण चर्चेपुर्वी काही बाबतीत प्रशासनाने उत्तर दिलेले आहे उर्वरीत जे प्रश्न शिल्लक आहे त्या संदर्भात प्रशासनाने आपले आपले निवेदन करावे.

अति.आयुक्त (श्री.राम जोशी) :- मा.महापौरजी, सन्माननिय सदन, सर्व जेष्ठ नगरसेवकांनी जे मुद्ये येथे मांडलेले आहे ते रास्त आहे. ही जी पॅनडॅमिक स्थिती उत्पन्न झाली हाती ती सर्वांनाच नविन होती त्या संदर्भात काहीच एस.ओ.पी. एक्झीस्टींग नव्हत्या, नैसर्गिक आपत्ती आल्यानंतर कशा पध्दतीने आपण त्याला हॅन्डल करावे  त्याबाबत एस.ओ.पी. फ्रेम नव्हत्या. हा सर्व प्रकार नविन असल्यामुळे हळुहळू सर्व बाबी समजत समजत प्रशासन आणि स्थानिक प्रतिनिधी यांनी यामध्ये लढा दिलेला आहे. मधल्या काळामध्ये रुग्णांची संख्या कमी झाल्यामुळे या भागाकडे थोडे दुर्लक्ष झाले परंतु महाराष्ट्राच्या विदर्भ भागामध्ये कोरोना रुग्णांची संख्या मोठया प्रमाणात वाढल्याचे आढळुन आले. त्यामध्ये प्रशासनाला शंका आली की हा कदाचित दुसरा स्ट्रेन असु शकतो यामध्ये थोडासा प्रकार वेगळा आहे. प्रशासनाने आय.जी.जी.एम.सी. च्या माध्यमातून याचे सॅम्पल एन.आय.व्ही. ला पाठविण्यात आले आणि त्यामध्ये महाराष्ट्र शासनाने घोषित केले की महाराष्ट्राच्या काही भागात कोरोनाचा नविन स्ट्रेन आलेला आहे. म्हणजे पुर्वी जो आपल्याकडे कोरोना होता आणि आताचा जो कोरोनाचा व्हायरस आहे अधिक आहे आणि याचे स्प्रेडींग अतिशय जास्त प्रमाणात आहे. अगोदर पॉझिटीव्ह येण्याचा प्रकार हा कमी होता परंतु आता कुटुंबच्या कुटुंब पॉझिटीव्ह येत आहे. मा.सदस्य प्रफुल्लजींनी सुध्दा एक चांगला विषय या ठिकाणी मांडला, अगोदर पेशंटला पाच—पाच दिवस लागत नव्हते परंतु आता पाच दिवसानंतर देखील त्यांचे ऑक्सीजन कमी होऊन त्यांना ऑक्सीजनची आवश्यकता भासते. या सर्व बाबी सर्वांसाठी नविन आहे. मोठ मोठे डिन यामध्ये रिसर्च करीत आहे. आय.सी.एम.आर. च्या नविन गाईडलाईन यामध्ये येत आहे. डब्लु.एच.ओ. कडुन गाईडलाईन येत आहे त्यामुळे आपल्याला सर्वांना मिळुन याला लढा दयायचा आहे. यासोबतच प्रशासनाकडुन जी माहिती आपल्याला देणे अपेक्षित आहे ते आम्ही देतच आहे. येथे सर्व सन्माननिय सदस्यांच्या बोलण्यामधून असे लक्षात येत आहे की यामध्ये सहा.आयुक्त व झोनचे झोनल मेडीकल ऑफीसर यामध्ये प्रोॲक्टीव्ह होण्याची गरज आहे. यामध्ये लोकप्रतिनिधी आणि प्रशासन मिळुन काम सुरु आहे आज रोजी जो आकडा आला त्यामध्ये २५९७ पॉझिटीव्ह पेशंटचा आकडा आहे. यामध्ये दहा दिवसापासून दोन हजार, अडीच हजार व तीन हजार असा आकडा येत आहे. आपल्याकडे जर रोज अडीच हजार पेशंट निघत असेल तर दवाखाना आणि कोम ऑरबिडीटीचे तर पेशंट वेगळेच रोज जर तीनहजार पेशंट निघाले तर महिन्याचे ३०००० ॲक्टीव्ह पेशंट सांभाळण्याकरीता सर्वांनी एकत्र येण्याची गरज आहे आणि त्यासोबतच प्रशासनाने सुध्दा ॲक्टीव्ह होण्याची गरज आहे ते सुध्दा आम्ही नाकारत नाही. प्रशासन काम करीतच आहे परंतु आणखी काम करण्याची गरज आहे. आतापर्यत जे पॉझिटीव्ह पेशंट आले आहे ते १,६७,२०१ आहे. या सोबतच मृत्युंचा जो आतापर्यतचा आकडा आहे तो ३०७५ आहे. यामध्ये महापौरांनी सुध्दा भरपुर पुढाकार घेतला आहे. टेस्ट सेंटर व

व्हॅक्सीनेशन सेंटरच्या संदर्भात मोठया प्रमाणात नागरिकांना माहिती देण्याची गरज आहे. लोकप्रतिनिधींना विश्वासात घेण्याची आवश्यकता आहे मा.महापौर साहेब सुध्दा रोज प्रशासनाला घेऊन काम करीत आहे. आपल्याकडे आय.एम.ए. च्या विद्यमाने कालच मा.महापौरजी यांनी नागपूर महानगरपालिकेचे जे फेसबुक लाईव्ह पेज आहे त्यावर दररोज ०३.०० वाजता पासून आय.एम.ए. चे एक्पर्ट डॉक्टर्स सल्ला मसलत करीत आहेत. नागरिकांनी याचा लाभ घ्यावा म्हणुन मा.महापौरजी यांनी आवाहन केले आहे. माजी महापौरांनी सुध्दा हा कार्यक्रम यशस्वीपणे राबविला होता. तो मधल्या काळामध्ये रुग्णांची संख्या कमी झाल्यामुळे थोडासा दुर्लक्षित झाला होता तो आता सुरु झाला आहे. त्याचप्रमाणे घंटागाडयावर सुध्दा व्हॅक्सीनेशन संदर्भात प्रचार व प्रसार सुरु आहे त्या अनुषंगाने व्हॅक्सीनेशनची माहिती देण्यात येत आहे. पर्वा प्रेस घेऊन झोन मध्ये कुठले कुठले कॉटॅक्ट नंबर आहे. कंट्रोल रुमचा कोणता कॉटॅक्ट नंबरवर आहे त्या कॉटॅक्ट नंबरवर कोणती माहिती नागरिकांना उपलब्ध होऊ शकते याबाबत प्रेस घेऊन चांगली प्रसिध्दी दिलेली आहे. सिव्हील ऑफीसचा जो नंबर आहे तो मोठया प्रमाणात व्हायरल झालेला आहे २५६०२१ या नंबरवरुन आपल्याला हॉस्पीटलची पोझीशन व उपलब्ध बेडची पोझीशन कळते. सत्तापक्ष नेत्यांनी येथे विषय मांडला की, त्या दवाखान्यात असलेले ऑक्सीजन बेड किती आहे. व्हॅंटीलेटरचे बेड किती आहे आणि उपलब्ध बेड किती आहे याची सुध्दा माहिती मिळाली तर त्या लोकांना त्या दवाखान्यामध्ये अप्रोच व्हायला मदत मिळेल असे सुध्दा निर्देश देऊन प्रशासनाच्या वतीने ही प्रक्रीया सुध्दा आम्ही सुरु केलेली आहे. मा.दटके साहेबांनी एक विषय सुरुवातीला मांडलेला होता मा.पालकमंत्री यांच्या सभेमध्ये आपण ८८ व्हॅक्सीनेशन सेंटरचा उल्लेख केलेला होता येथे सांगतांना ७४ सांगण्यात आले आहे. तेव्हा आपल्याकाडे जे कोव्हीन १ ॲपचे वर्शन होते त्यामध्ये आपल्याला फ्रंट लाईन वर्कर व हेल्थ वर्कर काही प्रायव्हेट दवाखान्यांना सुध्दा मंजूरी दिलेली होती आणि तेथे व्हॅक्सीन सुरु होते. आणि जेव्हा कोव्हीड २ सुरु झाले तेव्हापासून प्रायव्हेट आणि गव्हर्नमेंट असे दोन प्रकार झाल्यामुळे जे प्रायव्हेट हॉस्पीटल फ्रंट लाईन वर्कर आणि हेल्थ वर्करसाठी फ्री व्हॅक्सीनेशन दयायचे ते आता बंद झाले आहे. त्या अनुषंगाने प्रशासनाने पुढाकार घेऊन आणि महापौरजी यांनी सुध्दा निर्देश दिले आणि आपण असे ३२ प्रायव्हेट दवाखाने आयडेन्टीफाय केले की ते उत्सुक आहे करायला ३२ दवाखान्यांना परवानगी मिळावी म्हणुन मा.आयुक्तांनी एक प्रपोजल राज्य शासनाला पाठविले ते राज्य शासनाने केंद्र शासनाला दिले आणि ही परवानगी मिळल्यानंतर लगेच आपण ३२ प्रायव्हेट व्हॅक्सीनेशन सेंटर सुरु करु शकतो. सन्माननिय सदस्यांकडुन फिडबॅक आला आहे की १ तारखेपासून आपल्याकडे ४५ वयाच्या वरचे नागरिक येणार आहे त्यामुळे आपल्यावर मोठया प्रमाणात आणखी सेंटर सुरु करायचे आहे त्या अनुषंगाने आम्ही सुध्दा प्लॅन करीत आहे की ज्या उर्वरीत यु.पी.एस.सी. आहे जेथे साधारणत: व्यवस्था उभ्या होऊ शकते की जेथे अडचण नाही अशा आणखी १० ते १५ ठिकाणी या दवाखान्यांना सेंटर सुरु करु, सध्या जे आपले व्हॅक्सीनेशन सेंटर सुरु आहे त्यापैकी जे महानगरपालिकेचे सेंटर आहे जे दोन शिफ्टमध्ये चालतात उदा. आपल्याकडे जे इंदिरागांधी रुग्णालय आहे, के.टी. नगर रुग्णालय आहे, महाल येथील दटके हॉस्पीटल, पाचपावली रुग्णालय, आयसोलेशन या दवाखान्यामध्ये आपल्याकडे दोन्ही शिफ्टमध्ये म्हणजे सकाळी ०८.०० ते दुपारी ०३.०० वाजेपर्यत आणि दुपारी ०३.०० वाजेपासून रात्री १०.०० वाजेपर्यत व्हॅक्सीनेशन ड्राईव्ह करीत आहे. तेथे चांगला रिसपॉन्स आहे. संध्याकाळी तेथे येणा-यांची संख्या कमी असते त्यावेळी जर

आपण लोकांना व्हॅक्सीनेशन करीता आणु शकलो तर व्हॅक्सीनेशनमध्ये आणखी वाढ होईल, यामध्ये मा.महापौरांनी ८ ते १० दिवसापूर्वी यामध्ये पुढाकार घेऊन त्यांनी आम्हाला सांगितले होते की, आपण झोननिहाय रजिस्ट्रेशनला सुरुवात करु त्याप्रमाणे त्यांनी सर्व झोन सभापती यांची येथे सभा घेतली मी पण त्या सभेला प्रशासनातर्फे बोलाविण्यात आले होते आणि त्या सभेमध्ये निर्देश दिले. मला सांगायला आनंद होत आहे की, पर्वा आपण २६४५ लोकांचे रजिस्ट्रेशन करु शकलो, काल म्हणजे दि.२३ तारखेला ४४८६ लोकांचे रजिस्ट्रेशन झोनच्या माध्यमातून तसेच आपल्या कर्मचा-यांच्या माध्यमातून सभापतीच्या सहभागामुळे करु शकलो परंतु ४४८६ रजिस्ट्रेशनचा हा फार मोठा आकडा नाही आहे यामध्ये आपल्याला भरपुर काम करण्याची गरज आहे. सहा.आयुक्त आणि झेडएम.ओ यांनी सुध्दा यामध्ये लक्ष देण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे काही मा.नगरसेवकांनी सूचित केले की, आपल्याकडे पॉझिटीव्ह पेशंट आहे त्यांच्याकरीता क्वॉरंटाईन सेंटर सुरु करावे, परंतु पॉझिटीव्ह आलेल्या व्यक्तीसाठी ज्याला आम्ही कोव्हीड केअर सेंटर म्हणतो ते सी.सी.सी. सेंटर आपण सुरु केले आहे. पाचपावली आणि व्ही.एन.आय.टी. हे तर आधी दोन कार्यरत होतेच आता जिल्हाधिकारी महोदयांनी आपल्याला आमदार निवास अधिग्रहीत करुन दिलेला आहे. आमदार निवासला सुध्दा आता सीसीसी सेंटर सुरु झालेले आहे. या तिन्ही सी.सी.सी. सेंटरवर आजच्या घटकेला पाचपावली येथे १७०, एम.एल.ए हॉस्टेल ला ६८ आणि ५९ व्ही.एन.आय.टी. ला हे सकाळचे आकडे आहे. या सी.सी.सी. सेंटरवर महानगरपालिकेकडुन दोन्ही वेळचे मोफत जेवन सुध्दा दिले जाते. महानगरपालिका आणि स्टेट गर्व्हनमेंटचा येथे स्टाफ नेमलेला आहे त्यांच्या मार्फत त्यांचे ऑक्सीजन लेव्हल वारंवार चेक केल्या जाते. त्यांचे टेम्परेचर चेक केल्या जाते आणि त्यांना योग्य प्रमाणात उपचार दिल्या जाते. असिमेटेमॅटीक व्यक्ती क्रीटीकल कडे गेला तर त्यांना आपल्या ॲम्बुलन्सव्दारे दुस-या हॉस्पीटलमध्ये शिफ्ट केल्या जाते. एक मुद्दा चर्चेमध्ये असा सुध्दा आला की ज्या प्रायव्हेट हॉस्पीटलमध्ये उपचार घेत असतांना अव्वाच्यासव्वा दर काढल्या जाते आणि त्यामध्ये नागरिकांचे आर्थिक शोषण होते. त्या अनुषंगाने जी आपण कारवाई केली होती ती आता परत सुरु केलेली आहे. आपण ऑडीटर्स या सर्व केंद्रावर नेमलेले आहे. यांच्याकडुन आपण प्री ऑडीट करुन घेत आहे. परंतु आपल्याला लोकांना आणखी अवेअर करण्याची गरज आहे. कारण यामध्ये ८० टक्के कॉटच यामध्ये मर्यादीत आहेत. २० जे कॉट्स आहे ते आपल्या त्यांच्या दरानेच अपेक्षित आहे. त्यामुळे आपण नागरिकांना अवेअर करावे तेथे छोटासा बोर्ड सुध्दा लागलेला असतो ८० टक्क्यांमध्ये किती बेड अव्हेलेबल आहे २० टक्क्यांमध्ये किती बेड अव्हॅलेबल आहे. आपल्या माध्यमातून जर लोकांना अवेअर करुन ८० टक्कयांमध्ये जर लोकांना ॲडमिशन घ्यायला लावली तर निश्चित त्यांना याच दरामध्ये प्री ऑडीट करता येईल आणि त्यांचे आर्थिक शोषण करण्यापासून थांबविता येईल, जे अफोर्ड करु शकतात जे स्पेशल रुम करु शकतात आणि त्यांना ते दर मान्य आहे त्यांचा तर काही प्रश्नच नाही. या अनुषंगाने आज आपल्याकडे होम आयसोलेशन मध्ये असणारे जवळपास २३८६९ नागरिक होम आयसोलेशनमध्ये आहे. या लोकांना हॅन्डल करण्यासाठी शहरामध्ये ४४ आर.आर.टी. टिम काही झोनमध्ये १२ आहे काही १४ आहे. या आर.आर.टी. टिममध्ये काही ठिकाणी नर्सिंग स्टाफ वेगळा जातो कुठे टॅक्सचे कर्मचारी जातो कुठे सॅनिटेशनचे कर्मचारी जाते, कुठे टिचर्स स्टाफ जात आहे यांचे मुख्य काम कॉटॅक्ट ट्रेसिंग आहे. हा जो पॉझिटीव्ह व्यक्ती कोणाकोणाच्या संपर्कात आलेला आहे ती माहिती

आपल्या टिमला प्राप्त करुन दयायची आहे. दोन्ही कामांमध्ये आपल्याला लोकप्रतिनिधींचा देखील सहभाग मिळत आहे. त्या टिम मधील कर्मचारी देखील सांगतात की पुर्वी आम्हाला नागरिकांचा प्रतिसाद मिळत नव्हता परंतु जेव्हापासून नगरसेवक सोबत आल्यावर ती माहिती आम्हाला मिळाली. यासोबतच आपल्याकडे जे मेडीकलचा जो स्टाफ आहे त्यांचा एक टास्कफोर्स तयार करण्यात आलेला आहे. नागपूर शहरातील या क्षेत्रातील जे दिग्गज म्हटल्या जातात डॉ.सरनाईक असो, डॉ.पी.आर. जोशी असो, दोन्ही कॉलेजचे डिन असो, या सर्वांना यामध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. आम्ही वेळोवेळी या टास्कफोर्सची सभा घेऊन त्यांच्याकडुन टेक्नीकल व वैद्यकीय मार्गदर्शन घेऊन पुढची लाईन ऑफ ॲक्शन ठरवित असतो. मागच्या सभेला मा.महापौर साहेब सुध्दा होते. मागच्या टास्कफोर्सच्या टिमच्या माध्यमातून सांगण्यात सुध्दा आले होते की फॅल्यीफुड हे जे मेडीसीन तुम्ही शक्यतोवर होम आयसोलेट असलेल्या व्यक्तींना देऊ नका जोपर्यत बाकी गोष्टी कळत नाही. म्हणुन मग आम्ही तेव्हापासुन फॅटीफ्लुड होम आयसोलेशनला सरसकट देणे बंद केले. परंतु आपल्या हॉस्पीटलमध्ये किंवा डी.सी.एच.सी. ला आवश्यकतेप्रमाणे उपलब्धता आहे. मा.सदस्य श्री.प्रफुल्ल गुडधे यांनी जे निर्देशनास आणुन दिले की, काही ठिकाणी आमच्याकडे ऑक्सीजन, औषधांचा तुटवडा आहे यामध्ये आमचे थोडे दुर्लक्ष झाले होते आम्ही त्यावर सुध्दा लक्ष केंद्रीत केलेले आहे. आपले जे चार हॉस्पीटल कार्यरत आहे त्यामध्ये १२५ जंम्बो सिलेंडर सेंटरला पुरविण्यात आले होते त्यामध्ये वाढ करुन आणखी ९० सिलेंडर घेत आहेत. अशा रितीने २१५ सिलेंडर चारही सेंटरला होत आहे. हा जो बदललेला व्हायरस आहे त्यामुळे ऑक्सीजनचा सप्लाय वाढवावा लागतो. जे फिजीशीयन आपल्याकडे काम करीत आहे त्यांचे असे म्हणणे आहे की ज्या पेशंटला पुर्वी ३ लिटर किवा ५ लिटर ऑक्सीजनचा सप्लाय जरी झाला तरी स्टेबल रहायचे त्या सप्लाय पर्यत यांचे ऑक्सीजन लेव्हल मेनटेन रहायचे त्याच पेशंटला आम्हाला १२ ते १५ लिटर ऑक्सीजन पेशंटला दयावे लागत आहे त्यामुळे एका हॉस्पीटलला साधारणत: आम्हाला ३० सिलेंडर पुरायचे तेथे आम्हाला आवश्यकता ५० ते ५५ पर्यत झालेली आहे त्यामुळे हा निर्णय घेण्यात आले आहे. मी. मा. नगरसेवकांचे आणि महापौरांची देखील आभार मानतो की त्यांनी त्या विषयाच्या खोलात जाऊन त्यावर अभ्यास करुन डायरेक्शन दिले आहे त्यामुळे आम्ही त्यावर निर्णय घेऊ शकलो. याशिवाय आपल्याकडे एन.यु.एच.एम. च्या माध्यमातून जे स्टाफ आपण घेऊ शकतो त्यामध्ये मोठया प्रमाणात आपण स्टाफ घेतलेला आहे. त्यामध्ये दोन प्रकार आहे म्हणजे जिल्हा समितीच्या माध्यमातून सिव्हीज सर्जन तसेच एम.एच.ओ. यांची जी कमेटी आहे यांच्या माध्यमातून त्यांनी अपॉइमेंट केलेले आहे परंतु ते काम आपल्या शहरातील हॉस्पीटलमध्ये करीत आहे. जी.एम.सी. व आय.जी.एम.सी. मध्ये काम करीत आहे. मला सांगण्यास आनंद होत आहे की स्टॅडींग कमेटीने एक मोठा निर्णय घेतला म्हणजे एन.यु.एच.एम मध्ये जी सॅलरी ठरवलेली आहे त्या सॅलरीवर आम्हाला मेडीकल स्टाफ उपलब्ध होत नव्हता ६०,००० रुपये त्यामध्ये एम.बी.बी.एस. डॉक्टरला पेमेंट ठरले होते म्हणजे आम्हाला त्यामध्ये कोव्हीड साठी पुर्ण वेळ सेवा देणारा डी.सी.एच.सी. साठी जी.एम.सी. व आय.जी.एम.सी. मध्ये मिळत नव्हता आम्हाला स्थायी समितीच्या माध्यमातून टॉप अप करुन दिले उरलेले ४०,००० हजार रुपये महानगरपालिका खर्च करु शकतील त्याप्रकारे आम्हाला मेडीकल व पॅरामेडीकलचा स्टाफ मोठया प्रमाणात उपलब्ध व्हायला मदत झाली. आपल्याकडे जवळपास ३७३ लोक आहे त्यामध्ये डॉक्टर, स्टाफ नर्स, फारमासिस्ट, डाटा ऐन्ट्री ऑपरेटर, ए.एन.एम, जी.एन.एम असे लोक

आहे सर्वांच्या मदतीने आपण लढत आहोत पण यामध्ये आणखी काम करण्याची गरज आहे. आपल्यकडील परिस्थिती पाहता मा.सदस्यांनी प्रशासनावर नाराजी दाखविली की उपलब्ध बेडचे आकडे चुकीचे सांगण्यात आले आहे. ते चुकीचे नाही. त्यावेळी सत्तापक्ष नेत्यांनी व्यवस्थित सांगितले की काही हॉस्पीटलला व्हेंटीलेटर उपलब्ध नाही. काही हॉस्पीटलला ऑक्सीजन आहे परंतु आय.सी.यु नाही. यांची जी उपलब्धतेची संख्या जी आहे ती आम्ही सकाळी ९ ते १० च्या दरम्यान घेतो आणि १० वाजता ती यादी संकेतस्थळावर टाकतो परंतु तो पर्यत ते बेड फुल होऊन जाते त्यामुळे यामध्ये आणखी काम करण्याची गरज आहे आणि त्या दृष्टीने आम्ही कामाला लागतो आहे. मा.सदस्या आभाताईंनी सुध्दा एक मुद्या मांडला होता की माहिती देत नाही परंतु यामध्ये मी आपणांस सांगु इच्छितो की, यामध्ये जेवढी पारदर्शक ठेवण्याची गरज आहे तेवढी ठेवण्यात येईल, सगळयात चांगले आपल्याकडे टेस्टचा जो आकडा आहे तो ११ लाख ३० हजार आहे. आपण जर शहराची लोकसंख्या २८ ते ३० लाख धरली तर त्यापैकी ११ लाख टेस्ट झालेल्या आहेत. टेस्ट पर मिलीयन म्हणजे १० लाख लोकसंख्येपैकी किती टेस्ट झाल्या हा जो आकडा असतो तो महाराष्ट्रात सुध्दा नागपूरचा हायस्ट आहे. आज आपण जवळपास ४ लाख आहे. म्हणजे १० लाख लोकसंख्येच्या मागे आपण ४ लाख आहे. यामध्ये मला खात्री आहे की आपला सहभाग वाखाखण्यासारखा आहे. आमच्या मागे लागुन सर्व नगरसेवकांनी आपआपल्या परिसरात सेंटर उभे केले आणि नुसते उभे केले नाही तर जागा सुध्दा ॲडव्हाईस केली. या ठिकाणी जर होऊ शकत नसेल तर शाळेच्या ठिकाणी दया, आम्ही तुम्हाला मदत करतो असे करुन टेस्टचा चांगला परफॉरमन्स महाराष्ट्रात दाखवु शकलो आहे. मला माहिती आहे की आपला सहभाग व मार्गदर्शन प्रशासनासोबत चांगले राहिले तर आपण व्हॅक्सीनेशनचे देखील चांगले काम जगभरात करुन दाखवु शकु, या कोव्हीडला संपविण्यासाठी प्रयत्न करु.

श्री प्रविण दटके -: मा.महापौरजी, प्रशासनानी ज्या नियोजनाबद्यल सांगीतला आहे, त्याबद्यल मला काही म्हणावयाचे आहे, एक तर आरटीपीसीआर मोठया प्रमाणात होत आहे, कुठलीही भिती न बाळगता लोक आरटीपीसीआर करुन राहिले आहे, परंतु या आरटीपीसीआरचा रिपोर्ट किमान २४ तासाच्या आंतमध्ये पेशंटला मिळावयास पाहिजे, लसीकरणाच्या संदर्भात इंदिरा गांधी हॉस्पिटलमध्ये १० वाजेपर्यंत सेंटर चालत आहे व महाल येथे पांच वाजेपर्यंत सेंटर चालत आहे व दुसरीकडे आयसोलेशनमध्ये सायंकाळी ८ वाजेपर्यंत सेंटर चालत आहे, इतकडचे जे अधिकारी आहे त्यांना सांगुन रात्री १० वाजेपर्यंत सेंटर चालले पाहिजे. कर्मचा-यांचे लसीकरण मोठयाप्रमाणात करण्यांत यावे, मागे महानगरपालिकेतील अनेक कर्मचारी पॉझीटीव्ह आले आहे, श्री धामेचा साहेबांच्या विभागातील अनेक कर्मचारी पॉझीटीव्ह आले, श्री जलज शर्मा साहेबांच्या विभागतील कर्मचारी पॉझीटीव्ह आले, म्हणुन आपल्या इमारतीत आपल्या कर्मचा-यांची संख्या त्यांच्या कामाप्रमाणे आपण ठेवली पाहिजे. मा.महापौरजी, नागपूर शहरात आपल्या नेतृत्वात ६ विधान सभा क्षेत्रामध्ये सहा सेंटर असावे. तेथे आपण केव्हाही गेलो तर २४ तासात केव्हाही लसीकरण व्हावे, आयुक्तांच्या सोबत एकत्रित बसुन सहा सेंटर असावे. प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये कोरोना पेशंटसाठी जे दर शासनाने निर्धारीत करुन दिले आहे, त्याचा बोर्ड ठळक अक्षरात हॉस्पिटलच्या दर्शनी भागात लावण्यात यावा.याची खबरदारी त्या त्या झोनच्या मेडिकल ऑफिसरांनी घेतली पाहिजे, याबातीत आपल्या संकेतस्थळावर नागरिकांना बघता येईल, अश्याप्रकारची बातमी प्रकाशित करण्यांत

यावी, प्रत्येक हॉस्पिटलमध्ये व्हेंटीलेटर असावे, प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये पेशंटकडुन जास्तीचे पैसे घेण्यांत येवु नये, याची काळजी प्रशासनाने घ्यावी. मा.महापौरजी, आपल्या महानगरपालिकेच्या दवाखान्यात एमरजंसीमध्ये पेशंटला ॲडमिट करण्याची वेळ आली तर व्हीकल्स असाव्या, महानगरपालिकेच्या प्रत्येक दवाखान्यामध्ये १०-१० व्हेंटीलेटर एमरजंसी सर्व्हीसेस करिता ठेवण्यांत याव्या, त्या आपल्या कामात येतील, मा.महापौरजी, ॲम्ब्युलेंसचा विषय आहे, पेशंटला त्याच्या घरापासून हॉस्पिटलपर्यंत पहोचविण्याकरिता अम्ब्युलेंस लागते, मागच्या काळात मा.संदिपजी एकदम चांगली व्यवस्था उभी केली होती, ती परत एकदा उभी करण्याची गरज आहे, त्याचे दर निश्चित करुन जर आपण नागरिकांना कळविले तर त्या अम्ब्युलेंस नागरिकांकरिता उपलब्ध होईल. सर्वांत महत्वाचे मा.महापौरजी, कोणत्या गोष्टीसाठी कोणाला फोन लावले पाहिजे, जसे लसीकरण, आरटीपीसीआर बेडची माहिती, व्हेंटीलेटरची माहिती, दवाखान्याची माहिती अश्याप्रमाणे आपण कामाचे डिसेंट्रालाईज केले तर तो अधिकारी पुर्ण ताकदीने जनतेला मदत करेल, यादृष्टीने सुध्दा उपाययोजना करण्याची गरज आहे. सर्व नगरसेवकांनी या चर्चेमध्ये भाग घेतला प्रशासन सुध्दा वेगवेगळया मार्गांनी कोविड या रोगावर मात करण्यासाठी प्रयत्नरत आहे, पण लसीकरणाची प्रक्रिया वाढविण्याची गरज आहे, आपण जेव्हा स्थगन प्रस्तावावर निर्णय द्याल मला अपेक्षा आहे कि, आपण यासर्व बाबीवर खुलासा कराल, आपण मला बोलण्याची संधी दिली, धन्यवाद.

महापौर :- इस स्थगन प्रस्ताव मे चर्चा मे समाविष्ट समस्त नगरसेवको का मैं अभिनंदन करता हुॅं कि, उन्होने सकारात्मकता के साथ मे संपुर्ण विषय को बहोत संजीदगी के साथ मे रखा, और किसी प्रकार की नकारात्मक टिप्पणी न करते हुऐ सुधार पर बहोत आवश्यक चर्चा की , इसलिये मैं सभी का हृदय से अभिनंदन करता हुॅं । मा.प्रविणजी ने इस स्थगन प्रस्ताव को प्रारंभ किया और धिरे धिरे सभी नगरसेवको ने इसमे बडी संख्या मे सहभाग लिया, कुछ बाते जो उभरकर के सामने आयी जहां से चर्चा की शुरुवात हुई, उसमे सबसे पहली बात यह थी कि, महानगरपालिका के वह सफाई कर्मचारी जिन्होने इस कोरोना के कार्यकाल मे पुर्ण तत्परता के साथ मे अपनी जान हथेली पर रखकर काम किया है उनका लसीकरण होना चाहिये । राम जोशीजी ने आंकडे रखे कि, ७,४७८ कर्मचारीयो मे से ३,८९३ कर्मचारीयो ने लसीकरण लिया है यह आंकडा करीब करीब ५०-५२ प्रतिशत के आसपास है, ५० प्रतिशत अभी भी बाकी है, मैं प्रशासन से निवेदन करता हुॅं कि, एक परिपत्रक निकाले और परिपत्रक निकालकर हमारे जिन सफाई कर्मचारीयो ने लसीकरण नही करवाया है, उन्हे आनेवाले माह मे हम पगार पुरी नही देगे इस प्रकार के स्ट्रीक्ट आदेश दे जिससे वह लसीकरण करवाले I मैं एक निवेदन और करना चाहता हुॅं कि, जिन केअर हेल्थ वर्कर एवं फ्रंटलाईन वर्कर के नाम दर्ज नही है वहा वॅक्सीनेशन सेंटर पर जाकर के अपना नाम अभी दर्ज करवा सकते है, इस विषय को प्रशासन एक प्रेस नोट रिलीज करके इसको जनता के समक्ष फिरसे प्रसारीत करे, कारण बहोत बडी संख्या मे जो हेल्थ केअर वर्कर है, फ्रंट लाईन वर्कर है, जिन्होने रजिस्ट्रेशन बंद होने के बाद रजिस्ट्रेशन नही करवाया वह यही संभ्रम मे है कि हमारा नंबर आयेगा, इसलिये यह अवेयरनेस भी प्रशासन प्रेस के माध्यम से खुद अग्रक्रम देकर के आगे बढाये, ऐसा मैं निवेदन करता हुॅं । और उसी के साथ साथ हमारे सभी नगरसेवक और मिडिया के प्रतिनिधी इनका भी लसीकरण फ्रंट लाईन वर्कर के रुप मे अग्रक्रम से किया जाये । आर.टी.पी.सी.आर. टेस्ट को लेकर के मा. प्रविणजी ने कहां कि हमने

२० हजार के टारगेट तक जाना चाहिये, महानगरपालिका इस विषय को लेकर के बहोत अच्छा काम कर रही है, मैं सभी नगरसेवको से निवेदन करना चाहता हुँ कि, यह  निवेदन मैं इसलिये करना चाहता हुँ कि, सभी ने अपने अपने निवेदन मे यह बताया कि, जो पेशंट होम कोरंटाईन है वह अपने घर के आसपास घुम रहे है, मैं आपसे निवेदन करना चाहता हुँ कि, आपने सभागृह मे जो बताया कि, होम कोरंटाईन पेशंट घर के बाहर निकलते है, इसका अर्थ यह है कि वह उस परिसर मे घुम रहे है, होम कोरंटाईन पेशंट के आसपास रहनेवाले लोगो ने भी अपनी आर.टी.पी.सी.आर. टेस्ट करवा लेनी चाहिये इस विषय को लेकर के नगरसेवक अगर अपने अपने क्षेत्र मे जिस प्रकार से हम लसीकरण के विषय को लेकर के जनता से संपर्क कर रहे है, उसी प्रकार से अगर संपर्क करेगें तो हम २० हजार के आंकडे तक पहोंचेगें इसमे प्रशासन को आपके सहयोग की नितांत आवश्यकता है। यह निवेदन मैं आपके समक्ष करना चाहता हुँ,नागपूर महानगरपालिका के जो कर्मचारी पॉझीटीव्ह निकलते है उनको भरती करने के लिये महानगरपालिका ने अपनी तरफ से यंत्रणा खडी करनी चाहिये, ऐसे मैं निवेदन प्रशासन को आजकी सभा के माध्यम से करता हुँ। महानगरपालिका का हमारा वह कर्मचारी जो २४ घंटे इस कोरोना के कार्यकाल मे सेवा दे रहा है, अगर वह पॉझीटीव्ह आजाये तो उसके परिवार की नैसर्गिक इच्छा होती है कि, उसको कुछ न कुछ व्ही.आय.पी. ट्रीटमेंट मिलनी चाहिये, मैं किसी व्ही.आय.पी. ट्रीटमेंट की बात नही कर रहा हुँ, लैकिन उसको प्राथमिकता के साथ मे हमने अडमिट करने की अगर व्यवस्था करदी तो उसके परिजनो को ऐसा लगेगा कि, महानगरपालिका का प्रशासन अपनी संस्था मे काम करनेवाले कर्मचारीयो को सम्मान देता है, इस प्रकार का व्यवस्थापन हमने करना चाहिये, ऐसा मैं प्रशासन को निर्देशित करता हुँ। अस्पताल मे कोरोना पेशंट के मेडीसीन और इंजेक्शन को लेकर के बहोत सारी शिकायते आती है, मा.सत्तापक्ष नेता श्री अविनाशजी ठाकरे ने भी इस संदर्भ मे सूचना की है, जो प्रायव्हेट हॉस्पिटल है, वहां पेशंट का बील  नर्सीग से ज्यादा फिजीशियन से ज्यादा  मेडीसीन का बील निकल रहा है,  देखिये हम किस प्रकार से अस्पताल मे लगने वाली मेडिसीन को अगर  एफ.डी.ए. से बात कर के  बाहर से हम उस व्यवस्था को उपलब्ध कराने की व्यवस्था अगर एफ.डी.ए. के किसी  परिपत्रक के माध्यम से कर सके तो बडे प्रमाण मे नागरिको को इसका भी लाभ मिल सकेगा। और  कही न कही वह इस शहर की जनता को भी मिलेगा इस दृष्टीसे हमने कदम उठाना चाहिये, ऐसा मैं निवेदन करता हुँ। जो प्रायव्हेट हॉस्टिल शुरु नही हुऐ है इस संदर्भ मे कमलेशजी ने कहां और मुझसे भी निवेदन किया कि, मैंने इसकी झोन वाईज जानकारी लेनी चाहिये, मैं निगम आयुक्त महोदय को निर्देश देता हुँ कि, जिन प्रायव्हेट हॉस्पिटल को हमने कोविड हॉस्पिटल के रुप मे शुरु करने की अनुमती दी है, अगर वह शुरु नही हुऐ है तो उन्हे तत्काल शुरु किया जाये, और हमारी एक टिम ने उनका सर्व्हे करके आजके आज इस बात की तहकीकात करे की वह प्रायव्हेट हॉस्पिटल शुरु हुऐ है या नही, होम कोरंटाईन पेशंट पर वॉच रखने के लिये सबने बार बार कहा, मैं सभी मा.सदस्यो से नम्र निवेदन करना चाहता हुँ कि, मैंने सभी झोन सभापती से भी कहां कि वह अपने झोनल अधिकारीयो से मिल करके पॉझीटीव्ह पेशंट की यादी निकाल ले उससे उन्हे पता चल जायेगा कि, उनके इलाको मे कितने लोग होम कोरंटाईन है, और बहोत विनम्रता से मैं कहना चाहता हुँ कि, प्रशासन की अपनी एक सीमा है,प्रशासन कार्य करहा है, लेकिन प्रशासन का जो स्कॉड है, वह वहां जाकर के अगर होम कोरंटाईन पेशंट बाहर घुम रहा है तो उसके ऊपर रेट करता है, उसे पकडता है, उसकी संख्या नही के प्रमाण मे है,

ज्यादा नही है, इसलिये सारी की सारी टिम वहां नही लगा सकते कारण मास्क से लेकर के सारी कारवाई उनको करना है, इसलिये प्रशासन अपनी क्षमता के अनुरुप काम कररहा है । हम भी प्रशासन का एक अंग है, महानगरपालिका का प्रशासन और निर्वाचित जनप्रतिनिधी दोनो मिलाकर के महानगरपालिका बनती है, मैं आप सभी का अभिनंदन करना चाहता हॅु कि आप सभी लोग लसीकरण के विषय को लेकर काफी महनत कर रहे है, पिछले समय जो सॅनिटायझेशन हुआ उस समय भी आपने काफी महनत की, फुड पॅकेटस बांटने मे भी आपने महनत की, आपसे अलग प्रकार की मेहनत की अपेक्षा है, यह अपेक्षा है कि, आप आपके मोहल्ले के सामाजिक संघटनाओ को साथ मे लेकर के जो होम कोरंटाईन पेशंट है उन्हे किसी न किसी प्रकार से दिलासा देने की कोशिश करे, उन्हे अपने घर से बाहर न निकलने दे । घोडेस्वारजी ने एक बात कही, और उन्होने कहां कि एक व्यक्ति अपने परिजनो को भोजन देने के लिये गया और उसपर दंडात्मक कारवाई की गयी, इस विषय पर चर्चा हुई अगर किसी परिवार को भोजन हॉस्पिटल तक पहोंचाना है तो आप महानगरपालिका से निवेदन करते या अपने किसी परिचित से निवेदन करते वह आपके पेशंट तक भोजन पहोंचा देता था, लेकिन अगर आप पॉझीटीवह होने के बाद पॉझीटीव्ह की हैसियत से अगर घर के बाहर जायेगे तो महानगरपालिका का प्रशासन आप पर दंडात्मक कार्यवाही करेगा वह कारवाई कही भी गलत नही है, आपने जो किया वह भी गलत नही है, एक बेटा अपनी मॉ के लिये भोजन देने जाये,  यह भावना का विषय है, लेकिन प्रशासनिक दृष्टीसे कोविड पॉझीटीव बेटा जाये, यह प्रतिबंधित है, इसलिये महानगरपालिका ने दंड किया । घोडेस्वारजी इस बात को लेकर के हमारे मन मे संजीदगी है, लैकिन वह कारवाई इसलिये नितांत आवश्यक थी कि, कोई भी कोविड पॉझीटीव्ह व्यक्ती घर के बाहर न निकले, यह महानगरपालिका की मोहिम है और उसके पश्चात उनके परिचितो ने हॉस्पिटल मे जाकर के भोजन देना प्रारंभ किया,  अगर शायद उसे दंड नही होता, तो  वह पॉझीटीव्ह पेशंट रोज बाहर जाते रहता इसलिये इस प्रकार की कारवाई नितांत आवश्यक है । एक सूचना आयी, आय.जी.आर. मे स्टॉफ बढाने की मांग की गयी है, जिस प्रकार से हमारे यहां पेशंट बढरहे है, और सकारत्मक तरीके से एक अच्छे हॉस्पिटल मे जिस प्रकार से ट्रीटमेंट होता है, वह सारी सुविधा आय.जी.आर. के अंतर्गत हमने वहां उपलबध करा के दी है,  केवल आय.सी.यु. मे जिस पशेंट को जाना है उससे पूर्व की सारी सुविधा हमने वहां पर उपलब्ध करा कर दी है, इसलिये हमे वहां इस व्यवस्था को बनाये रखने के लिये अतिरिक्त स्टॉफ की आवश्यकता लगती है तो प्रशासन ने वहां स्टॉफ बढाना चाहिये, ऐसा मैं निवेदन करना चाहता हॅु ।  सॅनिटायझेशन की व्यवस्था कम पढरही है, मैंने स्वयं झोन नंबर ६ मे जाकर के इस विषय मे बैठक ली बैठक लेने के बाद मे मैंने श्री राम जोशीजी से निवेदन भी किया इसमे गतीशीलता लाने के लिये हमने कोविड के अन्य कामो मे जो कर्मचारीयो को रखा है, उनकी मदद से सॅनिटायझेशन के काम को करना नितांत आवश्यक है, हमने निर्देश दिये, मा.निगम आयुक्तजी के निर्देश है कि, एक फलॅट सकीम मे अगर एक पेशंट पॉझीटीव्ह निकलता है तो संपुर्ण फलॅट स्कीम का चेकअप होना चाहिये, और संपुर्ण फलॅट स्कीम का सॅनिटायझेशन होना चाहिये, लैकिन हकिकत मे यह होता हुआ दिखाई नही देता इसलिये इस दृष्टीसे हमने बडे प्रमाण मे सॅनिटायझेशन को फिरसे करने की नितांत आवश्यकता है, यह बात सही है कि जो पॉझीटीव्ह पेशंट है उनसे संपर्क करने मे हमारी टीम कम पड रही है, हमारी आर.आर.टी. जो टिम है, हमारे आर.आर.टी. टिम की संख्या भी अभी जोशी साहब ने बताई, उन्होने कहां कि २३ हजार पेशंट को

देखने के लिये १२४ टिम है, यह टिम सब जगह संपर्क तिव्रता से कर सके इस दृष्टीसे अगर आर.आर.टीम को बढाने की आवश्यकता है और जिस प्रमाण मे पेशंट बढे है उस प्रमाण मे उनसे संपर्क करने के लिये हमारी टिम भी बढनी चाहिये। और नैसर्गिक है कि हमारे पास रिपोर्ट आने के बाद हम उसे झोन वाईज डिस्ट्रीब्युशन करते है और झोन वाईज डिस्ट्रीब्युशन करने के बाद वह रिपोर्ट टिम के पास जाती है और टिम फिर फोन करके संबंधित व्यक्ती से संपर्क करती है, इसमे हमारा दो दिन का समय चला जाता है हम क्या इस प्रकार की कोई यंत्रणा खडी कर सकते है कि, हमारे पास जो सरकार की साईट से जो मॅसेज आते है उस मॅसेज मे संबंधित व्यक्ती का टेलीफोन नंबर होता है क्या हम उसे टॅक्नालॉजी का इस प्रकार से उपयोग कर सकते है कि, वह रिपोर्ट जब महानगरपालिका के पास मे आती है तो हम टॅक्नालॉजी के माध्यम से एस.एम.एस. का ऐसा कोई पॅक् ले जिसका नियोजन करके वह रिपोर्ट हमारे साथ साथ संबंधित व्यक्ती को भी एस.एम.एस के माध्यम से मिल जाये, इस प्रकार से अगर हम लोग टॅक्नालॉजी का उपयोग कर सके तो तुरंत हमारे सेंटर पर आनी वाली रिपोर्ट और पेशंट को जानेवाली रिपोर्ट भी समय पर जायेगी इससे पेशंट को कही न कही इलाज करते समय सुविधा का लाभ मिलेगा, इस दृष्टीसे हमने विशेष रुपसे प्रयास करने चाहिये।मुख्य बात प्रोपोगंडा किया जाये, महानगरपालिका ने पिछले कार्यकाल मे बहोत बडे प्रमाण मे जहा जहां शहर मे प्रोपोगंडा (जागृती) की थी, यह इसलिये स्टॅब्लीश होता है कारण उस वक्त सब लोग अपने घर के अंदर बैठे थे, इसलिये जितनी बार गाडी जाती थी, उतनी बार आवाज आती थी, लैकिन इस बार हर व्यक्ती बाहर घुम रहा है इसलिये इस बार उसके कानो मे आवाज नही आरही है, लैकिन नगरसेवको की सूचना है कि अपने कार्यो का प्रोपोगंडा करना इसलिये आवश्यक है कि, महानगरपालिका क्या काम कर रही है यह केवल इस शहर के सभागृह के सदस्यो को नही शहर की जनता मे भी सकारत्मक बात जानी चाहिये। उनसे जो हमे सहयोगी की अपेक्षा है वह भी प्रोपोगंडा के माध्यम से मांगनी चाहिये, इस दृष्टीसे मा.आयुक्त महोदय प्रोपोगंडा बढाने के प्रयास करेगें, आनेवाली एक तारीख से ४५ साल के ऊपर समस्त नागरिको का लसीकरण करने का निर्णय भारत सरकारने लिया है, यह गती और बढेगी, नागरिक लसीकरण के लिये महानगरपालिका के केंद्र मे बडे प्रमाण मे आयेगें, मैंने कल स्वयं मा.मुख्यमंत्री महोदय को पत्र लिखा कि, मा.आयुक्तजी ने चार तारीख को आपको पत्र दिया था कि, नागपूर शहर के दवाखानो को, प्रायव्हेट हॉस्पिटल को लसीकरण की अनुमती मिलनी चाहिये, आपने पुणे और मुंबई मे तो यह व्यवस्था दी लैकिन नागपूर मे नही दी आप जल्द इसपर निर्णय ले, मा.आयुक्त ने कल मुझे बताया कि, वह पत्र मुंबई से दिल्ली के लिये गया है वहां से अनुमती मिलने के बाद तुरंत और प्रायव्हेट हॉस्पिटल मे लसीकरण केंद्र की व्यवस्था करेगें। मैं आयुक्त महोदय को आजके सभागृह मे चर्चा के अनुरुप एक निर्देश देना चाहता हुँ मा.आयुक्त महोदयजी हमारी जिन पी.एच.एस.सी. मे हम लोग जो टेस्टींग सेंटर चला रहे है, वह टेस्टींग सेंटर किसी पडोस के समाज भवन मे हम स्थानांतरीत करे वहां संपुर्ण व्यवस्था उपलब्ध करवा कर दे, और लसीकरण की शुरुवात उन पी.एच.एस.सी. सेंटर मे करे, लसीकरण के लिये हमारे पास शासन के नॉर्म्स है, टेस्टींग सेंटर के लिये नॉर्म्स नही है इसलिये जहां जहां हमारे किलिनिक मे डिस्पेंसरी मे हमारे सेंटर टेस्टींग के लिये चल रहे है, उन्हे दुसरी जगह स्थानांतरीत करके उसको हम अगर लसीकरण केंद्र के रुप मे अगर कन्वर्ड करेगें तो नैसर्गिक रुप से हमारी संख्या बढेगी। कुछ एन.जी.ओ. के माध्यम से निवेदन आये है, वह एन.जी.ओ. हमे नर्सिंग कॉलेज से नर्सेस

उपलब्ध करवाकर देने के लिये तैयार है हमारे यहां जो पॅरामेडिकल कॉलेज है, वहां के बच्चे सेवा देने के लिये तैयार है, हमारे यहां जो एन.एस.एस. के बच्चे है वह हमे सेवा देने के लिये तैयार है, हमारे यहां जो मॉयक्रोबायलोजी के स्टुडेंट है, वह सेवा देने के लिये तैयार है l जो बायोकॅमेसट्री के स्टुडेंट है वह सेवा देने के लिये तैयार है l इन सारे लोगो से संपर्क करके इनका अगर हमने ठिक तरीके से नियोजन किया तो लसीकरण सेंटर को हम बहोत अच्छे से चला सकते है l मा.प्रविणजी ने निवेदन किया कि हमारे २४ बाय ७ लसीकरण केंद्र होने चाहिये, प्रविणजी आपका सुझाव बहोत अच्छा है, आयुक्तजी ने जिस दिन १० बजे तक सेंटर शुरु किया उस दिन मुझ से कहां था कि, मैं २४ घंटे सेंटर चालु करना चाहता हुॅ मैंने उनसे निवेदन किया था कि, हमारे जो कर्मचारी है उनपर रहम करो और इसको १० बजे तक रहने दो, लैकिन अगर हमे और अतिरिक्त स्टॉफ मिलता है तो हम इस अतिरिक्त स्टॉफ के साथ २४ घंटे तक सेंटर चला सकते है, १ अप्रेल से ४५ साल के ऊपर के समस्त नागरिको को लसीकरण की सुविधा होंगी, तो एक तारीख के बाद हम छ: विधान सभा क्षेत्र मे छ: लसीकरण के सेंटर पुरी रातभर चलाये, २४ घंटे चलाये, इस प्रकार के निर्देश आजकी सभा के माध्यम से प्रशासन को दिये जाते है l आप सभी नगरसेवको से निवेदन है कि, पुरे भारतवर्ष मे लसीकरण मे जो एम्प्युल की संख्या जो सब से ज्यादा है, इंजेक्शन खराब होने की यह महाराष्ट्र मे है और नागपूर भी उसमे पिछे नही है, इसका कारण यह है कि एक एम्प्युल अगर हमने बाहर निकाला तो दो घंटे के बाद हम उसमे बची हुई मेडीसीन को युज नही करसकते हम २४ घंटे हॉस्पिटल तो शुरु कर सकते है, लैकिन यह एम्प्युल अगर दो घंटे के अंदर उपयोग मे नही आयी तो यह दवा वेस्ट होंगी यह हमारे लिये संजीवनी है, यही इंजेक्शन हमारे लिये जिवनदाता है, ऐसा भारत सरकार का कहना है, ऐसा विश्व का कहना है, इसलिये जिवनदात्री औषद्यी को २४ घंटे देने के लिये अगर हम २४ घंटे उसी प्रक्रिया से गतीशीलता को बनाये रखेगें तो मेडीसीन का वेस्टेज कम होंगा, जिस प्रकार से लोगो को लस मिलना चाहिये, यह नितांत आवश्यक है, उसी प्रकार से लस खराब नही होना चाहिये, नष्ट नही होना चाहिये, यह भी हमारी एक सामाजिक जिम्मेदारी है, इस दृष्टीसे अच्छा नियोजन करके एक दुसरे से संपर्क स्थापित करके आप जिस आक्रमकता से काम कर रहे है, उस आक्रमकता से लसीकरण को आगे बढाईये l कोरोना बहोत तेजी से आगे बढरहा है, मैं प्रशासन से नियमित बात करता हुॅ और मुझे जो उचित लगता है उसकी जानकारी देता हुॅ आपने जितनी बाते आज सभागृह मे उठायी, जिन सभी विषयो पर हमने चर्चा की और मैं विशेष रुपसे बताना चाहता हुॅ कि, हमारे तरफ से भुल भी होगयी कल हमने अपने फेस बुक पर हमारे सारे के सारे संपर्क के नंबर डाल दिये और संपर्क के नंबर के ऊपर मे हमने जो पंच लाईन लिखी कि, जिनको भी रिक्त बेड की आवश्यकता है वह निचे के नंबर पर संपर्क करे, संपर्क करने के लिये वह सारे नंबर तो हमने झोन के कार्यालय के दिये थे, उसमे से केवल एक ही नंबर ऐसा था जो बेड की जानकारी दे सकता था, यह बात जब सामान्य जनता से पता चली, मैंने तुरंत यह बात मा.श्री राम जोशीजी से कहां फिर हमने उसमे सुधार किया, हमारे जो झोन के नंबर है कंट्रोल रुम के वहां से बेड की जानकारी नही मिलेगी, बेड की जानकारी हमारे मुख्य कंट्रोल रुम के नंबर से मिलेगी, इसलिये उसी नंबर से हम सभी लोग जानकारी ले सकेगे l कल एक आय.टी. प्रोफेशन को मैंने बुलाया भी था, मा.श्री राम जोशीजी के पास मिलने के लिये भी भेजा था, जोशीजी ने बताया कि बेड की व्यवस्था शर्माजी देख रहे है, हम कोशिश कर रहे है कि आयटी का उपयोग करके हम यह व्यवस्था उपलब्ध करवा सके,

ऑन टिप आपको किस हॉस्पिटल मे कितने बेड खाली है, कौनसे आक्सिजन वाले है, कौनसे व्हेंटीलेटर वाले है, और कौनसे आय.सी.यु.वाले है, इसकी जानकारी मिल सके, थोडासा समय लगेगा इस व्यवस्था को भी हम अंमल मे लायेगें। परसो ही यहां शहिद दिन का हमने कार्यक्रम लिया उसके पश्चात हम हमारे कंट्रोल रुम मे गये और कंट्रोल रुम मे जाने के बाद मैंने तुरंत सूचना करी और उस सूचना के अनुरुप महानगरपालिका ने प्रतिदिन की बेड की स्थिती अखबार मे देना चालु किया आपके मन मे जो संभ्रम है, जानकारी गलत है, संभ्रम होने मे कोई बुराई नही है, सुबह १० बजे जब हमारे पास सूचना आयेगी और उसको हम प्रकाशित करेगें तो ३-३ हजार पेशंट रोज निकल रहे है तो नैसर्गिक है कि वहां बेड फिरसे भर जायेगे, शाम को ६ बजे जो सूचना आयेगी वह अगर हम अखबार मे छापेगें तो वह सुबह आपके पास आयेगी, इस १२ घंटे मे बेड की अव्हेलिबीलीटी मे फरक पडता है, इसलिये मैं निवेदन करना चाहता हुॅं कि, इस बात की जानकारी प्रत्येक नगरसेवक तक पहोंचे इसलिये हम आय.टी. का उपयोग करने का प्रयास कर रहे है, लैकिन जब तक वह नही होता तब तक हमारे मुख्य कार्यालय का जो कंट्रोल केंद्र का नंबर है, वहां से हॉस्पिटल वाईज विधान सभा क्षेत्र के हिसाब से आपने आपकी विधान सभा बताया तो आपको कौनसे हॉस्पिटल मे कितने बेड खाली है इस बात की जानकारी मिल जायेगी। प्रशासन ने यह व्यवस्था उपलब्ध करवाकर दी है। महानगरपालिका ने भी अपना आयुष हॉस्पिटल शुरु करने का निर्णय लिया है, बहुधा कल से हमारे आयुष हॉस्पिटल प्रारंभ हो जायेगा, जिससे और अतिरिक्त बेड नागपूर महानगरपालिका के माध्यम से मिलेगे, पांचपावली मे भी जो हमारा सेंटर है, जहां किसी पेशंट को अगर ऑक्सिजन की कमी है वहां आकर के वह ऑस्किजन लेकर के फिर अपने घर जा सकता है, जैसाकि अविनाशजी ने कहां कि रेमडीसेव्हर कोई आकर के लेकर के चले जाये, ऐसा व्यवस्था हो सकती है क्या ? तो आक्सिजन के लिये हमने यह व्यवस्था की है, यह जो रेमडीसेव्हर की सूचना है यह एक किलिनिकल विषय है, अगर डॉक्टर्स की सलह लेकर के उसमे भी कुछ किया जात सकता है तो उस दृष्टीसे हम प्रयास करेगें। प्रशासन कार्य कर रहा है इसमे कोई दोराय नही है, लैकिन प्रशासन की गती से ज्यादा कोरोना की गती है, इसलिये हम सभी लोग, हम सभी लोगो की मन की इच्छा है कि हम कोरोना को मात दे, आप सब लोगो का सहकार्य मिलता रहेगा, ऐसा मुझे विश्वास है, प्रशासन को नगरसेवको की सूचना के अनुरुप अपनी गतीशीलता को बढाने के लिये जिसमे एन.जी.ओ. का जितना सहयोग लेना चाहिये वह लेना चाहिये, हमारा मेन पॉवर अगर कम पड रहा है तो एन.जी.ओ. के मेन पॉवर को उपयोग मे लेकर के हम लोग हमारे व्यक्तीयो की कमतरता को समाप्त कर सके, फलाईंग स्कॉड के रुप मे जिस प्रकार से हम लोग हमारे एनडीएस के कर्मचारीयो का उपयोग कर रहे है, होम कोरंटाईन पेशंट पर वॉच रखने के लिये उसी प्रकार से कोरोना के कार्यकाल मे जिन जिन एन.जी.ओ. ने पिछले समय हमे साथ दिया, उनको भी साथ मे लेकर के अगर उन व्हॉलेंटीयर का हमारे फालईंग स्कॉड के रुप मे उपयोग कर सके तो एक सकारात्मक संदेश जायेगा, और हम कोरोना को रोकने मे तिव्रता से आगे बढेगें। इन सारे निदर्शो का तत्वत: प्रशासन पालन करे, आनेवाली १ तारीख से २४ घंटे के छ: सेंटर छ: विधान सभा क्षेत्र मे बने, मेडिसीन की कही भी कमी न हो, प्रफुलजी का मैं अभिनंदन करना चाहता हुॅं कि, कल उन्होने समय पर आयजीआर का विषय सामने लाया मैं वहां गया, प्रफुलजी के सामने ही आयुक्त महोदय से बात हुई,और १० मिनिट मे ही हमने निर्णय ले लिया कारण यह विषय १० मिनिट के अंदर निर्णय लेने के होते है, आयुक्त महोदय

ने उस विषय पर तुरंत निर्णय लिया, इस बात के लिये मैं उनका भी अभिनंदन करना चाहता हुँ, राम जोशीजी ने अपने निवेदन मे बताया कि, हमने हमारे ऑक्सिजन सिलेंडर की संख्या ५० प्रतिशत बढा दी है, आपने सूचना कि, के हमारे पास कम से ५० प्रतिशत रिझर्व्ह मे सिलेंडर होने चाहिये, ऐसी आपकी जो भी सकारत्मक सूचना आयेगी उसमे सुधार करने के निर्देश मैं प्रशासन को देता हुँ, और आप सभी नगरसेवको से निवेदन करना चाहता हुँ कि, शहर के संचालन मे आयुक्त महोदय के नेतृत्व मे जो काम शुरु है इसमे कही भी अगर आपको किसी प्रकार की कोई ढिलाई दिखायी देती है तो आप आयुक्त महोदय से या फिर संबंधित अधिकारीयो से जिन्हे जो जो जिम्मेदारी बांटी गयी है, प्रविणजी ने जिम्मेदारी के वितरण के बारे मे कहां मैं आयुक्त महोदय से यह भी निवेदन करुंगा कि, कल के अखबार मे बेड की जिम्मेदारी कौन देखरहा है उनका नाम आजाना चाहिये, उनका फोन नंबर आजाना चाहिये, साथ ही साथ मे कौन व्यक्ती लसीकरण की जिम्मेदारी देखरहा है उनका नाम आजाना चाहिये, उनका फोन नंबर आजाना चाहिये, साथ ही साथ मे कौन व्यक्ती कंट्रोल रुम की जिम्मेदारी देखरहा है, उनका नाम आजाना चाहिये, उनके साथ मे उनके असिसटेंट का भी नाम आजाना चाहिये ताकि वह व्यक्ती अगर उपलबध न हो तो दुसरे व्यक्ती से संपर्क स्थापित किया जासके, अगर व्यवस्थापन ठिक हो गया तो अपने आप पॅनिक कम हो जाता है इसलिये व्यवस्थापन मे गतीशीलता बनाकर के उसकी पारदर्शिकता को स्थापित करने के लिये प्रशासन कार्य करे, ऐसे निर्देश मैं प्रशासन को देता हुँ। हम इस स्थगन प्रस्ताव की चर्चा को यही विराम देते है।

महापौरः- विषय पत्रिकेला सुरुवात करण्यात येते

**<u>ठराव क्र.५६</u>**:- नागपूर महानगरपालिका, महासभेचे खालील कार्यवृत्त कायम करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून कायम करण्यास मान्यता प्रदान केली.

1. म.न.पा. सर्वसाधारण सभा दिनांक 20.01.2021 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्त

**<u>ठराव क्र.५७</u>**:- नागपूर महानगरपालिका, स्थायी समितीचे खालील तिमाही अहवाल कायम करण्याच्या प्रश्नाची सभागृहाने नोंद घेतली.

१. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक १५—०१—२०२१ रोजी दुपारी १२—०० वाजता
२. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक ०२—०२—२०२१ रोजी दुपारी ०३—०० वाजता
३. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक ११—०२—२०२१ रोजी दुपारी ०३—०० वाजता
४. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक १७—०२—२०२१ रोजी दुपारी ०३—०० वाजता
५. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक २५—०२—२०२१ रोजी दुपारी ०३—०० वाजता
६. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक ०२—०३—२०२१ रोजी सकाळी ११—०० वाजता

**<u>ठराव क्र.५८/वि.क्र.२४</u>** :- **{सार्वजनिक आ.अ. विभाग}** नागपूर शहर 24X7 पाणी पुरवठा या योजनेअंतर्गत एकुण 68 कमांड एरिया पैकी 20 कमांड एरिया मधे 24X7 पाणीपुरवठा करण्यात आला आहे व 18 कमांड एरीयामधे प्रायोगिक तत्वावर 24X7 पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. या योजनेतील मुळ BOQ मधे अस्तीत्वात असलेल्या पाईप लाईन बदलविणे (Rehabilitation)च्या कामाचा समावेश होता, मात्र प्रत्यक्ष कामास सुरूवात झाल्यावर अस्तित्वात असलेल्या पाईपलाईन शिवाय नविन पाईपलाईन सुद्धा बदलविण्यात आल्या, या कारणास्तव BOQ मधील Quantity संपुष्ठात आल्या आहेत. शहरातील इतर Command Area मध्ये 24X7 पाणीपुरवठा करण्याचे दृष्टीने ऑपेरटर मे. ऑरेंज सिटी वॉटर प्रा.लि. यांनी रू. 88. 46 कोटीचा प्रस्ताव सादर केला आहे. (GST + Esclation वगळून) ऑपरेटर यांनी सादर केलेला प्रस्ताव हा 24X7पाणी पुरवठा योजनेतील करारामधील Sehedule – 16 वर आधारीत आहे.

यात प्रामुख्याने खालील घटकांचा समावेश आहे.

| Sr. No | Item | Unit | BOQ Qty | Work done upto Sept.२०२० | Add Qty Req. for Conversion of C.A.in २४X७ | Amt Req. (As per Sehedule - १६) Rs in Cr. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Pipeline laying | Kms | ६८८ | ६८८ | १२५.५ | ४३.१९ |
| २ | HSC | Nos | ३२१३२७ | २,४१,८६० | -- | -- |
| ३ | ESR / GSR Rehabilitation | L.S | १९ | १८ | २० Nos | ११.८९ |
| ४ | Rehabilitation of Pench -II WTP | L.S | १ | १००% | -- | -- |
| ५ | Replacement of GATES & VALVES Chambers | L.S | १ | १००% | ७५ Nos (Chamber for valves & Flow Meter) | ३.०० |
| ६ | Development of Billing Software SCADA & GIS | L.S | १ | ९५% | -- | -- |
| ७ | NESL Building | L.S | १ | -- | -- | -- |
| ८ | Laying २००० m.m. dia M.S. २ Km. | Kms | २.०० | १००% | -- | -- |
| ९ | Rehabilitation of Sitabuldi Fort ESR | L.S | १ | १००% | -- | -- |
| १० | For Improvement in power factor (Pench – I & III) | L.S | | | -- | ३.३२ |
| ११ | Installation EMF Flow Meter | -- | | | १५० Nos | ८.६० |
| १२ | ESR Byepass Arrangement | -- | | | ६८ Nos | १६.२९ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १३ | Other miscellaneous work | L.S | | | Lumsum | २.१६ |
| | | | | | | ८८.४६ Cr (Excluding GST & Escalation) |

ऑपरेटर मे. ऑरेंज सिटी वॉटर प्रा.लि. यांनी सादर केलेला रू. 88.46 कोटीचा प्रस्तावावर NESL BOD च्या दि. 26.10.2020 च्या बैठकीत चर्चा करण्यात आली व M/s OCWPL यांनी सादर केलेला प्रस्ताव हा MJP 2019–2020 CSR चे दर घेऊन प्रस्ताव सादर करण्यास्तव निर्देश देण्यात आले व यानुसार रू. 78,65,29,349/– या रकमेचा प्रस्ताव तयार करण्यात आला, व ऑपरेटरला या दरांवर काम करण्यास तयार असल्यास तसा प्रस्ताव सादर करण्यास्तव निर्देशित करण्यात आले. मात्र ऑपरेटर M/s OCWPL यांनी सदरहु काम MJP च्या दरांवर करण्यास्तव नाकार दिला या कारणास्तव हे काम नियमीत निविदा बोलावुन करण्यास्तव व याद्वारे प्राप्त निम्नतम दरावर ऑपरेटर M/s OCWPL काम करण्यास तयार असल्यास तसे प्रस्तावित करण्यास्तव निर्देशीत करण्यात आले.

सबब वरिल बाबी विचारात घेवून खालीलप्रमाणे मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

1. नागपूर शहरातील 24X7 योजनेअंतर्गत उर्वरित 30 कमांड एरिया 24X7 पाणीपुरवठा करण्याच्या रू. 78,65,29,349/– या रकमेच्या प्राकलनेस प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा व पुढील 17 वर्षे केलेल्या कामाचे देखभाल दुरूस्ती करण्याच्या कामास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.
2. याकरिता तयार करण्यात आलेल्या निविदा प्रपत्रे मंजुर करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

निविदा राष्ट्रीय स्तरावर मागविण्यात येतील. प्राप्त निम्नतम निविदा दरावर मे. ऑरेंज सिटी वॉटर प्रा. लि. काम करण्यास तयार असल्यास त्याप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यांत येईल.उपरोक्त प्रश्न सभागृहाने विचारात घेतला

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, विषयपत्रिकेवरील विषय क्र. २४ च्या अनुषंगाने काही प्रश्न उपस्थित होत आहे की आयपीआयपी प्रोजेक्ट जेव्हा २०१२ ला नागपूर महानगरपालिकेतर्फे सुरु होता आणि त्याच्यामध्ये नागपूर शहरातील संपुर्ण एरिया, या संपुर्ण एरियामध्ये जे काही रिहेबीटेशनचे काम आहेत ते सर्वच्या सर्व ओ.सी.डब्लू.तर्फे करण्यात यावे अशी त्या वेळेला भुमिका मांडण्यात आली होती. त्यावेळेला ड्राप एग्रीमेंट नागपूर महानगरपालिकेच्या सभागृहासमोर आला होता. परंतु हा जो प्रस्ताव आहे ८८ करोड चा महानगरपालिकेच्या तिजोरीतून खर्च करीत आहे हा त्या एग्रीमेंटचा पार्ट आहे किंवा नाही हा महत्वाचा प्रश्न आहे. हे जे काम सांगितले आहे ते या शहराच्या बाऊंड्रीच्या बाहेरचे आहे काय? या माझ्या प्रश्नाचे उत्तर प्रशासनाने दयावे.

महापौरः- प्रशासनाने उत्तर दयावे.

श्रीमती बॅनर्जी(कार्यकारी अभियंता,जलप्रदाय):-सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन. यह जो काम है यह शहर का बाहर का काम नही है यह शहर के अंदर का काम है। यह जो काम है यह एक्सटेंशन ऑफ आयपीआयपी है।

श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, एक्सटेंशन ऑफ आयपीआयपी हा शब्द मी पहिल्यांदा ऐकत आहे.

आयपीआयपी प्रोजेक्टमध्ये एक्सटेंशन कुणी दिले? केव्हा दिले? कधी दिले?

श्रीमती बॅनर्जी (कार्यकारी अभियंता,जलप्रदाय) :-सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन. एक्सटेंशन ऑफ आयपीआयपी एग्रीमेंट मे था, टेंडर मे यह क्लॉज था। आयपीआयपी काम होने के बाद पुरे शहर मे २४ बाय ७ का काम होना चाहिए। उस के साथ यह भी लिखा था की अगर ऑपरेटर को लगता है तो सेपरेट प्रपोजल दे सकते है और ओसीडब्लूने उस समय सेपरेट प्रपोजल दिया था। मगर ८८ करोड के जगह ४४४ करोड टोटल लगेगे हमने उस वक्त २४ बाय ७ कुछ सोचा नही था। मगर अभी पहिले शेडयुल्ड मे ६० करोड का प्रस्ताव और दुसरा शेडयुल्ड फीक्स होने के बाद ६४ करोड मे कन्वर्ट हुआ था।

श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, या संदर्भातील जी माहिती आहे ती प्रशासनाने सभागृहाला दिलेली आहे काय ? ६० कोटीचा प्रस्ताव कधी पाठविला होता, त्याची माहिती प्रशासनाने सभागृहाला दिली होती काय?

श्रीमती बॅनर्जी(कार्यकारी अभियंता,जलप्रदाय):-सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन. यह माहिती नही दी थी।

श्री.प्रवीण दटके:- पाईट ऑफ इन्फोंमेशन, मा.महापौरजी, एक महत्वाचा विषय आहे म्हणून सांगत आहे. मा.महापौरजी, २४ बाय ७ हा एग्रीमेंट सभागृहात येवून मंजूर झालेला आहे. आणि ज्या वेळेला एनईएसएलने पाच वर्षानंतर यांना ओटीएस दिल्यानंतर यांनी नवीन एग्रीमेंट दिला आहे अशी माहिती माझ्याकडे आहे. यांनी तो एग्रीमेंट सभागृहाच्या पटलावर आणलेला नाही. त्यामुळे मा.महापौरजी, २४ बाय ७ हा एग्रीमेंट झाला तेव्हा हा प्रस्ताव आपण सुरु केला. ही देशातील पहिली अशी योजना होती. टेंडर झाल्यानंतर प्रत्येक वर्षी यांच्या माध्यमातून ५० लक्ष रुपये खर्च करावयाचे होते. ते सुध्दा ओसीडब्लूने खर्च केले नाही. ओटीएस दिल्यानंतर सभागृहाच्या पटलावर यांनी एग्रीमेंट ठेवलेला नाही. जे काही काम यांना शहराच्या आंतमध्ये करावयाचे होते त्या सर्व कामांचा समावेश हा त्या टेंडरमध्ये होता. एग्रीमेंट करतांना याची खबरदारी घेतल्या गेली होती. त्या कामांच्या व्यतिरिक्त माझी जी माहिती आहे की पेंच टप्पा ४, टप्पा ५ ची कामे यांनी २४ बाय ७ मध्ये करुन घेतली. त्याकरिता यांनी कुणाच्या परवानग्या घेतल्याश् कां घेतल्या माहीत नाही. आज या विषयातही कुठलेही प्रस्ताव असे मंजूर करुन घेवू शकत नाही. त्यामुळे आपल्याला या सभागृहाच्या माध्यमातून विनंती आहे की हा प्रस्ताव परत करण्यात यावा. असा कुठलाही नियमबाहय एग्रीमेंटच्या विरोधात जावून आपण मंजूर केला तर आपण सभागृहाला अडचणीत आणू. आपला जो मुळ एग्रीमेंट आहे त्याच्या विरोधात जावू. एग्रीमेंटमध्ये नसेल तर सभागृहाच्या पटलावर आणावे. कुठेतरी बॅनर्जी मॅडम या सभागृहाची दिशाभूल करीत आहेत. हा प्रस्ताव सभागृहाला परत करावा अशी माझी विनंती आहे.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

श्रीमती बॅनर्जी(कार्यकारी अभियंता,जलप्रदाय):-सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन. मै सभागृह की दिशाभूल नही कर रही हूँ। ओटीएस के बाद जो एग्रीमेंट बना था, ओटीएस का प्रस्ताव जो ५ मार्च २०१९ को रखा गया तो तब उसमे क्लिअर दिया था, जोशी साहब का भी स्टेटमेंट था जो पहले १५ कोटी हर साल खर्च करना था वो २०१७ के बाद हर साल २५ कोटी खर्च करना है।

श्री.प्रवीण दटके:- पाईट ऑफ आर्डर, मा.महापौरजी, सभागृहात कुठलेही निवेदन कुणी केले तर तो एग्रीमेंटचा

भाग होतो काय ? मा.महापौरांनी स्टेटमेंट केले तर ते एग्रीमेंटमध्ये ऑथॉन्टिक करतो की सभागृहाच्या ठरावाला ऑथॉन्टिक करतो.

श्री.अविनाश ठाकरे:- पाईंट ऑफ इन्फॉमेशन,ज्या ठरावाचे उल्लेख मा.बॅनर्जी मॅडम करीत आहे त्या ठरावाचे वाचन या ठिकाणी करण्यात यावे.

महापौर:- ज्या ओटीएसला सभागृहाने मंजूरी दिली होती त्या ठरावाचे वाचन करण्यात यावे.

श्रीमती बॅनर्जी(कार्यकारी अभियंता,जलप्रदाय):-सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन. (ठरावाचे वाचन केले)

श्री.प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, याचाच अर्थ असा आहे ज्या वेळेस ओटीएस झाला होता त्यावेळेस त्या जुन्या एग्रीमेंटमध्ये बदल करावयाचा होता. त्या मुळ करारनाम्याची जी कालमर्यादा आहे ती या ओटीएसच्या माध्यमातून या सभागृहाने बदलली. त्याचे कन्वर्शन ऑन पेपर सुरु झाले आहे काय? तो कायखंड ५ वर्षाचा होता तो १० वर्षाचा केला. जो १० वर्षाचा होता तो १५ वर्षाचा केलेला आहे. ब्लॅक ॲन्ड व्हाईटमध्ये ठरावामध्ये ज्याला मान्यता मिळाली होती त्याला मानायचे की सेपरेट करारनामा झालेला आहे. ही माहिती प्रशासनाने दयावी.

श्रीमती बॅनर्जी(कार्यकारी अभियंता,जलप्रदाय):-सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन. सेपरेट करारनामा हुआ नही है, यह १५.०२.२०१९ का एनईएसएल का जो ठराव हुआ था उसका चेंजेस है।

श्री.प्रवीण दटके:- पाईट ऑफ आर्डर, मा.महापौरजी, एनईएसएलने ठराव दिला म्हणजे नागपूर महानगरपालिकेच्या सभागृहाने ठराव दिला असे यांचे म्हणणे आहे काय? एनईएसएलचा ठराव हा महानगरपालिकेच्या सर्वोच्च सभागृहाला मॅडेटरी आहे काय? असे यांचे म्हणणे आहे काय?

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

श्रीमती बॅनर्जी (कार्यकारी अभियंता,जलप्रदाय):-सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन. यहा पर मा.महापौरजी ने जो स्टेटमेंट दिया है उनमे एनईएसएल के ठराव का उल्लेख है।

श्री.प्रवीण दटके:-मा.महापौरजी, एकतर आपल्या ज्या सन्माननीय अधिकारी आहेत त्यांना या टेंडरची धड माहिती नाही आणि एग्रीमेंटचे त्यांनी नीट वाचन केलेले नाही. या वारंवारं सभागृहाची दिशाभूल करीत आहे. माझे तर असे म्हणणे आहे जर सभागृहाची अशाप्रकारे जर दिशाभूल करीत असेल तर त्यांना परत पाठवून दयावे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर, अधिका-याला कुठे पाठवायचे ते नंतर पाहू. परंतु असा करारनामा झालेला नसेल आणि अशा पध्दतीचा प्रस्ताव सभागृहाच्या पटलावर येत असेल तर हे बरोबर नाही. या प्रकल्पात एकही अतिरिक्त रुपये महानगरपालिका देणार नाही आहे. करारनाम्यानुसार जी रक्कम निश्चित झाली होती तीच रक्कम महानगरपालिका देणार. त्या व्यतिरिक्त कुठलेही अतिरिक्त काम नव्याने निर्माण झाले असे यांचे म्हणणे आहे आणि एनईएसएलच्या ठरावाने काहीही चेंजेंस करता येते काय?

श्री.प्रवीण दटके:-मा.महापौरजी, पाईंट ऑफ इन्फॉमेशन. २४ बाय ७ चा हा जो ठराव आहे याचा कालावधी २५ वर्षाचा आहे. या २५ वर्षात त्यांना प्रत्येक वर्षी १५ कोटी याप्रमाणे २५ वर्षात ६०० कोटी रुपये खर्च करावयाचे आहेत आणि दुसरे २४ बाय ७ हेही करावयाचे आहे. माझी विनंती आहे हा प्रस्ताव वापस करावा .

श्री.प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, हा प्रस्ताव नामंजूरच करण्यात यावा.

महापौर:- मा.निगम आयुक्तांनी या विषयावर निवेदन करावे.

निगम आयुक्त:- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन. यामध्ये काही प्रमाणात कन्फुंझन दिसते आहे. यामध्ये मी जे कन्फुझन आहे त्याला क्लॅरीफिकेशन करीत आहे. पहिला मुद्दा आहे ज्यावेळेला २०१६ साली २४ बाय ७ योजनेची संकल्पना घेण्यात आली होती. सभागृहाची याला मंजुरी घेण्यात आली. त्यावेळी शासनाचा जी.आर. निर्गमित झाला होता. त्यावेळी टेंडर प्रक्रिया झाल्यानंतर विशेषत: टेंडर प्रक्रिया आयपीआयपीच्या अनुषंगाने घेण्यात आली होती. त्यावेळी आपली अपेक्षा अशी होती. एवढा खर्च जेएनएनयुआरएम अंतर्गत पर्याय उपलब्ध झाले नसेल तर ते केल्यानंतर २४ बाय ७ योजना या शहरात घेवू. त्यावेळेला टेंडरमध्ये क्लिअर कट सुचना देण्यात आली होती त्यात सहा महिन्याचा कालावधी देण्यात आला होता. दीस इज द प्लॅन मेड या शहराचा चांगला अभ्यास करुन या शहराला इतर आणखी चांगले काम इन्फ्रास्ट्रक्चर आयपीआयपीएल द्यायचे असेल तर तुम्ही आम्हांला कळवा. यामध्ये मला असे दिसते की ओसीडब्लूने अशा पध्दतीने कळविले होते. जेएनएनयुआरएमचा पुर्ण निधी संपल्यानंतर जो १३५० कोटीचा जेएनएनयुआरएमचा बजेट होता त्यामध्ये जे काही जास्तीचे बोलले ते महानगरपालिकेला करणे बंधनकारक होते. दयाट ईज वेरी वेरी क्लिअर त्यामध्ये महानगरपालिकेला खर्च करावयाचा होता हा पाईंट नंबर वन. दुसरा पाईंट असा आहे ओटीएसच्या संदर्भात आहे, ज्यावेळी आपण एग्रीमेंट पुर्ण केले, पाच वर्षामध्ये आपल्या अपेक्षेप्रमाणे २०१७-१८ पर्यंत अपेक्षाप्रमाणे पुर्ण होईल परंतु पुर्ण झाले नाही. म्हणून एनईएसएलमध्ये त्यांच्या विरोधात कार्यवाही सुध्दा सुरु केली होती परंतु त्याच्या अगेंस्टमध्ये त्यांनी सुध्दा मुद्दे मांडले होते. ते सर्व मुद्दे घेवून त्यांनी पेमेंटचा मुद्दा सुध्दा उपस्थित केला होता. आपण आरएन्डआरएल केली नाही म्हणून त्यांना म्हटले होते. अशा सर्व गोष्टी झाल्यानंतर एक प्रकारची दोन्ही साईडने कमतरता झाल्यामुळे आपण आपले ऑब्जेक्टीव्ह पुढे करावे अशा पध्दतीचा ओटीएस स्कीम आणली होती. त्या ओटीएस बद्दल प्रफुल्ल गुडधे यांनी सुध्दा म्हटल्याप्रमाणे त्यांचा विरोध होता. या बाबत डिटेल डिस्कशन झाले होते, एनईएसएलचा जो ठराव झाला होता तो ओटीएसच्या संदर्भातील या सभागृहामध्ये २०१९ मध्ये आला. त्यावेळी सभागृहाने असले कुठल्याही पध्दतीचे इन्स्ट्रक्शन दिलेले नव्हते की फ्रेश एग्रीमेंट करावे. ओटीएस म्हणजे काय तेही मी सांगतो, ओटीएस मध्ये जे एक्च्युअल पेमेंट होते ते आपण होल्ड करुन ठेवले होते ते टप्याटप्याने रेस करीत होतो. त्या कंत्राटदाराने इन्फ्रास्टक्चर सुध्दा गीव्ह अप केले होते. अशाप्रकारचे ओटीएस झाले होते. त्यावर साधकबाधक चर्चा सुध्दा झाली होती. त्यावर मा.सदस्यांनी विरोध केला होता. तरीही सभागृहाने ओटीएसप्रमाणे स्कीम पुढे गेली पाहिजे असे सांगितले. जसे आपले अपेक्षेप्रमाणे टारगेट थोडे चेंजेंस करुन दिले होते. उदाहरणार्थ सांगावयाचे की जे काही ओसीडब्लू ला तीन वर्षात खर्च करावयाचे होते ते त्यांनी खर्च केलेच नाही. हे सगळे ब्लॅक ॲन्ड व्हाईटमध्ये रेकार्डमध्ये आहे. या कालावधीमध्ये २४ बाय ७ कधीपर्यंत पुर्ण करणार हे ओटीएसमध्ये सगळे आलेले आहे. आज सुध्दा ओटीएसचा शेवटचा हप्ता राहिला आहे ते सुध्दा क्युरी मी त्यांना सुचविलेली आहे. तेही क्लिअर करुन घेवू. त्यामुळे सभागृहाचा कोणत्याही प्रकारची असा एग्रीमेंट करावयाचा नाही असा काही प्रश्न येत नाही. एनईएसएलकडे सगळी माहिती आहे.पुढच्या सभागृहात ती देण्यास मी तयार आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर, माझा आक्षेप असा आहे. ज्यावेळी ओटीएस आला

होता त्यावेळी स्पेसिफिक या करारनाम्याचा उल्लेख केला होता. महानगरपालिकेला त्या करारनाम्यानुसार जे कामे करणे बंधनकारक होते. तेवढे पेमेंट देणे बंधनकारक होते तसेच सोबत सोबत ओसीडब्लू ला त्या अंतर्गत कुठले कुठले कामे करणे बंधनकारक होते. त्याचा ॲक्शन टेकन रिपोर्ट या सभागृहाच्या पटलावर आपल्याला ठेवावयाचा होता. यात कुणाकुणाची दिरंगाई झाली. ओसीडब्लूची दिरंगाई कोणकोणत्या कामात झाली. महानगरपालिकेची दिरंगाई पैसे देण्यात कुठे झाली. तशा पध्दतीचा त्याचा पाईंट ऑफ व्हयू फिक्स करावा. त्या संदर्भातील ॲक्शन टेकन रिपोर्ट या सभागृहात ठेवला पाहिजे असा माझा मानस आहे. असा ॲक्शन टेकन रिपोर्ट सभागृहासमोर आला नाही. आपण महानगरपालिकेला त्या करारनाम्याप्रमाणे करणे बंधनकारक आहे म्हणून आपण् वारंवारं करतो आहे. परंतु या एग्रीमेंटप्रमाणे ओसीडब्लूने ते उद्दिष्ट पुर्ण केले आहे काय? याची सुध्दा माहिती या सभागृहापुढे आली पाहिजे. महानगरपालिका फक्त् त्या करारनाम्यामध्ये नमुद आहे म्हणून ते करा. एवढे पैसे दयायचे बंधनकारक आहे म्हणून ते दया. मात्र त्याचा इम्प्लीमेंटेशन करीत असतांना त्या कंपनीला जे बंधनकारक आहे. त्या करारनाम्यानुसार ज्या ज्या बंधनात ते आहेत त्यांनी त्याची परिपुर्तता किती टक्के पर्यंत पुर्ण केली आहे. कुठपर्यंत पुर्ण केली आहे.

निगम आयुक्त:- मा.महापौरजी, मा.सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे दोन गोष्टी मी क्लॅरिफाय करेल. मी जे काही बोलणार आहे ते रेकार्डमध्ये आहेत. त्यामुळे तेवढेच मी सांगणार आहे. नवीन मुद्दा काही उपस्थित केलेला नाही. मुद्दा एवढाच आहे की ७८ कोटी रुपये आज ठेवले हे काही नवीन नाही आहे. ते सुध्दा आपण ओसीडब्लू ला देत नाही आपण टेंडर प्रक्रिया राबवितो. टेंडर प्रक्रियेमध्ये जे कुणी बिडर येतील जे पार्टीसिपेट करणार आहेत ते मॅच करु शकतील त्या बिडरद्वारे आपण काम करणार आहे हा झाला दुसरा मुद्दा. तिसरा महत्वाचा भाग हा आहे. ओटीएसच्या संदर्भात किती कार्यवाही झालेली आहे. ओटीएस संदर्भात एनईएसएलने पुढे काय निर्णय घेतले ते सुध्दा आम्ही पुढच्या सभागृहात ठेवायला तयार आहोत. विनंती एवढीच आहे टेंडर प्रक्रियेला भरपूर वेळ लागणार आहे.

श्री.प्रवीण दटके :- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, या योजनेअंतर्गत २५ वर्षात ६०० कोटी यांना खर्च करावयाचे होते. किती खर्च केला त्याची माहिती सभागृहात देण्यात यावी. जर प्रशासनाकडून परिपुर्ण माहिती येत नसेल तर हे या सभागृहाचे दुर्देव आहे. जर मा.संदीप जोशी महापौर असतांना आणि सत्तापक्ष नेते श्री.संदीप जाधव यांनी जर एटीआर तुम्हांला सांगितला होता तर प्रशासनाने सभागृहापुढे एटीआर कां नाही आणला. मा.महापौरजी, जसा टेंडर यांनी म्हटले आहे तसे टेंडर यांनी करावे जर तुम्हाला रिवाईज ओकेस द्यायचा आहे तर रिवाईज एग्रीमेंट करावा लागेल आणि रिवाईज एग्रीमेंट एनईएसएल बोर्डाच्या समोर ठेवून सभागृहाच्या पटलावर ठेवावयाचा आहे. जर एनईएसएल बोर्डाच्या आयुक्त स्तरावर निर्णय घेतलेला आहे. माझी मागणी आहे, एकही रुपया खर्च न करता ओसीडब्लू कंपनीने दिलेल्या वेळेत संपुर्ण कामे संपविली पाहिजेत. सरसकट हा प्रश्न वापस करावा. यांच्याकडे माहिती असेल तर त्या माहिती सह पुर्ण अभ्यास करुन पुढच्या सभागृहात हा प्रस्ताव ठेवावा तोपर्यंत या प्रस्तावाला मंजुरी देवू नये. अशी या सभागृहाच्या माध्यमातून आपल्याला विनंती आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, मी याला समर्थन करतो.

श्री.प्रवीण दटके :- मा. महापौरजी, सरसकट हा प्रश्न वापस करावा. यांच्याकडे माहिती असेल तर त्या माहिती

सह पुर्ण अभ्यास करुन पुढच्या सभागृहात हा प्रस्ताव ठेवावा तोपर्यंत या प्रस्तावाला मंजुरी देवू नये. अशी या सभागृहाच्या माध्यमातून आपल्याला विनंती आहे.मा.महापौरजी, हा देशातील सर्वोत्तम प्रकल्प आहे. या प्रकल्पाला आमचा विरोध नाही. प्रशासन ज्या अडचणी निर्माण करतो आहे त्याला आमचा विरोध आहे.

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, विषय क्र. २४ च्या अनुषंगाने जी भुमिका आदरणीय आमदार श्री. प्रवीणजी दटके यांनी मांडली ती योग्य आहे. प्रशासन अपुर्ण माहितीच्या आधारे हा प्रकल्प महासभेपुढे करीत आहे असे स्पष्टपणे निदर्शनास येत आहे. कारण एनईएसएल बीओडीच्या मिटींग आहे.त्याचे लागोपाठ तीन विषय आहेत आणि तिघांचे कॉन्ट्रीडिक्शन वाचल्यानंतर असे लक्षात येते की एग्रीमेंट मध्ये काही छेडछाड करावयाची असेल, काही चेंजेंस करावयाचे असेल तर ओरीजनल एग्रीमेंट सभागृहासमोर आणला होता त्यामध्ये त्याचा ड्राफ्ट एग्रीमेंट हा बीओडी समोर ठेवला ना सभागृहासमोर आणला आणि ते न करता त्याचा आपण महानगरपालिकेच्या माध्यमातून एक जेआरए नावाची एजन्सी नियुक्त केली होती त्याच्याबद्दल कुठले लिगल ओपिनियम घेतले नाही आणि स्वत:च ठरवून हा प्रस्ताव महासभेपुढे आणला. हा प्रस्ताव प्रशासनाला परत पाठवावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

वरील चर्चेनंतर नागपूर शहर 24X7 पाणी पुरवठा या योजनेअंतर्गत एकुण 68 कमांड एरिया पैकी 20 कमांड एरिया मधे 24X7 पाणीपुरवठा करण्यात आला आहे व 18 कमांड एरीयामधे प्रायोगिक तत्वावर 24X7 पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. या योजनेतील मुळ BOQ मधे अस्तीत्वात असलेल्या पाईप लाईन बदलविणे (Rehabilitation)च्या कामाचा समावेश होता, मात्र प्रत्यक्ष कामास सुरूवात झाल्यावर अस्तित्वात असलेल्या पाईपलाईन शिवाय नविन पाईपलाईन सुद्धा बदलविण्यात आल्या, या कारणास्तव BOQ मधील Quantity संपुष्ठात आल्या आहेत. शहरातील इतर Command Area मध्ये 24X7 पाणीपुरवठा करण्याचे दृष्टीने ऑपरेटर मे. ऑरेंज सिटी वॉटर प्रा.लि. यांनी रू. 88.46 कोटीचा प्रस्ताव सादर केला आहे. (GST + Esclation वगळून) ऑपरेटर यांनी सादर केलेला प्रस्ताव हा 24X7पाणी पुरवठा योजनेतील करारामधील Sehedule – 16 वर आधारीत आहे.

यात प्रामुख्याने खालील घटकांचा समावेश आहे.

| Sr. No | Item | Unit | BOQ Qty | Work done upto Sept.२०२० | Add Qty Req. for Conversion of C.A.in २४X७ | Amt Req. (As per Sehedule - १६) Rs in Cr. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Pipeline laying | Kms | ६८८ | ६८८ | १२५.५ | ४३.१९ |
| २ | HSC | Nos | ३२१३२७ | २,४१,८६० | -- | -- |
| ३ | ESR / GSR Rehabilitation | L.S | १९ | १८ | २० Nos | ११.८९ |
| ४ | Rehabilitation of Pench -II WTP | L.S | १ | १००% | -- | -- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | Replacement of GATES & VALVES Chambers | L.S | १ | १००% | ७५ Nos (Chamber for valves & Flow Meter) | ३.०० |
| ६ | Development of Billing Software SCADA & GIS | L.S | १ | ९५% | -- | -- |
| ७ | NESL Building | L.S | १ | -- | -- | -- |
| ८ | Laying २००० m.m. dia M.S. २ Km. | Kms | २.०० | १००% | -- | -- |
| ९ | Rehabilitation of Sitabuldi Fort ESR | L.S | १ | १००% | -- | -- |
| १० | For Improvement in power factor (Pench – I & III) | L.S | | | -- | ३.३२ |
| ११ | Installation EMF Flow Meter | -- | | | १५० Nos | ८.६० |
| १२ | ESR Byepass Arrangement | -- | | | ६८ Nos | १६.२९ |
| १३ | Other miscellaneous work | L.S | | | Lumsum | २.१६ |
| | | | | | | ८८.४६ Cr<br>(Excluding GST & Escalation) |

ऑपरेटर मे. ऑरेंज सिटी वॉटर प्रा.लि. यांनी सादर केलेला रू. 88.46 कोटीचा प्रस्तावावर NESL BOD च्या दि. 26.10.2020 च्या बैठकीत चर्चा करण्यात आली व M/s OCWPL यांनी सादर केलेला प्रस्ताव हा MJP 2019–2020 CSR चे दर घेऊन प्रस्ताव सादर करण्यास्तव निर्देश देण्यात आले व यानुसार रू. 78,65,29,349/– या रकमेचा प्रस्ताव तयार करण्यात आला, व ऑपरेटरला या दरांवर काम करण्यास तयार असल्यास तसा प्रस्ताव सादर करण्यास्तव निर्देशित करण्यात आले. मात्र ऑपरेटर M/s OCWPL यांनी सदरहु काम MJP च्या दरांवर करण्यास्तव नाकार दिला या कारणास्तव हे काम नियमीत निविदा बोलावुन करण्यास्तव व याद्वारे प्राप्त निम्नतम दरावर ऑपरेटर M/s OCWPL काम करण्यास तयार असल्यास तसे प्रस्तावित करण्यास्तव निर्देशीत करण्यात आले.

सबब वरिल बाबी विचारात घेवून खालीलप्रमाणे मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

1. नागपूर शहरातील 24X7 योजनेअंतर्गत उर्वरित 30 कमांड एरिया 24X7 पाणीपुरवठा करण्याच्या रू. 78,65,29,349/– या रकमेच्या प्राकलनेस प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा व पुढील 17 वर्षे केलेल्या कामाचे देखभाल दुरूस्ती करण्याच्या कामास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

2. याकरिता तयार करण्यात आलेल्या निविदा प्रपत्रे मंजुर करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

निविदा राष्ट्रीय स्तरावर मागविण्यात येतील. प्राप्त निम्नतम निविदा दरावर मे. ऑरेंज सिटी वॉटर प्रा. लि. काम करण्यास तयार असल्यास त्याप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यांत येईल.

उपरोक्त प्रश्न सभागृहाने विचारात घेवून मा.सदस्यांनी सखोल चर्चा या सभागृहात केली आहे. या चर्चेनंतर असे लक्षात येते की अशा अनेक गोष्टी आहेत की ज्याची चर्चा हा प्रकल्प येण्यापूर्वी सभागृहात होणे आवश्यक होते. सन्माननीय सदस्यांना निवेदन करतो की त्यांना कोणकोणती माहिती आवश्यक आहे ते लेखी स्वरुपात महापौर कार्यालयात आणून दयावे. पुढच्या सभागृहात त्या संपुर्ण माहिती सकट पुन्हा हा विषय सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावा. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्र.५९/वि.क्र.२५</u> :-**
**{साप्रवि}**

नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील (1) निगम सचिव, (2) प्रमुख लेखा वित्त अधिकारी (प्रतिनियुक्तीने कार्यरत), (3) चुंगी अधिक्षक, (4)कर निर्धारक तथा संग्राहक,(5) सांख्यिकीय अधिकारी, व (6) विशेष कार्यासन अधिकारी या पदावर पदोन्नती देण्यासंबंधाने संयुक्त असलेली ही 6 पदे एकल (एकाकी) पदावर पदोन्नतीबाबतचा विषय दि. 03/11/2020 रोजी पदोन्नती तपासणी समितीपुढे ठेवण्यात आला असता, त्यात श्री. मदन सुभेदार, अधिक्षक (साप्रवि) यांना पदोन्नतीस पात्र ठरवून निगम सचिव, चुंगी अधिक्षक, विशेष कार्यासन अधिकारी यापैकी एका पदावर पदोन्नती देण्यास समितीने शिफारस केलेली आहे.

त्यानुसार नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर रिक्त असलेल्या (1) निगम सचिव, (2) विशेष कार्यासन अधिकारी, (3)चुंगी अधिक्षक यापैकी एका पदावर शासन पत्र दि. 29 डिसेंबर 2017 नुसार मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल विशेष अनुज्ञा याचिका क्र. 28306/2017 च्या निर्णयाच्या अधीन राहून रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात सेवाजेष्ठतेनुसार,वेतनमान रू. 15600–39100 ग्रेड पे 5400 या वेतनश्रेणीत प्राप्त वेतन आणि इतर भत्त्यासह सेवाजेष्ठता क्र. 4 वरील श्री. एम. डी. सुभेदार, अधिक्षक (साप्रवि) यांना ''विशेष कार्यासन अधिकारी'' या पदावर पदोन्नती देण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेतला

श्री.प्रवीण दटके :- मा.महापौरजी, नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील निगम सचिव, प्रमुख लेखा अधिकारी, चुंगी अधिक्षक, कर निर्धारक तथा संग्राहक, सांख्यिकीय अधिकारी, विशेष कार्यासन अधिकारी अशी ६ पदे आहेत. मला प्रशासनाला अशी माहिती विचारावयाची आहे की या ६ पदापैकी किती पद रिक्त आहेत. आपण एकाच कर्मचाऱ्याच्या नावाचे प्रमोशन दिले आहे. रिक्त असलेल्या जागेकरिता त्या पात्रतेचे कर्मचारी नाही आहे काय? ही सगळी प्रशासनाने माहिती दयावी.

ॲड्धर्मपाल मेश्राम :- पाईंट ऑफ इन्फोर्मेशन मा.महापौर साहेब. विषय क्र. २५ आणि विषय क्र. ३३ मी क्लब करु इच्छितो, आपल्याकडे पदोन्नती समिती आहे. आपल्याला ज्ञात असेलच की मा. मा.उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने सर्व प्रकारच्या पदोन्नतीच्या आरक्षणाला स्थगिती दिलेली आहे. आणि उच्च न्यायालयाने सुप्रीम कोर्टामध्ये पुर्नविचार याचिका दाखल केली आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने १८ फेब्रुवारी २०२१ ला अशा पध्दतीचे सर्व प्रमोशनाचा पुर्नविचार करावा व ते थांबविण्यात यावे असे आदेशित केले आहे. असे असतांना महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाने सुप्रीम कोर्टाची याचिकेबाबत आपल्याला सुध्दा अंधारात ठेवून अशा पध्दतीचा प्रस्ताव या महानगरपालिकेच्या सभागृहामध्ये प्रस्तावित केला आहे. मा.महापौर साहेब, एखाद्या वेळेला जिल्हा न्यायालयात सिव्हील कोर्टाचे

एखादे प्रकरण प्रलंबित असेल तर आपण समजू शकतो. परंतु या राज्याच्या सर्वोच्च न्यायालय म्हणजे उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने सर्व प्रकारच्या पदोन्नतीच्या आरक्षणाला बाद केले आहे. त्यामुळे मा.राज्य सरकार सुप्रीम कोर्टात गेले आहे. असे असतांना देखील या पध्दतीचे परिपत्रक राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाने काढले असतांना महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाच्या प्रमुखाने अशा पध्दतीचा प्रस्ताव देणे हे कायद्याला धरुन नाही. सुभेदार साहेब यांचे काम चांगले आहे त्यांच्या पदोन्नतीला मी समर्थन देतो. मी व्यक्तीश: सर्व प्रकारच्या आरक्षणाचा कट्टर समर्थक आहे. असे असतांना देखील ज्या विषयाची न्यायालयीन पध्दत आहे आणि जर सर्वोच्च न्यायालयात एखादे प्रकरण प्रलंबित असेल तर तिथल्या निवाडयाला देखील धारेवर धरण्याचे काम महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाने केलेले आहे. मी या विषयाच्या अनुषंगाने आपल्याला अशा पध्दतीने तीन प्रकारच्या मागण्या करीत आहे. विषय क्र. २५, विषय क्र. ३३ जे पदोन्नतीचे विषय आहेत या पदोन्नती तपासणी समितीच्या कार्यवाहीला कोणत्याही प्रकारचा अर्थ उरत नाही.

श्री.कमलेश चौधरी :- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी. इससे रिलेटेड एक विषय है, मा.महापौरजी, माझे म्हणणे इतकेच आहे की हा जो विषय चालू आहे या विषयाशी संबंधित हा विषय आहे. आपले महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी ज्यांनी स्वत:हून सेवानिवृत्ती घेतली आहे किंवा जे सेवानिवृत्त झाले आहेत. आपल्या महानगरपालिकेच्याअधिका-यांनी पुष्कळ विषयात त्यांची दिशाभूल केली आहे. मी आपल्या माहितीकरिता सांगू इच्छितो, जे लोक जानेवारी, फेब्रुवारी, मार्च महिन्यापर्यंत रिटायर्ड झाले आहेत त्यांना सहावा वेतन आयोगानुसार निवृत्तीवेतन देण्याचा प्रयत्न केला जात आहे त्यांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे पेंशन व इतर लाभ देण्यात यावे.

ॲड्धर्मपाल मेश्राम :- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी. विषय क्र. २५ आणि विषय क्र. ३३ च्या अनुषंगाने मी एवढेच म्हणेल की मा.उच्च न्यायालयाने सर्व प्रकारच्या आरक्षणाला स्थगिती दिल्यानंतर या पदोन्नती तपासणी समितीच्या कार्यवाहीला कोणत्याही प्रकारचा अर्थ उरत नाही. असे असतांना या पध्दतीची याचिका सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असतांना नागपूर महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाने अशा पध्दतीने प्रस्तावित करणे हे निश्चितपणे कायद्याला धरुन नाही. या शहराचे प्रथम नागरिक मा.महापौरजी यांना सुध्दा अंधारात ठेवून हे सामान्य प्रशासन विभागाने काम केले आहे. म्हणून मी आपल्याला या विषयाच्या अनुषंगाने तीन प्रकारची मागणी करतो. मागणी क्र. १ विषय क्र. २५ आणि विषय क्र. ३३ हे दोन्ही विषय जोपर्यंत सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय येत नाही तोपर्यंत स्थगित ठेवण्यात यावे. मागणी क्र. २ मा.महापौरजी आपल्याला अंधारात ठेवून सामान्य विभागाचे प्रमुख ज्यांनी हा विषय या सभागृहात प्रस्तावित केले त्यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी आणि त्यांना त्वरित प्रभावाने निलंबित करण्यात यावे आणि तिस-या क्रमांकाची मागणी अशी आहे की सामान्य प्रशासन विभागाच्या उपायुक्तांनी यांनी या बाबीकडे डोळेझाक केली त्यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी आणि त्यांना १ रु. दंड लावण्यात यावा. या सर्व बाबींची नोंद घेण्यात यावी अशी मी सभागृहाला मागणी करीत आहे.

श्री.कमलेश चौधरी :- मा.महापौरजी, एक विषय मै आपकी जानकारी के लिए रखना चाह रहा हूँ । मा.महापौरजी, जनवरी महिने मे जो नागपूर महानगरपालिका के कर्मचारी रिटायर्ड हुए है उनकी पेंशन अमाऊन्ट छटवे वेतन आयोग से निकालने का प्रयास किया जा रहा है । और जो नागपूर महानगरपालिका के सेवा मे कर्मचारी है उन कर्मचारीयों का आखरी वेतन लाभ नियमबाहय तरीके से छटवे वेतन आयोग से देना का प्रयास हो रहा है । उन्होने अपनी पुरी जिंदगी नागपूर महानगरपालिका मे काम करने मे लगाई उन पर कही ना कही नागपूर महानगरपालिका अन्याय करने जा रही है । इस पर विशेष ध्यान देने की जरुरत है, इसमे प्रशासन गलत तरीके से माहिती दे रहा है की इससे हमपर आर्थिक बोजा आ रहा है । जनवरी महिने मे जो नागपूर

महानगरपालिका के कर्मचारी रिटायर्ड हुए है उनकी पेंशन व इतर लाभ सातवे वेतन आयोग से दिये जाये। जो कर्मचारी रिटायर्ड हुए उनकी पेंशन सातवे वेतन आयोग से ही बने मा.महापौरजी इस ओर ध्यान देना चाहिए। जो रिटायर्ड हुए कर्मचारी है वह बडी आशाभरी नजरो से देख रहे है। जो रिटायर्ड हुए है उनकी पेंशन रिटायर्ड होने की वजह से आधी होने वाली है मा.महापौरजी, इसलिए कृपया आप आदेश दे।

श्रीमती आभा पांडे :- मा.महापौरजी, कमलेशजीने जो विषय रखा इसी विषय पर मै निवेदन करना चाहती हूॅं। मा.महापौरजी, राज्य शासन जो भी आदेश देती है, राज्य शासन ने जो भी आदेश नागपूर महानगरपालिका को दिया उसमे कही ना कही गुमराह किया जाता है। नागपूर महानगरपालिका मे जो पेंशनर है उनको सातवा वेतन आयोग नही लगाया गया है। राज्य मे सभी महानगरपालिका को सातवा वेतन आयोग लगाने के लिए राज्य शासन ने आदेश दिये है परंतु उसको लगाते वक्त नागपूर महानगरपालिका अलग तरीके से लगाती है और कहती है की राज्य शासन से पत्रव्यवहार करना पडेगा। मा.महापौरजी, मै आपको निवेदन करती हूॅं की जो भी महानगरपालिका के पेंशनर है उनको सातवा वेतन आयोग के हिसाब से पेंशन मे लाभ दे। सामान्य प्रशासन विभाग इस सभागृह मे जिसप्रकार से पदोन्नतीका विषय लाती है, दुसरी तरफ अनुकंपा के कर्मचारीयो के विषय को लेकर मा. महापौरजी इन्होने रुलिंग दिये थे। मा.महापौरजी, सामान्य प्रशासन विभाग ने मा.महापौरजी के आदेश का भी अवहेलना की है मै इसका निषेध करती हूॅं। ये दोनो बातो को ओर मा.महापौरजी आप ध्यान दे ऐसा मै आपसे निवेदन करती हूॅं।

महापौर:- मा.सदस्य कमलेश चौधरी आणि मा.सदस्या श्रीमती आभा पांडे यांनी रिटायर्ड कर्मचा-यांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे पेंशन देण्याबाबत जी सुचना केली आहे त्या सुचनेप्रमाणे ज्या कर्मचा-यांचे शेवटचा पेंमेंट सातव्या वेतन आयोगाप्रमाणे झालेला आहे त्या कर्मचा-यांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे पेंशन देण्यात यावी.

श्री.सुनिल अग्रवाल:- मा.महापौरजी, मै ने लेखी सुचना मा.प्रवीण दटकेजी इनकी तरफ दी है उस लेखी सुचना के अनुसार विषय मंजूर किया जाये।

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, चार लोकांचे प्रस्ताव होते त्यात एकच व्यक्तीचा प्रस्ताव आला आहे बाकी लोकांचे पदोन्नतीचे प्रस्ताव कां आले नाही याचे उत्तर तर मला प्रशासनाने दयावे.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

श्री.निर्भयजैन (उपायुक्त, सामान्य प्रशासन विभाग):-मा.महापौरजी, ६ एकल पद आहेत ते भरण्यासंदर्भात दिनांक ३.११.२०२० रोजी डीपीडीसीची बैठक झाली होती.पदोन्नतीच्या कोटयातील चार पद आहेत. प्रतिनियुक्तीचे एक पद आहे आणि सरळ सेवा भरतीचे एक पद आहे.

श्री.प्रवीण दटके:- पाईंटऑफ आर्डर मा.महापौरजी, ही सहा पदे आहेत याचे विभाजन आपण १२.०४.७६ च्या नियमाप्रमाणे करीत आहे की इतर कुठल्या नियमाप्रमाणे करीत आहे याची सुध्दा माहिती देण्यात यावी.

श्री.निर्भयजैन (उपायुक्त, सामान्य प्रशासन विभाग):-मा.महापौरजी, १२.०४.७६ चा ठराव झाला आहे आणि त्यानंतर सुध्दा वेळोवेळी जे ठराव झाले आहेत. फिडर कॅटर आहे त्याच्यामध्ये अगोदर आपल्याकडे ९ जागा होत्या. त्या जागेत एक जागेची भर पडून १० झाल्या आणि ६ पदे एकल करण्याच्या संदर्भात २०१६ मध्ये ठराव झाले आहे. असे वेळोवेळी ठराव झाले आहेत.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, प्रमुख लेखा व वित्त अधिकारी हे जे पद आहे ते १२.०४.७६ नंतर जे वेळोवेळी ठराव झाले असतील हे पद प्रतिनियुक्तीवर आहे की महानगरपालिकेच्या कर्मचा-यामधून घ्यावयाचे आहे याची माहिती देण्यात यावी.

श्री.निर्भय जैन (उपायुक्त, सामान्य प्रशासन विभाग):-मा.महापौरजी, प्रमुख लेखा व वित्त अधिकारी हे पद प्रतिनियुक्तीवर आहे. महाराष्ट्र शासनाच्या १५ मे २००७ चा जो शासननिर्णय आहे त्या अनुषंगाने हे पद

प्रतिनियुक्तीवर निश्‍चित करण्यात आले आहे.

श्री.प्रवीण दटके :- मा.महापौरजी, शासनाने जो निर्णय दिला आहे तो सभागृहाने मान्य केला आहे. तो मान्य करावाच लागतो तो आपल्याला मॅंडेटरी आहे. ही जर चुक असेल तर मा.महापौरजी यांच्या माध्यमातून दुरुस्त करावी. शासन निर्णय १५ मे २००७ जो शासनाने शासन निर्णय दिला आहे तो महानगरपालिकेला बंधनकारक आहे तो मान्य करावाच लागतो असे माझे व्यैयक्तिक समज आहे ती चुक आहे कि दुरुस्त आहे ते सांगावे.

श्री.निर्भय जैन (उपायुक्त, सामान्य प्रशासन विभाग):- मा.महापौरजी, शासन निर्णयानुसार ते पद प्रतिनियुक्तीवर नियुक्त केले आहे.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, मला एवढेच क्लिरीफिकेशन पाहिजे की शासनाचा जो निर्णय आहे तो महानगरपालिकेला बंधनकारक आहे.

श्री.निर्भयजैन (उपायुक्त, सामान्य प्रशासन विभाग):- होय सर.

श्री.प्रवीण दटके :- मा.महापौरजी, ६ पद आहे त्यातील एक पद प्रतिनियुक्तीवर आहे. उरलेले चार पद प्रमोशन कॅडरचे आहे तर त्यात एकच व्यक्ती पात्र आहे काय?

श्री.निर्भय जैन(उपायुक्त, सामान्य प्रशासन विभाग):- मा.महापौरजी, याच्यामध्ये फिडर कॅडरमध्ये ८ लोक आहेत. त्या आठ पैकी सिनेरीटी क्रमांक १ वरती वंदना आत्राम आहेत त्यांच्या कडे या प्रमोशनकरिता जी शैक्षणिक पात्रता निश्‍चित केली आहे ती शैक्षणिक पात्रता नाही आहे त्यामुळे त्या पात्र होत नाही. क्रमांक २ वरती वाय.डी. जामठेकर हे सेवानिवृत्त झाले आहेत. क्रमांक ३ आर.एल.मेश्राम यांच्या संदर्भात मध्यंतरी २९ डिसेंबर २०१७ ला शासनकडून जे डायरेक्शन आले होते त्यामध्ये असे नमुद करण्यात आले होते. त्याच्यानंतर सुभेदार आहेत. हे पदोन्नतीचा कायटेरिया पुर्ण करतात म्हणून त्यांची पदोन्नती समितीने शिफारस केली आहे. त्यानंतर जे तीन लोक आहेत त्यांना तीन वर्ष झाले नाही त्यामुळे ते पदोन्नतीकरिता पात्र ठरत नाही.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, तुमचे असे म्हणणे आहे की सुभेदार शिवाय कुणीही पात्र होत नाही हे आपले ऑफीशियल स्टेटमेंट आहे का?

श्री.निर्भय जैन(उपायुक्त, सामान्य प्रशासन विभाग):- होय सर.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, आपल्या माध्यमातून विनंती करतो की आपण जे स्टेटमेंट केले की सुभेदार साहेब यांना सोडून जी या पदाकरिता पात्रता लागते. ३ वर्षाची पात्रता ती कोणताही उमेदवार पुर्ण करीत नाही.

श्री.निर्भयजैन(उपायुक्त, सामान्य प्रशासन विभाग):- होय सर.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, निगम सचिव या पदाकरिता फिडर कॅडर कुठला आणि एनएमसी ॲक्टमध्ये काय नमुद आहे याची माहिती मा.महापौरजी यांच्या माध्यमातून देण्यात यावी.

श्री.निर्भयजैन(उपायुक्त, सामान्य प्रशासन विभाग):-मा.महापौरजी, निगम सचिवाकरिता फिडर कॅडर अधीक्षक संवर्ग आहे.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, कायद्याच्या कुठल्या कलमात निगम सचिवाकरिता फिडर कॅडर दिले आहे याची माहिती देण्यात यावी. कायद्याच्या कुठल्या कलमात फिडर कॅडर दिलेले आहे. आपल्याला माहीत नसेल तर मी सांगतो. कलम ४५ पोट कलम (४) आहे याचे वाचन करण्यात यावे. मा.महापौरजी आपल्या माध्यमातून वाचन करण्यास सांगण्यात यावे.

महापौर:- निगम सचिवांनी या कलमाचे वाचन करावे.

निगम सचिव(डॉ.रंजना लाडे):-मा.महापौरजी, ( कलम ४५ पोटकलम(४) याचे वाचन केले)

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, जे कलम वाचायला सांगितले होते ते वाचून झाले आहे. आता मला प्रकरण ३ विविक्षीत नगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांचे नेमणुकीची पध्दती व त्यांचे अधिकार यांचे मार्गदर्शक

सुचना पेज नंबर ४६५ याचे वाचन करावे अशी माझी विनंती आहे.

श्री.तानाजी वनवे:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, सकाळ ११ वाजेपासून मी बोलण्याचा प्रयत्न करीत आहे. या विषयावर कोणतीही गंभीरता घेतली जात नाही. केव्हापासून प्रयत्न करतो आहे तेव्हा कुठे लिंक आता उपलब्ध झालेली आहे. मी आपला आभारी आहे. कारण मी २ वाजेपासून प्रयत्न करीत होतो परंतु कोणताही रिस्पॉन्स येत नव्हता. मी संबंधित ऑपरेटरला सुध्दा फोन केला. येथे विषय क्र. २५ सुरु आहे. या संबंधामध्ये जो अहवाल कार्यालयाने वाचून दाखविला आहे त्याच्यामध्ये निगम सचिवाचे नाव सुध्दा आले आहे. याच्यामध्ये कायद्यानुसार काय कार्यवाही करता येईल. कायद्याची बाजू येथे निगम सचिवांनी वाचून दाखवावी.

महापौर:- त्याचेच वाचन सुरु होते. मा.प्रवीणजी यांनी ज्या कलमाचे वाचन करण्याकरिता सांगितले ते वाचन करण्यात यावे.

निगम सचिव(डॉ. रंजना लाडे):- (प्रकरण ३ चे वाचन केले.)

वरील चर्चेनंतर नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील (1) निगम सचिव, (2) प्रमुख लेखा वित्त अधिकारी (प्रतिनियुक्तीने कार्यरत), (3) चुंगी अधिक्षक, (4)कर निर्धारक तथा संग्राहक,(5) सांख्यिकीय अधिकारी, व (6) विशेष कार्यासन अधिकारी या पदावर पदोन्नती देण्यासंबंधाने संयुक्त असलेली ही 6 पदे एकल (एकाकी) पदावर पदोन्नतीबाबतचा विषय दि. 03/11/2020 रोजी पदोन्नती तपासणी समितीपुढे ठेवण्यात आला असता, त्यात श्री. मदन सुभेदार, अधिक्षक (साप्रवि) यांना पदोन्नतीस पात्र ठरवून निगम सचिव, चुंगी अधिक्षक, विशेष कार्यासन अधिकारी यापैकी एका पदावर पदोन्नती देण्यास समितीने शिफारस केलेली आहे.

त्यानुसार नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर रिक्त असलेल्या (1) निगम सचिव, (2) विशेष कार्यासन अधिकारी, (3)चुंगी अधिक्षक यापैकी एका पदावर शासन पत्र दि. 29 डिसेंबर 2017 नुसार मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल विशेष अनुज्ञा याचिका क्र. 28306/2017 च्या निर्णयाच्या अधीन राहून रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात सेवाजेष्ठतेनुसार,वेतनमान रू. 15600–39100 ग्रेड पे 5400 या वेतनश्रेणीत प्राप्त वेतन आणि इतर भत्त्यासह सेवाजेष्ठता क्र. 4 वरील श्री. एम. डी. सुभेदार, अधिक्षक (साप्रवि) यांना ''विशेष कार्यासन अधिकारी'' या पदावर पदोन्नती देण्याचा प्रश्न सभागृहाने घेवून विषयाला प्राप्त चार (4 )लेखी सुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येते. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

सुचना(१)

मा.महापौर, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५ च्या तरतुदीप्रमाणे शहर अभियंता, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, नगरपालिका मुख्य लेखापरीक्षक, नगरपालिका सचिव, नगरपालिका उपायुक्त व नगरपालिका सहायक आयुक्त यांची नेमणुक करण्याचे अधिकार हे महानगरपालिकेस कायदयाने विहीत आहे. आजपर्यंत नगरपालिका सचिवाचे पद रिक्त आहे.

४५.शहर अभियंता, वैद्यकीय आरोग्य अधिकारी व नगरपालिका सचिव इत्यादींची नेमणूक-कलम ४५ च्या पोट कलम १ मध्ये

(१) महानगरपालिका वेळोवेळी वैद्यकीय आरोग्य ,योग्य अशा व्यक्तीची शहर अभियंता ,अधिकारी व नगरपालिका सचिव म्हणून नेमणूक करील .

आणि कलम ४५ च्या पोट कलम ४ मध्ये

(४) नगरपालिका सचिवाच्या नेमणुकीव्यतिरिक्त या कलमान्वये केलेली प्रत्येक नेमणूक शासनाकडून कायम करण्याच्या अधीन असेल आणि ज्या कोणत्याही अधिका-याची नेमणूक कायम करण्याचे शासन नाकारील त्यास ताबडतोब पदावरुन काढून टाकण्यात येईल.

याचा अर्थ असा की नगरपालिका सचिवाची नेमणुक करण्याचा अधिकार हा महानगरपालिकेचा आहे.

आणखी एक बाब या सभागृहाचे निदर्शनास आणुन देतो.
महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या अनुसूची ड मधील प्रकरण ३ मध्ये विवक्षित नगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांच्या नेमणुकीची पध्दती दिली आहे.
नेमणुका करण्याची रीती मध्ये कलम १ च्या पोट कलम १ मध्ये

१. कलम ४५, पोटकलम (७) अन्वये करण्यात आलेल्या तात्पुरत्या नेमणुका आणि कलम ५८ अन्वये करण्यात आलेल्या हंगामी नेमणुका या व्यतिरिक्त अन्य बाबतीत, कोणत्याही व्यक्तीस, नियम ३ अन्वये याबाबत विहित केलेली अर्हता तो धारण करत असल्याखेरीज, ज्या पदांवर नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये निहित आहे अशा पदांपैकी कोणत्याही पदावर नेमणुक करता कामा नये.
२. नियम १ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही पदावर नेमणुक करण्यापूर्वी, स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन अशा पदासाठी अर्ज मागविण्यात आले पाहिजेत आणि आलेल्या अर्जाची आयुक्ताने छाननी केली पाहिजे. महानगरपालिकेने तसे फर्माविले असल्यास, आयुक्ताने ज्या व्यक्तींनी अर्ज केले असतील त्या व्यक्तींपैकी, त्याच्या मते, ज्या व्यक्ती या पदासाठी अर्हताप्राप्त असतील अशा व्यक्तींची एक यादी पसंतीच्या क्रमानुसार तयार करुन समितीमार्फत महानगरपालिकेस सादर केली पाहिजे:

परंतु, नियम ३ अन्वये विहित केलेली अर्हता धारण करणारा नगरपालिकेच्या सेवेतील कोणताही अधिकारी हा उक्त पदावर नेमणूक केली जाण्यास योग्य अशी व्यक्ती आहे असे महानगरपालिकेचे मत असेल तर, महानगरपालिकेस या नियमात विहित केलेली पध्दती न अनुसरता अशा अधिका-याची उक्त पदावर नेमणूक करता येईल.

म्हणून नगरपालिका सचिवाचे अति महत्वाचे पद कलम ४५ (५) अन्वये चार महिन्याचे आत भरावयास पाहिजे परंतु ते आजपर्यंत रिक्त असल्यामुळे व हया रिक्त पदावर नेमणुक करण्याचे अधिकार हे महानगरपालिकेस असल्यामुळे कलम ४५ (४) अन्वये नगरपालिका सचिव या पदाचे नेमणुकीस राज्य शासनाची मंजुरीची नियमाप्रमाणे आवश्यकता नसल्याचे स्पष्ट उल्लेखीत असल्यामुळे, नागपूर महानगरपालिकेत कनिष्ठ अभियंता कार्यरत असलेले श्री. प्रफुल्ल शा. फरकसे यांना नगरपालिका सचिव पदासाठी आवश्यक असलेली किमान अर्हता प्राप्त असून त्यांनी स्थायी समिती यांचे वि. कार्य. अधि. म्हणून मागील १६ वर्षापासून उकृष्ठ कामगिरी बजावली आहे. त्यांचा प्रदिर्घ अनुभव व महानगरपालिका अधिनियमाचे तसेच सर्वसाधारण सभा व स्थायी समिती यांचे कामाबाबतचे नियमावलीचा अभ्यास पाहता त्यांची या पदावर नियुक्ती करण्याची शिफारस करण्यांत येते.

महानगरपालिकेतील त्यांची प्रदिर्घ सेवा बघता आणि ते पदवी धारक असल्यामुळे नगरपालिका सचिव या पदाकरीता विहित केलेली अर्हता धारण करीत असल्यामुळे या पदावर नेमणूक केली जाण्यास योग्य अशी व्यक्ती असल्याने श्री. प्रफुल्ल शा. फरकसे यांना महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत नगरपालिका सचिव नियुक्त करण्याच्या सुचनेसह हा प्रस्तावित विषय नियमानुसार मंजुर करावा.मा.महापौर आपणास व या सभागृहास विनंती करतो.

सुचक
श्री.प्रवीण प्रभाकर दटके

सुचना(२)

मा.महापौर, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५ च्या तरतुदीप्रमाणे शहर अभियंता, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, नगरपालिका मुख्य लेखापरीक्षक, नगरपालिका सचिव, नगरपालिका उपायुक्त व नगरपालिका सहायक आयुक्त यांची नेमणुक करण्याचे अधिकार हे महानगरपालिकेस कायदयाने विहीत आहे. आजपर्यंत नगरपालिका सचिवाचे पद रिक्त आहे.
४५.शहर अभियंता, वैद्यकीय आरोग्य अधिकारी व नगरपालिका सचिव इत्यादींची नेमणूक-कलम ४५ च्या पोट कलम १ मध्ये

(१) महानगरपालिका वेळोवेळी वैद्यकीय आरोग्य ,योग्य अशा व्यक्तीची शहर अभियंता ,अधिकारी व नगरपालिका सचिव म्हणून नेमणूक करील .

आणि कलम ४५ च्या पोट कलम ४ मध्ये

(४) नगरपालिका सचिवाच्या नेमणुकीव्यतिरिक्त या कलमान्वये केलेली प्रत्येक नेमणूक शासनाकडून कायम करण्याच्या अधीन असेल आणि ज्या कोणत्याही अधिका-**याची** नेमणूक कायम करण्याचे शासन नाकारील त्यास ताबडतोब पदावरुन काढून टाकण्यात येईल.

याचा अर्थ असा की नगरपालिका सचिवाची नेमणुक करण्याचा अधिकार हा महानगरपालिकेचा आहे. आणखी एक बाब या सभागृहाचे निदर्शनास आणुन देतो.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या अनुसूची ड मधील प्रकरण ३ मध्ये विवक्षित नगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांच्या नेमणुकीची पध्दती दिली आहे.

नेमणुका करण्याची रीती मध्ये कलम १ च्या पोट कलम १ मध्ये

१. कलम ,४५पोटकलम अन्वये ५८ अन्वये करण्यात आलेल्या तात्पुरत्या नेमणुका आणि कलम (७) करण्यात आलेल्या हंगामी नेमणुका या व्यतिरिक्त अन्य बाबतीतअन्वये ३ नियम ,कोणत्याही व्यक्तीस , ज्या पदांवर नेमणुक करण्याचा अधिकार ,धारण करत असल्याखेरीज याबाबत विहित केलेली अर्हता तो .महानगरपालिकेमध्ये निहित आहे अशा पदांपैकी कोणत्याही पदावर नेमणुक करता कामा नये

२. नियम मध्ये विनिर्दिष्ट १केलेल्या कोणत्याही पदावर नेमणुक करण्यापूर्वीस्थानिक वृत्तपत्रात जाहिरात , मागविण्यात आले पाहिजेत आणि आलेल्या अर्जाची आयुक्ताने छाननी केली देऊन अशा पदासाठी अर्ज आयुक्ताने ज्या व्यक्तींनी अर्ज केले असतील त्या ,महानगरपालिकेने तसे फर्मावले असल्यास .पाहिजे व्यक्तींपैकीज्या व्यक्ती या पदासाठी अर्हताप्राप्त असतील अशा व्यक्तींची एक यादी ,त्याच्या मते , :तीच्या क्रमानुसार तयार करुन समितीमार्फत महानगरपालिकेस सादर केली पाहिजेपसं

परंतु, नियम ३ अन्वये विहित केलेली अर्हता धारण करणारा नगरपालिकेच्या सेवेतील कोणताही अधिकारी हा उक्त पदावर नेमणूक केली जाण्यास योग्य अशी व्यक्ती आहे असे महानगरपालिकेचे मत असेल तर, महानगरपालिकेस या नियमात विहित केलेली पध्दती न अनुसरता अशा अधिका-याची उक्त पदावर नेमणूक करता येईल.

म्हणून नगरपालिका सचिवाचे अति महत्वाचे पद कलम ४५ (५) अन्वये चार महिन्याचे आत भरावयास पाहिजे परंतु ते आजपर्यंत रिक्त असल्यामुळे व हया रिक्त पदावर नेमणुक करण्याचे अधिकार हे महानगरपालिकेस असल्यामुळे कलम ४५ (४) अन्वये नगरपालिका सचिव या पदाचे नेमणुकीस राज्य शासनाची मंजुरीची नियमाप्रमाणे आवश्यकता नसल्याचे स्पष्ट उल्लेखीत असल्यामुळे, नागपूर महानगरपालिकेत कनिष्ठ अभियंता कार्यरत असलेले श्री. प्रफुल्ल शा. फरकसे यांना नगरपालिका सचिव पदासाठी आवश्यक असलेली किमान अर्हता प्राप्त असून त्यांनी स्थायी समिती यांचे वि. कार्य. अधि. म्हणून मागील १६ वर्षापासून उकृष्ठ कामगिरी बजावली आहे. त्यांचा प्रदिर्घ अनुभव व महानगरपालिका अधिनियमाचे तसेच सर्वसाधारण सभा व स्थायी समिती यांचे कामाबाबतचे नियमावलीचा अभ्यास पाहता त्यांची या पदावर नियुक्ती करण्याची शिफारस करण्यांत येते.

महानगरपालिकेतील त्यांची प्रदिर्घ सेवा बघता आणि ते पदवी धारक असल्यामुळे नगरपालिका सचिव या पदाकरीता विहित केलेली अर्हता धारण करीत असल्यामुळे या पदावर नेमणूक केली जाण्यास योग्य अशी व्यक्ती असल्याने श्री. प्रफुल्ल शा. फरकसे यांना महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत नगरपालिका सचिव नियुक्त करण्याच्या सुचनेसह हा प्रस्तावित विषय नियमानुसार मंजुर करावा.मा.महापौर आपणास व या सभागृहास विनंती करतो.

सुचक

श्री.अविनाश निलकंठ ठाकरे

सुचना(३)

म.न.पा. ठराव क्र. ४७ दि.२०.०६.२०१७ मध्ये म.न.पा.मधील उच्च शिक्षित अभियंत्यांची गरज लक्षात घेता आणि महानगरपालिकेत कार्यरत असलेल्या कनिष्ठ अभियंता यांना उच्च शिक्षण घेण्यास प्रोत्साहित करण्यासाठी पदवीधारक, पदविका धारक स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांचेसाठी समान धोरण असणे संयुक्तीक आहे.पदवी तसेच पदविका आणि नाशिक महाविद्यालयाची कनिष्ठ अभियंता परीक्षा उत्तीर्ण स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांचा वेगवेगळा गट ठेवण्यात आला आहे परंतु या शैक्षणिक पात्रतेचे कोणतेही कर्मचारी या ५ टक्के संवर्गात उरले नाहीत. त्यामुळे स्थापत्य अभियांत्रिकी उच्च पदवीधारक, पदवी, पदविका व नाशिक महाविद्यालयाची कनिष्ठ अभियंता व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांचा एकत्रित एकच गट असणे काळाची गरज आहे.

तेव्हा अंशकालीन किंवा दुरशिक्षण धारण केलेल्या स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांना पदोन्नती देण्यासाठी म.न.पा.ठराव क्र. ४७ दि. २०.०६.२०१७ मधील ब गटातील २० टक्के पदोन्नतीच्या प्रमाणात ५ टक्के प्रमाण समायोजित करणे संयुक्तीक राहील त्यांना वेगळे ठेवणे संयुक्तिक होणार नाही.

त्यामुळे स्थापत्य अभियांत्रिकी उच्च पदवीधारक, पदवी, पदविका व नाशिक महाविद्यालयांची कनिष्ठ अभियंता व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांचे कनिष्ठ अभियंता स्थापत्य पदावर पदोन्नतीचे संयुक्त प्रमाण २० % +५%= २५% करणे. या संशोधनास करण्याची शिफारस आहे. उच्च शैक्षणिक पात्रतेला प्राथम्याने देवून यानुसार संशोधनानंतर यांचे २५ टक्के करण्याच्या या सुचनेसह या सभागृहास विनंती करण्यात येते यास मंजूरी प्रदान करावी.

सुचक
श्री.सुनील जीवराज अग्रवाल

सुचना(४)

मा.महोदय, उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये सविनय सादर करण्यात येते की, नागपूर महानगरपालिका नागपूर या ठिकाणी मनपामध्ये कार्यान्वित असलेले दि. १२/०४/१९७६ अन्वये वर्ग १ ते ६ पदे खालीलप्रमाणे असून (१) निगम सचिव (२) प्रमुख लेखा व वित्त अधिकारी(प्रतिनियुक्तीने कार्यरत (३) चुंगी अधिक्षक (४) करनिर्धारक तथा संग्राहक (५) सांख्यियिकी अधिकारी व (६) विशेष कार्यासन अधिकारी महानगरपालिकेद्वारे यापुर्वी उपरोक्त पदांमधून नियमानुसार तसेच निकषानुसार उपनिगम आयुक्त किंवा उपायुक्त या पदावर पदोन्नती देण्यात येत होती.

सन २००४ मध्ये नागपूर महानगरपालिका नागपूर मध्ये एकुण १२ पदांवर सहा आयुक्त यांची नियुक्ती करण्यात आली आणि महानगरपालिकमध्ये मुख्यालयात तसेच झोन अंतर्गत सहा.आयुक्त कार्यरत आहेत.

मनपा ठराव क्र. ३७६ दि. २०/०२/२०१६ रोजी महानगरपालिकेद्वारा वर्ग १ ची सेनिओरीटी निर्धारित करतांना उक्त ठराव पारित करुन सन २००४ मध्ये मनपामध्ये नियुक्त झालेले सहा.आयुक्त यांना seniority मध्ये Upgrade केलेले असून दिनांक १२/०४/१९७६ प्रमाणे कार्यरत असलेले वर्ग १ चे महानगरपालिकेतील अधिकारी यांना Lowgrad Seniority मध्ये समाविष्ट करण्यात आलेले असून सामान्य प्रशासन विभागाद्वारे सन २०१७ पासून (१) निगम सचिव (२) प्रमुख लेखा व वित्त अधिकारी(प्रतिनियुक्तीने कार्यरत (३) चुंगी अधिक्षक (४) करनिर्धारक तथा संग्राहक (५) सांख्यीकीय अधिकारी व (६) विशेष कार्यासन अधिकारी आणि सहा.आयुक्त मनपा यांची सन २०१७ Common Seniority प्रदर्शित करण्यात आलेली आहे.

महोदय, मी आपणास कळवू इच्छितो की, वरील प्रमाणे सामान्य प्रशासन विभागाद्वारे Common Seniority केल्याने वर्ग १ मधील अधिकारी यांनी पदोन्नती करीता ३ वर्षाची अट पुर्ण केल्यानंतर देखील वरील पदोन्नती करीता Seniority मध्ये सगळयात मागे असल्याने मनपा ठराव क्र. दि. १२/०४/१९७६ मधील पदांना पदोन्नती करीता भरपूर वर्ष वाट पाहावे लागणार आहे. त्यामुळे त्यांच्यावर उपनिगम आयुक्त किंवा उपायुक्त या पदावर पदोन्नती करीता अन्याय होत आहे.

सबब आपणास विनंती करण्यात येते की, आमच्यावरील पदोन्नतीबाबतचा अन्याय दूर करण्याकरिता

दि.१२/०४/१९७६ मध्ये समाविष्ट असलेली वर्ग १ चे ६ पदे तसेच २००४ मधील नियुक्त झालेले सहा.आयुक्त यांच्या पदांमध्ये ५०-५० टक्के पदोन्नतीचे निकषावर सन्माननीय सभागृहाद्वारे निर्णय घेण्यात आल्यास भविष्यात ५० टक्के पदोननतीचे निकषामध्ये (१) निगम सचिव (२) प्रमुख लेखा व वित्त अधिकारी(प्रतिनियुक्ती कार्यरत) (३) चुंगी अधीक्षक (४) करनिर्धारक तथा संग्राहक (५) सांख्यीकीय अधिकारी व (६) विशेष कार्यासन अधिकारी, यांना नियमानुसार उपनिगम आयुक्त किंवा उपायुक्त पदावर पदोन्नती मनपाद्वारे देता येईल. तसेच ५० टक्केचे निकषामध्ये २००४ मध्ये नियुक्त झालेले सहा.आयुक्त यांना देखील उपनिगम आयुक्त किंवा उपायुक्त या पदावर संवर्गात पदोन्नती देता येईल. यामुळे उपरोक्त वर्ग १ मधील ६ पदे तसेच सहा.आयुक्त यांच्या पदोन्नती निकषामध्ये समानता निर्माण होवून पदोन्नतीच्या अनुषंगाने कोणत्याही वर्ग -१ च्या अधिका-यांवर अन्याय होणार नाही.

करीता उपरोक्त क्र १ ते ६ मधील वर्ग १ अधिकारी आणि सहा.आयुक्त मनपा, यांना उपनिगम आयुक्त किंवा उपायुक्त या वरिष्ठ पदावर पदोन्नती देण्याकरिता ५०-५० टक्क्याचे निकष ठरवून निर्णय घेण्यास्तव सुचनासह मंजूरी देण्यात यावी .

सुचक
श्री.प्रवीण विलासराव भिसीकर

**<u>ठराव क्र.६०/वि.क्र.२६</u>** :-
**{परीवहन विभाग}**

महाराष्ट्र मेट्रो रेल कॉरपोरेशन यांनी फिडर बस सर्व्हीस करीता १८ मिनी बसेसची मागणी केलेली असून या बसेसकरीता मनपास रू ३,५००/- प्रतिबस प्रतिदिवस या प्रमाणे शुल्क देण्याबाबत सहमती दर्शविलेली आहे. बस सर्व्हीसेस् करीता १८ मार्ग निहाय बस संख्या खालीलप्रमाणे आहे.

| अ क्र | मार्गाचे नांव | बस संख्या |
|---|---|---|
| १. | अजनी चौक मेट्रो स्टेशन ते रघुजी नगर | ०२ मिनी बस |
| २. | अजनी चौक मेट्रो स्टेशन ते मानेवाडा | ०२ मिनी बस |
| ३. | रहाटे कॉलनी चौक मेट्रो स्टेशन ते एल.ए.डी. मेट्रो स्टेशन | ०३ मिनी बस |
| ४. | रहाटे कॉलनी चौक मेट्रो स्टेशन ते एल.ए.डी. मेट्रो स्टेशन | ०४ मिनी बस |
| ५. | आय.ओ.ई. मेट्रो स्टेशन ते एल.ए.डी. मेट्रो स्टेशन मार्ग क्र. ३,४ व ५ | ०४ मिनी बस |
| ६. | लोकमान्य नगर मेट्रो स्टेशन ते वाडी टी. पॉईंट | ०१ मिनी बस |
| ७. | चिंचभवन ते मेट्रो स्टेशन | ०२ मिनी बस |

सध्या या बसेस पासुन मनपाला रू. २,५००/- एवढे उत्पन्न प्रतिबस प्रतिदिवस येत आहे. मनपातर्फे ऑपरेटर यांना रू. ९,०००/- प्रतिबस प्रतिदिवस एवढी रक्कम अदा करण्यात येते, जी जास्त आहे. महामेट्रो यांना या १८ मिनी बसेस दिल्यास या बसेसद्वारे रू. ३,५००/- प्रतिबस प्रतिदिवस या प्रमाणे ६३,०००/- प्रतिदिवस एवढे उत्पन्न प्राप्त होवू शकेल व तिकीट आकारून मिळणारा महसुल यात समायोजित करण्यात येईल महामेट्रोला १८ बसेस रू. ३,५००/- प्रतिबस प्रतिदिवस फिडर बस सेवा म्हणुन देण्याचा प्रस्ताव परिवहन समिती ठराव क्र.५६, दि. २५/०२/२०२१ अन्वये मंजूर करण्यात आला व ही बाब धोरणात्मक असल्याने सदर विषय महासभे समक्ष सादर करण्यास सुचित केले. सदर विषयास महानगरपालिकेद्वारे मंजुरात प्राप्त करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्र.६१/वि.क्र.२७</u>** :-
**{परीवहन विभाग}**

नागपूर आंतरराष्ट्रीय विमानतळ अशी बससेवा सुरू करण्याची मागणी महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन यांनी केलेली असून याकरीता नविन प्राप्त इलेक्ट्रीक बस देण्याकरीता व या बसकरीता महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशनने मनपास रू ४५००/- प्रतिबस प्रतिदिवस या प्रमाणे शुल्क देण्याबाबत सहमती दर्शविलेली आहे.

नविन सहावी इलेक्ट्रीक बस प्राप्त झाली असून ही बस विमानतळ ते दक्षिण विमानतळ

मेट्रो स्टेशन पर्यंत सकाळी ०६:०० ते रात्री १०:०० या वेळेत चालविण्यात येईल. विमानतळ ते दक्षिण विमानतळ मेट्रो स्टेशन पर्यंतचे ०.९ कि.मी. अंतर असून या दरम्यान ही बससेवा संपुर्ण दिवस देण्यात येईल व त्याकरीता महामेट्रो मनपाला रू. ४,५००/- प्रतिबस प्रतिदिवस देईल. यापुर्वी आलेल्या ०५ बसेस फक्त महिलांकरीता देण्यात आल्या असून त्यांचे एकत्रित उत्पन्न रू. ५,१७५/- प्रतिदिवस येत आहे. मनपातर्फे ऑपरेटर यांना रू. ८,६४०/- प्रतिबस प्रतिदिवस एवढी रक्कम अदा करण्यात येते, जी जास्त आहे. महामेट्रोला यापैकी एक बस दिल्यास हया बसद्वारे रू. ४,५००/- प्रतिबस प्रतिदिवस चे महसुल प्राप्त होवू शकेल.

करीता एक नविन इलेक्ट्रीक बस विमानतळ ते दक्षिण विमानतळ मेट्रो स्टेशन सकाळी ०६:०० ते रात्री १०:०० या वेळेत ०३ महिन्याकरीता महामेट्रो यांना देण्याकरीता मा. आयुक्त, नागपूर महानगरपालिका नागपूर यांनी मंजुरी प्रदान केलेली असुन सदर प्रस्ताव परिवहन समिती ठराव क्र.५७, दि.२५/०२/२०२१ अन्वये मंजुर करण्यात आला असून ही बाब धोरणात्मक असल्याने नागपूर महानगरपालिकेच्या महासभेत सादर करण्याबाबत निर्देशित केले. सदर विषयाला कार्योत्तर मंजूरी देण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्र.६२/वि.क्र.२८</u> :-**
**{परीवहन विभाग}**

नागपूर शहराकरीता शहर बस सेवा नागपूर महानगरपालिका मार्फत चालविण्यात येत आहे. ही बस सेवा सुचारू पध्दतीने कार्यान्विती करीता मनपा कडे पुढील प्रमाणे व्यवस्था उपलब्ध आहे.

**(अ) उपलब्ध बसेस**

१. मनपा मालकीच्या एकूण २३७ स्टॅन्डर्ड डिझेल बसेस (जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत वर्ष २०१० मध्ये प्राप्त).
२. नागपूर मनपाला जे.एन.एन.यु.आर.एम. योजने अंतर्गत प्राप्त २३६ बसेस CNG इंधनावर परवर्तीत करण्याचा कार्यक्रम सुरू असून सध्या ५५ बसेस CNG वर परावर्तीत झालेल्या आहेत. उर्वरीत संपुर्ण मनपा मालकीच्या बसेस लवकरात लवकर परावर्तीत करण्यात येतील. ज्यामुळे बसेस चालविण्याच्या कालावधीत वाढ होईल व इंधनावरील खर्च देखील कमी करण्यात येईल.
३. महाराष्ट्र शासनाच्या तेजस्विनी बस योजने अंतर्गत फक्त महिलांसाठी वर्ष २०१८-१९ मध्ये मनपा मालकीच्या एकूण ०६ इलेक्ट्रीक बसेस (तेजस्विनी)
४. शहर बस सेवा चालविण्याकरीता नेमणुक केलेले ०३ ऑपरेटरच्या १५० मिडी बसेस
५. शहर बस सेवा चालविण्याकरीता नेमणुक केलेले ०३ ऑपरेटरच्या ४५ मिनी बसेस
   याप्रमाणे एकूण ४३८ बसेस उपलब्ध आहे.
६. केंद्र शासन द्वारे FAME-II योजनेअंतर्गत प्राप्त होणाऱ्या ४० इलेक्ट्रीक मिडी बसेस खरेदी करण्यास्तव M/s. EVYE TRANS LTD यांचे सोबत करारनामा झालेला आहे.

**(ब) उपलब्ध बस डेपो**

१. यशवंत स्टेडियम जवळील मनपा ताब्यातील पटवर्धन मैदानाची ०.७५ हेक्टर जागा.
२. ऑरेंज स्ट्रिट डेपो (हिंगणा रोड) या ठिकाणी १.२५ हेक्टर जागा.
३. खापरी नाका बस डेपो ३.५४ हेक्टर जागा.
४. वाडी नाका बस डेपो १.१३ हेक्टर जागा.
५. कोराडी नाका बस डेपो (नासुप्र च्या मालकीच्या रू. २५.८ लक्ष+जी.एस.टी वार्षिक भाडे तत्वावर डेपो १.७८२ हेक्टर जागा.
६. लकडगंज येथील स्माल फॅक्ट्री एरीया या ठिकाणी ०६ इलेक्ट्रीक बसकरीता डेपो ०.३६ हेक्टर जागा.
७. मोरभवन सिताबर्डी येथील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांची जागा

संयुक्त बस टर्मिनस वापर करण्याकरीता रू. ५५,९४३/- वार्षिक भाडे पटटयावर घेण्यात आली आहे.

**(क) बस संचालन व्यवस्थापन**

१. उक्त बससेवा जी.सी.सी. तत्वावर चालविण्याकरीता ०३ बस ऑपरेटर १) मे. आर.के.सिटी बस सर्व्हीसेस, नागपूर २) मे. ट्रॅव्हल टाईम बस सर्व्हीसेस, नागपूर
३) मे. हंसा बस सर्व्हीसेस, नागपूर यांची नियुक्ती वर्ष २०१७ मध्ये करण्यात आली असून या कंत्राटाचा कालावधी १० वर्ष आहे. या कंत्राटा अंतर्गत मनपाच्या मालकीचे तसेच त्यांच्या द्वारे पुरविण्यात आलेल्या बसेसची देखभाल व दुरूस्ती, बस चालक, आवश्यक तांत्रिक मनुष्यबळ व इंधन याचा खर्च ऑपरेटरतर्फे करण्यात येतो व मनपा मार्फत त्याकरीता प्रतिकिमी दराप्रमाणे भुगतान केल्या जाते.

२. या बसेस परिचलन द्वारे प्राप्त होणारे उत्पन्न मनपाच्या कोषात जमा करण्यात येते. त्याकरीता प्रवाश्यांकडून तिकीट विक्रीद्वारे होणारे महसुल प्राप्त करण्यास्तव एक वाहक पुरवठा एजेन्सी मे. युनिटी सिक्युरेटी फोर्स ॲड ट्रेनिग इंस्टिटयुट, नागपूर यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

३. उपरोक्त सर्व बस सेवा सुचारूपणे नियंत्रण करण्यास्तव बसेसचे मार्ग निश्चित करण्यास्तव वाहक एजेन्सी व ऑपरेटर्स् यांचेवर नियंत्रण आधुनिकरित्या जी.पी.एस. पध्दतीद्वारे संचालनास्तव मे. दिल्ली इटीग्रेटेड मलटी मॉडेल सिस्टिम या एजेन्सीची नेमणुक करण्यात आलेली आहे.

**(ड) बस सेवेपोटी मनपास प्राप्त होणारे उत्पन्न व खर्च**

आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये

एकूण उत्पन्न रू. ६४.४६ कोटी
एकूण खर्च रू. १६४.८३ कोटी

**(इ) केद्र शासन द्वारे FAME-II अतंर्गत प्राप्त होणाऱ्या ४० इलेक्ट्रीक मिडी बसचा प्रस्तावित खर्च अंदाजे रू. २० कोटी**

उक्तप्रमाणे नमुद आय व खर्चाचे विवरण अवलोकन केल्यास रू. १२१ कोटीची तुट (Viability Gap Funding) मनपास देय ठरते.

मनपाची आर्थिक स्थिती लक्षात घेता ही Viability Gap Funding जास्त प्रमाणात असून याचा परिणाम महानगरपालिकेच्या इतर विकास कामावर होत आहे. आता शहरात मुख्य मार्गावर मेट्रो रेल द्वारे परिवहन सुरू झालेले आहे. मुख्यत्वे याच मार्गावर बस परिवहन व्यवस्था सुध्दा सुरू आहे. त्यामुळे एकाच मार्गावर दोनही व्यवस्था परिचालन असल्यामुळे शहर बस सेवेत प्रवाश्यांचा तुटवडा झालेला आहे. या परिस्थितीमुळे शहर बस सेवा आणि मेट्रोरेल ही दोन्ही व्यवस्था तोटयात सुरू आहे.

महामेट्रोप्रमाणे नागपूर शहराकरीता शहर परिवहन व्यवस्था एकाच प्राधिकरणाकडे असावी व यामुळे शहर बस सेवेचे परिचलन सुध्दा महामेट्रो यांनी करावे असे अभिमत व्यक्त करण्यात आले.

करीता उक्त नमुद संपुर्ण वस्तुस्थिती विचारात घेऊन नागपूर महानगरपालिकेद्वारे चालविण्यात येणारी शहर बस सेवा मालमत्ता व देयतांसह (Assets and Liabilities) परिवहन समिती ठरवेल त्या अटी व शर्तीसह महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेड यांना हस्तांतरण करण्याबाबत धोरण निश्चित करण्याकरीता परिवहन समिती ठराव क्र. ५५, दि. २५/०२/२०२१ अन्वये सदर विषय धोरणात्मक असल्याने नागपूर महानगरपालिकेच्या महासभेसमोर सादर करण्यास मंजूरी प्रदान केली. सदर विषय महासभेसमक्ष सादर करण्यास तसेच महानगरपालिकेची बस सेवा महामेट्रो यांना परिचलनाकरीता हस्तांतरीत करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्र.६३/वि.क्र.२९ :-** अधिकारी/कर्मचारी यांचे वेगवेगळे प्रशिक्षणादरम्यान होणारा खर्च
**{अग्निशमन विभाग}** नागपूर महानगरपालिका वहन करेल याबाबत.

अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागातीचल अधिकारी/कर्मचारी यांचे वेगवेगळे प्रशिक्षणादरम्यान होणारा खर्च नागपूर महानगरपालिका वहन करेल या धोरण निश्चिततेच्या विषयास अग्निशमन सेवा व विद्युत विशेष समितीकडे वर्ग करण्यात यावा याप्रमाणे ठराव पारीत केले. त्यानुसार अग्निशमन सेवा व विद्युत विशेष समितीचे दि. ०५/०६/२०२० रोजी संपन्न झालेल्या बैठकीत खालीलप्रमाणे सदर विषयाबाबत शिफारस केली आहे.

अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागाची कार्यप्रणाली ही अत्यंत जोखिमपुर्ण असते. एखादी दुर्घटना घडली असता धोकादायक स्थितीत अग्निशमन विभागाचा कर्मचारी आपला जीव धोक्यात टाकून कार्यकुशलतेने कार्य करीत असतो. ही कुशलता त्याला प्रशिक्षणाच्या माध्यमातून प्राप्त होत असते. लोकांच्या सेवेकरता हे प्रशिक्षण आहे. त्यामुळे महानगरपालिकेने हा खर्च वहन करणे गरजेचे वाटते. दुसऱ्या महानगरपालिकेनेसुध्दा हा खर्च वहन करण्याचे धोरण निश्चित केले आहे. त्याअनुषंगाने नागपूर महानगरपालिकेने सुध्दा हा खर्च वहन करावा.

करीता अग्निशमन सेवा व विद्युत विशेष समितीने केलेल्या शिफारशीनुसार अग्निशमन विभागातील अधिकारी तथा कर्मचारी यांना राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय येथील सब ऑफिसर्स कोर्स, स्टेशन ऑफिसर्स कोर्स, डिव्हिजनल ऑफिसर्स कोर्स आणि राष्ट्रीय नागरीक सुरक्षा महाविद्यालय (NCDC) येथील वेगवेगळया प्रशिक्षणाकरीता पाठविल्यानंतर उत्तीर्ण झाल्यास प्रशिक्षणा दरम्यान नियमानुसार येणारा संपुर्ण खर्च नागपूर महानगरपालिका वहन करेल या धोरणनिश्चितीच्या विषयास महासभेने विचारात घेवून ज्यावेळेला या संपुर्ण कर्मचा-यांचे प्रमोशन होणार आहे. त्यावेळेला प्रमोशनचा लाभ ॲटोमॅटीकली कर्मचा-यांना मिळणार आहे त्यामुळे हा खर्च इन्टॉलमेंटच्या रुपाने कर्मचा-यांच्या पगारातून खर्च करावा या मा.सत्तापक्ष नेते श्री. अविनाश ठाकरे यांनी केलेल्या सुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येते. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

श्री.प्रकाश भोयर:- मा.महापौरजी, प्रत्येक झोनमध्ये वॉटर्सवर्क्स, कारखाना विभाग आणि दहाही झोनमध्ये अनेक प्रकारे, अनेक जागी अशी भंगारे आहेत. क्लिष्ट विषय असा आहे आपण रु. ८४,१८०/- इतकी किंमत ठरविली आणि प्राकलनीय किंमतीपेक्षा ९५.७५ टक्के जास्त दराची निविदा त्या ठेकेदारानी घेतली याचा अर्थ असा आहे. या विषयावर आपले जे कर्मचारी आहे, जे रक्कम ठरविणारे लोक आहेत. जे प्रशासन आहे ते कुठेतरी चुक करीत आहे. ९५ टक्केच्या वर दर गेला आणि जर ठेकेदाराने अशा पध्दतीने चेन निर्माण केली असती तर एक्स्ट्रा १० टक्के वर घेवू शकले असते. मा.महापौरजी, यानंतर अशा पध्दतीने रेट ठरवीत असतांना प्रशासनाला अशी सुचना दयावी मा.महापौरजी, या अनुषंगाने विशिष्ट रेट ठरवावे आणि अशा सर्व विभागामध्ये आणि जितके दहा झोन आहेत यामध्ये ई-ऑक्शन करावे. कारण ब-याच मोठया प्रमाणात भष्ट्राचार होण्याची शक्यता आहे आणि अनेक लोकांचे नाव गोवण्याचा प्रयत्न होवू शकतो त्यामुळे या संपुर्ण गोष्टीवर भंगार विकण्याकरिता काढतांना ई-ऑक्शन महिन्याभरात ठेवावी या सुचनेसहीत हा विषय मंजूर करावा.

**ठराव क्र.६४/वि.क्र.३०** :- महानगरपालिका सिव्हील लाईन्स मुख्यालय परिसरातील भंगार व
**{लोककर्म विभाग}** नादुरूस्त वेगवेगळया प्रकारचे साहित्य उदा.खुर्च्या, टेबल, आलमारी, लोखंडी स्टॅन्ड, रॅक, सोफा, दरवाजे, झेरॉक्स मशीन इत्यादी निकामी साहित्य विल्हेवाट करण्यासाठी (परिशिष्ठ "अ" प्रमाणे) मान्यता प्राप्त व्हेलुवर मार्फत भंगाराचे मुल्यांकन करून रू.८४,१८०/- इतकी किमंत ठरविण्यात आली. त्या अनुषंगाने प्राकलीन रक्कम रू.८४,१८०/- च्या कामारीता एकूण **५** निविदेकारापैकि मे. परवेझ एन्टरप्राईजेस यांची निविदा प्राकलनीय किमती पेक्षा **९५.७५%** टक्के जास्त दराची म्हणजे रू. १,६४,७८७/- ची प्राप्त झाली. प्रथम अधिक दराची निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेण्याकरीता, नागपूर महानगरपालिका कलम **७९** नुसार रु.**५०००/-** पेक्षा जास्त मुल्य असल्यास म.न.पा सभागृहाची मंजुरी आवश्यक असल्याने निविदाकार मे. परवेझ एन्टररप्राईजेस यांची प्राकलनीय किमंती पेक्षा **९५.७५%** टक्के जास्त दराची रु.**१,६४,७८७/-** निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून प्रत्येक झोनमध्ये जे भंगार पडलेले आहे. अतिक्रमण विभागामध्ये मोठया प्रमाणात भंगार आहे. अतिक्रमणाचा जो स्टोर आहे जो किल्ल्याच्या पाणी टंकीच्या जवळ आहे तेथे मोठया प्रमाणात भंगार आहे. असे प्रत्येक ठिकाणच्या भंगारचा लवकरात लवकर निविदा काढून ऑक्शन करण्यात यावा असे निर्देश देण्यात येते आणि या विषयाच्या अनुषंगाने प्रशासनाने विशिष्ट रेट ठरवावे आणि अशा सर्व विभागामध्ये आणि दहा झोनमध्ये जे काही भंगार आहेत त्यामध्ये ई-ऑक्शन करावे. या या स्थायी समिती सभापती श्री. प्रकाश भोयर यांनी केलेल्या सुचनेनुसार हा विषय मंजूर करण्यात यावा या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्र.६५/वि.क्र.३१</u> :-** नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग, नकाशे /झोन नकाशे
**{नगर रचना विभाग}** पुरविण्यासाठी आकारावयाचे सुधारीत दराबाबत.

**संदर्भ** :— शासन नगर विकास विभागाकडील निर्णय क्र. संकीॅण —5019/प्र.क्र. 114/ 2019/नवि—27, दि. 28.10.2020.

नागपूर शहराची सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 31(1) अन्वये शासन, अधिसुचना नगर विकास विभाग क्र. टिपीएस — 2496 —2643— प्र.क्र. 300(अ)—97—नवि—9, दि. 07 जानेवारी 2000 अन्वये भागशः मंजुर झाली असून ती दि. 01 मार्च 2000 पासून अमंलात आली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसुचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस—2400—1628—सी.आर.—200—नवि—9, दि. 10.09.2001 अन्वये मंजुर झाली असून ती दि. 21.09. 2001 पासून अमंलात आलेली आहे. तसेच शासनाचे नगर विकास विभागाचे अधिसुचना क्र. टिपीएस — 2401—885—प्र.क्र.—76/नवि—9, दि. 27 फेब्रुवारी 2002 अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या क्षेत्रांअंतर्गत सात योजनांचे क्षेत्र वगळुन उर्वरीत नागपूर शहराकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले होते. तथापी शासनाकडील नगर विकास विभागाची अधिसूचनाक्र. टिपीएस—2419— 1419 —प्र. क्र.—154—2019—नवि—9, दि. 27 ऑगस्ट 2019 अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या कार्यक्षेत्राअंतर्गत असलेल्या सात योजनेकरीता सुध्दा नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे.

कृपया सोबत जोडलेल्या महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण—5019/प्र.क्र. 114/2019/नवि—27, मंत्रालय, मुंबई दि. 28.10.2020 अवलोकन व्हावे.

सादर निर्णयानूसार नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभागाकडील नकाशे/झोन नकाशे पुरविण्यासाठी आकारावयाचे सुधारीत दर निश्चित केलेले आहे. सदर दर खालीलप्रमाणे आहेत.

**<u>विवरण पत्र —अ</u>**

(अ) भाग नकाशे/ झोन दाखले Offline देण्याकरीता शुल्क दर्शविणारा तक्ता.

| **अ. .** | **नकाशा/दाखला तपशिल** | **विद्यमान दर (रूपयांत)** | | **सुधारीत दर (रूपयांत) (Color प्रत)** |
|---|---|---|---|---|
| | | Black & White प्रत | Color प्रत | |
| 1 | नकाशा पुर्ण आकार 20 x 30 से.मी. (A4-Size) | 30 | 60 | 700 |
| 2 | नकाशा 30 x45 से.मी. (A3- Size) | 40 | 80 | 1100 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 | नकाशा 45x 60 से.मी. (A2- Size) | 50 | 100 | 1500 |
| 4 | नकाशा 60x 90 से.मी. (A1- Size) | 60 | 120 | 2500 |
| 5 | नकाशा 75x105 से.मी.(A0- Size) | 80 | 160 | 6800 |
| 6 | नगर रचना योजनेतील एक अंतिम व त्याचा मुळ भुखंड दर्शविणारा भाग नकाशा | -- | 50 | 700 |
| 7 | नगर रचना योजनेतील दोन अंतिम व त्यांच्या मुळ भुखंडाचा भाग नकाशा | -- | 80 | 1500 |
| 8 | दोन पेक्षा अधिक अंतिम भुखंड व त्यांच्या मुळ भुखंडाचा भाग नकाशा | -- | 140 | 2500 |
| 9 | मंजुर नगर रचना योजनेतील अंतिम भुखंडाच्या सनदेच्या प्रथम प्रतीसाठी | -- | 50 | 3000 |
| 10 | मंजुर नगर रचना योजनेतील अंतिम भुखंडाच्या सनदेच्या दुसऱ्या प्रतीसाठी | -- | 40 | 800 |
| 11 | मंजुर नगर रचना योजनेच्या योजना पुस्तकामधील एका अंतिम भुखंडाच्या नोंदीच्या उताऱ्यासाठी | -- | 30 | 200 |
| 12 | मंजुर विकास योजना/प्रादेशिक योजनेमधील एक स.नं. /गट नं. च्या प्रमाणपत्राच्या एका प्रतीसाठी | -- | 30 | 300 |
| 13 | विकास योजना नकाशे, भाग नकाशे यांची सिडी पुरविणे (1 जी.बी. पर्यंत सीडी साठी) | -- | -- | 500 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 14 | मंजुर रेखाकन/बांधकाम नकाशाच्या सत्यप्रती व आदेशाची (शिफारस) प्रत. | -- | -- | पत्राचे (आदेशाचे)<br>रू. 5/— प्रती पान<br>A- 4 रू. 50/—<br>A-3 रू. 100/—<br>A-2 रू. 150/—<br>A-1 रू. 200/— (नकाशा) |

ब) भाग नकाशे / झोन दाखले Online पध्दतीने देणेकरीता शुल्क — नगर संचालनालयाच्या विविध कार्यालयाकडून A- 4 आकाराचे भाग नकाशे Online पध्दतीने उपलब्ध होण्यासाठी रू. 250/— प्रती सर्व्हे नंबर.

नागपूर महानगरपालिकेने यापुर्वी वरील बाबीकरीता आकारावयाचे प्रचलित शुल्क महाराष्ट्र शासन राजपत्रात दि. 17.07.2015 रोजी प्रसिध्द केलेले असून सध्या त्याप्रमाणेच शुल्क आकारणी करण्यात येत आहे, ते खालीलप्रमाणे आहे.

| अ. | लोकसेवांची सुचि | आवश्यक कागदपत्रे | फी | नियत कालमर्यादा | पदनिर्देशीत अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | झोन दाखला देणे (भाग नकाशाची प्रत देण्याबाबत. | 1) विहित नमुन्यातील अर्ज<br>2) 7/12 उतारा/सिटी सर्व्हे उतारा<br>3) मोजणी नकाशा /सिटी सर्व्हे नकाशा | रू. 300/— | 7 दिवस | संबंधीत कनिष्ठ अभियंता |
| 2 | भाग नकाशा देणे | 1) विहित नमुन्यातील अर्ज<br>2) 7/12 उतारा/सिटी सर्व्हे उतारा<br>3) मोजणी नकाशा /सिटी सर्व्हे | रू. 300/— | 3 दिवस | संबंधीत कनिष्ठ अभियंता |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | नकाशा | | | |

नागपूर महानगरपालिकाकडील प्रचलित शुल्क व शासनाने संदर्भीय निर्णयान्वये निर्धारीत केलेल्या शुल्कात तफावत असल्याने व प्रचलित दराने वरीलप्रमाणे भाग नकाशे/झोन दाखले अर्जदारांना देणेविषयीच्या खर्चात वाढ झालेली असल्याने नागपूर महानगरपालिकेच्या प्रचलित दरात सुध्दा शासन निर्णयाच्या अनुषंगाने वाढ करणे आवश्यक ठरते. त्यानूसार नागपूर महानगरपालिकेच्या नगर रचना विभागामार्फत पुरविण्यात येणाऱ्या भाग नकाशे/झोन दाखले या करीता शासन निर्णयानूसार आकारावयाचे शुल्कात खालीलप्रमाणे वाढ करणे आवश्यक आहे.

| **अ. .** | **नकाशा/दाखला तपशिल** | **विद्यमान दर (रूपयांत)** | | **सुधारीत दर (रूपयांत)**<br>**(Color प्रत)** |
|---|---|---|---|---|
| | | Black & White प्रत | Color प्रत | |
| 1 | नकाशा पुर्ण आकार 20 x 30 से.मी. (A4-Size) | 30 | 60 | 700 |
| 2 | नकाशा 30 x45 से.मी. (A3- Size) | 40 | 80 | 1100 |
| 3 | नकाशा 45x 60 से.मी. (A2- Size) | 50 | 100 | 1500 |
| 4 | नकाशा 60x 90 से.मी. (A1- Size) | 60 | 120 | 2500 |
| 5 | नकाशा 75x105 से.मी.(A0- Size) | 80 | 160 | 6800 |
| 6 | नगर रचना योजनेतील एक अंतिम व त्याचा मुळ भुखंड दर्शविणारा भाग नकाशा | -- | 50 | 700 |
| 7 | नगर रचना योजनेतील दोन अंतिम व त्यांच्या मुळ भुखंडाचा भाग नकाशा | -- | 80 | 1500 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 8 | दोन पेक्षा अधिक अंतिम भुखंड व त्यांच्या मुळ भुखंडाचा भाग नकाशा | -- | 140 | 2500 |
| 9 | मंजुर नगर रचना योजनेतील अंतिम भुखंडाच्या सनदेच्या प्रथम प्रतीसाठी | -- | 50 | 3000 |
| 10 | मंजुर नगर रचना योजनेतील अंतिम भुखंडाच्या सनदेच्या दुसऱ्या प्रतीसाठी | -- | 40 | 800 |
| 11 | मंजुर नगर रचना योजनेच्या योजना पुस्तकामधील एका अंतिम भुखंडाच्या नोंदीच्या उताऱ्यासाठी | -- | 30 | 200 |
| 12 | मंजुर विकास योजना/प्रादेशिक योजनेमधील एक स.नं. /गट नं. च्या प्रमाणपत्राच्या एका प्रतीसाठी | -- | 30 | 300 |
| 13 | विकास योजना नकाशे, भाग नकाशे यांची सिडी पुरविणे (1 जी.बी. पर्यंत सीडी साठी) | -- | -- | 500 |
| 14 | मंजुर रेखाकन/बांधकाम नकाशाच्या सत्यप्रती व आदेशाची (शिफारस) प्रत. | -- | -- | पत्राचे (आदेशाचे) रू. 5/— प्रती पान<br>A- 4 रू. 50/—<br>A-3 रू. 100/—<br>A-2 रू. 150/—<br>A-1 रू. 200/— (नकाशा) |

ब) भाग नकाशे झोन दाखले Online पध्दतीने देणेची प्रक्रिया सध्या नागपूर महानगरपालिकाकडून केल्या जात नसल्याने त्या बाबत धोरण भविष्यात निश्चित करणे उचित होईल.

तरी संबंधीत विवरण पत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे (अ) भाग नकाशे/ झोन दाखले Offline पध्दतीने

जनतेला उपलब्ध करून देण्याकरीता शासनाचे संदर्भीय निर्णयाच्या धर्तीवर आकारवयाचे शुल्कात वाढ करणेकरीता मा. स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. मा. स्थायी समितीने सदर विषयास मान्यता प्रदान केलेनंतर त्याबाबत महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करणे व ज्या दिवशी महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द होईल त्या दिवसापासून वरील दर लागू होतील त्याअनुषंगाने वरीलप्रमाणे सुधारीत दरास मान्यता देणेचा प्रश्न सभागृहाने विचारात घेतला

श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, नगररचना आणि मुल्यनिर्धारण विभाग नकाशे आणि झोन नकाशे पुरविण्यासाठी आकारावयाचे सुधारित दराबाबतचा हा विषय या महासभेपुढे आलेला आहे. अत्यंत छोटा आणि शुल्लक विषय आहे मा.महापौरजी. आपल्या झोनला नकाशाच्या प्रिन्ट द्यावयाच्या आहेत त्याची फी वाढवायची आहे. त्यापेक्षा फार मोठा विषय या शहराच्या विकासाच्या दृष्टीकोनातून अत्यंत महत्वाचा विषय आहे तो म्हणजे मेट्रो कॉरीडोर मध्ये जो टीओडी आहे. त्या टीओडीच्या विकास शुल्कात प्रशासनाने दुपटीने वाढ केली आहे. २ टक्के जो विकास शुल्क होता त्या २ टक्क्यावरुन ४ टक्के प्रशासनाने वाढ केली आहे. कमर्शियल प्रापर्टीचा जो विकास शुल्क आहे तो ४ टक्क्यावरुन ८ टक्के वर गेलेला आहे. यामध्ये कुठेही नागपूर महानगरपालिकेच्या महासभेला विश्वासात न घेता प्रशासनाने हा विषय वर्तमानपत्रात ॲडव्हरटाईज टाकली आणि विकास शुल्क लागू केलेला आहे. मा.महापौरजी, सर्वप्रथम प्रशासनाने या ठिकाणी या टीओडीच्या विषयाच्या संदर्भात आपले वक्तव्य मांडावे अशी मी आपल्या माध्यमातून विनंती करतो.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

श्री.हर्षल गेडाम():-मा.महापौरजी, सदर जी वाढ आहे. २०१५ मध्ये जो टीओडीचा प्रस्ताव महासभेने मंजूर केला आहे. त्या अनुषंगाने एमआरटीपी सेक्शन १२० 'ब' (अ) व सेक्शन १२४ 'ब' त्यामध्ये वाढ करण्याची तरतूद आहे. ही केलेली वाढ आहे याला शासनाने मंजूरी दिलेली आहे. ही फक्त एमआरटीपी पुरते मर्यादित नसून संपुर्ण शहरासाठी आहे. याला सुध्दा महाराष्ट्र शासनाने मंजूरी दिलेली आहे.

श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, १२४ 'ब' चे वाचन करण्यात यावे.

महापौर:- निगम सचिवांनी वाचन करावे.

निगम आयुक्त:- सन्माननीय महापौरजी, सन्मानननीय सदन. पटलावर विषय नाही परंतु मी सभागृहाच्या माहिती साठी सांगू इच्छितो, ज्यावेळी महामेट्रो या नागपूर शहरासाठी मंजूर झाली. त्या महामेट्रोमध्ये नागपूर महानगरपालिका ५ टक्के शेअरहोल्डर आहे. ज्यावेळी आपण शेअरहोल्डर आहोत त्याअर्थी शेअर रेस करुन उत्पन्न वाढ व्हावी याकरिता शासनाने २०१४-१५ मध्ये एक जी.आर.काढला. त्यात चार बाबींचा उल्लेख केला आहे. पहिली बाब होती टीओडी, नंतरच्या काळात त्या टीओडीच्या अनुषंगाने जी गाईडलाईन आली होती. त्यामधून जे उपलब्ध होणारे पैसे आहेत त्यामधून ५० टक्के आपला मिळतात आणि ५० टक्के आपण महामेट्रोला जमा करतो. दुसरी बाब होती, १ टक्केचा अधिभार करावयाची होती. रजिस्ट्रेशनच्या जेवढया प्रापर्टी होत्या नागपूर क्षेत्रामध्ये, त्यामध्ये १ टक्के शेष होता तो मधल्या काळात जेव्हा कोव्हीडचा प्रभाव खुप जास्त होता त्यावेळी बंद झाला. तिसरी बाब होती, ज्या एमआरटीपी मध्ये कायद्या अंतर्भुत केलेला आहे. अमीडमेंट केलेला आहे, अमीडमेंटची मी तारीख सुध्दा सांगतो, २०१५ मध्ये एमआरटीपी कायद्यामध्ये अमीडमेंट केली आणि असे घोषित केले की या शहरामध्ये वाईटन अर्बन ट्रान्सपोर्ट म्हणून घोषित केले त्या एरियामध्ये डेव्हल्पमेंट चार्ज दुप्पट करावयाचा आहे त्याच्यामधून रिसोर्स जनरेट करुन द्यावयाचे आहे. चौथा विषय असा आहे मेट्रोचे एरिया कमर्शियल करावयाचे आहे. यामध्ये सत्तापक्ष नेते अविनाश ठाकरे यांनी सांगितले की हे सभागृहासमोर आले नाही. यामध्ये आमच्यामध्ये जी काही चर्चा झाली ती सभागृहाच्या याच्यामध्ये येत नाही. २०१५ मध्ये ऑलरेडी

शासनाने निर्णय घेतला आहे. ज्या ज्या ठिकाणी घोषित केले त्या त्या ठिकाणी लागू करायला पाहिजे होता. काही कारणामुळे आपल्याकडे लागू न झाल्यामुळे तत्कालीन आयुक्तांनी या संबंधित मार्गदर्शन मागविले होते की यात काय करावयाचे. कारण महामेट्रोकडून पैसे संबंधात पत्रव्यवहार येत राहतो. याच्यामध्ये एक महत्वाचा मुद्दा म्हणजे यात ऑडीट पॅरा सुध्दा निर्माण होवू शकतो म्हणून त्यांनी शासनाकडे याचा खुलासा मागितला होता. त्याच्यामध्ये शासनाने रितसर चालू करावे अशी क्लिअर कट सुचना दिली आहे. त्याचा मोटीव्ह अप आपण केला आहे. त्यामुळे हा सभागृहाचा विषय नाही. हा शासनाचा विषय आहे. शासन स्तरावरील निर्णय आहे त्याचा फॉलो करणे आपल्याला बंधनकारक आहे. मी शासनाच्या पत्राचे वाचन करतो (वाचले)

श्री.अविनाश ठाकरे:- पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी, या ठिकाणी आयुक्तांची कुणीतरी दिशाभूल केली आहे आणि या ठिकाणी सभागृहाची सुध्दा दिशाभूल केलेली दिसत आहे. कारण शासनाचे जे २०१५ चे अमीडमेंट आहे १२४ 'ब' मध्ये त्यांनी नमुद केले आहे. त्याच्यामध्ये स्पष्टपणे त्यांनी म्हटले आहे. प्राधिकरण त्यांनी ज्या दराने विकास आकार दर योजावयाचे आहे ते दर विहित करण्या-या विविध विनिमयांना विशिष्ठ बैठकीत संमत केलेल्या ठरावाद्वारे मान्यता देण्यात येईल.

निगम आयुक्त:- सन्माननीय महापौरजी, सन्मानननीय सदन. मी सेक्शन वाचून दाखवितो.(वाचले) त्यामध्ये shall be हा शब्द वापरलेला आहे आणि ॲटोमेटीकली ते लागू झाले आहे ज्या दिवशी अमेडमेंट झाले त्या दिवशी लागू झाले. त्यामुळे याच्यामध्ये डिस्कशन करण्याचा काही विषय नाही.

श्री.प्रवीण दटके:- पाईट ऑफ आर्डर मा.महापौरजी, मा.अविनाश ठाकरे यांनी ज्या कलमाचे वाचन करण्याकरिता सांगितले त्या कलमाचे वाचन करण्यात यावे.

महापौर:- कलम १२४ 'ब' चे वाचन करावे.

श्री.प्रवीण दटके:-मा.महापौरजी, हा जो निर्णय राज्य सरकारने घेतला त्यावर महानगरपालिकेच्या स्तरावर निर्णय घ्यावयाचा आहे. तत्कालीन आयुक्तांनी यावर राज्य सरकारचा सल्ला मागितला. विधीमंडळात वरच्या सभागृहात चर्चा झाली त्यामुळे त्या त्या महानगरपालिकेला आपल्या स्तरावर हा निर्णय घ्यायचा आहे त्यामुळे हा काही शासनाचा निर्णय नाही. त्यामुळे जनतेवर अन्याय करणारा निर्णय घेवू नये हा विषय प्रशासनाला परत करावा अशी माझी सभागृहाच्या माध्यमातून आपल्याला विनंती आहे.

श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, ज्या पत्राचा उल्लेख मा.निगम आयुक्तांनी केला की यामध्ये शासनाची परवानगी मागितली होती. तर ते पत्र काय होते तर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन,नगररचना अधिनियम १९९६ कलम १२४ 'ब' (२) (१) 'अ' मधील तरतूदीनुसार आकारण्यात येणा-या विकास शुल्कात १०० टक्के वाढ करुन त्याची अंमलबजावणी घोषित केलेल्या क्षेत्राबाबत करण्याबाबत.असे पत्र पाठविण्यात आले जसे की आम्ही शासनाला विचारत आहे की ठराव झालेला आहे आणि महासभेने त्याला मान्यता दिलेली आहे. आणि त्याला भुरक्षित प्रभावाने त्याची अंमलबजावणी करावयाची काय? असे आशयाचे ते पत्र आहे. ते पत्र २०२० रोजी शासनाला पाठविण्यात आले. त्याच्यानंतर दुसरे असे आहे की शासनाकडून आलेले पत्र काय म्हणते तर १२४ 'ब' चा मध्ये काहीही संबंध येत नाही. शासनाकडून आलेल्या पत्रामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन,नगररचना अधिनियम १९९६ कलम १२४ 'ब' (२) (१) मधील तरतूदीच्या अधिनियमाच्या कलम १२४ 'ब' (२) च्या तरतूदी मध्ये बसविण्यात आलेल्या विकास आकारमध्ये अपेक्षित १०० टक्के वाढ भुरक्षित प्रभावाने म्हणजे ३०.०७.२०१६ पासून लावण्यात येईल. म्हणजे शासनाने स्पष्टपणे म्हटले आहे १२४ 'ब' आणि १२४ 'ब' (२) काय म्हणत आहे. तर १२४ 'ब' (२) म्हणत आहे की ठराव पारित झाल्यानंतर त्या ठरावाची माहिती प्रशासनाने शासनाला दयावी. त्या माहितीच्या आधारे लागू करावे. दुसरे या नस्तीचे वाचन केल्यानंतर असे लक्षात येईल की लिगल ओपिनियमच प्रशासनातर्फे घेण्यात आलेले नाही. आणि विदाऊट लिगल

ओपिनियम हा प्रस्ताव सु मोटो शासनाला पत्र पाठविण्यात आले आहे. शासनाला जे पत्र पाठविले त्याची भाषा सुध्दा हेच आहे. त्याचा नीट अभ्यास केला तर त्याचा अर्थ असा निघतो, आमची महानगरपालिकेची संम्मती दिली आहे आता आम्ही भुरक्षित प्रभावाने लागू करावे की काय? असे आशयाचे पत्र सुध्दा शासनाला पाठविण्यात आले.शासनाला सुध्दा अंधारात ठेवून शासनाची सुध्दा दिशाभूल करुन हा जो टीओडीचा डेटा शुल्क् आहे हा नागपूर शहराच्या जनतेवर लादण्यात आला आहे. मा.महापौरजी आपल्याला विनंती आहे, प्रशासनाला निर्देश दयावे, या संदर्भातील पुर्ण प्रक्रिया पुर्ण करावी. महासभेची मंजूरी घ्यावी त्यानंतर शासनाला पाठवावे. महासभेचा जो निर्णय आहे तो शासनाला कळवून या संदर्भातील निर्णय लागू करावा.

वरील चर्चेनंतर नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग, नकाशे /झोन नकाशे पुरविण्यासाठी आकारावयाचे सुधारीत दराबाबत.

**संदर्भ** :– शासन नगर विकास विभागाकडील निर्णय क्र. संकीर्ण –5019/प्र.क्र. 114/ 2019/नवि–27, दि. 28.10.2020.

नागपूर शहराची सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 31(1) अन्वये शासन, अधिसुचना नगर विकास विभाग क्र. टिपीएस – 2496 –2643– प्र.क्र. 300(अ)–97–नवि–9, दि. 07 जानेवारी 2000 अन्वये भागशः मंजुर झाली असून ती दि. 01 मार्च 2000 पासून अमंलात आली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसुचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस–2400–1628–सी.आर.–200–नवि–9, दि. 10.09.2001 अन्वये मंजुर झाली असून ती दि. 21.09. 2001 पासून अमंलात आलेली आहे. तसेच शासनाचे नगर विकास विभागाचे अधिसुचना क्र. टिपीएस – 2401–885–प्र.क्र.–76/नवि–9, दि. 27 फेब्रुवारी 2002 अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या क्षेत्रांअंतर्गत सात योजनांचे क्षेत्र वगळुन उर्वरीत नागपूर शहराकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले होते. तथापी शासनाकडील नगर विकास विभागाची अधिसूचनाक्र. टिपीएस–2419– 1419 –प्र. क्र.–154–2019–नवि–9, दि. 27 ऑगस्ट 2019 अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या कार्यक्षेत्राअंतर्गत असलेल्या सात योजनेकरीता सुध्दा नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे.

कृपया सोबत जोडलेल्या महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण–5019/प्र.क्र. 114/2019/नवि–27, मंत्रालय, मुंबई दि. 28.10.2020 अवलोकन व्हावे.

सादर निर्णयानूसार नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभागाकडील नकाशे/झोन नकाशे पुरविण्यासाठी आकारावयाचे सुधारीत दर निश्चित केलेले आहे. सदर दर खालीलप्रमाणे आहेत.

**<u>विवरण पत्र –अ</u>**

(अ) भाग नकाशे/ झोन दाखले Offline देण्याकरीता शुल्क दर्शविणारा तक्ता.

| अ. . | नकाशा/दाखला तपशिल | विद्यमान दर (रूपयांत) | सुधारीत दर (रूपयांत) |
|---|---|---|---|

| | | | | (Color प्रत) |
|---|---|---|---|---|
| | | Black & White प्रत | Color प्रत | |
| 1 | नकाशा पुर्ण आकार 20 x 30 से.मी. (A4-Size) | 30 | 60 | 700 |
| 2 | नकाशा 30 x45 से.मी. (A3- Size) | 40 | 80 | 1100 |
| 3 | नकाशा 45x 60 से.मी. (A2- Size) | 50 | 100 | 1500 |
| 4 | नकाशा 60x 90 से.मी. (A1- Size) | 60 | 120 | 2500 |
| 5 | नकाशा 75x105 से.मी.(A0- Size) | 80 | 160 | 6800 |
| 6 | नगर रचना योजनेतील एक अंतिम व त्याचा मुळ भुखंड दर्शविणारा भाग नकाशा | -- | 50 | 700 |
| 7 | नगर रचना योजनेतील दोन अंतिम व त्यांच्या मुळ भुखंडाचा भाग नकाशा | -- | 80 | 1500 |
| 8 | दोन पेक्षा अधिक अंतिम भुखंड व त्यांच्या मुळ भुखंडाचा भाग नकाशा | -- | 140 | 2500 |
| 9 | मंजुर नगर रचना योजनेतील अंतिम भुखंडाच्या सनदेच्या प्रथम प्रतीसाठी | -- | 50 | 3000 |
| 10 | मंजुर नगर रचना योजनेतील अंतिम भुखंडाच्या सनदेच्या दुसऱ्या प्रतीसाठी | -- | 40 | 800 |
| 11 | मंजुर नगर रचना योजनेच्या योजना पुस्तकामधील एका अंतिम भुखंडाच्या नोंदीच्या उताऱ्यासाठी | -- | 30 | 200 |
| 12 | मंजुर विकास योजना/प्रादेशिक योजनेमधील | -- | 30 | 300 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | एक स.नं. /गट नं. च्या प्रमाणपत्राच्या एका प्रतीसाठी | | | |
| 13 | विकास योजना नकाशे, भाग नकाशे यांची सिडी पुरविणे (1 जी.बी. पर्यंत सीडी साठी) | -- | -- | 500 |
| 14 | मंजुर रेखाकन/बांधकाम नकाशाच्या सत्यप्रती व आदेशाची (शिफारस) प्रत. | -- | -- | पत्राचे (आदेशाचे)<br>रू. 5/— प्रती पान<br>A- 4 रू. 50/—<br>A-3 रू. 100/—<br>A-2 रू. 150/—<br>A-1 रू. 200/—<br>(नकाशा) |

ब) भाग नकाशे / झोन दाखले Online पध्दतीने देणेकरीता शुल्क — नगर संचालनालयाच्या विविध कार्यालयाकडून A- 4 आकाराचे भाग नकाशे Online पध्दतीने उपलब्ध होण्यासाठी रू. 250/— प्रती सर्व्हे नंबर.

नागपूर महानगरपालिकेने यापुर्वी वरील बाबीकरीता आकारावयाचे प्रचलित शुल्क महाराष्ट्र शासन राजपत्रात दि. 17.07.2015 रोजी प्रसिध्द केलेले असून सध्या त्याप्रमाणेच शुल्क आकारणी करण्यात येत आहे, ते खालीलप्रमाणे आहे.

| **अ.** | **लोकसेवांची सुचि** | **आवश्यक कागदपत्रे** | **फी** | **नियत कालमर्यादा** | **पदनिर्देशीत अधिकारी** |
|---|---|---|---|---|---|
| 1 | झोन दाखला देणे (भाग नकाशाची प्रत देण्याबाबत. | 1) विहित नमुन्यातील अर्ज<br>2) 7/12 उतारा/सिटी सर्व्हे उतारा<br>3) मोजणी नकाशा /सिटी सर्व्हे नकाशा | रू. 300/— | 7 दिवस | संबंधीत कनिष्ठ अभियंता |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | भाग नकाशा देणे | 1) विहित नमुन्यातील अर्ज<br>2) 7/12 उतारा/सिटी सर्व्हे उतारा<br>3) मोजणी नकाशा /सिटी सर्व्हे नकाशा | रू. 300/— | 3 दिवस | संबंधीत कनिष्ठ अभियंता |

नागपूर महानगरपालिकाकडील प्रचलित शुल्क व शासनाने संदर्भीय निर्णयान्वये निर्धारीत केलेल्या शुल्कात तफावत असल्याने व प्रचलित दराने वरीलप्रमाणे भाग नकाशे/झोन दाखले अर्जदारांना देणेविषयीच्या खर्चात वाढ झालेली असल्याने नागपूर महानगरपालिकेच्या प्रचलित दरात सुध्दा शासन निर्णयाच्या अनुषंगाने वाढ करणे आवश्यक ठरते. त्यानूसार नागपूर महानगरपालिकेच्या नगर रचना विभागामार्फत पुरविण्यात येणाऱ्या भाग नकाशे/झोन दाखले या करीता शासन निर्णयानूसार आकारावयाचे शुल्कात खालीलप्रमाणे वाढ करणे आवश्यक आहे.

| **अ. .** | **नकाशा/दाखला तपशिल** | **विद्यमान दर (रूपयांत)** | | **सुधारीत दर (रूपयांत)**<br>**(Color प्रत)** |
|---|---|---|---|---|
| | | Black & White प्रत | Color प्रत | |
| 1 | नकाशा पुर्ण आकार 20 x 30 से.मी. (A4-Size) | 30 | 60 | 700 |
| 2 | नकाशा 30 x45 से.मी. (A3- Size) | 40 | 80 | 1100 |
| 3 | नकाशा 45x 60 से.मी. (A2- Size) | 50 | 100 | 1500 |
| 4 | नकाशा 60x 90 से.मी. (A1- Size) | 60 | 120 | 2500 |
| 5 | नकाशा 75x105 से.मी.(A0- Size) | 80 | 160 | 6800 |
| 6 | नगर रचना योजनेतील एक अंतिम व त्याचा मुळ भुखंड दर्शविणारा भाग नकाशा | -- | 50 | 700 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 7 | नगर रचना योजनेतील दोन अंतिम व त्यांच्या मुळ भुखंडाचा भाग नकाशा | -- | 80 | 1500 |
| 8 | दोन पेक्षा अधिक अंतिम भुखंड व त्यांच्या मुळ भुखंडाचा भाग नकाशा | -- | 140 | 2500 |
| 9 | मंजुर नगर रचना योजनेतील अंतिम भुखंडाच्या सनदेच्या प्रथम प्रतीसाठी | -- | 50 | 3000 |
| 10 | मंजुर नगर रचना योजनेतील अंतिम भुखंडाच्या सनदेच्या दुसऱ्या प्रतीसाठी | -- | 40 | 800 |
| 11 | मंजुर नगर रचना योजनेच्या योजना पुस्तकामधील एका अंतिम भुखंडाच्या नोंदीच्या उताऱ्यासाठी | -- | 30 | 200 |
| 12 | मंजुर विकास योजना/प्रादेशिक योजनेमधील एक स.नं. /गट नं. च्या प्रमाणपत्राच्या एका प्रतीसाठी | -- | 30 | 300 |
| 13 | विकास योजना नकाशे, भाग नकाशे यांची सिडी पुरविणे (1 जी.बी. पर्यंत सीडी साठी) | -- | -- | 500 |
| 14 | मंजुर रेखाकन/बांधकाम नकाशाच्या सत्यप्रती व आदेशाची (शिफारस) प्रत. | -- | -- | पत्राचे (आदेशाचे) रू. 5/— प्रती पान<br>A- 4 रू. 50/—<br>A-3 रू. 100/—<br>A-2 रू. 150/—<br>A-1 रू. 200/— (नकाशा) |

ब) भाग नकाशे झोन दाखले Online पध्दतीने देणेची प्रक्रिया सध्या नागपूर महानगरपालिकाकडून केल्या जात नसल्याने त्या बाबत धोरण भविष्यात निश्चित करणे उचित होईल.

तरी संबंधीत विवरण पत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे (अ) भाग नकाशे/ झोन दाखले Offline पध्दतीने जनतेला उपलब्ध करून देण्याकरीता शासनाचे संदर्भीय निर्णयाच्या धर्तीवर आकारवयाचे शुल्कात वाढ करणेकरीता मा. स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. मा. स्थायी समितीने सदर विषयास मान्यता प्रदान केलेनंतर त्याबाबत महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करणे व ज्या दिवशी महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द होईल त्या दिवसापासून वरील दर लागू होतील त्याअनुषंगाने वरीलप्रमाणे सुधारीत दरास मान्यता देणेचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून जो मुळ विषय आहे जो प्रशासनाने सभागृहाच्या पटलावर ठेवला आहे त्याची सभागृह एकमताने नोंद घेते. परंतु सन्माननीय सत्तापक्ष नेत्याने जो विषय मांडला आहे. ती मुळ नस्ती मी सुध्दा वाचली आहे. त्या मुळ नस्तीमध्ये सगळयात पहिला पॅरीग्राफ जो आहे त्यावेळीचे एडीटीपी विभागाचे सहा. संचालक श्री.गावंडे यांनी असे लिहिले आहे की मला असे वाटते की याची आवश्यकता नाही म्हणून याला सरसकट लागू करु शकतो. असे लिहिल्यानंतर त्या वेळेस निगम आयुक्त श्री.अभिजित बांगर यांनी असे लिहिले की या विषयावर लिगल ओपिनियम घेवून टाकावे. त्यानंतर महानगरपालिकेत कायद्याचे मोठे सल्लागार आयुक्त म्हणून नियुक्त झाले. त्यांनी कायद्याचा सल्ला न घेता स्वत: शासनाकडे पाठवून दिले की हे सरसकट बॅक इफेक्ट देवून लागू करण्यात यावा. शासन का उसपर परिपत्रक आया और शासन के परिपत्रक मे यह लिखा की १२४ (बी)अनुरुप इसका पालन किया जाये। शासन कि परिपत्रक मे १२४ (बी) का उल्लेख है। लेकिन प्रशासनने शासन के परिपत्रक मे १२४ (बी) का उल्लेख होने के बावजुद पालन न करते हुए सरसकट इसका नोटीफिकेशन निकाले के अखबार मे इसके ऑब्जेक्शन बुलाये गये और इसको राज्य शासन के निर्देश के अनुरुप लागू करने का निर्णय लिया गया। कही ना कही प्रक्रिया की त्रुटी है, इस प्रक्रिया की त्रुटी का संशोधन सभागृह मे लाके की किया जा सकता है। प्रशासन ने अगर निर्देश देने के बावजुद प्रक्रिया का पालन नही किया है तो हम उस प्रक्रिया का पालन करने के दृष्टी से आनेवाले सभागृह मे रितसर नियमित विषय के रुप मे इस विषय को सभागृह के पटल पर ले कर आये ऐसा मै प्रशासन को निर्देश देता हूॅ। या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्र.६६/वि.क्र.३२</u> :-** नागपुर महानगरपालिकेच्या मालकिच्या भुखंडाचे नुतनिकरण व **{मालमत्ता (स्थावर) विभाग}** हस्तांतरणाबाबत महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-ब दि. **13.09.2019** नगर विकास विभाग यांचे अधिसुचना महानगरपालिकेच्या सर्व सन्मानिय सदस्यांना माहिती होण्यास्तव सभागृहाचे पटलावर ठेवणे व धोरण निश्चित करणेबाबत.

उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने नागपुर महानगरपालिकेव्दारा नुतनिकरण, हस्तांतरण, अनधिकृत हस्तांतरण वापर बदल इ. बाबत वेळोवेळी घेण्यात आलेले मनपा ठराव क्र. **336** दि.

**25.11.2008,** मनपा ठराव क्र. **373** दि. **10.02.2009** व मनपा ठराव क्र. **299** दि. **20.10.2018** इ.. ठराव करण्यात आलेले आहे. या अनुषंगाने वरील ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाचे अधिसुचना दि. **13.09.2019** अन्वये कार्यवाही करण्यास शासनानी निर्देश दिलेले आहे, याबाबत खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे:

महानगरपालिका ठराव क्र. **336** दि. **25.11.2008,** मनपा ठराव क्र. **373** दि. **10.02.2009** व मनपा ठराव क्र. **299** दि. **20.10.2018** अन्वये नागपुर महानगरपालिका मालकिच्या मालमत्ता ज्या भाडेपट्टयानी दिलेल्या आहेत, अशा मालमत्तांचा भाडेपट्टा हस्तांतरण, नामांतरण, नुतनिकरण संबंधी कार्यवाही खालील प्रमाणे करणे अपेक्षित आहे. **:-**

1. नामांतरण प्रकरणे निकाली काढणे (मुद्दा क्र. **2**)
   - अ) भुखंडधारकांचे मृत्युनंतर वारसान हक्कानुसार नामांतरण करावयाचे झाल्यास रू. **1/-** प्रती चौ.फुट दराऐवजी सरसकट रू. **1,000/-** नामांतरण शुल्क आकारण्यात येईल.
   - ब) भुखंड अथवा बहुमजली सदनिकेच्या अनधिकृत हस्तांतरणा प्रकरणी नामांतरण करावयाचे असल्यास प्राप्त होणाऱ्या दंडाची रक्कम नामांतरण शुल्क गृहीत धरण्यात येईल.
   - क) भुखंड अथवा बहुमजली सदनिकेचे अधिकृत हस्तांतरण प्रकरणी नामांतरण करावयाचे असल्यास रू. **1/-** प्रती चौ.फुट दराने भुखंडाचे अथवा सदनिकेच्या क्षेत्रफळावर नामांतरण शुल्क आकारण्यात येईल.
2. रहिवासी/वाणिज्यिक/औदयोगिक स्वरूपाचे भुखंडाचे विभाजन हा ठराव मंजुर होण्यापुर्वी अनधिकृतपणे झाले असल्यास आणि हा ठराव मंजुर झाल्यानंतर प्रस्तावित विभाजन असल्यास अशी प्रकरणे विकास नियंत्रण नियमावलीचे तरतुदीनुसार नियमित करणे:- (मुद्दा क्र. 5)

   अशी विभाजनाची प्रकरणे नियमित करावयाची असल्यास विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार खालील प्रमाणे भुखंडाचे एकुण क्षेत्रफळावर प्रचलित बाजार मुल्य दरानुसार येणाऱ्या किंमतीवर खालील प्रमाणे विभाजन शुल्क आकारण्यात येईल.
   - अ) वारसान हक्कानुसार असल्यास **1** टक्के
   - ब) वारसान हक्काव्यतिरिक्त असल्यास **2** टक्के
3. रहिवासी/वाणिज्यिक/औदयोगिक स्वरूपाचे भुखंडाचे विभाजन हा ठराव मंजुर होण्यापुर्वी अनधिकृतपणे झाले असल्यास आणि हा ठराव मंजुर झाल्यानंतर प्रस्तावित विभाजन असल्यास अशी प्रकरणे विकास नियंत्रण नियमावलीचे तरतुदीनुसार नियमित करणे:- (मुद्दा क्र. 6)

   अशी विभाजनाची प्रकरणे नियमित करावयाची असल्यास विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार खालील प्रमाणे भुखंडाचे एकुण क्षेत्रफळावर प्रचलित बाजार मुल्य दरानुसार येणाऱ्या किंमतीवर खालील प्रमाणे विभाजन शुल्क आकारण्यात येईल.
   - अ) वारसान हक्कानुसार असल्यास **1.5** टक्के
   - ब) वारसान हक्काव्यतिरिक्त असल्यास **3** टक्के
4. रहिवासी/वाणिज्यिक/औदयोगिक स्वरूपाचे भुखंडाचे एकत्रिकरण हा ठराव मंजुर होण्यापुर्वी/ झाल्यानंतर अधिकृतपणे/अनधिकृतपणे झाले असल्यास अथवा प्रस्तावित परवानगी मागीत असल्यास अशी प्रकरणे विकास नियंत्रण नियमावलीचे तरतुदीनुसार नियमित करणे:- (मुद्दा क्र. 7)

   मनपाचे दोन किंवा त्यापेक्षा अधिक भुखंड एकत्रित करणे तसेच मनपा चे भुखंड व इतर भुखंड (खाजगी, शासकिय व इत्यादी) एकत्रिकरणाची प्रकरणे नियमित करावयाची असल्यास विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार खालील प्रमाणे भुखंडाचे एकुण क्षेत्रफळावर प्रचलित बाजार मुल्य दरानुसार येणाऱ्या किंमतीवर **1** टक्का एकत्रिकरण शुल्क आकारण्यात येईल.

**5.** रहिवासी वापराचे भुखंडावर भुखंडधारक स्वत:चे/स्वत:चे कुंटुंबाचे वापराकरीता घराचे किंवा सदनिकेचे बांधकाम करीत असल्यास त्याला कोणतेही शुल्क न आकारता नकाशाचे मंजुरीकरीता ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येईल. (मुद्दा क्र. **8**)

**6.** जे कॉर्नर चे भुखंड आहेत अशा ठिकाणी पुर्वी लिज देतांना टॅनजंट (गोलाकार) न कापता पुर्ण आयताकृती भुखंडाची लिज करून दिली होती. तसेच कॉर्नरचे भुखंड, नियमित भुखंडापेक्षा कमी किंवा जास्त क्षेत्रफळाचे असतांना अनेक ठिकाणी लिज देतांना त्या ले-आऊट मधिल नियमित भुखंडाचे क्षेत्रफळा ऐवढीच लिज करून देण्यात आलेली आहे.

वरील प्रकरणी लिज नविनिकरण करतांना प्रत्यक्षात मौक्यावर जागा मोजणी करून जागा कमी किंवा जास्त असेल, त्याप्रमाणे हे लिज नविनीकरण करण्यात येऊन आधी झालेल्या चुकीची दुरूस्ती करण्यात येईल. तसेच अशा भुखंडाची टॅन्जंट कापल्यावर गोलाकारामुळे जे क्षेत्रफळ कमी झाले, तेवढे कमी करून हे लिज नविनीकरण करण्यात येईल. भुखंड वाटपाचे वेळी जे क्षेत्रफळ प्रत्यक्षात दिले होते, परंतु लिजडिड करतांना त्या भुखंडाचे क्षेत्रफळ चुकीने कमी लिहील्या गेले, अशा प्रकरणात भुखंडाचे क्षेत्रफळ वाढले असल्यास अतिरिक्त जागेची किंमत, जागेचा ताबा ज्यावेळी दिला त्यावेळेच्या भुखंडाचा मुळ दराने वसुल करतांना येणाऱ्या रक्कमेवर ताबा दिल्याच्या दिवसापासुन द.सा.द.शे. **18%** दराने व्याज घेण्यात येईल. ही अट मुळ भुखंडधारकाला लागु राहील.

परंतु भुखंडाचे हस्तांतरण झाले असल्यास, अशा भुखंडाबाबत नगर रचना विभागाचे प्रचलित बाजार मुल्य् दरानुसार येणारी किंमत ही प्रिमियमची रक्कम म्हणुन गृहीत धरून आकारणी करण्यात येईल. तसेच सदर्हु रक्कमेवर **2.5** टक्के प्रमाणे वार्षीक ग्राऊँट रेंट आकारण्यात येईल. मात्र भुखंडाचा प्रचलित भुभाटक दर (ग्राऊँट रेंट) कायम ठेवण्यात येईल या शब्दलांचा समावेश करण्यात यावा. (मुद्दा क्र. **9**)

**7.** रहिवासी/वाणिज्यिक/औदयोगिक स्वरूपाचे भुखंडावर विकास नियंत्रण नियमावलीचे तरतुदीनुसार मंजुर नकाशाप्रमाणे बांधकाम करण्याकरीता बँकेकडुन कर्ज घेण्यासाठी परवानगी मागीत असल्यास अशा प्रकरणी भुखंडाचे एकुण क्षेत्रफळावर प्रचलित बाजार मुल्य दरानुसार येणाऱ्या किंमतीवर **0.5** टक्का शुल्क आकारून परवानगी देण्यात येईल. (सदनिकेच्या बाबतीत घटकाच्या त्याच्या वाटयाला असलेल्या जमिनीच्या अविभक्त किंमतीच्या हिस्स्याच्या किंमतीला अनुसरून हे शुल्क आकारण्यात येईल.) (मुद्दा क्र. **10**)

**8.** भुखंडाचे नामांतरण, नुतनिकरण, हस्तांतरण, विभाजन, एकत्रिकरण, बांधकाम परवानगी, बांधकामासाठी कर्ज घेण्यासाठी परवानगी, दस्ताऐवज नोंदणी इ.. करीता रू. **500/-** प्रशासकिय शुल्क आकारण्यात येईल. (मुद्दा क्र. **11**)

**9.** वरील परिच्छेद **1** ते **8** मध्ये सदनिकेचे क्षेत्रफळ म्हणजेच सदनिका किंवा गाळा यांचे संदर्भात त्या सदनिका किंवा गाळा धारकांच्या वाटयाला येणाऱ्या अविभक्त घटकांच्या जमिनीच्या हिस्स्याची किंमत गृहीत धरण्यात येईल. (मुद्दा क्र. **12**)

**10.** वरील परिच्छेदामध्ये उल्लेख केलेले प्रचलित बाजार मुल्य दर याचा अर्थ शासनाने जाहिर केलेले त्यावर्षीचे म्हणजेच विक्रिपत्र झालेल्या वर्षाचे प्रचलित गणना शिर्ष (रेडी रेकनर) गृहीत धरण्यात येईल.

प्रचलित गणना शिर्ष (रेडी रेकनर) अस्तित्वात येण्यापुर्वी (**1989** पुर्वी) त्यावेळेचे विक्रिमुल्य हे बाजार मुल्य म्हणुन गृहीत धरण्यात येईल. ( मुद्दा क्र. **13**)

मनपा ठराव क्र. **373** दि. **10.02.2009** मधील मुद्दयांचे ठरावाव्दारे सुधारणा करण्यात आलेल्या आहे, त्या याप्रमाणे :-

सुधारीत अट क्र. **06 :-** रहिवासी/वाणिज्यिक/औदयोगिक स्वरूपाचे भुखंडाचे विभाजन हा ठराव मंजुर झाल्यानंतर अनधिकृतपणे विभाजन झाले असल्यास अशी विभाजनाची प्रकरणे नियमित करावयाची असल्यास विकास नियंत्रण नियमावलीचे तरतुदीनुसार खालील प्रमाणे भुखंडाचे एकुण क्षेत्रफळावर प्रचलित बाजार मुल्य दरानुसार येणाऱ्या

किंमतीवर खालील प्रमाणे शुल्क आकारण्यात येईल.

अ) वारसान हक्कानुसार असल्यास **1.5** टक्के

ब) वारसान हक्काव्यतिरिक्त असल्यास **3** टक्के

क) तसेच ठराव मंजुर झाल्यानंतर भुखंडधारक भुखंड विभाजनाची परवानगी मागत असल्यास मुद्दा क्र. **5** मध्ये नमुद केलेले शुल्क आकारण्यात येईल. (मनपा ठराव क्र. **336** दि. **25.11.2008** अनु क्र. **2**)

मनपा ठराव क्र. **336** दि. **25.11.2008** व मनपा ठराव क्र. **299** दि. **20.10.2018** अन्वये सभागृहांनी घेतलेल्या निर्णयाप्रमाणे खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात येत होती :-

भाडेपट्टयांच्या नुतनिकरणाची कार्यवाही करतांना थकीत रकमेवर प्रत्यक्ष रक्कम भरण्याची नोटीस दिल्याच्या दिनांकापर्यंत व्याज आकारण्यात येणार नाही. तथापी रक्कम भरण्याचे नोटीस मधील मागणी कालावधीची मुदत संपल्यानंतर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनीयमातील तरतूदीनुसार **2** टक्के प्रतीमाह शास्ती आकारण्यात येईल.

उपरोक्त प्रश्न सभागृहाने विचारात घेतला आहे.

**1)** निवासी भाडेपट्टयाच्या नुतनिकरणाचे दर **0.04** टक्क्यावरून **0.02** टक्के करण्यात यावे. वाणिज्यिक व औद्योगीक भाडेपट्टयाच्या नुतनिकरणाचे दर जशाचे तसे ठेवण्यात यावे.धर्मदाय /सार्वजनिक प्रयोजनकरिता **0.02** टक्के करण्यात यावे.

**2)** भाडेपट्टयासंदर्भात यापुर्वी झालेले शर्तभंग नियमीत करतांना भाडेपट्टीच्या संदर्भात अटीशर्तीचा भंग झाला तर जमिनीच्या प्रचलित बाजारमुल्याच्या **10** टक्के घेण्यात येणारी अनर्जित रक्कम **6** टक्के करण्यात यावी. त्याचप्रमाणे जमीन वाणिज्यिक व औद्योगीक वापराकरिता येत असलेली **25** टक्के प्रचलित बाजारमुल्याची अनर्जित रक्कम **15** टक्केकरण्यात यावी. शैक्षणिक व धर्मादाय वापराकरिता **10** टक्क्याऐवजी दोन्ही ठिकाणी **6** टक्के करण्यात यावे.

**3)** भाडेपट्टीच्या जमिनीचे यापुढील हस्तांतरणास व वापरातील बदलास पुर्वपरवानगी देतांना“अ“प्रमाणे जमिनीच्या प्रचलित बाजारमुल्याच्या **5** टक्के ऐवजी **3** टक्के तसेच ‘ब“प्रमाणे जमिनीच्या प्रचलित बाजारमुल्याचे **40** टक्के अनर्जित रक्कमवरून **10** टक्के करण्यात यावी. वाणिज्यीक व औद्योगिक प्रयोजनासाठी वापरण्यात येत असल्यास जमीनीच्या प्रचलित बाजारमुल्याच्या **25** टक्के अनर्जित रक्कम **15** टक्के करण्यात यावे व “ब“मध्ये प्रचलित बाजारमुल्याच्या **50** टक्के रक्कम **40** टक्के करण्यात यावे. शैक्षणिक व धर्मदाय उपयोगाकरिता “अ“मध्ये **5** टक्के व “ब“मध्ये बाजारमुल्याच्या **20** टक्के अनर्जित रक्कम **10** टक्के करण्यात यावी. हे करीत असतांना **31** डिसेंबरपर्यंत अंतिम मुदत देण्यात यावी. **31** डिसेंबर नंतर जे नागरिक यामध्ये भाग घेणार नाही त्यांच्यावर **24** टक्के दरानी दंड आकारणे निश्चितपणाने झाले पाहिजे.

<u>महाराष्ट्र शासन राजपत्र</u>

असाधारण भाग चार - ब दि. **13** सप्टेंबर **2019** मधील अधिसुचना अन्वये कार्यवाही करणे अपेक्षित व मनपा ठराव क्र. **336** दि. **25.11.2008** व मनपा ठराव क्र. **299** दि. **20.10.2018** अन्वये कार्यवाही करणेबाबत तुलनात्मक विवरण

मुद्दा क्र. **2** - मनपा मालकिचे मालमत्तेचे भुभाडे

| अ.क्र. | दि. **13.09.2019** च्या अधिसुचनेतील **“**महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर/मालमत्ता भाडेपट्टा नुतनिकरण अथवा हस्तांतरण) नियम **2019”** अन्वये अटी व शर्ती | मनपा ठराव क्र. **336** दि. **25.11.2008,** मनपा ठराव क्र. **373** दि. **10.02.2009** व मनपा ठराव क्र. **299** दि. **20.10.2018** | दि. **13.09.2019** च्या अधिसुचनेतील “महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर/मालमत्ता भाडेपट्टा नुतनिकरण अथवा हस्तांतरण) नियम **2019** या तरतुदी अंतर्गत अनुसरून सध्या मंजुर मनपा ठरावानुरूप सुरू असलेल्या कार्यवाहीस करावयाचा अपेक्षित बदल |
|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** |
| **1** | भुखंडाचे वार्षिक भाडे मालमत्तेच्या मुल्यांकनावर **8%** किंवा बाजारभावानुसार जे जास्त असेल ते निश्चित करावे | अ) निवासाकरीता - **0.02%**<br>ब) वाणिज्यिक/औदयोगिक - **0.05%, 0.07%, 0.09%** व **0.10%**<br>क) धर्मदाय व सार्वजनिक करीता - **0.02%** | भुभाडयामध्ये कमीत कमी **80** पट वाढ करणे अपेक्षित आहे. |

मुद्दा क्र. **3** - मनपा मालकिचे मालमत्तेचे भाडेपट्टा नुतनिकरण, हस्तांतरण करण्याकरीता

| अ.क्र. | दि. **13.09.2019** च्या अधिसुचनेतील **“**महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर/मालमत्ता भाडेपट्टा नुतनिकरण अथवा हस्तांतरण) नियम **2019”** अन्वये अटी व शर्ती | मनपा ठराव क्र. **336** दि. **25.11.2008,** मनपा ठराव क्र. **373** दि. **10.02.2009** व मनपा ठराव क्र. **299** दि. **20.10.2018** | दि. **13.09.2019** च्या अधिसुचनेतील “महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर/मालमत्ता भाडेपट्टा नुतनिकरण अथवा हस्तांतरण) नियम **2019** या तरतुदी अंतर्गत अनुसरून सध्या मंजुर मनपा ठरावानुरूप सुरू असलेल्या कार्यवाहीस करावयाचा अपेक्षित बदल |
|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** |
| **1** | महानगरपालिकेच्या मालमत्तेचे/ भाडेपट्ट्याचे नुतनीकरण व हस्तांतरण.<br>(१) अशा मालमत्तांच्या मुल्यांकना साठी जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त आणि सह जिल्हा निबंधक | नागपुर शहर महानगरपालिका अधिनियम **1948** च्या तरतुदी नुसार यापुर्वी भाडेपट्टयाने नागपुर महानगरपालिकेच्या जागा देण्यात आलेल्या आहेत.<br>महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे | निरंक |

| | | | |
|---|---|---|---|
| | (मुद्रांक) यांची समिती असेल. ही समिती, अशा मालमत्तांचे मूल्यांकन महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेचे वास्तव बाजारमूल्य निर्धारित करणे) नियम, १९९५ नुसार बाजार मूल्यांच्या अनुषंगाने निश्चित करेल. | कलम **79** (ड) च्या तरतुदीनुसार नागपुर महानगरपालिकेची मालमत्ता बाजार मुल्यापेक्षा कमी असु नये, अशा जागा भाडेपट्टयाने देणे अपेक्षित असल्याने आजच्या सिघ्रसिध्द गणकानुसार जागेचे मुल्यांकन निश्चित करून जागा भाडेपट्टयाने देण्यात येते. | |
| **2** | मालमत्तेच्या मुल्यांकनाच्या **8%** रक्कम किंवा, बाजार भावानुसार निश्चित होणारे वार्षिक भाडे, यापैकी जे जास्त असेल तेवढे वार्षिक भाडे या समितीमार्फत निश्चित करण्यात यावे | स्तंभ क्र. **3** मध्ये उल्लेखित मनपा ठरावानुसार हस्तांतरण करणेकरीता वैद्यरित्या परवानगी घेतल्यास **0.02%** शुल्क आकारणी करणे. अनधिकृत हस्तांतरण झाल्यास स्तंभ क्र. **3** मध्ये उल्लेखित मुद्दयानुसार शुल्क नियमित करण्यात येते. उदा. शिवनगर (सक्करदारा) **1200** चौ.फुट/**111.78** चौ.मी. **x**<br><br>रू. **34,210/-** = रू. **38,13,731/-** येणाऱ्या मुल्यावर **0.02%** = रू. **763/-** ग्राऊँट रेट आकारणी करण्यात येते. | परंतु राजपत्रातील अटीप्रमाणे सदयाचे प्रचलित निर्णयानुसार आकारण्यात येणारे रू. **763/-** ऐवजी रू. **3,05,098/-** वार्षिक भाडे आकारणे अपेक्षित आहे. |
| **3** | महानगरपालिकेच्या मालमत्तांचे भाडेपट्टा नुतनीकरण अथवा हस्तांतरणासाठीची पात्रता/अटी :----<br>**1.** ज्या मालमत्ता अधिनियमातील तरतुदीनुसार व जाहीर लिलाव प्रक्रियेचा अवलंब करून भाडेपट्टयाने अथवा हस्तांतरीत करण्यात आल्या आहेत. | नागपुर शहर महानगरपालिका अधिनियम **1948** च्या तरतुदी नुसार यापुर्वी भाडेपट्टयाने नागपुर महानगरपालिकेच्या जागा देण्यात आलेल्या आहेत.<br><br>नागपुर शहर महानगरपालिका अधिनियम **1948** च्या तरतुदी व सभागृहाचे वेळोवेळी निर्णयानुसार **Already** मनपा अभिन्यासातील भुखंड/जागा भाडेपट्टयाने देण्यात आलेले आहेत. | सिम्बॉयसिस या संस्थेला दिलेली मालमत्ता वगळता नागपुर महानगरपालिकेची कोणतीही मालमत्ता लिलाव प्रक्रीयेचा अवलंब करून देण्यात आलेली नाही. |
| | **2.** महानगरपालिकेच्या ज्या मालमत्तांचे हस्तांतरण वैध रित्या झाले आहे. | हस्तांतरणास परवानगी मागितलेली असता, मनपा ठराव क्र. **299** दि. **20.10.2018** नुसार कार्यवाही करण्यात येते. रहिवासी वापराकरीता **3%** व वाणिज्यिक वापराकरीता **15%**<br><br>पुर्व परवानगी न घेता हस्तांतरण झालेले | भुखंड परत घेणे अपेक्षित आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | असल्यास रहिवासी वापराकरीता **10%** व वाणिज्यिक वापराकरीता **40%** आकारून भाडेपट्टयाचे नुतनिकरण व हस्तांतरणाचे नियमितीकरण करण्यात येते. | |
| | **3.** संबंधित मालमत्तेबाबतचे सर्व कर आणि भाडे भाडेपट्टाधारकाने भरलेले असावे आणि भाडेपट्टा धारकाकडे भाडेपट्ट्याची रक्कम किंवा कोणत्याही प्रकारच्या कराची रक्कम थकीत नसावी. | नुतनिकरण व हस्तांतरण करतेवेळी थकित रक्कम वसुल करण्यात येते. नुतनिकरण<br><br>**a)** भाडेपट्टयाची मुदत संपेण्या पुर्वीच नुतनिकरणाबाबत अर्ज सादर केल्यास प्राथमिक मुल्य रू. **500/-** व आजच्या बाजार मुल्यावर भुभाडेचे आकारणी दरांनी **0.02%, 0.05%, 0.07%, 0.10%**<br><br>**b)** भाडेपट्टयाची मुदत संपल्या नंतर अर्ज सादर झाल्यास करारनाम्यावरील शर्तींचा भंग केल्याचे गृहीत धरून बाजार मुल्याच्या **6%** रहिवासी वापराकरीता व वाणिज्यिक वापराकरीता **15%** मुल्य आकारून भाडेपट्टयाचेनुतनिकरण करणे.<br><br><u>हस्तांतरण</u><br><br>**a)** अनधिकृत (पुर्व परवानगी) रहिवासी - **3%** वाणिज्यिक - **15%**<br><br>**b)** विना परवानगी<br><br>रहिवासी - **10%**<br><br>वाणिज्यिक - **40%**<br><br>शैक्षणिक - **10%** | भुखंड परत घेणे अपेक्षित आहे. |
| | **4.** सदर नियमावली पूर्वी भाडेपट्ट्याची मुदत संपलेल्या तथापि, नुतनीकरण न झालेल्या वैध भाडेपट्ट्याचे नुतनीकरण/ हस्तांतरण हे या नियमातील पात्रते संबंधी असलेल्या तरतुदीनुसार करण्यात येईल. तथापि, ज्या प्रकरणात भाडेपट्ट्याची रक्कम संबंधितांनी भरलेली नसेल, अशा | **(A)** भाडेपट्टा नुतनिकरण/हस्तांतरण (पुर्व परवानगी) करण्याची विहित मुदतीत न केल्यास ठराव क्र. **299** अन्वये अधिकृत हस्तांतरण प्रकरणात निवासी **6%** वाणिज्यिक/औदयोगिक करिता **15%** व शैक्षणिक/धर्मादाय करिता **5%** रक्कम वसुल करण्यात येते. | सदर नियमावलीतील पात्रतेसंबंधी पुर्तता होत असल्यास नुतनिकरण करणे अपेक्षित आहे. अपात्र होणाऱ्या भाडेपट्टाधारकाचे भाडेपट्टयाचे नुतनिकरण न करता भुखंड परत घेणे अपेक्षित आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | प्रकरणांत महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेचे वास्तव बाजारमुल्य निर्धारित करणे) नियम, १९९५ नुसार बाजार मूल्यांच्या अनुषंगाने मालमत्तेच्या होणाऱ्या मुल्यांकनाच्या **8%** रक्कम अधिक अधिनियमातील तरतुदीनुसार दरमहा **2%** इतके व्याजासह आकारणी करण्यात यावी. | **(B)** अनधिकृत हस्तांतरण प्रकरणात (विना परवानगी) तसेच पुर्ण परवानगी न घेता हस्तांतरण व वापर बदल झाल्यास अ. क्र. **4%**<br>रहिवासी - **10%**<br>वाणिज्यिक - **40%**<br>शैक्षणिक - **10%** | |
| | **5.** सदर भाडेपट्टाधारकाने भाडेपट्ट्या संदर्भात यापूर्वी करण्यात आलेल्या करारनाम्यातील अटी-शर्तीचा भंग केलेला नसावा. | सदर भाडेपट्टाधारकाने भाडेपट्टा संदर्भात यापुर्वी करण्यात आलेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग केलेला असल्यास उपरोक्त अ.क्र. **3** व **4** अन्वये दंड आकारून भाडेपट्टा नियमित करण्यात येते. | करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग झालेला असल्यास संबंधित भाडेपट्टा धारकाने भाडेपट्टा नुतनिकरण व हस्तांतरण करीता अपात्र ठरविणे अपेक्षित आहे. |
| | **6.**भाडेपट्टाधारकास त्याने धारण केलेल्या मालमत्तेच्या भाडेपट्ट्याचे नुतनीकरण करावयाचे असल्यास, करारनाम्याची मुदत संपण्यापूर्वी संबंधिताने किमान तीन महिने अगोदर महानगरपालिकेस लेखी कळविणे आवश्यक आहे.<br>परंतु, अशा प्रकारे संबंधित भाडेपट्टा धारकाने महानगरपालिकेस कळविले नसल्यास, महानगरपालिकेने संबंधितांस नोटीस देऊन मालमत्ता महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्याबाबतची कार्यवाही करावी. | करारनाम्यातील अटीप्रमाणे भाडेपट्टयाचे कालावधी संपण्यापुर्वी विनंती अर्ज सादर करणे आवश्यक आहे. परंतु किती कालावधी पुर्वी भाडेपट्टा नुतनिकरण करून देणेबाबत अर्ज सादर करणेबाबत कालावधीचा उल्लेख नाही. परंतु उशिरा अर्ज सादर झाला तरी अनु. क्र. **3** व **4** अन्वये दंड आकारून अर्ज विचारात घेवुन भाडेपट्टयाचे नुतनिकरण करण्यात येते. | भाडेपट्टा संपुष्ठात येणाऱ्या कालावधीच्या तीन महिने पुर्वी भाडेपट्टाधारकाने भाडेपट्टा नुतनिकरणाकरीता अर्ज सादर करणे अभिप्रेत आहे. तशा प्रकारची दुरूस्ती भाडेपट्टा करारनाम्यात करणे सोईचे होईल. |
| **4** | भाडेपट्ट्याचे नुतनीकरण हे कमाल दहा वर्षांसाठी असेल. | सदय:स्थितीत भाडेपट्टा **30** वर्षीय कालावधी करीता करण्यात येत आहे. | राजपत्रातील नियमावलीतील तरतुदीनुसार दुरूस्ती करावी लागेल. |
| **5** | भाडेपट्ट्याने देण्यात आलेली मिळकत ही हस्तांतरण / तारण / गहाण ठेवता येणार नाही. अथवा अन्य कोणत्याही प्रकारे त्रयस्थ पक्षाचे हितसंबंध त्यावर | मनपा ठराव क्र. **336** दि. **25.11.2008,** मनपा ठराव क्र. **373** दि. **10.02.2009** व मनपा ठराव क्र. **299** दि. **20.10.2018** नुसार भुखंड बांधकामाकरीता व | राजपत्रातील नियमावलीतील तरतुदीन्वये<br>ना-हरकत देता येणार नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| | प्रस्थापित करता येणार नाहीत. | तारण/गहाण ठेवण्याकरीता बाजार मुल्याच्या **0.05%** शुल्क आकारून ना-हरकत देण्यात येते. | |
| **6** | भाडेपट्टा धारकाने महानगरपालिकेच्या मालमत्तेवर कोणतेही हितसंबंध प्रस्तापित करू नयेत. | सदयस्थितीत परस्पर हितसंबंध प्रस्थापित करून वारसा हक्काने किंवा विक्रि करून अनधिकृतरित्या इतरांना हस्तांतरण केल्यास शर्ती व अटींचा भंग झाल्याचे गृहीत धरून अनु. क्र. **3** व **4** प्रमाणे दंड आकारून नियमितीकरण करण्यात येणे | स्वत:चीच मालमत्ता समजुन मनपाचे स्थावर विभागाची अनुमती न घेता वारसा हक्काने किंवा खरेदी खतने हितसंबंध प्रस्थापित करता येणार नाहीत. |
| **7** | ज्या कारणासाठी गाळा भाडेपट्टयाने दिला आहे त्याच कारणासाठी गाळयाचा वापर अनुज्ञेय असेल | ज्या कारणासाठी भुखंड देण्यात आलेला आहे, त्या कारणासाठी वापर करणे भाडेपट्टयात नमुद आहे. प्रत्यक्ष मौक्यावर आढळलेल्या वापर व भाडेपट्टा करारनाम्यातील अटीनुसार अनुज्ञेय वापर हयामध्ये बदल आढळल्यास अनु. क्र. **3** व **4** अन्वये दंड आकारून नियमितीकरण करण्यात येते. | भाडेपट्टाधारकाने वापर बदल केल्यास भुखंड/गाळा परत घेणे अपेक्षित आहे. |
| **8** | शासनास तसेच महानगरपालिकेस नियमानुसार देय असलेले सर्व कर विहीत वेळेत भाडेपट्टाधारकाने भरणे आवश्यक आहे. तसेच याबाबत करारनाम्यात उल्लेख करण्यात यावा. | शासनास तसेच नागपुर महानगरपालिकेचे नियमानुसार घेणे असलेले सर्व कर विहीत वेळेत भाडेपट्टाधारकाने भरणे आवश्यक असल्याचा उल्लेख भाडेपट्टा करारनाम्यात करण्यात आलेला आहे. | निरंक |
| **9** | भाडेपट्ट्येधारकाने शासनाच्या तसेच, महानगरपालिकेच्या देय असलेल्या रकमा विहित कालावधीत अदा न केल्यास नियमानुसार कार्यवाही करून, सदर मिळकत महानगरपालिकेकडे जमा करण्यास पात्र राहील. तसेच, प्रलंबित रकमा या संबंधित भाडेपट्टा धारकांकडून त्यांच्या अनामत रकमेतून तसेच, त्यातून अपेक्षित वसुली न झाल्यास सदर रकमेची वसुली महाराष्ट्र जमीन महसूल संहिता तरतुदीनुसार | संबंधीत भाडेपट्टाधारकाकडे उक्त मिळकतीकरीता शासनाचे/निमशासकिय संस्थेचे कोणतेही थकबाकी असल्यास उक्त थकबाकी जमा करण्याची खात्री पटवुन भाडेपट्टयाचे नुतनिकरण व हस्तांतरण करण्यात येते. | निरंक |

| | | | |
|---|---|---|---|
| | करण्यास पात्र राहील. | | |
| 10 | महानगरपालिकेमार्फत भाडेपट्ट्याने देण्यात आलेल्या मिळकतीशिवाय अतिरिक्त जागेचा वापर अथवा अतिरिक्त बांधकाम करता येणार नाही. अशा प्रकारचा वापर आढळून आल्यास शर्तभंग समजण्यात येऊन महानगरपालिकेमार्फत तशी नोटीस देऊन सदर मालमत्ता परत घेण्याची कार्यवाही करण्यात यावी. | सदयस्थितीत अशा परिस्थितीवेळी भुखंडालगत असलेली व **Non-buildable** असलेली जागा संबंधीत भुखंडधारकांकडुन बाजार मुल्यानुसार प्रिमियम रक्कम वसुल करून भाडेपट्टयानी जागा हस्तांतरीत करण्यात येते. (मनपा ठराव क्र. **336** दि. **25.11.2008** मधील मुद्दा क्र. **9** अन्वये कार्यवाही करण्यात येते. | मुळ भाडेपट्टयातील क्षेत्रापेक्षा अधिकचे क्षेत्र वापरात असल्यास सदर अधिकचे क्षेत्र परत घेणे अपेक्षित आहे |
| 11 | महानगरपालिकेची पूर्वपरवानगी न घेता वापरात बदल करण्यात आल्यास शर्तभंग, तसेच करारनाम्याचा भंग समजण्यात येऊन भाडेपट्ट्याचे नुतनीकरण रद्द करण्याबाबत महानगरपालिकेने नियमोचित कार्यवाही करावी. | महानगरपालिकेची पुर्व परवानगी न घेता वापरात बदल करण्यात आल्यास शर्तभंग ग़हीत धरून अनु. क्र. **3** व **4** अन्वये दंड आकारून नियमितीकरण करण्यात येते. | राजपत्रातील नियमावलीतील तरतुदीन्वये उक्त भुखंडाचे भाडेपट्टा रद्द करणे अपेक्षित आहे. |
| 12 | भाडेपट्ट्याचे नुतनीकरण करतांना भाडेपट्टा करार नोंदणीकृत करावा. तसेच, करारनामा करतांना मूळ भाडेपट्टा करारातील अटी व शर्ती देखील विचारात घेऊन, महानगरपालिकेस आवश्यक वाटतील त्या अतिरिक्त अटी-शर्ती करारनाम्यात अंतर्भूत कराव्यात. | सभागृहांनी वेळोवेळी निर्णय घेवुन निश्चित केलेल्या अटी व शर्ती करारनाम्यात अंतर्भुत करून भाडेपट्टा करारनामा नोंदणीकृत करण्यात येते. | निरंक |

<u>माहितीस्तव व धोरण निश्चिती करणेबाबत प्रस्ताव</u>

दि. **13.09.2019** नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासनाने प्रसिध्द केलेल्या राजपत्रातील अधिसुनेतील **“**महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर/मालमत्ता, भाडेपट्टा नुतनिकरण अथवा हस्तांतरण) नियम **2019”** तरतुदी अशा आहेत की, महानगरपालिके च्या मालमत्तेचे/भाडेपट्टयांचे नुतनिकरण व हस्तांतरण मालमत्तेच्या मुल्यांकनाच्या **8%** रक्कम किंवा, बाजार भावानुसार निश्चित होणारे वार्षिक भाडे, यापैकी जे जास्त असेल तेवढे वार्षिक भाडे या समितीमार्फत निश्चित करण्यात यावे, सदर भाडेपट्टेधारकाने भाडेपट्टे संदर्भांत यापुर्वी करण्यात आलेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग केलेला नसावा, भाडेपट्टाधारकास त्याने धारण केलेल्या मालमत्तेच्या भाडेपट्टयाचे नुतनिकरण करावयाचे असल्यास, करारनाम्याची मुदत संपण्यापुर्वी संबंधिताने किमान तीन महिने अगोदर महानगरपालिकेस लेखी कळविणे आवश्यक आहे, भाडेपट्टयाचे नुतनिकरण हे कमाल दहा वर्षांसाठी असेल, भाडेपट्टयाने देण्यात आलेली मिळकत ही हस्तांतरण/तारण /गहाण ठेवता येणार नाही. अथवा अन्य कोणत्याही प्रकारे त्रयस्थ पक्षाचे हितसंबंध त्यावर

प्रस्थावित करता येणार नाही, भाडेपट्टेधारकाने शासनाच्या तसेच महानगरपालिके च्या देय असलेल्या रकमा विहित कालावधीत अदा न केल्यास नियमानुसार कार्यवाही करून, सदर मिळकत महानगरपालिकेकडे जमा करण्यास पात्र राहील. तसेच, प्रलंबित रकमा या संबंधित भाडेपट्टाधारकांकडुन त्यांच्या अनामत रकमेतुन तसेच, त्यातुन अपेक्षित वसुली न झाल्यास सदर रकमेची वसुली महाराष्ट्र जमिन महसुल संहिता तरतुदीनुसार करण्यास पात्र राहील व महानगरपालिकेची पुर्व परवानगी न घेता, वापर बदल करण्यात आल्यास शर्तभंग तसेच करारनाम्याचा भंग समजण्यात येवुन भाडेपट्टयाचे नुतनिकरण रद्द करण्याबाबत महानगरपालिकेने नियमोचित कार्यवाही करावी. म्हणजेच भाडेपट्टा करारनाम्यातील कोणत्याही अटींचे उल्लंघन भाडेपट्टाधारकाने केल्यास भाडेपट्टाधारकाकडुन उक्त जागा/भुखंड/मालमत्ता नागपुर महानगरपालिकेकडे परत घेणे बंधनकारक आहे. सदर नियमावली महानगरपालिकेच्या सभागृहाचे सर्व सन्मानिय सदस्यांना माहिती होण्यास्तव सभागृहाचे पटलावर नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन दि. **13.09.2019** ची अधिसुचना ठेवण्यात येत आहे.उपरोक्त विषय सभागृहाने विचारात घेतला

श्री.संदीप जोशी:- मा.महापौरजी, आपल्याला या विषयाच्या मुळाशी जाणे अत्यंत आवश्यक आहे. १९२७ साली महानगरपालिकेचे ४३०० प्लॉट होते हे ४३०० प्लॉटला पहिल्यांदा लीजकरिता देण्याचा निर्णय झाला आणि ३० वर्षाचे स्थायी पट्टे पर्टिक्युलर लीजवर देण्याचे निश्चित झाले. आश्चर्य असे आहे की १९२७ मध्ये २००० ते २५०० हे पट्टे ३० वर्षाच्या लीजवर सर्वसामान्य नागरिकांना नासुप्रमार्फत देण्यात आले. हे देत असतांना हा संपुर्ण विषय बघता या विषयाचे दोन भाग करणे अत्यंत आवश्यक आहे. पहिला भाग महानगरपालिकेने २००८, २००९ आणि २०१८ साली विविध प्रकारचे ठराव पास केलेले आहेत. लीज देण्याच्या संदर्भात केलेले आहे आणि हे होत असतांना १३ सप्टेंबर २०१९ रोजी महाराष्ट्र शासनाचे एक नोटीफिकेशन आले. १३ सप्टेंबर २०१९ रोजीचे महाराष्ट्र शासनाचे नोटीफिकेशन जर तुम्ही आणि मी बघितले तर या नोटीफिकेशन एक आश्चर्य आहे. या नोटीफिकेशनचा महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर कुठल्याही प्रकारचा उल्लेख नाही. महाराष्ट्र शासनाने ज्यावेळी हे नोटीफिकेशन आले त्यावेळी महाराष्ट्र मध्ये निवडणुका सुरु होत्या. निवडणुकीच्या काळामध्ये हे नोटीफिकेशन चालू झाले आहे. यासाठी ४३०० प्लाटधारकांना या महाराष्ट्र शासनाच्या नोटीफिकेशनमुळे प्रचंड प्रमाणात मानसिक त्रास सहन करावा लागला. अनुक्रमांक १ मध्ये बघाल तर कमीत कमी ८० पट वाढ आहे ज्या ठिकाणी १० हजार रुपये वाढ असेल त्या ठिकाणी ८० पट वाढ आहे. या नोटीफिकेशनमुळे जर एका सर्व सामान्य नागरिकाने जर चुकुन काही वेळ लावला तर त्याचा भुखंड परत देण्याचे या नोटीफिकेशनमुळे निश्चित आहे. यामध्ये सध्याच्या प्रचलित अटीनुसार जे भाडे आकारण्यात येते ते ७५३ आकारण्यात येते. ते निश्चित वाढविल्या पाहिजे परंतु ७५३ च्या ऐवजी किमान ५ हजार रुपये भाडे देणे आणि त्याच्यामध्ये अशाप्रकारचे नोटीफिकेशन घेतले आहे त्याच्यामध्ये माझी अशा प्रकारची विनंती आहे. महाराष्ट्र शासनाला हे नोटीफिकेशन परत घेण्याकरिता आणि पुर्नविचार करण्याकरिता महाराष्ट्र शासनाला हे नोटीफिकेशन वापस पाठविले पाहिजे. त्याच्यामध्ये दुसरा विषय आहे, नागपूर महानगरपालिकेने ३ ठराव पारित झाले आहे त्या ३ ठरावामध्ये ज्यावेळी ३० वर्षाची लीज आहे. १९२७ ते १९५७, १९५७ ते १९८७ आणि १९८७ ते २०१७. १९२७ ते १९५७ ज्या अटीशर्ती होत्या त्या १९५७ ते १९८७ पर्यंत ज्या अटीशर्ती होत्या त्या तशाच आहेत मात्र २०१७ नंतर त्यात बदल करण्यात आला. तर बदल कसा झाला तर माझ्या माहितीनुसार सांगतो, महानगरपालिकेचा ठराव घेवून बदल केला नाही. असे ठराव सुध्दा महासभेमध्ये झाले नाही. काही गोष्टी आपण

केव्हाही केल्या. हे सगळे करीत असतांना सर्वसामान्य भुखंडधारकांना ग्राहय धरुन करण्यात आले. यामध्ये ३ ठराव आहेत महानगरपालिका म्हणजे लोकाभिमुख भुमिका घेणे, लोकांच्या हितासाठी भुमिका घेणे आणि लोकांशी चर्चा घेवून भुमिका घेणे हे नितांत आवश्यक आहे. परंतु दुर्दैवाने हे होत नाही म्हणून माझी आपणाला विनंती आहे. यामध्ये एक समिती बनवून पुढच्या सभागृहाच्या आत त्या समितीत या नागपूर शहरातील ४३०० प्लॉट धारकांच्या प्रतिनिधींना चर्चेसाठी बोलावून त्यांच्याकडून त्यांची बाजू ऐकुन घ्यावी. त्यांची बाजू ऐकुन हा संपुर्ण विषय पुढच्या सभागृहात पुन्हा सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावा. जो जी.आर.आहे १३ सप्टेंबर २०१९ चा तो पुनर्विचारकरिता महानगरपालिकेने महाराष्ट्र शासनाला पाठवावा.

श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, सन्माननीय माजी महापौर श्री. संदीप जोशी यांनी जे वक्तव्य केले आहे. ते सुध्दा महापौर असतांना त्यांच्या भागातील नागरिकांनी त्यांना या संदर्भात अनेक निवेदने दिलेली आहेत त्याबाबत काही चर्चा सुध्दा झालेली आहे. त्यामुळे माझी आपल्याला विनंती आहे आपला जो २०१८ चा ठराव आहे त्या ठरावाच्या अनुषंगाने त्या नागरिकांनी त्यांची भावना त्या वेळेस त्यांनी व्यक्त केल्या होत्या. त्या सर्वाचा विचार करता मा.संदीप जोशी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती बनविण्यात यावी त्या समितीचा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावा आणि हा विषय शासनाला परत पाठविण्यात यावा.

वरील चर्चेनंतर नागपुर महानगरपालिकेच्या मालकिच्या भुखंडाचे नुतनिकरण व हस्तांतरणाबाबत महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-ब दि. **13.09.2019** नगर विकास विभाग यांचे अधिसुचना महानगरपालिकेच्या सर्व सन्मानिय सदस्यांना माहिती होण्यास्तव सभागृहाचे पटलावर ठेवणे व धोरण निश्चित करणेबाबत.

उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने नागपुर महानगरपालिकेव्दारा नुतनिकरण, हस्तांतरण, अनधिकृत हस्तांतरण वापर बदल इ. बाबत वेळोवेळी घेण्यात आलेले मनपा ठराव क्र. **336** दि. **25.11.2008,** मनपा ठराव क्र. **373** दि. **10.02.2009** व मनपा ठराव क्र. **299** दि. **20.10.2018** इ.. ठराव करण्यात आलेले आहे. या अनुषंगाने वरील ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाचे अधिसुचना दि. **13.09.2019** अन्वये कार्यवाही करण्यास शासनानी निर्देश दिलेले आहे, याबाबत खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे:

महानगरपालिका ठराव क्र. **336** दि. **25.11.2008,** मनपा ठराव क्र. **373** दि. **10.02.2009** व मनपा ठराव क्र. **299** दि. **20.10.2018** अन्वये नागपुर महानगरपालिका मालकिच्या मालमत्ता ज्या भाडेपट्टयानी दिलेल्या आहेत, अशा मालमत्तांचा भाडेपट्टा हस्तांतरण, नामांतरण, नुतनिकरण संबंधी कार्यवाही खालील प्रमाणे करणे अपेक्षित आहे. **:-**

**11.** नामांतरण प्रकरणे निकाली काढणे (मुद्दा क्र. **2**)

आ) भुखंडधारकांचे मृत्युनंतर वारसान हक्कानुसार नामांतरण करावयाचे झाल्यास रू. **1/-** प्रती चौ.फुट दराऐवजी सरसकट रू. **1,000/-** नामांतरण शुल्क आकारण्यात येईल.

भ) भुखंड अथवा बहुमजली सदनिकेच्या अनधिकृत हस्तांतरणा प्रकरणी नामांतरण करावयाचे असल्यास प्राप्त होणाऱ्या दंडाची रक्कम नामांतरण शुल्क गृहीत धरण्यात येईल.

ख) भुखंड अथवा बहुमजली सदनिकेचे अधिकृत हस्तांतरण प्रकरणी नामांतरण करावयाचे असल्यास रू. **1/-** प्रती चौ.फुट दराने भुखंडाचे अथवा सदनिकेच्या क्षेत्रफळावर नामांतरण शुल्क आकारण्यात येईल.

12. रहिवासी/वाणिज्यिक/औदयोगिक स्वरूपाचे भुखंडाचे विभाजन हा ठराव मंजुर होण्यापुर्वी अनधिकृतपणे झाले असल्यास आणि हा ठराव मंजुर झाल्यानंतर प्रस्तावित विभाजन असल्यास अशी प्रकरणे विकास नियंत्रण नियमावलीचे तरतुदीनुसार नियमित करणे:- (मुद्दा क्र. 5)

अशी विभाजनाची प्रकरणे नियमित करावयाची असल्यास विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार खालील

प्रमाणे भुखंडाचे एकुण क्षेत्रफळावर प्रचलित बाजार मुल्य दरानुसार येणाऱ्या किंमतीवर खालील प्रमाणे विभाजन शुल्क आकारण्यात येईल.

आ) वारसान हक्कानुसार असल्यास **1** टक्के

भ) वारसान हक्काव्यतिरिक्त असल्यास **2** टक्के

13. रहिवासी/वाणिज्यिक/औदयोगिक स्वरूपाचे भुखंडाचे विभाजन हा ठराव मंजुर होण्यापुर्वी अनधिकृतपणे झाले असल्यास आणि हा ठराव मंजुर झाल्यानंतर प्रस्तावित विभाजन असल्यास अशी प्रकरणे विकास नियंत्रण नियमावलीचे तरतुदीनुसार नियमित करणे:- (मुद्दा क्र. 6)

अशी विभाजनाची प्रकरणे नियमित करावयाची असल्यास विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार खालील प्रमाणे भुखंडाचे एकुण क्षेत्रफळावर प्रचलित बाजार मुल्य दरानुसार येणाऱ्या किंमतीवर खालील प्रमाणे विभाजन शुल्क आकारण्यात येईल.

आ) वारसान हक्कानुसार असल्यास **1.5** टक्के

भ) वारसान हक्काव्यतिरिक्त असल्यास **3** टक्के

14. रहिवासी/वाणिज्यिक/औदयोगिक स्वरूपाचे भुखंडाचे एकत्रिकरण हा ठराव मंजुर होण्यापुर्वी/ झाल्यानंतर अधिकृतपणे/अनधिकृतपणे झाले असल्यास अथवा प्रस्तावित परवानगी मागीत असल्यास अशी प्रकरणे विकास नियंत्रण नियमावलीचे तरतुदीनुसार नियमित करणे:- (मुद्दा क्र. 7)

मनपाचे दोन किंवा त्यापेक्षा अधिक भुखंड एकत्रित करणे तसेच मनपा चे भुखंड व इतर भुखंड (खाजगी, शासकिय व इत्यादी) एकत्रिकरणाची प्रकरणे नियमित करावयाची असल्यास विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार खालील प्रमाणे भुखंडाचे एकुण क्षेत्रफळावर प्रचलित बाजार मुल्य दरानुसार येणाऱ्या किंमतीवर **1** टक्का एकत्रिकरण शुल्क आकारण्यात येईल.

**15.** रहिवासी वापराचे भुखंडावर भुखंडधारक स्वत:चे/स्वत:चे कुंटुंबाचे वापराकरीता घराचे किंवा सदनिकेचे बांधकाम करीत असल्यास त्याला कोणतेही शुल्क न आकारता नकाशाचे मंजुरीकरीता ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येईल. (मुद्दा क्र. **8**)

**16.** जे कॉर्नर चे भुखंड आहेत अशा ठिकाणी पुर्वी लिज देतांना टॅनजंट (गोलाकार) न कापता पुर्ण आयताकृती भुखंडाची लिज करून दिली होती. तसेच कॉर्नरचे भुखंड, नियमित भुखंडापेक्षा कमी किंवा जास्त क्षेत्रफळाचे असतांना अनेक ठिकाणी लिज देतांना त्या ले-आऊट मधिल नियमित भुखंडाचे क्षेत्रफळा ऐवढीच लिज करून देण्यात आलेली आहे.

वरील प्रकरणी लिज नविनिकरण करतांना प्रत्यक्षात मौक्यावर जागा मोजणी करून जागा कमी किंवा जास्त असेल, त्याप्रमाणे हे लिज नविनीकरण करण्यात येऊन आधी झालेल्या चुकीची दुरूस्ती करण्यात येईल. तसेच अशा भुखंडाची टॅन्जंट कापल्यावर गोलाकारामुळे जे क्षेत्रफळ कमी झाले, तेवढे कमी करून हे लिज नविनीकरण करण्यात येईल. भुखंड वाटपाचे वेळी जे क्षेत्रफळ प्रत्यक्षात दिले होते, परंतु लिजडिड करतांना त्या भुखंडाचे क्षेत्रफळ चुकीने कमी लिहील्या गेले, अशा प्रकरणात भुखंडाचे क्षेत्रफळ वाढले असल्यास अतिरिक्त जागेची किंमत, जागेचा ताबा ज्यावेळी दिला त्यावेळेच्या भुखंडाचा मुळ दराने वसुल करतांना येणाऱ्या रक्कमेवर ताबा दिल्याच्या दिवसापासुन द.सा.द.शे. **18%** दराने व्याज घेण्यात येईल. ही अट मुळ भुखंडधारकाला लागु राहील.

परंतु भुखंडाचे हस्तांतरण झाले असल्यास, अशा भुखंडाबाबत नगर रचना विभागाचे प्रचलित बाजार मुल्य् दरानुसार येणारी किंमत ही प्रिमियमची रक्कम म्हणुन गृहीत धरून आकारणी करण्यात येईल. तसेच सदर्हु रक्कमेवर **2.5** टक्के प्रमाणे वार्षीक ग्राऊँट रेंट आकारण्यात येईल. मात्र भुखंडाचा प्रचलित भुभाटक दर (ग्राऊँट रेंट) कायम ठेवण्यात येईल या शब्दलांचा समावेश करण्यात यावा. (मुद्दा क्र. **9**)

**17.** रहिवासी/वाणिज्यिक/औदयोगिक स्वरूपाचे भुखंडावर विकास नियंत्रण नियमावलीचे तरतुदीनुसार मंजुर

नकाशाप्रमाणे बांधकाम करण्याकरीता बँकेकडुन कर्ज घेण्यासाठी परवानगी मागीत असल्यास अशा प्रकरणी भुखंडाचे एकुण क्षेत्रफळावर प्रचलित बाजार मुल्य दरानुसार येणाऱ्या किंमतीवर **0.5** टक्का शुल्क आकारून परवानगी देण्यात येईल. (सदनिकेच्या बाबतीत घटकाच्या त्याच्या वाटयाला असलेल्या जमिनीच्या अविभक्त किंमतीच्या हिस्स्याच्या किंमतीला अनुसरून हे शुल्क आकारण्यात येईल.) (मुद्दा क्र. **10**)

**18.** भुखंडाचे नामांतरण, नुतनिकरण, हस्तांतरण, विभाजन, एकत्रिकरण, बांधकाम परवानगी, बांधकामासाठी कर्ज घेण्यासाठी परवानगी, दस्ताऐवज नोंदणी इ.. करीता रू. **500/-** प्रशासकिय शुल्क आकारण्यात येईल. (मुद्दा क्र. **11**)

**19.** वरील परिच्छेद **1** ते **8** मध्ये सदनिकेचे क्षेत्रफळ म्हणजेच सदनिका किंवा गाळा यांचे संदर्भात त्या सदनिका किंवा गाळा धारकांच्या वाटयाला येणाऱ्या अविभक्त घटकांच्या जमिनीच्या हिस्स्याची किंमत गृहीत धरण्यात येईल. (मुद्दा क्र. **12**)

**20.** वरील परिच्छेदामध्ये उल्लेख केलेले प्रचलित बाजार मुल्य दर याचा अर्थ शासनाने जाहिर केलेले त्यावर्षीचे म्हणजेच विक्रिपत्र झालेल्या वर्षाचे प्रचलित गणना शिर्ष (रेडी रेकनर) गृहीत धरण्यात येईल.

प्रचलित गणना शिर्ष (रेडी रेकनर) अस्तित्वात येण्यापुर्वी (**1989** पुर्वी) त्यावेळेचे विक्रिमुल्य हे बाजार मुल्य म्हणुन गृहीत धरण्यात येईल. ( मुद्दा क्र. **13**)

मनपा ठराव क्र. **373** दि. **10.02.2009** मधील मुद्दयांचे ठरावाव्दारे सुधारणा करण्यात आलेल्या आहे, त्या याप्रमाणे :-

सुधारीत अट क्र. **06 :-** रहिवासी/वाणिज्यिक/औदयोगिक स्वरूपाचे भुखंडाचे विभाजन हा ठराव मंजुर झाल्यानंतर अनधिकृतपणे विभाजन झाले असल्यास अशी विभाजनाची प्रकरणे नियमित करावयाची असल्यास विकास नियंत्रण नियमावलीचे तरतुदीनुसार खालील प्रमाणे भुखंडाचे एकुण क्षेत्रफळावर प्रचलित बाजार मुल्य दरानुसार येणाऱ्या किंमतीवर खालील प्रमाणे शुल्क आकारण्यात येईल.

आ) वारसान हक्कानुसार असल्यास **1.5** टक्के

भ) वारसान हक्काव्यतिरिक्त असल्यास **3** टक्के

ख) तसेच ठराव मंजुर झाल्यानंतर भुखंडधारक भुखंड विभाजनाची परवानगी मागत असल्यास मुद्दा क्र. **5** मध्ये नमुद केलेले शुल्क आकारण्यात येईल. (मनपा ठराव क्र. **336** दि. **25.11.2008** अनु क्र. **2**)

मनपा ठराव क्र. **336** दि. **25.11.2008** व मनपा ठराव क्र. **299** दि. **20.10.2018** अन्वये सभागृहांनी घेतलेल्या निर्णयाप्रमाणे खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात येत होती :-

भाडेपट्टयांच्या नुतनिकरणाची कार्यवाही करतांना थकीत रकमेवर प्रत्यक्ष रक्कम भरण्याची नोटीस दिल्याच्या दिनांकापर्यंत व्याज आकारण्यात येणार नाही. तथापी रक्कम भरण्याचे नोटीस मधील मागणी कालावधीची मुदत संपल्यानंतर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनीयमातील तरतूदीनुसार **2** टक्के प्रतीमाह शास्ती आकारण्यात येईल.

उपरोक्त प्रश्न सभागृहाने विचारात घेतला आहे.

**1)** निवासी भाडेपट्टयाच्या नुतनिकरणाचे दर **0.04** टक्क्यावरून **0.02** टक्के करण्यात यावे. वाणिज्यिक व औद्योगीक भाडेपट्टयाच्या नुतनिकरणाचे दर जशाचे तसे ठेवण्यात यावे.धर्मदाय /सार्वजनिक प्रयोजनकरिता **0.02** टक्के करण्यात यावे.

**2)** भाडेपट्टयासंदर्भात यापुर्वी झालेले शर्तभंग नियमीत करतांना भाडेपट्टीच्या संदर्भात अटीशर्तीचा भंग झाला तर जमिनीच्या प्रचलित बाजारमुल्याच्या **10** टक्के घेण्यात येणारी अनर्जित रक्कम **6** टक्के करण्यात यावी. त्याचप्रमाणे जमीन वाणिज्यिक व औद्योगीक वापराकरिता येत असलेली **25** टक्के प्रचलित बाजारमुल्याची अनर्जित रक्कम **15** टक्केकरण्यात यावी. शैक्षणिक व धर्मादाय वापराकरिता **10** टक्क्याऐवजी दोन्ही ठिकाणी **6** टक्के करण्यात यावे.

**3)** भाडेपट्टीच्या जमिनीचे यापुढील हस्तांतरणास व वापरातील बदलास पुर्वपरवानगी देतांना“अ“प्रमाणे जमिनीच्या प्रचलित बाजारमुल्याच्या **5** टक्के ऐवजी **3** टक्के तसेच ‘ब“प्रमाणे जमिनीच्या प्रचलित बाजारमुल्याचे **40** टक्के अनर्जित रक्कमवरून **10** टक्के करण्यात यावी. वाणिज्यीक व औद्योगिक प्रयोजनासाठी वापरण्यात येत असल्यास जमीनीच्या प्रचलित बाजारमुल्याच्या **25** टक्के अनर्जित रक्कम **15** टक्के करण्यात यावे व “ब“मध्ये प्रचलित बाजारमुल्याच्या **50** टक्के रक्कम **40** टक्के करण्यात यावे. शैक्षणिक व धर्मदाय उपयोगाकरिता “अ“मध्ये **5** टक्के व “ब“मध्ये बाजारमुल्याच्या **20** टक्के अनर्जित रक्कम **10** टक्के करण्यात यावी. हे करीत असतांना **31** डिसेंबरपर्यंत अंतिम मुदत देण्यात यावी. **31** डिसेंबर नंतर जे नागरिक यामध्ये भाग घेणार नाही त्यांच्यावर **24** टक्के दरानी दंड आकारणे निश्चितपणाने झाले पाहिजे.

<u>महाराष्ट्र शासन राजपत्र</u>

असाधारण भाग चार - ब दि. **13** सप्टेंबर **2019** मधील अधिसुचना अन्वये कार्यवाही करणे अपेक्षित व मनपा ठराव क्र. **336** दि. **25.11.2008** व मनपा ठराव क्र. **299** दि. **20.10.2018** अन्वये कार्यवाही करणेबाबत तुलनात्मक विवरण

मुद्दा क्र. **2** - मनपा मालकिचे मालमत्तेचे भुभाडे

| अ.क्र. | दि. **13.09.2019** च्या अधिसुचनेतील “महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर/मालमत्ता भाडेपट्टा नुतनिकरण अथवा हस्तांतरण) नियम **2019**” अन्वये अटी व शर्ती | मनपा ठराव क्र. **336** दि. **25.11.2008**, मनपा ठराव क्र. **373** दि. **10.02.2009** व मनपा ठराव क्र. **299** दि. **20.10.2018** | दि. **13.09.2019** च्या अधिसुचनेतील “महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर/मालमत्ता भाडेपट्टा नुतनिकरण अथवा हस्तांतरण) नियम **2019** या तरतुदी अंतर्गत अनुसरून सध्या मंजुर मनपा ठरावानुरूप सुरू असलेल्या कार्यवाहीस करावयाचा अपेक्षित बदल |
|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** |
| **1** | भुखंडाचे वार्षिक भाडे मालमत्तेच्या मुल्यांकनावर **8%** किंवा बाजारभावानुसार जे जास्त असेल ते निश्चित करावे | आ) निवासाकरीता - **0.02%**<br>भ) वाणिज्यिक/औदयोगिक - **0.05%, 0.07%, 0.09%** व **0.10%**<br>ख) धर्मदाय व सार्वजनिक करीता - **0.02%** | भुभाडयामध्ये कमीत कमी **80** पट वाढ करणे अपेक्षित आहे. |

मुद्दा क्र. **3** - मनपा मालकिचे मालमत्तेचे भाडेपट्टा नुतनिकरण, हस्तांतरण करण्याकरीता

| अ.क्र. | दि. **13.09.2019** च्या अधिसुचनेतील **“**महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर/मालमत्ता भाडेपट्टा नुतनिकरण अथवा हस्तांतरण) नियम **2019”** अन्वये अटी व शर्ती | मनपा ठराव क्र. **336** दि. **25.11.2008,** मनपा ठराव क्र. **373** दि. **10.02.2009** व मनपा ठराव क्र. **299** दि. **20.10.2018** | दि. **13.09.2019** च्या अधिसुचनेतील “महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर/मालमत्ता भाडेपट्टा नुतनिकरण अथवा हस्तांतरण) नियम **2019** या तरतुदी अंतर्गत अनुसरून सध्या मंजुर मनपा ठरावानुरूप सुरू असलेल्या कार्यवाहीस करावयाचा अपेक्षित बदल |
|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** |
| **1** | महानगरपालिकेच्या मालमत्तेचे/ भाडेपट्ट्याचे नुतनीकरण व हस्तांतरण.<br><br>(१) अशा मालमत्तांच्या मुल्यांकना साठी जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त आणि सह जिल्हा निबंधक (मुद्रांक) यांची समिती असेल. ही समिती, अशा मालमत्तांचे मूल्यांकन महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेचे वास्तव बाजारमूल्य निर्धारित करणे) नियम, १९९५ नुसार बाजार मूल्यांच्या अनुषंगाने निश्चित करेल. | नागपुर शहर महानगरपालिका अधिनियम **1948** च्या तरतुदी नुसार यापुर्वी भाडेपट्टयाने नागपुर महानगरपालिकेच्या जागा देण्यात आलेल्या आहेत.<br><br>महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम **79** (ड) च्या तरतुदीनुसार नागपुर महानगरपालिकेची मालमत्ता बाजार मुल्यापेक्षा कमी असु नये, अशा जागा भाडेपट्टयाने देणे अपेक्षित असल्याने आजच्या सिघ्रसिध्द गणकानुसार जागेचे मुल्यांकन निश्चित करून जागा भाडेपट्टयाने देण्यात येते. | निरंक |
| **2** | मालमत्तेच्या मुल्यांकनाच्या **8%** रक्कम किंवा, बाजार भावानुसार निश्चित होणारे वार्षिक भाडे, यापैकी जे जास्त असेल तेवढे वार्षिक भाडे या समितीमार्फत निश्चित करण्यात यावे | स्तंभ क्र. **3** मध्ये उल्लेखित मनपा ठरावानुसार हस्तांतरण करणेकरीता वैद्यरित्या परवानगी घेतल्यास **0.02%** शुल्क आकारणी करणे. अनधिकृत हस्तांतरण झाल्यास स्तंभ क्र. **3** मध्ये उल्लेखित मुद्दयानुसार शुल्क नियमित करण्यात येते. उदा. शिवनगर (सक्करदारा) **1200** चौ.फुट/**111.78** चौ.मी. **x**<br><br>रू. **34,210/-** = रू. **38,13,731/-** येणाऱ्या मुल्यावर **0.02%** = रू. **763/-** ग्राऊँट रेट | परंतु राजपत्रातील अटीप्रमाणे सदयाचे प्रचलित निर्णयानुसार आकारण्यात येणारे रू. **763/-** ऐवजी रू. **3,05,098/-** वार्षिक भाडे आकारणे अपेक्षित आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आकारणी करण्यात येते. | |
| 3 | महानगरपालिकेच्या मालमत्तांचे भाडेपट्टा नुतनीकरण अथवा हस्तांतरणासाठीची पात्रता/अटी :----<br>**1.** ज्या मालमत्ता अधिनियमातील तरतुदीनुसार व जाहीर लिलाव प्रक्रियेचा अवलंब करून भाडेपट्टयाने अथवा हस्तांतरीत करण्यात आल्या आहेत. | नागपुर शहर महानगरपालिका अधिनियम **1948** च्या तरतुदी नुसार यापुर्वी भाडेपट्टयाने नागपुर महानगरपालिकेच्या जागा देण्यात आलेल्या आहेत.<br>नागपुर शहर महानगरपालिका अधिनियम **1948** च्या तरतुदी व सभागृहाचे वेळोवेळी निर्णयानुसार **Already** मनपा अभिन्यासातील भुखंड/जागा भाडेपट्टयाने देण्यात आलेले आहेत. | सिम्बॉयसिस या संस्थेला दिलेली मालमत्ता वगळता नागपुर महानगरपालिकेची कोणतीही मालमत्ता लिलाव प्रक्रीयेचा अवलंब करून देण्यात आलेली नाही. |
| | **3.** महानगरपालिकेच्या ज्या मालमत्तांचे हस्तांतरण वैध रित्या झाले आहे. | हस्तांतरणास परवानगी मागितलेली असता, मनपा ठराव क्र. **299** दि. **20.10.2018** नुसार कार्यवाही करण्यात येते. रहिवासी वापराकरीता **3%** व वाणिज्यिक वापराकरीता **15%**<br>पुर्व परवानगी न घेता हस्तांतरण झालेले असल्यास रहिवासी वापराकरीता **10%** व वाणिज्यिक वापराकरीता **40%** आकारून भाडेपट्टयाचे नुतनिकरण व हस्तांतरणाचे नियमितीकरण करण्यात येते. | भुखंड परत घेणे अपेक्षित आहे. |
| | **3.** संबंधित मालमत्तेबाबतचे सर्व कर आणि भाडे भाडेपट्टाधारकाने भरलेले असावे आणि भाडेपट्टा धारकाकडे भाडेपट्टयाची रक्कम किंवा कोणत्याही प्रकारच्या कराची रक्कम थकीत नसावी. | नुतनिकरण व हस्तांतरण करतेवेळी थकित रक्कम वसुल करण्यात येते. नुतनिकरण<br>**a)** भाडेपट्टयाची मुदत संपेण्या पुर्वीच नुतनिकरणाबाबत अर्ज सादर केल्यास प्राथमिक मुल्य रू. **500/-** व आजच्या बाजार मुल्यावर भुभाडेचे आकारणी दरांनी **0.02%, 0.05%, 0.07%, 0.10%**<br>**b)** भाडेपट्टयाची मुदत संपल्या नंतर अर्ज सादर झाल्यास करारनाम्यावरील शर्तीचा भंग केल्याचे गृहीत धरून बाजार मुल्याच्या **6%** रहिवासी वापराकरीता व वाणिज्यिक वापराकरीता **15%** मुल्य आकारून भाडेपट्टयाचेनुतनिकरण करणे. | भुखंड परत घेणे अपेक्षित आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | <u>हस्तांतरण</u><br><br>**a)** अनधिकृत (पुर्व परवानगी) रहिवासी - **3%** वाणिज्यिक - **15%**<br><br>**b)** विना परवानगी<br><br>रहिवासी - **10%**<br><br>वाणिज्यिक - **40%**<br><br>शैक्षणिक - **10%** | |
| | **4.** सदर नियमावली पूर्वी भाडेपट्ट्याची मुदत संपलेल्या तथापि, नुतनीकरण न झालेल्या वैध भाडेपट्ट्याचे नुतनीकरण/ हस्तांतरण हे या नियमातील पात्रते संबंधी असलेल्या तरतुदीनुसार करण्यात येईल. तथापि, ज्या प्रकरणात भाडेपट्ट्याची रक्कम संबंधितांनी भरलेली नसेल, अशा प्रकरणांत महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेचे वास्तव बाजारमुल्य निर्धारित करणे) नियम, १९९५ नुसार बाजार मूल्यांच्या अनुषंगाने मालमत्तेच्या होणाऱ्या मुल्यांकनाच्या **8%** रक्कम अधिक अधिनियमातील तरतुदीनुसार दरमहा **2%** इतके व्याजासह आकारणी करण्यात यावी. | **(A)** भाडेपट्टा नुतनिकरण/हस्तांतरण (पुर्व परवानगी) करण्याची विहित मुदतीत न केल्यास ठराव क्र. **299** अन्वये अधिकृत हस्तांतरण प्रकरणात निवासी **6%** वाणिज्यिक/औदयोगिक करिता **15%** व शैक्षणिक/धर्मादाय करिता **5%** रक्कम वसुल करण्यात येते.<br><br>**(B)** अनधिकृत हस्तांतरण प्रकरणात (विना परवानगी) तसेच पुर्ण परवानगी न घेता हस्तांतरण व वापर बदल झाल्यास अ. क्र. **4%**<br><br>रहिवासी - **10%**<br><br>वाणिज्यिक - **40%**<br><br>शैक्षणिक - **10%** | सदर नियमावलीतील पात्रतेसंबंधी पुर्तता होत असल्यास नुतनिकरण करणे अपेक्षित आहे. अपात्र होणाऱ्या भाडेपट्टाधारकाचे भाडेपट्टयाचे नुतनिकरण न करता भुखंड परत घेणे अपेक्षित आहे. |
| | **5.** सदर भाडेपट्टाधारकाने भाडेपट्ट्या संदर्भात यापूर्वी करण्यात आलेल्या करारनाम्यातील अटी-शर्तीचा भंग केलेला नसावा. | सदर भाडेपट्टाधारकाने भाडेपट्टा संदर्भात यापुर्वी करण्यात आलेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग केलेला असल्यास उपरोक्त अ.क्र. **3** व **4** अन्वये दंड आकारून भाडेपट्टा नियमित करण्यात येते. | करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग झालेला असल्यास संबंधित भाडेपट्टा धारकाने भाडेपट्टा नुतनिकरण व हस्तांतरण करीता अपात्र ठरविणे अपेक्षित आहे. |
| | **6.**भाडेपट्टाधारकास त्याने धारण केलेल्या मालमत्तेच्या भाडेपट्ट्याचे नुतनीकरण करावयाचे असल्यास, करारनाम्याची मुदत संपण्यापूर्वी | करारनाम्यातील अटीप्रमाणे भाडेपट्टयाचे कालावधी संपण्यापुर्वी विनंती अर्ज सादर करणे आवश्यक आहे. परंतु किती कालावधी पुर्वी भाडेपट्टा नुतनिकरण करून देणेबाबत | भाडेपट्टा संपुष्ठात येणाऱ्या कालावधीच्या तीन महिने पुर्वी भाडेपट्टाधारकाने भाडेपट्टा नुतनिकरणाकरीता अर्ज सादर |

| | | | |
|---|---|---|---|
| | संबंधिताने किमान तीन महिने अगोदर महानगरपालिकेस लेखी कळविणे आवश्यक आहे.<br>परंतु, अशा प्रकारे संबंधित भाडेपट्टा धारकाने महानगरपालिकेस कळविले नसल्यास, महानगरपालिकेने संबंधितांस नोटीस देऊन मालमत्ता महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्याबाबतची कार्यवाही करावी. | अर्ज सादर करणेबाबत कालावधीचा उल्लेख नाही. परंतु उशिरा अर्ज सादर झाला तरी अनु. क्र. **3** व **4** अन्वये दंड आकारून अर्ज विचारात घेवुन भाडेपट्टयाचे नुतनिकरण करण्यात येते. | करणे अभिप्रेत आहे. तशा प्रकारची दुरूस्ती भाडेपट्टा करारनाम्यात करणे सोईचे होईल. |
| **4** | भाडेपट्ट्याचे नुतनीकरण हे कमाल दहा वर्षांसाठी असेल. | सदय:स्थितीत भाडेपट्टा **30** वर्षीय कालावधी करीता करण्यात येत आहे. | राजपत्रातील नियमावलीतील तरतुदीनुसार दुरूस्ती करावी लागेल. |
| **5** | भाडेपट्ट्याने देण्यात आलेली मिळकत ही हस्तांतरण / तारण / गहाण ठेवता येणार नाही. अथवा अन्य कोणत्याही प्रकारे त्रयस्थ पक्षाचे हितसंबंध त्यावर प्रस्थापित करता येणार नाहीत. | मनपा ठराव क्र. **336** दि. **25.11.2008,** मनपा ठराव क्र. **373** दि. **10.02.2009** व मनपा ठराव क्र. **299** दि. **20.10.2018** नुसार भुखंड बांधकामाकरीता व तारण/गहाण ठेवण्याकरीता बाजार मुल्याच्या **0.05%** शुल्क आकारून ना-हरकत देण्यात येते. | राजपत्रातील नियमावलीतील तरतुदीन्वये<br>ना-हरकत देता येणार नाही. |
| **6** | भाडेपट्टा धारकाने महानगरपालिकेच्या मालमत्तेवर कोणतेही हितसंबंध प्रस्तापित करू नयेत. | सदयस्थितीत परस्पर हितसंबंध प्रस्थापित करून वारसा हक्काने किंवा विक्रि करून अनधिकृतरित्या इतरांना हस्तांतरण केल्यास शर्ती व अटींचा भंग झाल्याचे गृहीत धरून अनु. क्र. **3** व **4** प्रमाणे दंड आकारून नियमितीकरण करण्यात येणे | स्वत:चीच मालमत्ता समजुन मनपाचे स्थावर विभागाची अनुमती न घेता वारसा हक्काने किंवा खरेदी खतने हितसंबंध प्रस्थापित करता येणार नाहीत. |
| **7** | ज्या कारणासाठी गाळा भाडेपट्टयाने दिला आहे त्याच कारणासाठी गाळयाचा वापर अनुज्ञेय असेल | ज्या कारणासाठी भुखंड देण्यात आलेला आहे, त्या कारणासाठी वापर करणे भाडेपट्टयात नमुद आहे. प्रत्यक्ष मौक्यावर आढळलेल्या वापर व भाडेपट्टा करारनाम्यातील अटीनुसार अनुज्ञेय वापर हयामध्ये बदल आढळल्यास अनु. क्र. **3** व **4** अन्वये दंड आकारून नियमितीकरण करण्यात येते. | भाडेपट्टाधारकाने वापर बदल केल्यास भुखंड/गाळा परत घेणे अपेक्षित आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| **8** | शासनास तसेच महानगरपालिकेस नियमानुसार देय असलेले सर्व कर विहीत वेळेत भाडेपट्टाधारकाने भरणे आवश्यक आहे. तसेच याबाबत करारनाम्यात उल्लेख करण्यात यावा. | शासनास तसेच नागपुर महानगरपालिकेचे नियमानुसार घेणे असलेले सर्व कर विहीत वेळेत भाडेपट्टाधारकाने भरणे आवश्यक असल्याचा उल्लेख भाडेपट्टा करारनाम्यात करण्यात आलेला आहे. | निरंक |
| **9** | भाडेपट्ट्येधारकाने शासनाच्या तसेच, महानगरपालिकेच्या देय असलेल्या रकमा विहित कालावधीत अदा न केल्यास नियमानुसार कार्यवाही करून, सदर मिळकत महानगरपालिकेकडे जमा करण्यास पात्र राहील. तसेच, प्रलंबित रकमा या संबंधित भाडेपट्टा धारकांकडून त्यांच्या अनामत रकमेतून तसेच, त्यातून अपेक्षित वसुली न झाल्यास सदर रकमेची वसुली महाराष्ट्र जमीन महसूल संहिता तरतुदीनुसार करण्यास पात्र राहील. | संबंधीत भाडेपट्टाधारकाकडे उक्त मिळकतीकरीता शासनाचे/निमशासकिय संस्थेचे कोणतेही थकबाकी असल्यास उक्त थकबाकी जमा करण्याची खात्री पटवुन भाडेपट्टयाचे नुतनिकरण व हस्तांतरण करण्यात येते. | निरंक |
| **10** | महानगरपालिकेमार्फत भाडेपट्ट्याने देण्यात आलेल्या मिळकतीशिवाय अतिरिक्त जागेचा वापर अथवा अतिरिक्त बांधकाम करता येणार नाही. अशा प्रकारचा वापर आढळून आल्यास शर्तभंग समजण्यात येऊन महानगरपालिकेमार्फत तशी नोटीस देऊन सदर मालमत्ता परत घेण्याची कार्यवाही करण्यात यावी. | सदयस्थितीत अशा परिस्थितीवेळी भुखंडालगत असलेली व **Non-buildable** असलेली जागा संबंधीत भुखंडधारकांकडुन बाजार मुल्यानुसार प्रिमियम रक्कम वसुल करून भाडेपट्टयानी जागा हस्तांतरीत करण्यात येते. (मनपा ठराव क्र. **336** दि. **25.11.2008** मधील मुद्दा क्र. **9** अन्वये कार्यवाही करण्यात येते. | मुळ भाडेपट्टयातील क्षेत्रापेक्षा अधिकचे क्षेत्र वापरात असल्यास सदर अधिकचे क्षेत्र परत घेणे अपेक्षित आहे |
| **11** | महानगरपालिकेची पूर्वपरवानगी न घेता वापरात बदल करण्यात आल्यास शर्तभंग, तसेच करारनाम्याचा भंग समजण्यात येऊन भाडेपट्ट्याचे नुतनीकरण रद्द करण्याबाबत महानगरपालिकेने नियमोचित कार्यवाही करावी. | महानगरपालिकेची पुर्व परवानगी न घेता वापरात बदल करण्यात आल्यास शर्तभंग ग़हीत धरून अनु. क्र. **3** व **4** अन्वये दंड आकारून नियमितीकरण करण्यात येते. | राजपत्रातील नियमावलीतील तरतुदीन्वये उक्त भुखंडाचे भाडेपट्टा रद्द करणे अपेक्षित आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| **12** | भाडेपट्ट्याचे नुतनीकरण करतांना भाडेपट्टा करार नोंदणीकृत करावा. तसेच, करारनामा करतांना मूळ भाडेपट्टा करारातील अटी व शर्ती देखील विचारात घेऊन, महानगरपालिकेस आवश्यक वाटतील त्या अतिरिक्त अटी-शर्ती करारनाम्यात अंतर्भूत कराव्यात. | सभागृहांनी वेळोवेळी निर्णय घेवुन निश्चित केलेल्या अटी व शर्ती करारनाम्यात अंतर्भुत करून भाडेपट्टा करारनामा नोंदणीकृत करण्यात येते. | निरंक |

माहितीस्तव व धोरण निश्चिती करणेबाबत प्रस्ताव

दि. **13.09.2019** नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासनाने प्रसिध्द केलेल्या राजपत्रातील अधिसुनेतील **“**महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर/मालमत्ता, भाडेपट्टा नुतनिकरण अथवा हस्तांतरण) नियम **2019”** तरतुदी अशा आहेत की, महानगरपालिके च्या मालमत्तेचे/भाडेपट्टयांचे नुतनिकरण व हस्तांतरण मालमत्तेच्या मुल्यांकनाच्या **8%** रक्कम किंवा, बाजार भावानुसार निश्चित होणारे वार्षिक भाडे, यापैकी जे जास्त असेल तेवढे वार्षिक भाडे या समितीमार्फत निश्चित करण्यात यावे, सदर भाडेपट्टेधारकाने भाडेपट्टे संदर्भात यापुर्वी करण्यात आलेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग केलेला नसावा, भाडेपट्टाधारकास त्याने धारण केलेल्या मालमत्तेच्या भाडेपट्टयाचे नुतनिकरण करावयाचे असल्यास, करारनाम्याची मुदत संपण्यापुर्वी संबंधिताने किमान तीन महिने अगोदर महानगरपालिकेस लेखी कळविणे आवश्यक आहे, भाडेपट्टयाचे नुतनिकरण हे कमाल दहा वर्षांसाठी असेल, भाडेपट्टयाने देण्यात आलेली मिळकत ही हस्तांतरण/तारण /गहाण ठेवता येणार नाही. अथवा अन्य कोणत्याही प्रकारे त्रयस्थ पक्षाचे हितसंबंध त्यावर प्रस्थावित करता येणार नाही, भाडेपट्टेधारकाने शासनाच्या तसेच महानगरपालिके च्या देय असलेल्या रकमा विहित कालावधीत अदा न केल्यास नियमानुसार कार्यवाही करून, सदर मिळकत महानगरपालिकेकडे जमा करण्यास पात्र राहील. तसेच, प्रलंबित रकमा या संबंधित भाडेपट्टाधारकांकडुन त्यांच्या अनामत रकमेतुन तसेच, त्यातुन अपेक्षित वसुली न झाल्यास सदर रकमेची वसुली महाराष्ट्र जमिन महसुल संहिता तरतुदीनुसार करण्यास पात्र राहील व महानगरपालिकेची पुर्व परवानगी न घेता, वापर बदल करण्यात आल्यास शर्तभंग तसेच करारनाम्याचा भंग समजण्यात येवुन भाडेपट्टयाचे नुतनिकरण रद्द करण्याबाबत महानगरपालिकेने नियमोचित कार्यवाही करावी. म्हणजेच भाडेपट्टा करारनाम्यातील कोणत्याही अटींचे उल्लंघन भाडेपट्टाधारकाने केल्यास भाडेपट्टाधारकाकडुन उक्त जागा/भुखंड/मालमत्ता नागपुर महानगरपालिकेकडे परत घेणे बंधनकारक आहे. सदर नियमावली महानगरपालिकेच्या सभागृहाचे सर्व सन्मानिय सदस्यांना माहिती होण्यास्तव सभागृहाचे पटलावर नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन दि. **13.09.2019** ची अधिसुचना ठेवण्यात येत आहे. उपरोक्त विषय सभागृहाने विचारात घेऊन दि. १३.०९.२०१९ जो ठराव है यह शासन के पास

फेरविचार के लिये वापस भेजा जाये। और महानगरपालिका की जो २०१८ की पॉलिसी है उसपर सभी नागरिकोकी हिअरींग लेके एक माह के अंदर आनेवाले सभागृह मे विस्तारीत प्रस्ताव फिर से रखने के लिये एक पाच सदस्यीय समिती का निर्माण करने का निर्देश इस प्रस्ताव के माध्यम से दिया जाता है। इस समितीने सभागृह मे हुई चर्चा का ध्यान मे रखते हुए सविस्तर चर्चा करके निर्णय ले व अहवाल सभागृह के पटलपर रखे। या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

श्री. अविनाश ठाकरे:-मा.महापौरजी, या संदर्भात जेष्ठ नगरसेवक मा.सुनिलजी अग्रवाल यांची लेखी सुचना आहे. ती आपल्याकडे पाठविण्यात त्या सुचनेसहीत हा विषय मंजूर करण्यात यावा.

श्री. प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, याची काय लेखी सुचना आहे ती वाचून दाखविण्यात यावी. यांच्याकडे लेखी सुचना जर असेल तर ती वाचून दाखविण्यात यावी.

श्री. अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, ऑनलाईन सभेमध्ये सुचना वाचून दाखविण्यात येत नाही. मा.महापौरजी, आपल्याकडे सुचना पाठविण्यात येत आहे.

श्री. प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, सुचना वाचून दाखविण्यात यावी आम्ही कशाला मंजूरी दयायची हे आम्हांला माहीत झाले पाहिजे. त्यांची काय सुचना आहे त्याला सभागृहाची मंजूरी घ्यावयाची आहे तर ती सुचना काय आहे ते माहीत पाहिजे.

श्री. अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, ज्यावेळेला हा विषय सभागृहाच्या नोटींगकरिता येईल त्यावेळी ही सुचना द्यावयाची आहे असे त्यांनी मला सांगितले. माझ्याकडे सुचना नाही आहे. मा.महापौरांकडे ती सुचना गेलेली आहे. मा.महापौरजी आपल्याकडे ती सुचना आल्यानंतर मा. प्रफुल्ल गुडधे यांना ती सुचना दयावी.

महापौर:- प्रफुल्ल गुडधे माझ्यापर्यंत सुचना सध्या पोहचायची आहे. आपण सांगितले त्याप्रमाणे मी वाचन करु शकतो.

श्री. प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, ज्या मा.सदस्यांनी ही लेखी सुचना सभागृहाच्या पटलावर ठेवली ती सुचना काय आहे त्याचे वाचन त्यांनी करावे.

महापौर:- मा.सुनिलजी अग्रवाल आपण सुचनेचे वाचन करावे.

श्री. अविनाश ठाकरे:-मा.महापौरजी, सर्व अधिकार मा.महापौरांना आहेत त्यांना आपल्या अधिकाराचा वापर करु दयावा. सर्व मा.सदस्यांना सुचना मांडण्याचा अधिकार आहे.

श्री. प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, ती सुचना जाणून घेण्याचा माझा अधिकार आहे. त्या सुचनावर माझे मत व्यक्त करण्याचा अधिकार आहे त्या अधिकारात मी म्हणत आहे की ती सुचना कळू दयावी. अन्यथा अशा सुचना आपल्याला देता येणार नाही.

श्री. अविनाश ठाकरे:-मा.महापौरजी, या संदर्भात सभागृहाचे सार्वभौम नेते ते मा.महापौरजी आहेत ते निर्णय घेतील. तुम्ही तुमचे मत मांडले आहे. मा.सदस्यांनी मला जे काही सांगितले ते मी सत्तापक्ष नेता म्हणून मा.महापौरजी पर्यंत कळविले आहे.

श्री. प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, सत्तापक्ष नेते जाणते आहेत त्यांनी ती सुचना सांगावी.

श्री. अविनाश ठाकरे:-मा.महापौरजी, त्यांनी मला सांगितले नाही आहे. त्यांनी फक्त सांगितले की माझी लेखी सुचना आहे.

श्री. प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, मी याचा विरोध करतो. अशी कोणतीही सुचना आपल्या कामकाज नियमावलीमध्ये अशी जर कुठली सुचना असेल तर त्याचे वाचन करावे असा नियम आहे आणि त्यामुळे त्याचे वाचन व्हावे असे माझे मत आहे मा.महापौरजी. जर त्याचे वाचन होत नसेल तर अशी कोणतीही सुचना यामध्ये स्विकारण्यात येवू नये अशी माझी विनंती आहे.

महापौर:- जे सर्व सम्मतीने होत नाही असे विषय सभागृहात घेणे योग्य होणार नाही.. अविनाश ठाकरे यांनी मा.सदस्य सुनिल अग्रवाल यांनी विनंती केली त्याचे पालन त्यांनी केले. आपण आक्षेप घेतला खर तर ऑनलाईन सभा असल्यामुळे सुचना माझ्यापर्यंत पोहचलेली नाही. त्या सुचनेचे सभागृहामध्ये वाचन होवू शकत नाही. नियमाप्रमाणे त्या सुचनेचे वाचन सभागृहात झाले पाहिजे. हा विषय जसाचातसा सभागृहाच्या पटलावर ठेवला आहे तसाच मंजूर करण्यात येतो.

**<u>ठराव क्र.६७/वि.क्र.३३</u> :-** नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उप अभियंता / सहा.
**{साप्रवि}** अभियंता (विद्युत व कल) या पदावर पदोन्नती बाबतचा विषय दि. 03/11/2020 रोजी पदोन्नती तपासणी समितीपुढे ठेवण्यात आला असता, त्यात श्री. प्रकाश यमदे, कनिष्ठ अभियंता, (विद्युत व कल) यांना पदोन्नतीस पात्र ठरवून उप अभियंता (विद्युत व कल) व सहा. अभियंता (विद्युत व कल) यापैकी एका पदावर पदोन्नती देण्याची समितीने शिफारस केलेली आहे.

त्यानुसार नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर रिक्त असलेल्या उप अभियंता/सहा. अभियंता (विद्युत व कल) या पदावर शासन पत्र दि. 29 डिसेंबर 2017 नुसार मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल विशेष अनुज्ञा याचिका क्र. 28306/2017 च्या निर्णयाच्या अधीन राहून खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात सेवाजेष्ठतेनुसार,वेतनमान रू. 15600–39100 ग्रेड पे 5400 या वेतनश्रेणीत प्राप्त वेतन आणि इतर भत्त्यासह श्री. प्रकाश यमदे,कनिष्ठ अभियंता (विद्युत व कल) यांना सहा. अभियंता (विद्युत व कल) या पदावर पदोन्नती देण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्र.६८/वि.क्र.३४</u>** :- शासन निर्णय क्र. एस.आर.व्ही. २०१६-प्र.क्र. ५०९-१२ दिनांक
**{साप्रवि}** १५ मे २०१९ चे अनुषंगाने नागपूर महानगरपालिकेत आंतरजिल्हा बदली धोरण (विनियम) २०१९ तयार करण्यात आले असून त्यास मनपा ठराव क्र. ४३२/वि.क्र. ३५१ दिनांक २२-०८-२०१९ नुसार मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे व त्यानुसार दिनांक ५ नोव्हेंबर २०१९ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्रात अधिसुचित करण्यात आलेले आहे.

सदर विनिमयातील तरतुदीनुसार श्री. मोहम्मद अकबर शेख जंगु सहा. शिक्षक व श्री. जाकीरखान तसलीम खान सहा. शिक्षक माध्यमिक म.न.पा. नागपूर यांनी त्यांचे आईला गंभीर आजाराचे कारणास्तव मुख्याधिकारी, नगरपरिषद कारंजा यांचे नाहरकत प्रमाणपत्रासह अर्ज सादर केल्यामुळे तसेच शिक्षक संचालक माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे दिनांक १ डिसेंबर २०२० चे पत्रान्वये श्री. मोहम्मद अकबर शेख जंगु सहा. शिक्षक मनपा नागपूर यांना तथा दिनांक २ डिसेंबर २०२० अन्वये श्री. जाकीर खान तसलीम खान सहा. शिक्षक, मनपा नागपूर यांना बदलीचे ठिकाणी रुजू होणेबाबत कार्यमुक्त करण्याची मंजुरी प्राप्त झाल्याने आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांनी

१) श्री. मोहम्मद अकबर शेख जंगु सहा. शिक्षक कार्यालयीन आदेश क्र. १४१/ओ.ॲन्ड एम. दिनांक ११-०१-२०२१ व
२) श्री. जाकीर खान तसलीम खान, सहा. शिक्षक महानगरपालिका, नागपूर यांना आदेश क्र. १४२/ओ. ॲन्ड एम. दिनांक ११-०१-२०२१ अन्वये मु.जे. उर्दु माध्यमिक शाळा, नगरपरिषद कारंजा लाड जिल्हा वाशिम येथे कायमस्वरुपी कार्यमुक्त करण्यास मान्यता प्रदान केली आहे.

आंतरजिल्हा बदली (विनियम) २०१९ चे अनुषंगाने सदर विनियमातील अनु.क्र. ७ मधील तरतुदीनुसार पारीत दिनांक ११-०१-२०२१ चे कार्यालयीन आदेश महानगरपालिका सभागृहाचे माहितीस्तव सादर केलेला प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्याची

एकमताने नोंद घेतली

**ठराव क्र.६९/वि.क्र.३५** :- मनपा अधिनियम कलम ५९ अ अन्वये खटला दाखल करण्याची परवानगी संदर्भात सभागृहात माहिती देणेबाबत.
**{सा.प्र.वि.}**

पोलीस उपायुक्त (डिटेक्शन) गुन्हे शाखा, नागपूर शहर, नागपूर यांनी केलेल्या विनंतीनुसार, लोकसेवक डॉ. प्रवीण गंटावार, वैद्यकीय अधिकारी, (शल्यचिकित्सा) वैद्यकीय आरोग्य विभाग, महानगरपालिका, नागपूर यांचे विरुध्द पोलीस स्टेशन तहसील येथे दाखल अपराध क्रमो ३७६/२० तथा पोलीस स्टेशन मानकापूर येथे दाखल अपराध क्रमांक २८८/२० संबंधाने मा. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्याची परवानगी मा. आयुक्त मनपा यांनी महानगरपालिका अधिनियम कलम ५९ अ अन्वये दिनांक १०-०३-२०२१ रोजी प्रदान केली आहे.

करीता कृपया मनपा सभागृहाचे माहितीस्तव सादर प्रश्न सभागृहाने विचारात घेतला

श्री.अविनाश ठाकरे:-मा.महापौरजी, या विषयाच्या संदर्भात मा. संदीप जोशी महापौर असतांना त्यांनी या संबंधित अधिकारी डॉ. प्रवीण गंटावार यांच्यावर कार्यवाही करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले होते. त्या संदर्भात काय झाले याची माहिती प्रशासनाने दयावी.

श्री. निर्भय जैन(उपायुक्त):- मा.महापौरजी, या संदर्भात दिनांक २६.०६.२०२० रोजी च्या सभेमध्ये मा.महापौरजी यांनी जे निर्देश दिले होते त्या अनुषंगाने सदर निर्देश शासनाकडे विखंडनासाठी पाठविण्यात आले आहे दिनांक १४.०७.२०२० रोजी त्यावर अद्याप शासनाकडून निर्देश येणे बाकी आहे.

श्री.प्रवीण दटके:-पाईंट ऑफ आर्डर, शासनाकडे आपण जे प्रस्ताव विखंडनाकरिता प्रस्ताव पाठवितो त्या संबंधित काही समयसिमा आहे काय?

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

श्री. निर्भय जैन(उपायुक्त):- मा.महापौरजी, शासनाकडे प्रस्ताव विखंडन करण्याकरिता पाठविण्याबाबत सदर कलमामध्ये कोणतीही समयसिमा निश्चित केलेली नाही.

श्री.प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, ६० दिवसाची समयसिमा आहे. जर शासनाने त्यावर निर्णय केला नाही तर मा.आयुक्त स्वत:च्या सद्सदविवेक बुध्दीने निर्णय करु शकतात. असे वाचनात आहे मी कन्फर्म करुन घेतो.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, हा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठवून किती दिवस झाले आहे.

श्री. निर्भय जैन(उपायुक्त):- मा.महापौरजी, हा प्रस्ताव दिनांक १४.०७.२०२० रोजी शासनाकडे पाठविले आहे परंतु त्यामध्ये ६० दिवसाची तरतूद नमुद नाही.

श्री.प्रवीण दटके:-मा.महापौरजी, निगम सचिवांना या संबंधित कलमाचे वाचन करावे असे आपण आदेश दयावे.

महापौर:-शासनाकडे विखंडनासाठी प्रस्ताव पाठवितो त्याबाबतचे नियम काय आहे त्याचे वाचन करावे.

निगम सचिव(डॉ.रंजना लाडे):- कलम ४५१ वाचले

श्री.विजय झलके:-पाईंट ऑफ इन्फोमेशन, मा.महापौरजी, कलम४५१ मे अगर स्पेसिफिक टाईम मे राज्य शासन विखंडन के लिए भेजा हुए प्रस्ताव पर इतने इतने दिन मे करना चाहिए अगर ऐसा विखंडन नही किया है तो यह मेरा पहिला सवाल है और दुसरा सवाल यह है की सिटीजन चार्टर ॲक्ट जो महाराष्ट्र राज्य मे लागू है कितने टाईम डयुरेशन मे उसपर निर्णय लेना अपेक्षित है। इतने समय मे विखंडन के प्रस्ताव पर निर्णय नही लिया है तो उसका मतलब यह है की विखंडन के प्रस्ताव मंजूर नही किया है। एक इसमे आयुक्त महोदय को

मा.महापौरजी ने निर्देश दिये उस ठराव पर इम्पलीमेंट किया गया है क्या मा.महापौरजी।

महापौर:- प्रशासन इसकी जानकारी दे।

श्री. निर्भय जैन(उपायुक्त):- मा.महापौरजी, ४५१ कलमात शासनाने विखंडनाच्या प्रस्तावाच्या संदर्भात कोणतीही टाईमलिमीट फ्रेम केलेली नाही.

श्री.विजय झलके:-मा.महापौरजी, एमएमसी ॲक्टमध्ये कायद्याच्या अशा अनेक कलमामध्ये कोणत्याही गोष्टी इतक्या स्पष्ट नाही. अनेक कायद्यामध्ये काही गोष्टी स्पष्ट नाही आहे. अशा स्थितीमध्ये राज्य शासनाकडे विखंडनासाठी पाठविलेल्या प्रस्तावामध्ये सिटीजन चार्टर ॲक्टमध्ये कलम १७२ (अ) प्रमाणे डिसाईड केलेल्या फाईलमध्ये इतक्या दिवसात कार्यवाही केली पाहिजे तसेच महाराष्ट्र शासनाच्या नियमामध्येआहे. अशा स्थितीमध्ये राज्य शासनाकडे प्रस्ताव विखंडनासाठी पाठविले तर अशा स्थितीमध्ये कार्यवाही करता येईल. ६० दिवसामध्ये नियमाप्रमाणे कार्यवाही झाली पाहिजे.

श्री.अविनाश ठाकरे:-मा.महापौरजी, हा विषय मी वाचला. या विषयामध्ये सभागृहामध्ये भरपूर चर्चा झाली होती. पाच दिवस ते सभागृह चालले होते आणि दोन दिवस या गंटावार नावाच्या अधिका-यावर चर्चा झाली होती मा.महापौरजी. आपण ज्या वेळेला लागोपाठ दोन दिवस चर्चा करुन गंटावारने काय काय उद्योग केले, ते कसे वागले, त्यांची कार्यपध्दती काय आहे. यांनी काय काय जमा केले, यांनी रजिस्टर कसे पळविले, यांच्या धर्मपत्नी कशा एका राजकीय पक्षाची कार्यकर्त्या कशी आहे. याचे सहप्रमाण पुरावे आपण त्या वेळेला दिलेले होते. त्यावेळेस आपण आमच्या सोबत बसले होते आज रुलिंग देण्याकरिता बसले आहे. हा कायद्याचे कलम ४५१ काय सांगतो तर कुठल्याही प्रकारे महानगरपालिकेच्या प्रापर्टीचे अपव्यय होत असेल, चुकीचे काम केले असेल असे प्रकारे काही असेल तर त्याचेवर आरोप पत्र असेल, कायद्यामध्ये ज्या ज्या गोष्टी सांगितल्या आहेत त्याच्या विपरीत हे गंटावार साहेब ज्यावेळेला होते. शोकांतिका बघा मा.महापौरजी, जास्त दिवस झाले नाही. ही सभा जून, ऑगस्ट महिन्यात झाली होती आणि आज आठ-नऊ महिन्यानंतर आपण बसलो आहे. ज्या प्रशासनाने हा अधिकारी अत्यंत चांगला आहे, अत्यंत व्यवस्थित आहे, अत्यंत चांगला काम करणारा, उत्तम अधिकारी अशा प्रकारचा अभिर्भाव आणून याचा संस्पेंडचा आर्डर विखंडीत करण्याकरिता शासनाकडे पाठविला होता त्याच प्रशासनाने आज यांच्या दुर्दैवाने म्हणा, याच प्रशासनाला या महासभेपुढे याच अधिका-यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याचा विषय परवानगी करिता पाठवावा लागला आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे:-पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, विषय क्र. ३५ स्पेसिफिक आहे. डॉ.प्रवीण गंटावार यांच्यावर ॲन्टी करप्शन विभागाकडून गुन्हा दाखल करण्याकरिता त्याबद्दल न्यायालयामध्ये फौजदारी गुन्हा दाखल करावयाचा आहे. महानगरपालिकेच्या अधिकारी, कर्मचा-यावर अशा प्रकाराचे मा. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्याचे असेल तर या सभागृहाची परवानगी घेणे आवश्यक आहे. परवानगी मागण्यासाठी प्रशासनाने हा प्रस्ताव पाठविला आहे. मा.महापौरजी, परवानगी आपल्याला द्यायचीच आहे यामध्ये दुमत नाही.

महापौर :- श्री.प्रफुल्ल गुडधे एक सुधार करु इच्छितो, ही ॲन्टी करप्शन डिपार्टमेंटवाली तक्रार नाही आहे. या तक्रारीमध्ये फिर्यादी दयाशंकर तिवारी आहे. सभागृहाच्या पटलावर चुकीचे आले नाही पाहिजे म्हणून सुधार करु इच्छितो.

श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, हरकत नाही. कुठलीच तक्रार असो, त्याच्यावर दोषारोपन झाले असतील तर दोषारोप पत्र दाखल करण्याकरिता महानगरपालिकेच्या परवानगीची आवश्यकता आहे ती परवानगी या सभागृहाने या विषयावर प्रदान करावी ही विनंती करतो मा.महापौरजी.

श्री.अविनाश ठाकरे:-मा.महापौरजी, प्रफुल्ल गुडधे म्हणतात ते बरोबर आहे परंतु मा.महापौरजी या सभागृहाच्या लक्षात आले पाहिजे. त्यावेळेस नगरसेवकांना चोर ठरविणारे हे अधिकारी या गंटावारला वाचविण्याचा प्रयत्न केला होता. या सभागृहाला आणि प्रशासनाच्या लक्षात आले पाहिजे मा.महापौरजी, ज्या नागपूर महानगरपालिकेच्या या प्रशासनाने या अधिका-यावर कार्यवाही केली नाही म्हणून मा.महापौरजी आपल्याला या अधिका-याच्या विरोधात एफआयआर दाखल करावा लागला. पोलीस इन्वेस्टीगेशन मध्ये तो प्रत्यक्ष सापडला. मी हे या सभागृहाच्या लक्षात आणून देवू इच्छितो की आणि हा इशारा या प्रशासनाला आहे की आपण चुकीचे निर्णय घ्याल तर त्याची सुनावणी दुस-या ठिकाणी होवू शकते. मा.महापौरजी, या विषयाला मंजूरी प्रदान करावी अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री.प्रवीण दटके:-पाईंट ऑफ आर्डर, मा.महापौरजी, हा एकच विषय नाही. तर विकास कामाच्या बाबतीतीलही विषय आहे. त्या सभेतील सर्वच्या सर्व निर्णय आपण विखंडीत करण्याकरिता राज्य शासनाकडे पाठविले. माझी आपल्या माध्यमातून प्रशासनाला विनंती आहे असे किती विषय आपण राज्य शासनाला विखंडीत करण्याकरिता पाठविले आणि किती विषयाच्या बाबतीत निर्णय झाले आहे या सभागृहात आपल्या माध्यमातून माहिती दयावी.

श्री.प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, दटके साहेबांच्या प्रश्नासोबत माझा उप प्रश्न आहे. २०१४ ते २०१९ ऑक्टोंबरपर्यंत नागपूर महानगरपालिकेचे किती निर्णय विखंडीत करण्याकरिता शासनाकडे गेले आणि त्या नंतर किती गेले त्याचे पण बायफरकेशन करुन सांगण्यात यावे.

श्री.प्रवीण दटके:-मा.महापौरजी, मी स्पेसिफिक माहिती विचारतो आहे ती प्रशासनाकडे आहे. जी सध्या प्रशासनाकडे माहिती नाही ती मा. प्रफुल्लजीला लेखी माहिती दयावी लागेल. जी मागच्या वर्षीची शेवटची सभा पाच दिवस कविवर्य सुरेश भट सभागृहात चालली. मा.महापौरजी यांनी सभागृहाने मत ऐकुन जे निर्देश दिले होते त्यातील किती विषय प्रशासनाने शासनाकडे विखंडीत करण्याकरिता पाठविले होते त्याची माहिती आता या सभागृहात देण्यात यावी.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

श्री. निर्भय जैन(उपायुक्त):- मा.महापौरजी, या सभेमध्ये जे निर्देश देण्यात आले होते त्याच्यामध्ये एकुण सहा प्रस्ताव विखंडीत करण्याकरिता पाठविण्यात आले होते. ते सहाच्या सहा शासन स्तरावर प्रलंबित आहेत.

श्री.प्रवीण दटके:- सहा प्रस्ताव कोणते आहेत.

महापौर:- प्रशासनाने कृपया माहिती दयावी.

श्री. निर्भय जैन(उपायुक्त):- मा.महापौरजी, मी पाच मिनीटांत माहिती जमा करुन सभागृहासमोर देतो.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, तोपर्यंत पुढचा विषय घ्यावा अशी विनंती करतो.

महापौर:- या विषयावर जैन साहेब जेव्हा माहिती देतील तेव्हा आपण चर्चा करु.

श्री.अविनाश ठाकरे:-पाईंट ऑफ इन्फोर्मेशन मा.महापौरजी. या विषयावर एक प्रश्न आहे. आपल्या महासभेने सभा संचालनाच्या अनुषंगाने एक समिती गठीत केली होती की विषयपत्रिकेवर काय काय आले पाहिजे. त्याच्यामध्ये एक विषय असा आहे. शासनाला जो पत्रव्यवहार महानगरपालिकेतर्फे होतो त्याची सुध्दा माहिती या

सभागृहाच्या पटलावर विषयपत्रिकेच्या माध्यमातून देणे आवश्यक आहे. प्रशासनाने विखंडनासाठी जो पत्रव्यवहार केला त्याची माहिती या सभागृहाला देणे अपेक्षित आहे ते नोटींगकरिता आले नाही.

महापौर:-त्याची सुध्दा माहिती जैन साहेब देतील.

वरील चर्चेनंतर मनपा अधिनियम कलम ५९ अ अन्वये खटला दाखल करण्याची परवानगी संदर्भात सभागृहात माहिती देणेबाबत.

पोलीस उपायुक्त (डिटेक्शन) गुन्हे शाखा, नागपूर शहर, नागपूर यांनी केलेल्या विनंतीनुसार, लोकसेवक डॉ. प्रवीण गंटावार, वैद्यकीय अधिकारी, (शल्यचिकित्सा) वैद्यकीय आरोग्य विभाग, महानगरपालिका, नागपूर यांचे विरुध्द पोलीस स्टेशन तहसील येथे दाखल अपराध क्रमो ३७६/२० तथा पोलीस स्टेशन मानकापूर येथे दाखल अपराध क्रमांक २८८/२० संबंधाने मा. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्याची परवानगी मा. आयुक्त मनपा यांनी महानगरपालिका अधिनियम कलम ५९ अ अन्वये दिनांक १०-०३-२०२१ रोजी प्रदान केली आहे.

करीता कृपया मनपा सभागृहाचे माहितीस्तव सादर प्रश्नाची सभागृहाने नोंद घ्यावी या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मान्यता प्रदान केली.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, विषय क्र. ३६ हा उद्यान विभागाचा विषय आहे. मागच्या वेळेस हा विषय सभागृहात प्रश्नाच्या माध्यमातून आणला होता. त्या वेळेला मी काही प्रश्न सभागृहाच्या पटलावर ठेवले होते.आपण आदेश दिले होते ते आदेश देतांना मला एक पत्र प्राप्त झाले आहे. ज्या विषयावर एका अधिका-याला निलंबन करण्याचा आपण आदेश दिला होता त्या विषयाच्या संबंधित मला एक पत्र प्राप्त झाले आहे ते १७ तारखेला संध्याकाळी ६.३० वाजता. ते पत्र माजी आयुक्त अभिजित बांगर यांनी कामाचे तुकडे पाडण्याकरिता परवानगी दिली आहे त्याचे नावानिशी पत्र मला प्राप्त झाले आहे. मागच्याही सभेत विरोधी पक्ष नेता मा. तानाजी वनवे यांनी नंदलाल समितीचा उल्लेख केला होता. नंदलाल समितीने कामाचे तुकडे पाडण्यावर फौजदारी गुन्हे दाखल केले होते. या संबंधिची माहिती संबंधित विभागाच्या मार्फत किंवा विधी विभागाचे जे कुणी असतील ते आपल्या माध्यमातून सभागृहात सांगावी. मी पत्राचे वाचन करण्यात तयार आहे. विश्वास नसेल तर पत्र जमा करण्यात तयार आहे.(पत्र वाचले)

महापौर:- सन्माननीय सदस्य श्री.प्रवीण दटके का प्रश्न है, एक काम के तुकडे करने पर सन्माननीय नगरसेवको पर गुन्हा दाखल महानगरपालिका द्वारा किया गया है क्या? इसकी जानकारी कृपया विधी विभाग के माध्यम से दी जाये।

श्री.कपले(विधी अधिकारी):-मा.महापौरजी, नंदलाल कमेटीच्या रिपोर्टमध्ये एका कामाचे तुकडे करण्याच्या अनुषंगाने एक शिर्षक पास झाले होते. व त्यांच्यावर गुन्हे दाखल झाले आहे ते महानगरपालिकेच्या विधी विभागाद्वारे दाखल झालेले नव्हते ते सामान्य प्रशासन विभागाचे उपायुक्त श्री. सिद्दीकी यांनी एक तक्रार दाखल केली आणि त्या आधारावर पोलीसांमार्फत गुन्हा दाखल झाल्याचे माझ्या ऐकण्यात आहे.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, याचा अर्थ महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागामाध्यमातून त्यावेळेचे उपायुक्त यांच्या म्हणण्यानुसार त्या वेळेचे आयुक्त श्री.अभिजित बांगर साहेब यांनी कामाचे तुकडे करण्याकरिता परवानगी दिली होती. याचा अर्थ असा की त्या वेळेचे आयुक्त यांनी कामाचे तुकडे करण्याकरिता

परवानगी दिली तर महानगरपालिकेचा सामान्य प्रशासन विभाग वा विधी अधिकारी यांनी संबंधित आयुक्त त्या वेळेचे यांच्यावर काय कार्यवाही केली याची माहिती दयावी.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

श्री. निर्भय जैन(उपायुक्त):- मा.महापौरजी, माझ्याकडे सध्या माहिती उपलब्ध नाही.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, त्यावेळेचे आयुक्त होते अभिजित बांगर. एका कामात झाड लावणे, एका कामात खत पुरविणे, एका कामात माती पुरविणे असे टेंडर काढून काम करणे असे मी या महानगरपालिकेत पहिल्यांदा बघतो आहे. मला अभिजित बांगर या आयुक्तावर पुर्ण विश्वास आहे. परंतु आयुक्त अशा भ्रष्टाचारी अधिका-याला कां वाचवितो. अशा भ्रष्टाचारी अधिका-यांवर वेळोवेळी कार्यवाही झाली पाहिजे. मी आपल्याला विनंती करतो, या अधिका-याने आयुक्त अभिजित बांगर यांचे नाव घेवून या प्रश्नाचे उत्तर दिले आहे. त्या संबंधित अधिका-यावर कार्यवाही होत असेल तर यांनी दिलेल्या पत्रानुसार माजी तत्कालीन आयुक्त अभिजित बांगर यांच्यावर गुन्हा दाखल करावा काय? त्यांचे मी पत्र दाखवितो.

महापौर:- संबंधित पत्रावर पुर्व निगम आयुक्त अभिजित बांगर यांचे नाव आहे. या विषयावर त्यांच्याकडून स्पष्टीकरण मागविण्यात यावे असे हे सभागृह निर्देश देत आहे.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, इथे विषय संपत नाही आहे यांनी कामाचे तुकडे केले आणि त्या पत्रावर अभिजित बांगर यांची सही आहे. याच्या आधी ज्या अधिका-यांनी अशा पध्दतीने नस्तीवर सहया केल्या असतील त्यांची या सभागृहाच्या आपल्या माध्यमातून मला प्रशासनाकडून माहिती हवी आहे. अभिजित बांगर यांच्या आधी ज्या ज्या अधिका-यांनी सहया केल्या आहे. ज्यांनी ही नस्ती तयार करण्यास सुरुवात केली. याच्यामध्ये ज्या ज्या अधिका-यांनी सहया केल्या त्यांनी या कामाचे तुकडे पाडले. आपण अभिजित बांगर यांचेकडून स्पष्टीकरण तर मागविले आहे. परंतु ज्या ज्या अधिका-यांच्या सहया त्या नस्तीवर आहेत त्यांच्यावर काय कार्यवाही अपेक्षित आहे याबाबतीत खुलासा प्रशासनाने आपल्या माध्यमातून या सभागृहात करावा.

श्री.प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, पाईंट ऑफ इन्फोंमेशन, दटके साहेबांच्या प्रश्नाला एक उपप्रश्न आहे. नागपूर महापालिकेच्या महापौर फंडाचे या आधी तुकडे करण्यात आले अशी बातमी माझ्या वाचनात आहे. मला आठवत नाही. त्यावेळेचे तत्कालीन महापौर फंडाचे तुकडे केले होते त्या सोबत हा विषय संलग्न करावा. अशा पध्दतीने महापौर फंडाचे तुकडे झाले असतील तर ती कार्यवाही या सोबत करणार आहे का?

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, त्या संदर्भात त्यांनी वेगळा प्रश्न टाकावा.

श्रीमती आभा पांडे:-पाईट ऑफ आर्डर मा.महापौरजी. पूर्व महापौर प्रवीण दटके यांनी जी मागणी केली आहे आणि प्रफुल्ल गुडधे यांनी जी मागणी केली आहे या दोन्ही मागणीला माझी संमत्ती आहे. जर कोणत्या अधिका-याने एका कामाचे तुकडे केले असतील आणि जर पुर्व महापौर यांनी आपल्या निधीचे जर तुकडे केले असतील तर या दोघांवर कार्यवाही झाली पाहिजे. एक अधिका-याने कामाचे तुकडे केले म्हणून त्याच्यावर कार्यवाही होईल आणि महापौर पदाचा गैरवापर ज्यांनी केला असेल त्यांचे मला नाव आठवत नाही. ते महापौर असतांना त्यांनी निधीचे तुकडे केले असेल तर त्यांच्यावर सुध्दा तीच कार्यवाही झाली पाहिजे. त्या अधिका-यावर जी कार्यवाही करण्याची मागणी मा. माजी महापौर प्रवीण दटके करीत आहे. ही माझी मागणी आहे मा.महापौरजी.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, आभाताई पांडे यांना माझे नाव जर घ्यायचे असेल तर माझी काही हरकत नाही.

श्री.प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर, माजी महापौरांचे आता नाव आठवत नाही मात्र एवढे निश्चित आहे की माजी महापौर प्रवीण दटके ते नाहीत. त्याच्यामुळे प्रवीण दटके यांचा प्रश्न नाही. परंतु महापौर फंडाच्या कामाची प्रत ती आता माझ्याकडे नाही ती मी उदया उपलब्ध करुन देवू शकतो. प्रवीण दटके हे माझे मित्र आहेत, ते मला लहान भावासारखे आहेत. त्यांच्या प्रत्येक कृतीवर माझे लक्ष असते त्यामुळे ते असे करु शकत नाही तेवढयाच ताकदीने मी सांगू शकतो.

श्रीमती आभा पांडे:-मा.महापौरजी, आमचा लहान भाऊ आमदार आदरणीय माजी महापौर प्रवीण दटके नाहीत परंतु कुणीतरी माजी महापौर आहेत. माझी मागणी आहे मा.महापौरजी, अधिका-यावर जी कार्यवाही होणार असेल तीच कार्यवाही पूर्व महापौर यांच्यावर सुध्दा कार्यवाही झाली पाहिजे.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, आतापर्यंत १०-१५-२० वर्षात जे जे महापौर झालेत. माझ्यासहीत त्या सर्व महापौरांच्या महापौर फंडाची चौकशी व्हावी अशी माझी मागणी आहे.

श्री.अविनाश ठाकरे:- पाईंट ऑफ आर्डर, मा.महापौरजी विषय दुसरीकडे जात आहे. नगरसेवक असोत, महापौर असोत. ते फक्त पत्र देण्याचे काम करतात. प्रशासनाला जे काही कामाचे, कामकाजाचे गोष्टी अधिका-यांना सांगत असतात आणि अधिका-यांना कार्यवाही करावी लागते. चुकून महापौरांनी नगरसेवकांना पत्र दिले असेल तर प्रशासनाला वाटत असेल की कामाचे तुकडे झाले आहे तर त्यांना कल्ब करण्याचा अधिकार आहे. त्यामुळे यामध्ये महापौरांना दोष नाही आहे.

(बेल)

श्री.प्रवीण दटके:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, मा.आभाताई असतील, मा. प्रफुल्लजी असतील. २०-३० वर्षात जे जे महापौर झाले असतील त्यात मग प्रवीण दटके सहीत सर्व महापौरांच्या महापौर फंडाची चौकशी व्हावी.

महापौर:-कृपया सभागृहाने लक्ष दयावे. मी सगळयांचा म्हणणे ऐकत आहे.मुळ विषय वेगळा आहे आणि हा विषय वेगळीकडे चालला आहे. जर अशा प्रकारची चौकशी असेल तर आपण सभागृहात विषयपत्रिकेवर नोटीस देवून याची मागणी करावी. मी याच्यावर सभागृहात चर्चा करण्यास तयार आहे. विषय आहे त्याला मंजूरी देवून पुढच्या विषयाकडे वाटचाल करावी.

**<u>ठराव क्र.७०/वि.क्र.३६</u>** :- **{उद्यान विभाग}** महाराष्ट्र(नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, 1975 कलम 5सेक्शन 2 नुसार नागपूर महानगरपालिकेकरिता प्रत्येक झोन करिता वृक्षअधिकारी म्हणून सहायक आयुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा असणार नाही. वृक्ष प्राधिकरण वेळोवेळी निश्चित करील अशा संपूर्ण नागरी क्षेत्रावरकिंवा त्यांच्या अशा भागावर वृक्ष अधिकारी म्हणून ते अधिकारीतेचा वापर करील.

1. संपूर्ण वाळलेली झाडे, झाडांच्या किरकोळ फांदया व धोकादायक वृक्ष छाटणीची परवाणगी कामाची आवश्यकता व मौका तपासणी करुन सहायक आयुक्त आपल्या स्तरावर देतील. या कामा करिता प्रत्येक झोन मध्ये नेमण्यात आलेल झोन समन्वयक त्यांना मदत करतील.
2. 1 ते 25 झाडांचा जमिनीपासून कापण्याकरिताचे प्रस्ताव प्रत्येक झोन कडून उद्यान विभागास प्राप्त झाल्यावर मा आयुक्त तथा अध्यक्ष वृक्ष प्राधिकरण यांची परवाणगी घेण्यात येईल.

3. 25 झांडापेक्षा अधिके वृक्ष कटाईचे प्रस्ताव संबधीत झोन कडून प्राप्त झाल्यानंतर वृक्ष प्राधिकरण समिती पुढे मंजूरीस्तव ठेवण्यात येतील. वृक्ष प्राधिकरण समितीचे कामकाज करण्याकरिता मुख्यालयात उद्यान अधिक्षक हे वृक्ष अधिकारी म्हणून काम पाहतील.

करिता झोन व मुख्यालय स्तरावर वृक्ष प्राधिकरण समितीचे वृक्ष अधिकारी नेमणूक करणेबाबतचा प्रस्तावास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्र.७१/वि.क्र.३७ :-** मौजा-वाठोडा, खसरा क्र. 114 (P) मधील 1.00 एकर जागा
**{मालमत्ता (स्थावर) विभाग}** वाठोडा पोलीस स्टेशनकरीता दिलेल्या मनपा सभागृह ठराव क्र. 325 दि. 29.01.2019 अन्वये घेतलेल्या निर्णयावर सभागृहाने उचित निर्णय घेणे गरजेचे असल्यामुळे सभागृहाचे पटलावर ठेवणेबाबत.

नागपुर महानगरपालिकेच्या मालकिच्या मौजा-वाठोडा, खसरा क्र. 114 येथील गिड्डोबा मंदिर ते चांदमारी रोडवरील एकुण आराजी 50.00 मी. x 80.00 मी. = 4000.00 चै.मी. जागा प्रस्तावित पोलीस स्टेशन करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 79 (d) अन्वये बाजारभाव मुल्याप्रमाणे जागा देण्याची तरतुद आहे. यानुसार या जागेची अधिमुल्य राशी रु. 6.08 कोटी व वार्षीक भुभाडे 12.16 लक्ष होत आहे मात्र पोलीस विभागाने सदर जागेची मागणी विनामुल्य केलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये महानगरपालिकेची जमीन विनामुल्य देण्याची तरतुद नाही. तथापि, महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण क्रमांक 82 प्रसिद्धी दि. 01 सप्टेंबर 2017 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 79 (g) मध्ये प्रस्तावित केलेल्या सुधारणेनुसार प्रकरण दोन मधील (तीन) मध्ये महाराष्ट्र शासनाच्या किंवा भारत सरकारच्या कोणत्याही विभागाला किंवा उपक्रमाला सार्वजनिक प्रयोजनासाठी भाडेपट्टयाने देण्याकरीता नियत असलेल्या अधिमुल्याच्या भाड्याच्या बाजारभाव मुल्यापेक्षा किंवा इतर मोबदल्यापेक्षा कमी असेल अशा भाड्याने आणि महापालिका लादील अशा शर्तीस अधिन राहुन 30 वर्षाहुन अधिक होणार नाही इतक्या मुदतीकरीता भाडेपट्टयाने देता येईल.

मौजा-वाठोडा, खसरा क्र. 114 (P) मधील 1.00 एकर जागा वाठोडा पोलीस स्टेशन करीता महानगरपालिका ठराव क्र. 325 दि. 29.01.2019 नुसार देण्याचे प्रस्तावित आहे. मंजुर ठरावानुसार वाठोडा पोलीस स्टेशनकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 (g) मधील सुधारणानुसार सदर जागा सार्वजनिक प्रयोजनासाठी देत असल्यामुळे विनामुल्य देण्यात यावी व त्या जागेच्या मोबदल्यात महाल रोग निदान केंद्राच्या बाजुला असलेली गृह विभागाची जागा (एसीपी बंगला) महानगरपालिकेला महाल रोग निदान केंद्राच्या विस्तारासाठी देण्यात यावी, असे मा. सदस्य श्री. प्रविण दटके यांनी केलेल्या सुचनेनुसार विषय मंजुर करण्यात आला होता. मा. आयुक्त यांचे दि. 13.02.2019 नुसार उक्त ठरावानुरूप घेतलेला निर्णय कार्यान्वित करण्यास मंजुरी प्राप्त झाली.

मौजा-वाठोडा, खसरा क्र. 114, 115/1, 2 व 3, 116/1, 2, 167, 168/1, 2, 169/1, 2, 170, 171, 174, 180/1, 2 व मौजा-भांडेवाडी, खसरा क्र. 137/2, 138, 139 व 167/1 मधील अशी एकुण 102.52 एकर जागेचा कौशल्य विकास विद्यापिठ केंद्र (Skill Development Univercity and Management Center) या वापराकरीता दि. 27.01.2016 चे शासन निर्णयानुसार फेरबदल करण्यात आलेला आहे. परंतु या ठिकाणी पोलीस स्टेशनला जागा दयावयाची असल्यामुळे 1.00 एकर जागेवर पोलीस स्टेशनचा वापर करण्याचा फेरबदलाचा प्रस्ताव नगर रचना विभागा मार्फत पाठविण्यात आलेला आहे. तसेच मौजा-वाठोडा, खसरा क्र. 114 (P) मधील 1.00 एकर जागा विनामुल्य महानगरपालिका ठराव क्र. 325 दि. 29.01.2019 हस्तांतरण करीता शासनाकडे दि. 20.02.2019 च्या पत्रानुसार मंजुरी प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

दि. 20.02.2019 च्या पत्रानुसार सादर प्रस्तावास अनुसरून महाराष्ट्र शासन नगर विकास विभागानी पत्र क्र.' नामपा-2020/प्र.क्र.40/नवि26 दि. 12.10.2020 नुसार खालील माहिती मागीतलेली आहे.:-

1. मौजा-वाठोडा येथील पोलीस स्टेशनसाठी हस्तांतरीत करावयाचे जागेवर "कौशल्य विकास विद्यापिठ व व्यवस्थापना केंद्राकरीता" असे आरक्षण आहे. हे आरक्षण बदलवुन ते पोलीस स्टेशनसाठी करावे लागेल. हा बदल महानगरपालिकेने करावा.
2. गृह विभागाकडुन जी महाल येथील जागा हस्तांतरीत होणार आहे, ती रोग निदान केंद्राच्या विस्तारासाठी वापरावयाचा महानगरपालिकेचा मानस आहे असे करतांना या जागेवरील सद्याचे आरक्षण काय आहे? हे विचारात घेवुन तेथे रोग निदान केंद्राचा विस्तार करणे शक्य आहे काय? याची महानगरपालिकेने तपासणी करावी. नसल्यास ते ही आरक्षण बदलवुन घ्यावे.
3. नागपुर येथील पोलीस आयुक्त कार्यालयाला, त्यांची जागा महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यासाठी शासनाच्या गृह विभागाची परवानगी घेण्यास कळवावे.
4. वरील प्रमाणे आरक्षण बदल व गृह विभागाची परवानगी प्राप्त झाल्यावर शासनास मंजुरीस्तव प्रस्ताव सादर करावा, असे पत्रात नमुद आहे.

यामधील मुद्दा क्र. 3 नुसार पोलीस उपायुक्त (मुख्यालय) यांना स्थावर विभागाचे पत्र क्र. मा.वि./507 दि. 08.10.2020 ला गृह विभागाची एसीपी बंगल्याची जागा महानगरपालिकेला हस्तांतरीत करण्याबाबत कळविले होते, परंतु पोलीस उपायुक्त (मुख्यालय) यांनी पोलीस आयुक्त, नागपुर शहर कार्यालयाचे पत्र क्र. पोआना/जि-1/ 17197/एसीपी बंगला जागा/2020 दि. 13.11.2020 नुसार मौजा-नागपुर, न.भु.क्र. 222, 111 मधील 630.28 चै.मी. मध्ये जुना एसीपी बंगल्याची जागा महाल रोग निदान केंद्राच्या विस्तारीकरणासाठी हस्तांतरीत करता येणार नाही असे कळविले आहे.

अशा परिस्थितीत महानगरपालिका सभागृहानी ठराव क्र. 325 दि. 29.01.2020 अन्वये घेतलेल्या निर्णयावर सभागृहानी पुन:निर्णय घेणेचे प्रश्न सभागृहाने विचारात घेवून गृह विभागाकडे स्व.प्रभाकरराव दटके रोग निदान केंद्राच्या बाजूला असलेल्या जागेच्या प्रस्तावावर शासनाचा सकारात्मक अभिप्राय येईपर्यंत हा विषय स्थगित ठेवण्यात येते. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्र.७२/वि.क्र.३८</u> :-** सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, सामाजिक न्याय व **{समाज कल्याण विभाग}** अधिकारिता विभाग, भारत सरकार यांच्या मार्फत प्राप्त झालेल्या दि. 14/01/2020 रोजीच्या पत्रान्वये भिक्षेकरी व्यक्तीचे पुनर्वसन करण्याबाबत राष्ट्रीय स्तरावर मोहीम राबविण्याकरिता देशातील 10 शहरांची (महानगरपालिका) निवड करण्यात आली आहे. 10 शहरांमध्ये मोहीम राबविण्याकरिता नागपूर महानगरपालिकेचे नाव नमूद असल्याचे कळविण्यात आले. दि. 24/01/2020 रोजी प्राप्त झालेल्या पत्रान्वये भिक्षेकाऱ्यांचे सर्व्हेक्षण करण्याबाबत सूचना देण्यात आली. त्यानुषंगाने नागपूर महानगरपालिका अंतर्गत नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांच्या मार्फत V–Max कंपनीच्या माध्यमातून फेब्रुवारी 2019 मध्ये शहरी बेघरांचे सर्व्हेक्षण करण्यात आले होते. त्यामध्ये 1070 बेघर व्यक्ती आढळून आले. त्याचप्रमाणे कोविड–19 च्या अनुषंगाने विभागामार्फत समुदाय संघटक व शहरी बेघर निवारा व्यवस्थापन करणाऱ्या संस्था यांच्या माध्यमातून माहे एप्रिल 2020 मध्ये सर्व्हेक्षण केले असता एकूण 884 भिक्षेकरी व बेघर आढळून आले. याप्रमाणे दोन्ही सर्व्हेक्षणा अंतर्गत एकूण 1954 व्यक्ती सर्व्हेक्षणामध्ये आढळून आले आहे.

तद्नंतर दि. 25/01/2020 रोजी प्राप्त झालेल्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे नागपूर महानगरपालिकेने उपायुक्त (समाज विकास विभाग) यांची नोडल अधिकारी म्हणून निवड करून,खालील नमूद केल्याप्रमाणे सविस्तर तीन टप्प्यामध्ये प्रकल्पाची विभाजणी करून भिक्षेकाऱ्यांचे पुनर्वसन करण्याकरिता "शहर विशिष्ट कृती नियोजन आराखडा" तयार करण्यात आला व सदर

आराखड्यात प्रथम टप्प्यात प्राथमिक स्तरावर 60 व्यक्तींना निवारागृहाच्या माध्यमातून सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. सदर निवारागृहात 30 पुरुष व 05 ते 06 कुटुंब (सदस्य संख्या 30) भिक्षेकऱ्यांना लाभ देण्याचे प्रस्तावीत आहे.द्वितीय टप्प्यामध्ये 1894 भिक्षेक–यांना ते वास्तव्य करीत असलेल्या ठिकाणी विविध सुविधा उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित करण्यात आले. तृतीय टप्प्यामध्ये1086.6 स्क्वे. मी. च्या जागेवर अंदाजे 16,000 स्क्वे. फुटाचे बांधकाम करून. सदर निवारागृहात 150 भिक्षेक–यांना सुविधा उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित होते.सदर आराखडा सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, सामाजिक न्याय व अधिकारिता विभाग, भारत सरकार यांना पाठविण्यात आला.

मा. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, सामाजिक न्याय व अधिकारिता विभाग, भारत सरकार यांच्या मार्फत दि. 25/11/2020 रोजी घेण्यात आलेल्या Video Conference च्या माध्यमातून आयोजित केलेल्या सभेचे इतिवृत्तामध्ये नागपूर करिता दिलेल्या निर्देशान्वये भिक्षेक7यांचे सर्व्हेक्षण करण्याबाबतची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. याच Video Conference मध्ये भिक्षेकरी गृहाचे बांधकामावर खर्च करण्याऐवजी प्रकल्प लगेच सुरु होण्याच्या दृ ष्टीने शहरातील चार दिशांना वेगवेगळ्या भागात भाड्याने इमारती घेऊन भिक्षेकरी गृह सुरु करावेत अशा सुचना मिळाल्यात.

त्यानुषंगाने नागपूर महानगरपालिका क्षेत्रा अंतर्गत पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण अशा चारही दिशेला 4 निवारागृहाकरिता सामाजिक संस्थेची ई–निविदेच्या माध्यमातून निवड करण्यात येईल. तद्नंतर निवड करण्यात आलेल्या सामाजिक संस्थांमार्फत किरायाची जागा निश्चित करून भिक्षेक–्यांना निवारागृह, अन्न, वस्त्र, निवारा, भिक्षेक–यांचे मेकओव्हर (कटिंग, दाढी, आंघोळ), दैनंदिन गरजेच्या वस्तू, आरोग्य सेवा, समुपदेशन, कौशल्य प्रशिक्षण, स्वयंरोजगार, रोजगार, मुलांकरिता शाळा, मनोरंजन ई. सेवा उपलब्ध करून देण्यात येईल. सदर सुविधेच्या माध्यमातून भिक्षेकरीच्या व्यवसायातून मुक्त करून समाजातील मुख्य प्रवाहात आणण्याकरिता तसेच भिक्षेकऱ्यांना आत्मनिर्भर बनविण्याकरिता कार्य करण्यात येईल व नागपूर शहराला भिक्षेकरी मुक्त करण्याचे दिशेने कार्य करण्यात येईल.

त्याअन्वये सदर प्रकल्प राबविण्याकरिता सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, सामाजिक न्याय व अधिकारिता विभाग, भारत सरकार यांच्या मार्फत दि. 21/12/2020 रोजी रु. १.५० कोटी निधी महानगरपालिकेच्या प्रकल्प खात्यात वळते केले आहे.सदर प्रकल्प हा 100 टक्के केंद्रशासीत पुरस्कृत असून महानगरपालिकेला कोणत्याही खर्चाकरीता गुंतवणूक करावी लागणार नाही.

सदर प्रकल्पाच्या माध्यमातून नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील भिक्षेकऱ्यांना सुविधा उपलब्ध करून भिक्षेकऱ्यांना भिक्षेकरीच्या व्यवसायातून मुक्त करून समाजातील मुख्य प्रवाहात आणण्याकरिता तसेच भिक्षेकऱ्यांना आत्मनिर्भर बनविण्याकरिता कार्य करण्यात येईल व नागपूर शहराला भिक्षेकरी मुक्त करण्याचे दिशेने कार्य करण्यात येईल.

त्यानुषंगाने सदर विषय माहितीस्तव व मंजुरीस्तव सादर प्रस्तुत प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

श्री.अविनाश ठाकरे:- विषय क्र. ३९ च्या संदर्भात प्रशासनाने माहिती दयावी.

श्रीमती बॅनजी(कार्यकारी अभियंता,जलप्रदाय):-आदरणीय महापौरजी, विषय क्र. ३९ मे यह भांडेवाडी यहा का मलनिस्सारण केंद्र यह पीपीपी तत्वपर विश्वराज को बनाने के लिए दिया है, उनको सेकंडरी फेज तक करना था। विश्वराज इनको हमने सिर्फ लॅन्ड दिया था बाकी १०० एमएलडी ट्रिटमेंट का जो प्लॉन्ट था वह कन्वर्ट किया गया था पहले सेकंडरी ट्रिटमेंट प्लॉन्ट तक ही था। वह इसके लिए दिया था की क्योंकि गोसीखुर्द प्योल्युटेड हो रहा है उसके चलते महानगरपालिका को एसटीपी बनाना बहोत जरुरी है। जो टेंडर है उससे हमको एक फार्मुला

दिया गया था उसको हर साल पीआय को पेमेंट कराना था वो कम से कम ६० कोटी का आता है। सिर्फ उसके बाद टेंडर मे यह भी क्लॉज किया गया था अगर विश्वराज चाहे तो कौन्सलिंग ट्रिटमेंट कर सकती है। कन्सलींग ट्रिटमेंट करने के बाद वह पानी वह किसी को बेच भी सकते है। और फिर वह पानी देखेगी तो उसका भी एक रॉयल्टी विश्वराज हमको पे करेगी। विश्वराज जो हमको एक रॉयल्टी पे करेगी उसका भी फार्मुला दिया गया है। उसके तहत मा.महापौरजी उसका कन्क्लुजन यह होता है लगभग साल के करीब ६० करोड के हमको विश्वराज को देना। उसके अगेस्ट हमको रॉयल्टी कुछ ३५ करोड करीब मिलेगी। जिसमे २०० एमएलडी प्लॉन्ट ट्रिटमेंट मे इसके लिए महानगरपालिका को १५ करोड देना है। और यह जो १५ कोटी जो है, हमने ऑलरेडी पहिले वाले बजेट मे ६० कोटी रखा था वह रिफ्युज किया था, ४५ करोड भी रखा है जो डिफरेन्स है १५ कोटी का वह चाहिए है इसलिये यह प्रस्ताव रखा गया है। अभी तक हमारे पास ३३ करोड का अमाऊन्ट है वह आ चुका है।

श्री.अविनाश ठाकरे:-मा.महापौरजी, मला काहीही आवाज आलेला नाही.

महापौर:- अविनाशजी माझा आवाज येत आहे. आप दुसरे मोबाईलसे ट्राय करे

श्री.अविनाश ठाकरे:-मा.महापौरजी, आवाज नाही येत आहे.

श्री.प्रवीण दटके:-मा.महापौरजी, बॅनर्जी मॅडम ने सांगितलेला कुठलाही आवाज अविनाशजी यांना आलेला नाही. हा विषयावर आम्हांलाही अभ्यास करण्याकरिता वेळ दयावा. हा विषय पुढच्या सभागृहात ठेवावा.

**ठराव क्र.७३/वि.क्र.३९** :- **{सार्व.आ.अ.विभाग}**

भांडेवाडी येथिल मलनिस्सारण केंद्राची 100 MLD वरून 200 MLD क्षमतावाढ करण्यात आलेली आहे. तो जुलै 2018 पासुन कार्यान्वित झालेला आहे. हा प्रकल्प PPP तत्वावर (Deferred Payement) वर करण्यात आलेला आहे सन 2020 – 21 च्या वार्षिक अर्थसंकल्पामध्ये वरील पदाअंतर्गत रू. 7500 लक्ष ची मागणी विभागाद्वारे करण्यात आलेली आहे. परंतू या मध्ये मा. आयुक्त यांचे सन 2020–21 च्या अर्थसंकल्पात रू. 8000 लक्ष तरतुद उपलब्ध करून दिलेली होती. तद्नंतर मा. स्थायी समितीने 4500 लक्ष ची तरतुद मंजुर केलेली आहे. 200 MLd प्रकल्प जुलै 2018 पासून कार्यान्वित झाल्यामुळे PPP Operator यांना माहे मार्च 2021 पर्यंत खालील प्रमाणे भुगतान करणे आवश्यक आहे. या प्रकल्पाद्वारे प्रक्रिया (Tertiary treatment) केलेले 190 द.ल.लि. प्रतिदिन पाणी महाजेन्कोच्या कोराडी व खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रांना Operator द्वारे पुरविण्यात येते. या ऐवजी Operator मार्फत मनपा हिस्सा अंदाजे रू. 45.00 कोटी दरवर्षी प्राप्त होणे अपेक्षित आहे. त्यामुळे ऑपरेटरला मनपा तर्फे अंदाजे रू. 505 लक्ष प्रति मिहन्याप्रमाणे सन 2020–21 करिता रू. 6050 लक्ष पैकी रू. 1550 लक्षची वाढीव तरतूद उपलब्ध करण्याकरिता यथायोग्य पदातून समायोजन करण्याचा विषय निर्णयार्थ सादर प्रश्न सभागृहाने विचारात घेवून या विषयाची संपुर्ण माहिती घेवून हा विषय पुढच्या सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावा. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्र.७४/वि.क्र.४०** :- **{झोपडपट्टीपुनर्वसनप्रा. विभाग}**

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत **EWS** घटकातील लोकांना लाभ पुरविण्याच्या हेतूने नागपूर महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत प्रकल्प अहवाल तयार करणे प्रस्तावित आहे.

या योजनेंतर्गत महाराष्ट्र राज्याचे शासन निर्णय दि. 15 जुलै 2019 नुसार, शासकीय जागा रु. 1/- प्रति चौ.मी. या नाममात्र दराने उपलब्ध करुन देण्याबाबत नमूद केले आहे.

त्यानुसार नागपूर महानगरपालिकेच्या मालकीच्या जागा रु. 1/- प्रति चौ. मी. या नाममात्र दराने उपलब्ध करुन दिल्यास नागपूर शहरातील **EWS**घटकातील नागरीकांना परवडणाऱ्या किंमतीमध्ये 30.00 चौ. मी. चटई क्षेत्रफळाची सदनिका उपलब्ध करुन देता येईल.

करिता सदर जागा रु. 1/- प्रति चौ. मी. दराने उपलब्ध करुन देण्याबाबत मंजुरीचा प्रश्न सभागृहाने विचारात घेतला

श्रीमती आभा पांडे:-मा.महापौरजी, या विषयाच्या संदर्भात मला एवढेच विचारावयाचे आहे की प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत ईडब्लूएस घटकातील लोकांना लाभ पुरविण्याच्या हेतूने नागपूर महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ देण्याचा प्रस्ताव आहे. त्याच्यामध्ये मला विचारावयाचे आहे की महानगरपालिकेची स्व:तची जागा आहे की एसआरएची जागा आहे. प्रशासनाने याचे उत्तर दयावे.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, कोण अधिकारी उत्तर देणार आहे. जोपर्यत ते उत्तर देण्यासाठी येतात त्यावेळेत मला एक गोष्ट बोलायची आहे. एक चांगला प्रकल्प महापौरजी आपल्या माध्यमातून, मा.आयुक्तांच्या माध्यमातून आणला आहे. या अशा वातातरणात प्रशासनानी हा विषय आणि त्याबद्दल प्रशासन आणि आपले दोघांचे मी अभिनंदन करतो. नागपूर शहरातील गरीब लोकांना घरे मिळतील. नियमाप्रमाणे घरे देवून एनआयटी पेक्षा अधिक सरस घरे बनवून देणार त्याबद्दल मी आपले आणि आपल्या माध्यमातून आयुक्त आणि संबंधित विभागाचे अभिनंदन करतो. यादृष्टीने आपण अनेक प्रस्ताव आणावेत. गरीबांना केंद्र आणि राज्य सरकारकडून २.५० लक्ष रुपये मिळतात याच्या व्यतिरिक्त कमी पैश्याचे हाऊसिंग घरे आणण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेच्या माध्यमातून मिळवून दिले.आपला हा प्रकल्प अत्यंत सुखपर्व आहे. मी परत एकदा गोरगरीब लोकांच्या माध्यमातून आयुक्तांचे, संबंधित विभागाचे आणि सभागृहातील सर्व मा.सदस्यांचे अभिनंदन करतो त्यांना धन्यवाद देतो. मा.आभाताई यांच्या प्रश्नाला उत्तर देवून या प्रस्तावाला मंजूरी दयावी अशी मी विनंती करतो.

श्रीमती आभा पांडे:-मा.महापौरजी, गोरगरीबांचे कल्याण हे व्हायलाच पाहिजे. सगळया लोकांना राहण्यासाठी घरे मिळायला पाहिजे. यात आम्ही व्यवधान आणू इच्छित नाही. आमचे एकच म्हणणे आहे की प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत २० टक्के सबसिडी दिली जात आहे परंतु राजीव गांधी आवास योजना होती त्यावेळी ८० टक्के सबसिडी मिळायची मा.महापौरजी. आमचे एवढेच म्हणणे आहे की ८० टक्के सबसिडी या प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत गरीब लोकांना मिळाली तर ते अतिउत्तम राहील. या चांगल्या योजना आहेत. परंतु महानगरपालिकेने कोणतीही जागा जर गरीब लोकांना देवून टाकली आणि दुसरा कुणी व्यक्ती त्याच्या विरोधात कोर्टात गेला किंवा कुठे गेला तर त्या गरीबाचे घरे रस्त्यावर येतील. म्हणून मला विचारायचा आहे की जो लाभ आपण गरीब लोकांना देणार आहे ती जागा एसआरएची आहे की महानगरपालिकेच्या मालकीची जागा आहे हेच विचारावयाचे आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, किती हेक्टर जागा कॉन्ट्रीब्युट करु राहिली ही पण माहिती दयावी.

श्री.पोहेकर(अधिक्षक अभियंता):-मा.महापौरजी, एसआरएच्या सेमीनार मध्ये घेतलेली जागा आहे. या व्यतिरिक्त महानगरपालिकेची काही भविष्यात जागा असेल तर ती शासकीय धोरणाप्रमाणे 1/- प्रति चौ.मी. या नाममात्र दराने उपलब्ध करुन देवू.

श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, महानगरपालिकेच्या इस्टेट डिपार्टमेंटकडून सुध्दा आढावा घेवून घ्यावा की महानगरपालिका किती जागा कॉन्ट्रीब्युट करीत आहे. काय होते अशा प्रकारचे प्रस्ताव आणून फक्त् त्याचा कॉम्प्लॅन्स् होवून जातो उद्या वर्तमानपत्रात अहवाल येईल की महानगरपालिका गोरगरीबांना घरे उपलब्ध करुन

देत आहे. प्रत्यक्षात एकही इंच नागपूर महानगरपालिका जागा उपलब्ध करुन देणार नाही. त्यामुळे असे होता कामा नये.

महापौर:- मा.आयुक्त साहेब उत्तर देतील.

श्री.पोहेकर(अधिक्षक अभियंता):-मा.महापौरजी, सध्या जो विषय आहे त्यामध्ये एसआरए ती जागा उपलब्ध करुन देत आहे.

श्रीमती आभा पांडे:-पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी. एसआरएची जी जागा ती एसआरएची जागा आहे ती उपलब्ध करुन द्यावयाची आहे. एसआरएच्या जागेची ॲथारिटी वेगळी आहे आणि नागपूर महानगरपालिकेच्या जागेची ॲथारिटी वेगळी आहे. एसआरएच्या जागेवर महानगरपालिका ईडब्लूएस घटकातील लोकांना जागा देवू शकते काय?

श्री.पोहेकर(अधिक्षक अभियंता ):-मा.महापौरजी, ही शासकीय योजना आहे. कोणतीही शासकीय जागा ही 1/- प्रति चौ.मी. या नाममात्र दराने शासनाकडून मंजूर केलेली आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, या योजनेसाठी महानगरपालिका किती जागा कॉन्ट्रीब्युट करण्यास तयार आहे.

महापौर:- मा.आयुक्त उत्तर देत आहे.

निगम आयुक्त:- सन्माननीय महापौर महोदय, सन्माननीय.सदन. शासनाने १५ जुलै २०१९ रोजी एक जी.आर.काढला होता त्याचा हेतू एवढाच होता पंतप्रधान आवास योजने अंतर्गत चार घटक आहेत. त्यामध्ये एक महत्वाचा घटक आहे. स्व:तच्या जागेवर लोक शासनाकडून २.५० लक्ष रुपयाचे अनुदान घेवून स्व:त कन्स्ट्रक्शन करतील. अन्य तीन घटकामध्ये एक घटक असा आहे जो शासनाच्या अर्फोडेबल हाऊसिंग नावाचे एक घटक आहे. हे शासनाच्या जमिनीवर पण होवू शकतो आणि खाजगी खुल्या जागेवर सुध्दा होवू शकतो. बाकी विकासाच्या जमिनीवर सुध्दा होवू शकतो.ज्यावेळी आपण प्रत्येक प्रकल्प करतो त्यावेळी प्रकल्पाची कॉस्ट वर्कआऊट करतो, घराची कॉस्ट आपण वर्कआऊट करतो. शेवटी लॅन्ड वॅल्यू त्याच्यामध्ये घेतो.त्याच्यामुळे इन प्रोजेक्ट कॉस्ट वाढतो. पर्टीक्युलर या योजनेमध्ये ईडब्ल्यूएस लोकांसाठी आपण विचार करतो ज्या व्यक्तीचे वार्षिक् ३ लाखाचे उत्पन्न आहे. त्यांच्याकरिता स्वस्त दरावर घरे मिळावी असा जीआर शासनाने काढला आहे. हया जीआरच्या अनुषंगाने कलेक्टरच्या जमिनी मिळतात, काही ठिकाणी जिल्हा परिषदेकडून जमिनी मिळतात. त्या पध्दतीने म्हाडा जमिनी उपलब्ध करुन दिल्या आहेत. त्या पध्दतीने आपण कॉन्ट्रीब्युशन करतो. ज्या पध्दतीने ईडब्लूएस लोकांना घरकुल मिळवून देण्याकरिता महानगरपालिका तरतूद करते त्यामध्ये ईडब्लूएस लोकांना कंन्सीडरींग त्यांनाच घरे मिळावीत. या कारणाने शासनाच्या जीआरप्रमाणे नाममात्र दराने करण्याचे पॉलीसी आपण घेत आहे. त्यानंतर पुढचा प्रश्न आहे. स्वत:चा प्रोजेक्ट कुठला आहे. आपण सध्याच्या स्थितीत बीएसयुपीचा प्रकल्प सक्सेसरित्या राबविलेला आहे. आता बीएसयुपीच्या योजना कार्यान्वित नाही आहे.बंद झाली आहे. बीएसयुपीच्या योजनेत काही जागा नारी या ठिकाणी मिळाली होती ती एनआयटीची जागा होती. त्या ठिकाणी लोकांना घरे उपलब्ध करुन देत आहे. त्या ठिकाणी अंदाजेने ६८० घरांसाठी प्लॉन करुन देत आहे. त्या प्लॉनमध्ये आपण एक निर्णय घेतला त्या घरामध्ये एक ते दीड लाख रुपये त्या घरामध्ये कमी होवू शकतात. हा

प्रोजेक्ट रिपोर्ट आहे. फॉयनान्सशियल प्रोसेस झाल्यानंतर आपण म्हाडाकडे पाठविणार आहे. म्हाडाकडून मंजूरी होणार आहे, मंजूरी आल्यानंतर टेंडर काढणार आहे. कन्स्ट्रक्शन चे टेंडर ज्या पध्दतीने बीएसयुपीचे कन्स्ट्रक्शन टेंडर होते त्या पध्दतीने काढू. त्यामध्ये आपण असा प्रयत्न राहणार आहे की लोकांना साडे पाच ते सहा लाखामध्ये घरे मिळावीत. सेम घर त्याच खाजगी जागेमध्ये पीएमआवास योजने अंतर्गत इडब्लूएसच्या लोकांना १४-१४ लाखामध्ये देतात आणि एनआयटी ११ लाखामध्ये देते.सबसिडी दिल्यानंतर ८ ते ९ लाखामध्ये देतात. त्यामुळे महानगरपालिका इनरवेटीव्ह आणि एक सभागृहाचे उदार प्रकल्प तयार करु शकतो. ते एक पॉलीसी डिसीजन आहे. जेथे जेथे आपल्याला ही स्ट्रारटींग आहे. आपल्याला पंतप्रधान आवास योजनेमध्ये भरपूर घरे बनवायची आहेत. त्याची सुरुवात म्हणून आपण नारा-नारी मध्ये करतो आहे. पोहेकर यांनी सांगितल्याप्रमाणे आपण त्याची सुरुवात करीत आहे. ती जागा आपण युझ करीत आहे.  येणा-या काळामध्ये ज्या ज्या एरियामध्ये आपण अशा जागा उपलब्ध आहेत ते सेम आपण वापरणार आहेत हे पॉलिसी डिसीजन आपण करीत आहे.धन्यवाद.

श्रीमती आभा पांडे:- मा.महापौरजी,  माझे तर असे म्हणणे आहे की २.५० लक्षामध्ये गोरगरीब लोकांना घरे न देता आपण ५० हजारमध्ये दिले पाहिजे. याच्यात काहीच वाद नाही. ईडब्लूएसच्या लोकांना याचा फायदा झाला पाहिजे. परंतु ती एसआरएची जागा असतांना महानगरपालिकेच्या विषयपत्रिकेवर हा विषय आलाच कसा. ही जागा महानगरपालिकेची नाही म्हणून मला असे वाटते.

महापौर:- मा.आयुक्तांचे वक्तव्य आपण बरोबर ऐकले नाही असे मला वाटते. त्यांचे वक्तव्य अगदी स्पष्ट आहे की एसआरए सोबत बीएसयुपीचा प्रोजेक्ट त्यांनी ठेवला. बीएसयुपीकरिता नागपूर महानगरपालिकेला ती जागा मिळाली आहे. याचा अर्थ ती जागा महानगरपालिकेकडे आहे. बीएसयुपी योजना शासनाने बंद केल्या नंतर त्या जागी पंतप्रधान आवास योजना आणलेली आहे. हे त्यांच्या वक्तव्यामध्ये स्पष्टपणे नमुद आहे. म्हणून आपण या विषयाला मंजूरी दयावी असे मी निर्देश देतो.

श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, नागपूर महानगरपालिका फक्त नारा-नारी मध्ये जागा उपलब्ध करुन देणार आहे की याशिवाय प्रत्येक विधानसभा क्षेत्रानिहाय जागा उपलब्ध करुन देणार आहे. आमच्या दक्षिण-पश्चिम मध्ये जागा उपलब्ध करुन देणार आहेत का? किती जागा महानगरपालिकेची विधानसभा क्षेत्रामध्ये उपलब्ध आहे. माझे स्पष्ट म्हणणे आहे, नागपूर महानगरपालिका कुठलीही जागा स्व:त आयडेंडीफाय करुन देणार नाही, महानगरपालिकेच्या इस्टेट विभागाने याचा आढावा घ्यावा की किती जागा उपलब्ध आहे, किती जागा उपलब्ध करुन देवू शकतो. हे पॉलिसी डिसीजन मान्य आहे यात काही प्रश्न नाही. परंतु जर महानगरपालिकेचे कॉन्ट्रीब्युशन जर शुन्य असेल तर शासनाकडून आलेल्या जीआरनुसार हा प्रकल्प करतो आहे.

वरील चर्चेनंतर प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत **EWS** घटकातील लोकांना लाभ पुरविण्याच्या हेतूने नागपूर महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत प्रकल्प अहवाल तयार करणे प्रस्तावित आहे.

या योजनेंतर्गत महाराष्ट्र राज्याचे शासन निर्णय दि. 15 जुलै 2019 नुसार, शासकीय जागा रु. 1/- प्रति चौ.मी. या नाममात्र दराने उपलब्ध करुन देण्याबाबत नमूद केले आहे.

त्यानुसार नागपूर महानगरपालिकेच्या मालकीच्या जागा रु. 1/- प्रति चौ. मी. या नाममात्र दराने उपलब्ध करुन दिल्यास नागपूर शहरातील **EWS**घटकातील नागरीकांना परवडणाऱ्या किंमतीमध्ये 30.00 चौ. मी. चटई क्षेत्रफळाची सदनिका उपलब्ध करुन देता येईल.

करिता सदर जागा रु. 1/- प्रति चौ. मी. दराने उपलब्ध करुन देण्याबाबत मंजुरीचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्र.७५/वि.क्र.४१ :-** मौजा — सिताबर्डी येथील नगर भुमापन क्र. १६१२, शिट क्र. १७, क्षेत्र २८८७.४९ चौ.मी. लोककर्म विभागाची जागा महापौर नागपूर महानगरपालिका, नागपूर यांना बंगल्याकरीता नागपूर शहरात जागा उपलब्ध करून देण्याबाबत.

**{नगररचना विभाग}**

१. मौजा — सिताबर्डी, नगर भुमापन क्र. १६१२, शिट क्र. १७, येथील नागपूर शहराच्या मंजुर विकास योजनेत सार्वजनिक/निमसार्वजनिक वापरामध्ये समाविष्ट असलेली जागा मा. महापौरांच्या बंगल्याकरीता मिळण्याबाबतचा प्रश्न विचारात घेणे.

२. महापौर, नागपूर महानगरपालिका, नागपूर बंगल्याकरीता मागणी करण्यात येणारी जमिन शासन ठरविल त्या दराने/किंमतीने शासनाच्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर करणेबाबतचा प्रश्न विचारात घेणे उपरोक्त प्रश्न सभागृहाने विचारात घेतला

श्रीमती नंदा जिचकार:- मा.महापौरजी, मला या विषयावर बोलायचे आहे. नागपूर शहर हे उपराजधानीचे शहर आहे. सर्व शहरात महापौर निवास आहेत. मुंबई, पुणे, नाशिक महापौर निवास आहेत. फक्त नागपूर शहरात महापौर निवास नाही. दिनांक १९.०५.२०१९ ला आपण मुंबई मंत्रालयाच्या मुख्य सचिवांना पत्र पाठवून पीडब्लूडीची जागा उपलब्ध करुन घेतली आहे. त्यासाठी ५२५० चौ.मी.जागा महापौर बंगल्यासाठी उपलब्ध झाली आहे. परंतु आपण एडीटीपीच्या अधिका-याला समज द्यावी की त्यांनी सुरुवातीला चुकीचा प्रस्ताव आणला होता त्यानंतर तो परत करण्यात आला सभागृह सुरु होण्याच्या आधी. परंतु माझा एडीटीपी विभागावर आक्षेप आहे की त्यांनी २६ जुलै २०१९ ला पीडब्लूडी विभागाने मुंबई मंत्रालयाला पत्र पाठविला आहे. त्या पत्रव्यवहारावरुन विषय आणायला पाहिजे होता. विषय दोन-तीन ठिकाणी चुकविला आहे. एडीटीपी विभागाचे एचओडी, मुख्य अधिकारी कोण आहेत. त्यांनी या विषयाला गंभीरतेने घेवून संबंधितांना समज दयावी. विषयाचा अभ्यास करुनच विषय आणावा. या विषयाला मंजूरी देण्यात यावी अशी मी विनंती करते.

श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, या विषयाच्या अनुषंगाने मला काही निवेदन करावयाचे आहे. या विषयाच्या अनुषंगाने स्वर्गीय दादासाहेब भोरकर यांचे स्मरण करणे मला अत्यंत महत्वाचे वाटते. नागपूर शहरात अधिकृत महापौर निवासस्थान नाही हा विषय १९८६-८७ साली महानगरपालिकेत चर्चेला आला होता. इंदिरा गांधी रुग्णालयाची जागा महापौर निवासस्थानासाठी होती तो प्रस्ताव सभागृहात आला होता. स्वर्गीय दादासाहेब भोरकर यांनी सभागृहामध्ये पुढाकार घेवून एक विषय या ठिकाणी ठेवला होता की या शहरामध्ये महापौर निवासस्थानाची सध्याच गरज नाही त्या ऐवजी आपण त्या ठिकाणी रुग्णालय उभारले पाहिजे. त्यावेळी सर्व सभागृहाने निर्णय घेवून महापौर निवासस्थानाच्या जागेवर इंदिरा गांधी रुग्णालय बांधले. त्यावेळी महानगरपालिकेच्या सदस्यांची ७५ सदस्य संख्या होती. त्यांनी आपआपल्या वार्डफंडातून निधी उपलब्ध करुन त्या रुग्णालयाची सुरुवात केली होती. महापौर निवासस्थानाची गरज नसून वैद्यकीय सुविधेची गरज या शहरात आहे ही गरज समजून त्यावेळच्या मा.सदस्यांनी स्वर्गीय दादासाहेब भोरकर यांनी त्यावेळी पुढाकार घेतला. दुर्देवाने आज असा पुढाकार घेण्यात येतो असे मला वाटत नाही. हा विषय मंजूर करण्यास काहीच हरकत नाही. आज आपल्या वैद्यकीय सुविधा ज्या प्राथमिक सेवा आहेत त्याची प्रायरिटी सोडून महापौर निवासस्थान करण्याचा आग्रह करीत असल्यास ते योग्य होणार नाही. महापौर निवासस्थान हा प्रायरिटीचा विषय नाही. याचा आपण अभ्यास केला पाहिजे. आपल्या कडे ब-याच भागात वैद्यकीय सुविधा नाही ती व्यवस्था आपण करु शकत नाही. अशा वेळेस महापौर निवासस्थानावर एवढा मोठा खर्च करीत असाल तर ते योग्य होणार नाही. स्वर्गीय दादासाहेब भोरकर यांनी अशाप्रकारे एक रुग्णालय उभे केले तसे आपण सुध्दा तसा पुढाकार घेवून

वेगळा निर्णय घेवू शकता ही विनंती यानिमित्ताने करीत आहे. मा.महापौरजी आपण समजदार आहात.

श्री.अविनाश ठाकरे:-मा.महापौरजी, निश्चितच आपण प्रफुल्लजी यांची भावना समजू शकतो. मा.महापौरजी यांनी ऑलरेडी ७५ वस्त्या वस्त्यामध्ये वंदेमातरम प्रकल्पाअंतर्गत हॉस्पीटल उभारण्याचा प्रकल्प राबवित आहे आणि त्याची तयारी पुर्णपणे झालेली आहे. ७५ वस्त्यामध्ये दवाखाने उभारीत आहे त्यामुळे महापौर निवासस्थानाच्या विषयावर हरकत घेण्यास आणि त्यांच्या हेतूबद्दल शंका घेणे योग्य नाही.

श्री.प्रफुल्ल गुडधे:-मी मा.महापौरजी यांच्या हेतूबद्दल शंका घेतलेली नाही. या उलट विश्वास व्यक्त केला ते जे काही निर्णय घेतील ते यथायोग्य आणि उचित निर्णय घेतील. महापौरांवर तुमच्या पेक्षा अधिक विश्वास आहे याची प्रकर्षाने नोंद घेतली पाहिजे. दुसरा महत्वाचा विषय असा आहे ज्या इंदिरा गांधी रुग्णालयामध्ये आज कोव्हीडच्या स्थितीमध्ये चांगली व्यवस्था उभी करु शकलो. त्या ठिकाणी आयसीयु अजूनही कार्यरत नाही आहे. मी ही त्या बैठकीमध्ये होतो. मा.महापौरजी यांनी पुढाकार घेवून प्रत्येक भागामध्ये पीएचसी उभी केली पाहिजे अशी भावना होती. आमचीही तीच भावना आहे त्यांची भावना निश्चितच सकारात्मक आहे यात काही वाद नाही. म्हणून मी मा.महापौरजी कडे विषय ठेवला की आज आपण महापौर बंगला बनवायचा की इंदिरा गांधी रुग्णालयात आयसीयू उभे करायचे. मा.महापौरजी निश्चितच निर्णय घेतील. आपला विश्वास त्यांच्या जर जितका असेल त्या पेक्षा अधिक दृढ विश्वास माझा आहे त्यामुळे अविनाशजी आपण काळजी करु नका.

श्री.अविनाश ठाकरे:-मा.महापौरजी, निश्चित आपण प्रफुल्लजी यांच्या भावनेशी सहमत आहोत. परंतु मा.महापौरजी, शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता शासनाच्या तर्फे एम्स् सारखे आरोग्य सुविधा नागपूर शहरात आलेली आहे.आणखीही काही प्रकल्प सुरु आहेत. आजच हा प्रकल्प होणार नाही आहे. आज मान्यता दिली तर उद्या तेथे प्रकल्प तयार होणार अशातला भाग नाही. हा १९८६ पासून चाललेला विषय आहे आज याला मान्यता देण्यात येत आहे. पुढील चार-पाच वर्षात हा प्रकल्प होईल. त्यामुळे मा. प्रफुल्लजी आपल्या भावनेचा आदर करतो.

श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, स्वर्गीय दादासाहेब भोरकर यांना मला स्मरण करावेसे वाटले म्हणून मी स्मरण केले.

श्री.अविनाश ठाकरे:-मा.महापौरजी, निश्चित आम्ही प्रफुल्लजी यांच्या भावनेशी सहमत आहोत. आपण स्वर्गीय दादासाहेब भोरकर यांचे स्मरण करुन दिले त्याबद्दल आम्ही आभारी आहोत. मा.महापौरजी, मी आपले धन्यवाद करतो की आपण प्रफुल्लजी गुडधे यांनी विषय मांडण्याअगोदरच ७५ दवाखाने उभारण्याची योजना कार्यान्वित केली त्याबद्दल आपले धन्यवाद करतो.

वरील चर्चेनंतर मौजा – सिताबर्डी येथील नगर भुमापन क्र. १६१२, शिट क्र. १७, क्षेत्र २८८७.४९ चौ.मी. लोककर्म विभागाची जागा महापौर नागपूर महानगरपालिका, नागपूर यांना बंगल्याकरीता नागपूर शहरात जागा उपलब्ध करून देण्याबाबत.

१. मौजा – सिताबर्डी, नगर भुमापन क्र. १६१२, शिट क्र. १७, येथील नागपूर शहराच्या मंजुर विकास योजनेत सार्वजनिक/निमसार्वजनिक वापरामध्ये समाविष्ट असलेली जागा मा. महापौरांच्या बंगल्याकरीता मिळण्याबाबतचा प्रश्न विचारात घेणे.

२. महापौर, नागपूर महानगरपालिका, नागपूर बंगल्याकरीता मागणी करण्यात येणारी जमिन शासन ठरविल त्या दराने/किंमतीने शासनाच्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर करणेबाबतचा प्रश्न विचारात घेणे.

उपरोक्त प्रश्न सभागृहाने विचारात घेवून वरील प्रस्तावामध्ये जागेच्या क्षेत्राबाबत २८८७.४९ चौ.मी. अनावधानाने नमुद केल्या गेले आहे. या ऐवजी प्रस्तावामध्ये २८८८४.९०

चौ. मी. जागेपैकी ५२५० चौ.मी. जागा अशी क्षेत्राबाबत दुरस्ती करण्यात यावी या नगर रचना विभागामार्फत आलेल्या पत्रान्वये निगम सचिव यांनी सुचित केल्याप्रमाणे नमुद करण्यात यावे. या मा. महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्र.७६/वि.क्र.४२** :- **{प्रकल्प विभाग}** ऑरेंज सिटी स्ट्रिट प्रकल्पाअंतर्गत वर्धा रोड (हॉटेल रेडीसन ब्ल्यु) जवळील जयप्रकाश नगर मेट्रो स्टेशनलगत भुखंड क्र. 1 वर आधुनिक शॉपींग मेट्रो मॉलचे बांधकाम महा मेट्रो रेल्वे कॉ. लि. यांचेमार्फत अग्रीम राशी जमा तत्वावर, सामंजस्य करार करून करण्यास म.न.पा. सभागृहाचे ठराव क्र. 290, दिनांक 29/09/2018 अन्वये मंजूरी प्राप्त आहे. तसेच याबाबत स्थायी समिती ठराव क्र. 529, दिनांक 02/01/2019 अन्वये महा मेट्रो रेल्वे कॉ. लि. सोबत करण्यात आलेल्या सामंजस्य करार (MOU) चे प्रारूपास तथा रू. 11.00 कोटी अग्रीम राशी महा मेट्रो रेल्वे कॉ लि. यांना भुगतान करण्यास मंजूरी प्राप्त आहे.

म.न.पा. सभागृहामध्ये ठराव क्र. 290, दिनांक 29/09/2018 अन्वये मा. आयुक्त यांना महा मेट्रो रेल्वे कॉ. लि. सोबत सामंजस्य करार करण्यास्तव प्रधिकृत केले असल्याने त्याअनुषंगाने 20/12/2018 रोजी करारनामा करण्यात आला. तसेच प्रस्तावित मेट्रो मॉलचे बांधकाम हाती घेण्यास त्यांना रू. 11.00 कोटी रक्कम दिनांक 10/01/2019 ला देण्यात आली. त्यानुसार मेट्रो मॉलचे बांधकाम महा मेट्रोद्वारे सुरू करण्यात आले असून सद्यःस्थितीत काम प्रगतीपथावर आहे.

दरम्यानच्या काळात महामेट्रो द्वारे काम संत गतीने करण्यात येत असल्याने म.न.पा. ठराव क्र. 480/दि. 13/1/2019 नुसार खालील प्रमाणे सभागृहाने मंजूरी प्रदान केलेली होती.

1) मेट्रो मॉल बांधकामाकरीता महा मेट्रो रेल्वे कॉ. लि. सोबत दिनांक 20/12/2018 रोजी झालेल्या सामंजस्य कराराचे आधिन त्यांच्यामार्फत करावयाचे मेट्रो मॉलचे बांधकाम फक्त Plinth Level पर्यत सिमीत ठेवण्यास मंजूरी प्रदान करण्याचा तथा याबाबतचा सामंजस्य करार सुधारीत करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करणे.

2) मेट्रो मॉलचे Plinth Level वरील कामाचे वर्ष 2019–20 च्या SSR वर आधारीत दरावर रू. 53,66,66,069/– चे प्राकलनास प्रशासकीय मान्यता देण्याचा तथा या कामाचा रीतसर निविदा मागवून हे काम म.न.पा. द्वारे करण्यास एकमताने मंजुरी प्रदान केलेली आहे.

उपरोक्त ठरावानुसार मेट्रो मॉलचे Plinth Level वरील Superstructure च्या बांधकामाकरीता निविदा बोलविण्यात आल्यात मा्त्र कोव्हिड–19 मुळे महसुली उत्पनात झालेली घट लक्षात घेता. निधी अभावी कार्यादेश निर्गमीत करण्यात आले नाहीत.

उपरोक्त स्थिती लक्षात घेता मेट्रो मॉलचे बांधकाम पूर्णत्वास नेण्याचे दृष्टीने म.न.पा. ठराव क्र. 480/दि. 13/01/19 चे अ. क्र. 2 वरील प्रस्तावाऐवजी बदल करून खालीलप्रमाणे प्रस्तावास मान्यता देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

- मेट्रो मॉलचे Plinth Level चे वरील उर्वरीत बांधकाम खाजगी उद्योजकामार्फत भागीदारी तत्वावर पुर्ण करून (म.न.पा. चा अद्याप पर्यत झालेल्या खर्चाच्या प्रतिपुर्तीसह) घेण्याकरीता निविदा बोलविण्याच्या व त्यासंबंधीचा करारनामा इ. करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करणे.

निविदा बोलविल्यानंतर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सभागृह समक्ष ठेवण्यात येईल.

उपरोक्त प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्र.७७/वि.क्र.४३** :- प्रभाग क्र 15, शंकरनगर नागपूर , मौजा– अंबाझारी, नगर

**{लोककर्म झोन २}** भूमापन क्र. 1747, शिट क्र. 53, येथे बांधण्यात येत असलेल्या जिजाऊ स्मृती शोध संस्थानाचे बांधकामाकरीता, शासन निर्णय क्रमांक – पूरक –2019/प्र.क्र.77(17)/नवि–16 दिनांक 20/09/2019 अन्वयेरु. 174194756/– इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त असून या प्रकल्पाकरीता शासन हिस्सा रु. 10.00 कोटी रु. निधी महानगरपालिकेस प्राप्त आहे. उर्वरीत 7,41,94,756/– इतका निधी महानगरपालिकेन स्वहिस्सा म्हणून उभारावा या अटीवर शासन मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. करीता महानगरपालिकेला निधी उभारण्याच्या दृष्टीने भारत सरकारच्या सुक्ष्म,लघू व मध्यम उद्योग मंत्रालय (MSME) या संस्थेला सदर इमारतीतील एक स्वतंत्र मजला (अंदाजे 1000.00 चौ.मी.) हा महीला सशक्तीकरण व सबलीकरण उपक्रम राबविण्याचे योजणे करीता उपलब्ध करणे , यास्तव निधी उपलब्ध होण्याचे दृष्टीने सविस्तर प्रकल्प अहवाल मंजूरी प्रक्रिया करणे, शासन मंजूरी करीता पत्रव्यव्हार, भाडेपट्टा /करारनामा करणे इत्यादी बाबतचे सर्वाधिकार मा. निगम आयुक्त म.न.पा. नागपूर यांना प्रदान करण्याबाबतच्या प्रस्तावास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्र.७८/वि.क्र.४४</u> :-** स्थायी समितीचे ७ सदस्यांनी राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर **{सचिवालय}** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २३ अन्वये भारतीय जनता पक्षाला ७ रिक्त जागा त्याच पक्ष/गटाच्या सदस्यांची वर्ष २०२१-२०२२ (उर्वरित कालावधीकरिता) नेमणूक करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेतला

महापौर:- निगम सचिवांनी प्रक्रिया सुरु करावी.

निगम सचिव:- स्थायी समितीचे ७ सदस्यांनी राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २३ अन्वये भारतीय जनता पक्षाला ७ रिक्त जागा त्याच पक्ष/गटाच्या सदस्यांची वर्ष २०२१-२०२२ (उर्वरित कालावधीकरिता) नेमणूक करावयाची असल्याने गटनेते भारतीय जनता पक्ष यांना विनंती करण्यात येते की त्यांनी आपल्या सदस्यांचे नामनिर्देशन पत्र बंद लखोटयात मा.महापौरजी यांना सादर करावे.

(भारतीय जनता पक्षाच्या गट नेत्याने बंद लखोटा मा.महापौरजी यांना सादर केला)

मा.महापौरजी यांना सादर करण्यात आलेला बंद लखोटा मा.महापौरजी यांनी सभागृहामध्ये उघडून त्यातील नावे वाचून दाखविण्याचे निगम सचिवांना निर्देश दिले.

निगम सचिव:- मा.महापौरजी, भारतीय जनता पक्षातर्फे स्थायी समितीच्या ७ (सात) सदस्यांसाठी खालील सदस्यांचे नामनिर्देशन करण्यांत आले आहे ते मी वाचून दाखविते.

| अनु क्र. | मा.सदस्यांचे नाव |
|---|---|
| १. | सौ.सुमेधा देशपांडे |
| २. | सौ.वर्षा ठाकरे |
| ३. | सौ. वनिता दांडेकर |
| ४. | सौ.स्वाती आखतकर |
| ५. | सौ.रुपाली ठाकूर |
| ६. | सौ.वंदना भुरे |
| ७. | सौ.जयश्री रारोकर |

महापौर:- स्थायी समिती सदस्यांची जी नावे घोषित करावयाची आहेत ती नावे मी वाचून दाखवितो. भारतीय जनता पक्षातर्फे स्थायी समितीकरिता खालील ७ (सात) सदस्यांचे नामनिर्देशन करण्यांत आले आहे

| अनु क्र. | मा.सदस्यांचे नाव |
|---|---|
| १. | सौ.सुमेधा देशपांडे |

| | |
|---|---|
| २. | सौ.वर्षा ठाकरे |
| ३. | सौ. वनिता दांडेकर |
| ४. | सौ.स्वाती आखतकर |
| ५. | सौ.रुपाली ठाकूर |
| ६. | सौ.वंदना भुरे |
| ७. | सौ.जयश्री रारोकर |

अशा रितीने स्थायी समितीचे ७ सदस्यांनी राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २३ अन्वये भारतीय जनता पक्षाला ७ रिक्त जागा त्याच पक्ष/गटाच्या सदस्यांची वर्ष २०२१-२०२२ (उर्वरित कालावधीकरिता) नेमणूक करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजुर मंजुरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

| अनु क्र. | मा.सदस्यांचे नाव |
|---|---|
| १. | सौ.सुमेधा देशपांडे |
| २. | सौ.वर्षा ठाकरे |
| ३. | सौ. वनिता दांडेकर |
| ४. | सौ.स्वाती आखतकर |
| ५. | सौ.रुपाली ठाकूर |
| ६. | सौ.वंदना भुरे |
| ७. | सौ.जयश्री रारोकर |

**ठराव क्र.७९/वि.क्र.४५** :- नागपूर सुधार प्रन्यासच्या विश्वस्त मंडळावर नागपूर
**{सचिवालय}** महानगरपालिकेतर्फे विश्वस्त म्हणून **श्री. भूषण कृष्णराव शिंगणे,** म.न.पा. सदस्य यांनी नागपूर सुधार प्रन्यासचा विश्वस्त पदाचा स्वच्छेने **राजीनामा** दिला आहे. या राजीनाम्यामुळे विश्वस्त पदाच्या रिक्त जागेवर महानगरपालिकेचा प्रतिनिधी म्हणून एका मा. सदस्यांची विश्वस्त म्हणून उर्वरित कालावधीकरिता नेमणूक करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेतला

महापौरः—सत्तापक्ष नेते श्री.अविनाश ठाकरे यांच्या वतीने एक नाव सुचविलेले आहे त्या नावाचे निगम सचिवांनी वाचन करावे.

निगम सचिवः—मा.महापौरजी, नागपूर सुधार प्रन्यास अधिनियम 1936 कलम 4 (१) (डी) आणि (४)(५) अन्वये ना.सु.प्र. विश्वस्त म्हणून भाजपाचा एक सदस्य वर्ष २०२१-२२ या उर्वरित कालावधीकरिता नेमणुक करण्यासाठी मंजूरी प्रदान केलेली आहे. विषय क्र. ४५ अन्वये खालील नमुद नाव सादर करण्यात येत आहे.

| अनु क्र. | मा.सदस्यांचे नाव |
|---|---|
| १. | श्री.संजय बंगाले |

महापौरः— नागपूर सुधार प्रन्यासच्या विश्वस्त मंडळावर नागपूर महानगरपालिकेतर्फे विश्वस्त म्हणून श्री.संजय बंगाले यांचे नाव उर्वरित कालावधीकरिता घोषित करण्यात येते.

| अनु क्र. | मा.सदस्यांचे नाव |
|---|---|
| १. | श्री.संजय बंगाले |

अशा रितीने नागपूर सुधार प्रन्यासच्या विश्वस्त मंडळावर नागपूर महानगरपालिकेतर्फे विश्वस्त म्हणून **श्री. भूषण कृष्णराव शिंगणे**, म.न.पा. सदस्य यांनी नागपूर सुधार प्रन्यासचा विश्वस्त पदाचा स्वच्छेने **राजीनामा** दिला आहे. या राजीनाम्यामुळे विश्वस्त पदाच्या रिक्त जागेवर महानगरपालिकेचा प्रतिनिधी म्हणून श्री.संजय बंगाले यांची विश्वस्त म्हणून उर्वरित कालावधीकरिता नेमणूक करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्र.८०/वि.क्र.४६</u> :- {परीवहन विभाग}** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम २५ (५) (६) (७) अन्वये परिवहन समितीचे १२ (एक पदेन सदस्य+१) सदस्यांपैकी निम्मे ६ सदस्य दि. ०१/०५/२०२० रोजी दुपार नंतर निवृत्त झाले आहेत. कोरोना विषाणुमुळे उद्भवलेल्या आपातकालीन परिस्थितीत पुढील आदेशापर्यंत महानगरपालिका अंतर्गत समिती सदस्याची निवृत्ती घेण्यात आली नव्हती. तथापी शासन परिपत्रकानुसार महानगरपालिका/नगरपरिषदांच्या पदाधिकाऱ्यांच्या अंतर्गत मुदतवाढीचा कालावधी संपुष्टात आलेल्या विविध पक्षाच्या सदस्यांना निवृत्त करण्यात येवुन निवडणुका घेण्याबाबत सुचित केले आहे. परिवहन समिती सदस्यांपैकी खालील नमुद निम्मे सदस्य यांचा कालावधी संपुष्टात आल्याने परिवहन समिती ठराव क्र. ५८, दि.२५/०२/२०२१ अन्वये निवृत्त झाले आहेत.

१) श्री. नरेंद्र बोरकर, मा. सभापती - भारतीय जनता पार्टी
२) सौ. अर्चना पाठक, मा. सदस्य - भारतीय जनता पार्टी
३) सौ. मनिषा धावडे, मा. सदस्या - भारतीय जनता पार्टी
४) सौ. वैशाली रोहणकर, मा. सदस्या - भारतीय जनता पार्टी
५) श्री. नितीश ग्वालबंशी, मा. सदस्य - भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष
६) श्री. नितीन साठवणे, मा. सदस्य - भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष

उक्त नमुद (१) भारतीय जनता पक्षाचे ४ सदस्य (२) भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे २ असे एकुण ६ सदस्यांपैकी परिवहन समितीमध्ये त्याच पक्ष/गट/आघाडी चे नविन ६ सदस्यांची वर्ष २०२१-२०२२ करिता नेमणुक करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेतला

महापौरः- निगम सचिवांनी प्रक्रिया सुरू करावी.

निगम सचिवः- मा. महापौरजी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम २५ (५) (६) (७) अन्वये परिवहन समितीचे १२ (एक पदेन सदस्य+१) सदस्यांपैकी निम्मे ६ सदस्य दि. ०१/०५/२०२० रोजी दुपार नंतर निवृत्त झाले आहेत. नमुद निम्मे सदस्य यांचा कालावधी संपुष्टात आल्याने उक्त नमुद (१) भारतीय जनता पक्षाचे ४ सदस्य (२) भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे २ असे एकुण ६ सदस्यांपैकी परिवहन समितीमध्ये त्याच पक्ष/गट/आघाडी चे नविन ६ सदस्यांची वर्ष २०२१-२०२२ करिता नेमणुक करण्यासाठी नामनिर्देशन पत्र बंद लखोटयात मा.महापौरजी यांना सादर करावयाचे आहे. गटनेते भारतीय जनता पार्टी आणि गटनेते राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष यांना विनंती करण्यात येते की त्यांनी आपल्या सदस्यांचे नामनिर्देशन पत्र बंद लखोटयात मा.महापौरजी यांना सादर करावे.

(भारतीय जनता पक्ष आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या गट नेत्यांनी बंद लखोटे मा. महापौरजी यांना सादर केले)

मा.महापौरजी यांना सादर करण्यात आलेला लखोटा मा.महापौरजी यांनी सभागृहामध्ये उघडून त्यातील नावे वाचून दाखविण्याचे निगम सचिवांना निर्देश दिले.

निगम सचिवः– मा. महापौरजी भारतीय जनता पक्षातर्फे परिवहन समितीच्या ४ (चार) सदस्यांसाठी खालील सदस्यांचे नामनिर्देशन करण्यांत आले आहे ते मी वाचून दाखविते.

| अनु क्र. | मा.सदस्यांचे नाव |
|---|---|
| १. | श्री.बंटी कुकडे |
| २. | सौ.सोनाली कडू |
| ३. | सौ.उषा पॅलेट |
| ४. | श्री.शेषराव गोतमारे |

निगम सचिवः– मा. महापौरजी भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षातर्फे परिवहन समितीच्या २ (दोन) सदस्यांसाठी खालील सदस्यांचे नामनिर्देशन करण्यांत आले आहे ते मी वाचून दाखविते.

| अनु क्र. | मा.सदस्यांचे नाव |
|---|---|
| १. | श्री.कमलेश दिलीप चौधरी |
| २. | श्री.नितीन रामभाऊ साठवणे |

महापौरः– परिवहन समिती सदस्यांची जी नावे घोषित करावयाची आहेत ती नावे मी वाचून दाखवितो. भारतीय जनता पक्षातर्फे परिवहन समितीच्या ४ (चार) सदस्यांची नावे

| अनु क्र. | मा.सदस्यांचे नाव |
|---|---|
| १. | श्री.बंटी कुकडे |
| २. | सौ.सोनाली कडू |
| ३. | सौ.उषा पॅलेट |
| ४. | श्री.शेषराव गोतमारे |

तसेच भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षातर्फे परिवहन समितीच्या २ (दोन) सदस्यांची नावे

| अनु क्र. | मा.सदस्यांचे नाव |
|---|---|
| १. | श्री.कमलेश दिलीप चौधरी |
| २. | श्री.नितीन रामभाऊ साठवणे |

या सर्वांना परिवहन समिती सदस्य म्हणून नेमणुक झाल्याचे घोषित करण्यात येते.

अशा रितीने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम २५ (५) (६) (७) अन्वये परिवहन समितीचे १२ (एक पदेन सदस्य+१) सदस्यांपैकी निम्मे ६ सदस्य दि. ०१/०५/२०२० रोजी दुपार नंतर निवृत्त झाले आहेत. कोरोना विषाणुमुळे उद्भवलेल्या आपातकालीन परिस्थितीत पुढील आदेशापर्यंत महानगरपालिका अंतर्गत समिती सदस्याची निवृत्ती घेण्यात आली नव्हती. तथापी शासन

परिपत्रकानुसार महानगरपालिका/नगरपरिषदांच्या पदाधिकाऱ्यांच्या अंतर्गत मुदतवाढीचा कालावधी संपुष्टात आलेल्या विविध पक्षाच्या सदस्यांना निवृत्त करण्यात येवुन निवडणुका घेण्याबाबत सुचित केले आहे. परिवहन समिती सदस्यांपैकी नमुद निम्मे सदस्य यांचा कालावधी संपुष्टात आल्याने परिवहन समिती ठराव क्र. ५८, दि.२५/०२/२०२१ अन्वये निवृत्त झाले आहेत. उक्त नमुद (१) भारतीय जनता पक्षाचे ४ सदस्य (२) भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे २ असे एकुण ६ सदस्यांपैकी परिवहन समितीमध्ये त्याच पक्ष/गट/आघाडी चे नविन ६ सदस्यांची वर्ष २०२१-२०२२ करिता नेमणुक करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहरले मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

| अनु क्र. | मा.सदस्यांचे नाव |
|---|---|
| १. | श्री.बंटी कुकडे |
| २. | सौ.सोनाली कडू |
| ३. | सौ.उषा पॅलेट |
| ४. | श्री.शेषराव गोतमारे |
| ५. | श्री.कमलेश दिलीप चौधरी |
| ६. | श्री.नितीन रामभाऊ साठवणे |

**<u>ठराव क्र.८१/वि.क्र.४७</u> :-** **(सचिवालय)** म.न.पा. ठराव क्र. 72 दिनांक 20.07.2017 अन्वये मा.महापौरजी यांनी दि. 18.01.2021 रोजी गठीत नामकरण समितीच्या दिनांक 08.03.2021 रोजी भरलेल्या सोबतच्या सभेच्या अहवालामध्ये (परिशिष्ट 'अ') करण्यांत आलेल्या विविध भागाचे नामकरणाच्या शिफारसींना मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**परिशिष्ट 'अ'**

नामकरण समितीच्या दि. ०८.०३.२०२१ रोजी दुपारी १.०० वाजता भरलेल्या सभेचा अहवाल

उपस्थित सभासद

| अ क्र. | मा. सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| १ | मा. सौ. मनिषा आशिष धावडे, उपमहापौर | अध्यक्षा |
| २ | मा. श्री. सुनिल जिवराज अग्रवाल | सदस्य |
| ३ | मा. श्री. दिनेश बसंतलाल यादव | सदस्य |
| ४ | मा. श्री. शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहीम | सदस्य |
| ५ | मा. श्री. दिपक मारोतराव चौधरी | सदस्य |

अनुपस्थित सभासद

| अ क्र. | मा. सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| १ | मा. सौ. चेतना राजु टांक | सदस्या |
| २ | मा. श्री. लहुकूमार दत्तुजी बेहते | सदस्य |

अध्यक्षा :— सभेची कार्यवाही सुरू करण्यात येत आहे आजच्या नामकरण समितीच्या सभेत नामकरण करण्याबाबतचे दोन प्रस्ताव नामकरण समितीसमोर ठेवण्यात येते व हे दोन प्रस्ताव एकमताने मंजुर करण्यात येते.

नामकरण समितीच्या दि. ०८.०३.२०२१ रोजीच्या सभेत नामकरण प्रस्तावावर घेण्यात आलेले निर्णय.

| अनु क्र. | सुचविणाऱ्याचे नाव | तपशिल | या पुर्वी नाव दिले असल्यास निर्णय मनपा ठराव | समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती दर्शनीताई धवड नगरसेविका प्र. क्र. १२<br>श्रीमती मायाताई इवनाते नगरसेविका प्र. क्र. १२<br>श्री. हरिशजी ग्वालबंशी नगरसेवक प्र. क्र. १२<br>स्व.जगदीशजी ग्वालबंशी माजी नगरसेवक प्र. क्र. १ | प्रभाग क्र. १२ येथील एल.ए.डी. कॉलेज ते प्रेरणा कॉलनी रस्त्यावरील नविन मुलींचे वस्तीगृह येथील टी—पॉईंटला ''श्री गृहलक्ष्मी अंबाबाई चौक'' असे नामकरण करण्याबाबत. | ——— | मंजुर |
| २ | श्रीमती दर्शनीताई धवड नगरसेविका प्र. क्र. १२<br>श्रीमती मायाताई इवनाते नगरसेविका प्र. क्र. १२<br>श्री. हरिशजी ग्वालबंशी नगरसेवक प्र. क्र. १२<br>स्व.जगदीशजी ग्वालबंशी माजी नगरसेवक प्र.क्र. १२ | प्रभाग क्र. १२ फ्रेंन्डस कॉलनी, काटोल रोड टी—पॉईट ते एन.आय.टी बगीचा पर्यतच्या मार्गाला ''स्व. माजी खासदार श्री. हेमचंद्रराव खांडेकर मार्ग'' असे नामकरण करण्याबाबत. | ——— | मंजुर |

**हस्ता/- मनिषा आशिष धावडे**
**अध्यक्ष**
**नामकरण समिति,**

महापौर:- जैन साहेबांनी उत्तर देण्याकरिता वेळ मागितली होती. त्यामुळे जैन साहेबांनी उत्तर दयावे.

श्री.निर्भय जैन(उपायुक्त,सामान्य प्रशासन विभाग):- मा.महापौरजी, विखंडनासाठी शासनाकडे जे प्रस्ताव पाठविले होते त्याची माहिती मा.सदस्यांनी विचारलेली होती.ती अशी आहे. एकुण सहा प्रस्ताव पाठविण्यात आले होते. त्याच्यामध्ये मा.सदस्य नितीन साठवणे यांच्यावर एफआयआर दाखल झाला होता त्या संदर्भातील विषय होता. त्यानंतर रिवाव्हीव्ह बजेट आहे त्याच्या कार्यदेशाच्या संदर्भात विषय होता. डॉक्टर गंटावार यांच्या संदर्भातील एक विषय होता. त्याच्यानंतर काही बाबतीत कार्यवाही करण्याच्या संदर्भातील विषय होता. त्यानंतर कलम ३८ अंतर्गत मा.आयुक्तांच्या रजे संदर्भात विषय होता. हॉस्पीटलच्या कामाचे तुकडे या संदर्भात विषय होता. असे एकुण सहा विषय शासनाकडे पाठविण्यात आले होते.

श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, या विखंडनाच्या विषयापैकी डॉ.गंटावाराचा विषय सभागृहात आलेला आहे. त्याचबरोबर कामाच्या तुकडे करण्याच्या विषयावर निर्णय झाला आहे. मला असे वाटते मा.सदस्य नितीन साठवणे यांच्यावरील एफआयआरच्या संदर्भातील विषयात प्रशासनाला विनंती केली होती की प्रशासनाने हा एफआयआर वापस घ्यावा. त्या विषयात प्रशासनाने परत विचार करावा आणि एफआयआर वापस करावा अशी प्रकारची मी विनंती करतो.

महापौर:- मा. निगम आयुक्तांना असे निर्देश देण्यात येत आहे. जे विषय प्रलंबित आहेत त्याचा ताबडतोब

पाठपुरावा करण्याकरिता एक माणसाची नियुक्ती करावी व शासनाकडून विखंडीत करावयाचे असेल तर विखंडीत करावे व जर परत करावयाचे असेल तर परत घेवून पुन्हा सभागृहासमोर ठेवावे .

यानंतर राष्ट्रगित होवून सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित करण्यांत आली.

**निगम सचिव**
**महानगरपालिका,नागपूर.**

**महापौर**
**महानगरपालिका,नागपूर.**

# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

---

**नागपूर महानगरपालिकेच्या सोमवार दिनांक २५/०३/२०२१ रोजी भरलेल्या विशेष सभेच्या कार्यवृत्तातून घेतलेला उतारा.**

**ठराव क्र.६६/वि.क्र.३२ :-** नागपुर महानगरपालिकेच्या मालकिच्या भुखंडाचे नुतनिकरण व
**{मालमत्ता (स्थावर) विभाग}** हस्तांतरणाबाबत महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-ब दि. **13.09.2019** नगर विकास विभाग यांचे अधिसुचना महानगरपालिकेच्या सर्व सन्मानिय सदस्यांना माहिती होण्यास्तव सभागृहाचे पटलावर ठेवणे व धोरण निश्चित करणेबाबत.

उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने नागपुर महानगरपालिकेव्दारा नुतनिकरण, हस्तांतरण, अनधिकृत हस्तांतरण वापर बदल इ. बाबत वेळोवेळी घेण्यात आलेले मनपा ठराव क्र. **336** दि. **25.11.2008**, मनपा ठराव क्र. **373** दि. **10.02.2009** व मनपा ठराव क्र. **299** दि. **20.10.2018** इ.. ठराव करण्यात आलेले आहे. या अनुषंगाने वरील ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाचे अधिसुचना दि. **13.09.2019** अन्वये कार्यवाही करण्यास शासनानी निर्देश दिलेले आहे, याबाबत खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे:

महानगरपालिका ठराव क्र. **336** दि. **25.11.2008**, मनपा ठराव क्र. **373** दि. **10.02.2009** व मनपा ठराव क्र. **299** दि. **20.10.2018** अन्वये नागपुर महानगरपालिका मालकिच्या मालमत्ता ज्या भाडेपट्टयानी दिलेल्या आहेत, अशा मालमत्तांचा भाडेपट्टा हस्तांतरण, नामांतरण, नुतनिकरण संबंधी कार्यवाही खालील प्रमाणे करणे अपेक्षित आहे. :-

**21.** नामांतरण प्रकरणे निकाली काढणे (मुद्दा क्र. **2**)

- इ) भुखंडधारकांचे मृत्युनंतर वारसान हक्कानुसार नामांतरण करावयाचे झाल्यास रू. **1/-** प्रती चौ.फुट दराऐवजी सरसकट रू. **1,000/-** नामांतरण शुल्क आकारण्यात येईल.
- म) भुखंड अथवा बहुमजली सदनिकेच्या अनधिकृत हस्तांतरणा प्रकरणी नामांतरण करावयाचे असल्यास प्राप्त होणाऱ्या दंडाची रक्कम नामांतरण शुल्क गृहीत धरण्यात येईल.
- ग) भुखंड अथवा बहुमजली सदनिकेचे अधिकृत हस्तांतरण प्रकरणी नामांतरण करावयाचे असल्यास रू. **1/-** प्रती चौ.फुट दराने भुखंडाचे अथवा सदनिकेच्या क्षेत्रफळावर नामांतरण शुल्क आकारण्यात येईल.

22. रहिवासी/वाणिज्यिक/औदयोगिक स्वरूपाचे भुखंडाचे विभाजन हा ठराव मंजुर होण्यापुर्वी अनधिकृतपणे झाले असल्यास आणि हा ठराव मंजुर झाल्यानंतर प्रस्तावित विभाजन असल्यास अशी प्रकरणे विकास नियंत्रण नियमावलीचे तरतुदीनुसार नियमित करणे:- (मुद्दा क्र. 5)

अशी विभाजनाची प्रकरणे नियमित करावयाची असल्यास विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार खालील प्रमाणे भुखंडाचे एकुण क्षेत्रफळावर प्रचलित बाजार मुल्य दरानुसार येणाऱ्या किंमतीवर खालील प्रमाणे विभाजन शुल्क आकारण्यात येईल.

- इ) वारसान हक्कानुसार असल्यास **1** टक्के
- म) वारसान हक्काव्यतिरिक्त असल्यास **2** टक्के

23. रहिवासी/वाणिज्यिक/औदयोगिक स्वरूपाचे भुखंडाचे विभाजन हा ठराव मंजुर होण्यापुर्वी अनधिकृतपणे झाले

असल्यास आणि हा ठराव मंजुर झाल्यानंतर प्रस्तावित विभाजन असल्यास अशी प्रकरणे विकास नियंत्रण नियमावलीचे तरतुदीनुसार नियमित करणे:- (मुद्दा क्र. 6)

